

# क्रांतिशोधक

दादा धर्माधिकारी

# क्रांतिशोधक

# क्रांतिशोधक


दादा धर्माधिकारी

संकलन आणि संपादन

तारा धर्माधिकारी



पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

क्रांतिशोधक
(म-९६२)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81-7185-786-8

KRANTISHODHAK
(Marathi : Biography)
Dada Dharmadhikari
Ed. Tara Dharmadhikari

© २००२, तारा धर्माधिकारी

पहिली आवृत्ती : २००२/१९२४

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

अक्षरजुळणी
गोकर्ण एन्टरप्रायझेस
११, न्यू युनायटेड हाऊस
मनमाला टँक रोड
माहीम, मुंबई ४०० ०१६

मुद्रक
क्रिएटिव्ह क्रिएशन
११ ए, रामनिवास
केशवराव खाड्ये मार्ग
जेकब सर्कल, मुंबई ४०० ०११

जयप्रकाशजींना अभिप्रेत असलेल्या
संपूर्ण लोकक्रांतीच्या संकल्पनेला परिपूर्णता आणण्यासाठी
नवीन अध्याय लिहू इच्छिणाऱ्या
त्यांच्या समानधर्मियांना---

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | नऊ |
| मी पाहिलेले जयप्रकाश . . . ! | १ |
| जयप्रकाशांची विचारयात्रा | ११ |
| भूदान व जयप्रकाश | २१ |
| जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीची आधारशिला | ३३ |
| मानवी विकासाचा अर्थ | ५४ |
| आत्मवान अजिंक्यच असतो! | ७४ |
| जयप्रकाशांची धर्मदृष्टी | ९५ |
| जयप्रकाशजी : एक संभाषण | १०७ |

# संपादकीय

दादा ग्रंथप्रामाण्य अगर व्यक्तिप्रामाण्य मानीत नसत. विचार 'अपौरुषेय' असतो म्हणजे तो एका विशिष्ट व्यक्तीचा नसतो. तो त्या व्यक्तीला सर्वप्रथम सुचलेला असतो, म्हणून त्याच्या नावाने ओळखला जातो एवढेच! "दादा स्वतःला विचारांचे निर्माते मानीत नसत, पण ते विचारांचे वाहक होते," असे त्याचमुळे आचार्य भागवतांनी म्हटले आहे. १९६० साली आचार्य विनोबाजी दादांचे जन्मगाव मूळतापी येथे, भूदानाच्या पदयात्रेत आले होते. तेव्हा तेथील जाहीर सभेत भाषण करताना विनोबाजींनी म्हटले होते, "देशामध्ये ज्या प्रमुख नद्या आहेत, त्यांपैकी एक नदी तापी असून तिचे हे उगमस्थान (मूळतापी) आहे. त्याचप्रमाणे सर्वोदयाचे जे प्रमुख विचारप्रवाह आहेत त्यांपैकी एका विचारप्रवाहाचे (दादांचे) हे जन्मस्थान आहे. दादांविषयी मी आणखी काय सांगू? लहान मुलाला विचारले की, तुझी आई कशी आहे— त्याची आई सुंदर असू शकेल, पण ते तसे म्हणणार नाही. त्याची आई विद्वान असू शकेल. पण ते हेही सांगणार नाही. माझी आई माझ्यावर खूप प्रेम करते, एवढेच म्हणेल ते! दादांच्या बाबतीतही हेच म्हणता येईल; की दादा खूप प्रेमळ आहेत." तर अन्य प्रसंगी विनोबाजींनी म्हटले, "विचाराच्या कसोटीवर कसून विषयाची मांडणी दादा करतात. त्यामुळे ऐकण्यावर आक्रमण होत नाही; आणि तो प्रसन्न राहतो... दादांची ऋजुबुद्धी असल्यामुळे ते नेमका विचार ग्रहण करतात आणि त्याची नेमकी भाषा त्यांना स्फुरते. दादांचा योग विद्वतेचा नाही. ऋजुतेचा आहे. तशाच ऋजुतेने त्यांच्या विचारांचे अभ्यासकांनी चिंतन, मनन करावे," यापेक्षा अधिक अपेक्षा या पुस्तकाबाबतही माझी नाही. स्नेहभाव हा दादांचा जीवनयोग होता. ऋजुता हे जसे दादांचे वैशिष्ट्य होते तसेच ते जयप्रकाशजींचेही वैशिष्ट्य होते. स्वतः दादांनीच म्हटल्याप्रमाणे, "जयप्रकाशजींच्या स्वभावात बालसुलभ ऋजुता व निरागसता होती. जशी संततुल्य शुचिता होती, तशीच स्फटिकासारखी प्रांजळताही होती. ते वृत्तीने अनाग्रही होते. त्यांच्या स्वभावात औपचारिकता नव्हती. पराक्रमशील असूनही

महत्त्वाकांक्षेने जयप्रकाशजींच्या जीवनाला स्पर्शही केला नव्हता.'' कदाचित याच कारणामुळे असेल, दादांचे व जयप्रकाशांचे स्नेहपूर्व व निरपेक्ष मैत्रीचे संबंध होते. या संबंधाबद्दल लिहिताना सुप्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक व चलेजाव आंदोलनाचे नेते अच्युतराव पटवर्धन यांनी म्हटले होते की, ''दादांच्या स्नेहावर मतभेदांचे सावट कधीच येत नसे. त्यामुळे जयप्रकाशजींच्या निकट सल्लागारांत दादा येऊ शकले व जयप्रकाशजींच्या कार्यक्रमांत दादांच्यामुळे विवेकाचे भान थोडे अधिक राहू शकले.''

म्हणूनच जयप्रकाशजींवर अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली तरी, दादांचे जयप्रकाशजींचे व्यक्तिमत्त्व व जीवनकार्याचे विविध पैलू उलगडून सांगणारे पुस्तक प्रकाशित व्हावे असा अनेकांचा आग्रह होता. म्हणून दादांनी जयप्रकाशजींवर जे लिहिले होते ते संकलित व संपादित करून मी पुस्तकरूपाने वाचकांसमोर प्रस्तुत करीत आहे. जयप्रकाशजींच्या जीवनकार्याचा ज्यांना परिचय नाही त्यांना दादांच्या शब्दांतील त्यांचा परिचय मोलाचा वाटेल. तर ज्यांना जयप्रकाशजींबद्दल माहिती आहे, व जो परिचय आहे, तो अधिक संपन्न होईल.

जयप्रकाशजी स्वतःला 'क्रांतिशोधक' म्हणत. संपूर्ण क्रांती व लोकक्रांतीचे त्यांचे स्वतःचे असे अनोखे स्वप्न होते. त्यांना त्यागाचे, सेवेचे, निर्माणाचे, संघर्षाचे, संपूर्ण क्रांतीचे मार्गच मान्य होते. ती त्यांच्या शोधाची, ध्येय-निधाने होती. त्यामुळे ते त्यांच्या विफलतेवरही संतुष्ट होते. पण ते म्हणत की त्यांचे विफल जीवन शतशः धन्य होईल, जर समानधर्मी प्रिय तरुणांचा काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग ते जरासा तरी सुगम करू शकलेत. जयप्रकाशजींना अपयश आले, असे तरी कसे म्हणता येईल? परंतु तसे पाहिले तर जटायूचे अपयश किंवा अल्पयश रावणाच्या यशापेक्षा श्रेष्ठच होते ना? खरे तर जयप्रकाशजींचे संपूर्ण क्रांतीचे प्रयत्न विफल झालेत ही आमची विफलता आहे. त्यांची सफलता व विफलता यांची परिभाषाच भिन्न होती. क्रांती थांबत नसते, तर प्रत्येक पिढी क्रांतीचा पुढचा अध्याय लिहून काढीत असते. आणि क्रांतीच्या प्रगतीपथाच्या प्रक्रियेत अंतिम अध्याय नसतोच. कारण क्रांतीचा शोध सुरूच असतो. क्रांतीचे बेरीज-वजाबाकीचे अंकगणित नसते. त्यांत बीजगणितात असतात तसे संकेत असतात. क्रांतीची प्रतीके असतात. 'बुलेट' नव्हे तर 'बॅलेट'ने लोकजागृतीद्वारे सत्तापरिवर्तन होऊ शकते हे दाखवून देणारे जयप्रकाशजी दुसऱ्या क्रांतीचे 'लोकनायक' होते. त्यांना 'तरुण' आशास्थान वाटत होता. कारण त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा 'तरुण' हाच आधारस्तंभ होता. ते तर म्हणत, की ''देशातील तरुणावर माझ्या आशा केंद्रित झाल्या आहेत. तरुण म्हणजे

जनसागरांतील दीपस्तंभ. या दीपस्तंभातील प्रकाश विझू न देणे त्यांच्याच हातात आहे. मी अंथरुणाला खिळून असलो तरी मनाने व विचाराने त्यांच्याच बरोबर आहे. म्हणून तरुण मित्रांनो पुढे व्हा! संपूर्ण क्रांती अब नारा है, भावी इतिहास हमारा है!'' अशा भावी इतिहासाचा नवीन अध्याय लिहू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक 'पाथेय' ठरेल अशी मला खात्री आहे. दादांनी जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीचे जे विश्लेषण केले आहे ते अनेक दृष्टींनी मोलाचे आहे. टेरेन्स मॅक्सविनी चौऱ्याहत्तर दिवसाचा उपवास केल्यावर आसन्न मरण स्थितीत होता. त्या वेळी त्याचे मित्र म्हणाले, ''आता सारे संपले. तू पराभूत झालास.'' मॅक्सविनी म्हणाला, ''मित्रांनो, मी मरणार आहे. हरणार नाही. मी पराभूत झालो नाही.'' एका आत्मवान पुरुषाचे हे उद्‌गार होते. आणि हेच जयप्रकाशजींबद्दल म्हणता येईल, असा प्रत्यय हे पुस्तक वाचणाऱ्यांना येईल अशी मला आशा नव्हे खात्री आहे.

हे पुस्तक दादांनी जयप्रकाशजी व संपूर्ण क्रांती याबाबत वेळोवेळी, जे लिहिले होते त्याचे संकलन आहे. संकलन व संपादन याच्याही काही मर्यादा असतात. अनेकदा ती चिंध्याची गोधडी असते. परंतु ती तशी होऊ नये व निरनिराळे धागे जोडून एक 'ताना-बाना' प्रस्तुत करावा असा प्रयत्न मी केला आहे. तो कितपत यशस्वी झाला हे वाचकांनीच ठरवावयाचे आहे. 'संपूर्ण क्रांतीची आधारशिला' हे संपूर्ण प्रकरण आणीबाणीचे वेळी, जनबोध प्रकाशनने 'संपूर्ण क्रांती' या शीर्षकाने प्रसिद्ध केलेली दादांच्या भाषणांची पुस्तिका, यावर आधारित आहे. तर शेवटचे प्रकरण, आमचे सुहृद व दादांचे स्वायत्त ज्येष्ठ पुत्र कै. श्रीपाद जोशी, यांनी दादांची घेतलेली मुलाखत, जी 'जयप्रकाश : एक संभाषण' या नावाने पुस्तिकेच्या रूपात किर्लोस्कर प्रेस प्रकाशनने प्रसिद्ध केली होती, त्यावर आधारित आहे. ही मुलाखत आहे त्याच रूपात प्रसिद्ध करावी असा निर्णय मी घेतला, कारण श्रीपाद जोशी यांनी विचारलेले प्रश्न जर समजून घेतले नाहीत, तर दादांनी दिलेली उत्तरे कुठल्या संदर्भात दिली होती, ह्याचे संपूर्ण ज्ञान होऊ शकणार नाही. अनेकदा उत्तरांचा आवाका कळावा म्हणून प्रश्न समजावून घेण्याची गरज असते. किंबहुना प्रश्नांच्या उदरातच त्याची उत्तरे सामावलेली असतात. ही संपूर्ण मुलाखत प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल मी श्रीपाद जोशी यांची ऋणी आहे. त्यांचे आभार मानण्याइतपत माझी पात्रता नाही. जन्मभर त्यांच्या ऋणांत राहणेच माझ्यासारखीला शोभून दिसेल. तेच मी पसंत करीन. हे पुस्तक इतक्या डौलदार व दिमाखदार स्वरूपात प्रकाशात आणले, त्याबद्दल पॉप्युलर प्रकाशनाचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांचे, दादांचे व

जयप्रकाशजींचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळेच त्यांच्या प्रेमापोटी त्यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरविले असावे. पुस्तकाचे श्रेय त्यांचे आहे. मी फक्त निमित्त झाले. एवढेच! या पुस्तकाची किंमत सामान्य वाचकांस परवडण्यासारखी असावी म्हणून कलमनयन बजाज ट्रस्ट व सर्वोदय आश्रम, नागपूर यांनी जे साहाय्य केले त्याकरिता मी त्यांची आभारी आहे.

१ ऑक्टोबर २००२ **तारा धर्माधिकारी**

मुंबई

पथ है अहिंसाका
कांटोभरा
वीर है वो
जो उसपर चला

१

# मी पाहिलेले जयप्रकाश . . . !

जयप्रकाश नारायणांचे विभूतिमत्त्व अद्वितीय आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सद्‌गुणांचे विविध पैलू आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन अद्‌भुतरम्य तर आहेच, पण त्याबरोबरच इंद्रधनुष्यासारखे मोहकही आहे. जनतेचे दूत असलेले जयप्रकाश केवळ ह्या देशाचे एक अपक्ष नागरिकच नाही, तर निष्पक्ष लोकनिष्ठ जीवनाचे प्रतीक आहेत. केवळ विशाल जनसमुदायाचे ते उपासक नाहीत, तर लोकात्म्याचे एक दक्ष पहारेकरी आहेत. गेल्या काही वर्षांपासून लोकात्म्याचे आणि विश्वात्म्याचे स्वरूप प्रत्यक्ष लोकजीवनात उतरविण्याची ते पराकाष्ठा करीत आहेत. म्हणूनच भारतीय नागरिकांबरोबरच ते विश्वनागरिकही मानले जातात. त्यांचा स्वतःचा देशही आता क्षितिजव्यापी झाला आहे. ह्याच कारणावरून ते जनतेचे अनिर्वाचित, स्वयंसिद्ध प्रतिनिधी मानले जातात.

चिंतामणराव देशमुख म्हणाले होते की, ''जयप्रकाश हे लोकात्म्याचे पुजारी आहेत.'' इमर्सनने म्हटले आहे की, ''जेवढे थोर पुरुष होऊन गेले, त्यांच्यासंबंधी सदा गैरसमज पसरलेले असतात.'' ह्या अर्थाने जयप्रकाशांचे व्यक्तित्व वादग्रस्त असले तरी मोठे मनोहर आहे. त्यांना विरोधक किंवा शत्रू विरळाच आहे. प्रतिस्पर्ध्यांना नेहमी असेच वाटत असे की, ते आपल्याबरोबर असते तर फार बरे झाले असते. अशा विरोधामध्ये स्तुतीचाच भाग अधिक असतो आणि अशा टीकेनेही गौरवच होत असतो.

मला आठवते, मी जयप्रकाशांना प्रथम १९३३ किंवा १९३४ मध्ये नागपूरला पु. य. देशपांडे ह्यांच्याकडे भेटलो. पहिल्या भेटीतच छाप पाडण्याचा गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. खऱ्या अर्थाने ते रूपवान, देखणे नाहीत; परंतु एकूण त्यांच्या मुद्रेवर अतिशय मधुर व स्निग्ध भाव आहेत. त्यांचा नीलकमळ सावळा वर्ण त्यांच्या रूपाची शोभा वाढवितो. त्यानंतर जेव्हा जेव्हा त्यांना भेटण्याचा योग आला, तेव्हा तेव्हा त्यांची प्रथमदर्शनी पडलेली ही छाप अधिकाधिक दृढ होत गेली. पु. य. देशपांडे ह्यांच्याकडे त्यांनी समाजवादाचे विवेचन करताना जे

विश्लेषणात्मक भाषण केले, त्यामध्ये त्यांची प्रतिभा दिसून आली. त्यामुळे पहिल्या भेटीतच मला त्यांचे मंत्रमुग्ध करणारे अस्तित्व जाणवले.

या देशाचे सर्व नागरिक त्यांना वीरपुरुष म्हणूनच ओळखतात व मानतात. स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्यांनी सैनिक व सेनापती ह्या दोन्ही रूपांत जो अतुल पराक्रम व साहस दाखविले, त्याची कहाणी रोमांचकारी व हृदयस्पर्शी आहे. परंतु जो खरा वीर पुरुष असतो त्याच्या व्यक्तित्वात कारुण्य काठोकाठ भरलेले असते व तो लोण्याप्रमाणे मऊ व मृदुल असतो. जयप्रकाशांच्या स्वभावात इतकी निर्व्याजता आहे की, ती पाहणाऱ्याला भेदून जाऊ शकते. प्रसंगानुसार त्यांच्यात क्रोध आणि आवेश जागृत होतो. परंतु मूलतः करुणेची प्रेरणाच अधिक असते. म्हणून त्यांच्या आवेशातून अथवा क्रोधातून अशुभ परिणाम कधीच होत नाहीत. बुद्धी आणि हृदय, ऋजुता आणि प्रांजलता ह्यांचे अद्‌भुत मिश्रण त्यांच्या व्यक्तित्वात उमटले आहे. ज्या वेळेस ज्या सत्याचे त्यांना दर्शन होते, त्या सत्याचे ते संपूर्ण चित्ताने ग्रहण करतात आणि प्राणपणाने त्या सत्याचा प्रत्यक्षात पाठपुरावा करण्यासाठी स्वतःला झोकून देतात. परंतु दुसऱ्याची भूमिका समजून घेण्यास ते नेहमी तयार असतात. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, कोणतीही राजकीय प्रणाली, संप्रदाय, संस्था ह्यांच्या सीमांनी ते बंदिस्त होऊ शकले नाहीत. ते जुन्या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये होते, साम्यवादी होते, समाजवादी होते आणि आता ते सर्वोदयी आहेत. परंतु कोणतीही विचारधारा त्यांचे व्यक्तित्व सीमित करू शकली नाही. आजही ते सर्वोदयाचे प्रतिनिधी आहेत, पण त्याहीपेक्षा ते अधिक मोठे आहेत. त्यामुळेच त्यांना नवीन विचार ग्रहण करताना व जुन्यापुराण्या विचारांच्या श्रृंखला तोडून टाकताना जड जात नाही. त्यांच्या जीवनातील सजीवता हीच ह्या सर्वांमागील मूळ प्रेरणास्रोत आहे.

समाजवादाचे इंग्लंडमधील अग्रगण्य भाष्यकार मॅकडोनाल्ड ह्याने समाजवादाच्या आपल्या पहिल्या पुस्तकात लिहिले आहे की, "राष्ट्रातील थोर पुरुषांचा इतिहास रोमांचक असतो." आमच्या देशातील समाजवादाचा इतिहास लिहिताना ज्या थोर पुरुषांचा उल्लेख करावा लागेल, त्यात जयप्रकाशांचे स्थान अग्रगण्य राहील. रंगून येथे समाजवादी व्यासपीठावरून बोलताना जयप्रकाश म्हणाले होते, "भावी समाजवादी क्रांतीचा नायक मजूर राहणार नाही, तर किसान राहील." परंपरावादी समाजवाद्यांच्या विचारांत आणि त्यांच्यात हा मोठा फरक दिसून येतो.

"वैज्ञानिक समाजवादाची प्रगती व्हावयाची असेल तर त्यात हिंसेला मुळीच स्थान राहणार नाही" अशी घोषणा देणारी जयप्रकाश हीच सर्वप्रथम व्यक्ती होती.

लोकशाही समाजवादी नेत्यांनीही ही घोषणा केली होती, परंतु वैज्ञानिक, क्रांतिकारी समाजवादी नेत्यांत जयप्रकाश हेच पहिले होते. समाजवादी आंदोलनाचे पुढारी ह्या नात्याने त्यांनी सांगितले होते की, भौतिक वातावरणातून सदाचाराची प्रेरणा मिळू शकत नाही. भौतिक आकर्षणाव्यतिरिक्त अन्य मूलभूत मानवीय प्रेरणेच्या दिशेनेच पावले उचलावी लागतील. यातच समाजवादाच्या आधुनिकतम वैज्ञानिक स्वरूपाचे दर्शन जयप्रकाशांनी दिलेले आहे. भारतीय समाजवादी पक्षाची स्थापना करताना जयप्रकाशांनी 'व्हाय सोशॅलिझम' हे पुस्तक लिहिले. त्यात गांधीवादावर टीका करतानाच समाजवादावरील आक्षेपांचे खंडन केले होते. एक आक्षेप असा होता की समाजवादाचा मनुष्यावर विश्वास नाही. उत्तर देताना जयप्रकाश म्हणाले, ''समाजवादाच्या मूलभूत धारणेत जर मनुष्यावर विश्वास नसता तर पूर्ण सत्ता व संपत्ती मूठभर लोकांच्या हाती सोपविलेली आहे, अशासारखे मुद्दे कसे उपस्थित होऊ शकले असते? मनुष्याच्या मूलभूत सत्प्रवृत्तींवर जर विश्वास नसता, तर या गोष्टी कशा संभवल्या असत्या?''

अशा तऱ्हेने जयप्रकाशांच्या व्यक्तित्वविकासात आमच्या देशाच्या समाजवादाच्या विकासाचे दर्शन घडून येते. आता प्रभावतीजींना जयप्रकाशजींच्या सहवासाची ओढ होती. त्या गांधीजींना म्हणाल्या, ''मुझे लगता है कि जयप्रकाश के साथ कुछ दिन रहूंगी तो आपके विचार उन्हें समझा सकूंगी।''

गांधीजी हसत हसत म्हणाले, ''विचार समझाने के लिये नहीं, सेवा के लिये उसके साथ रहो। उसे सेवा की जरूरत है। उसके स्वास्थ्य को संभालना।''

२९ जानेवारीला रात्री त्या पाटण्याला रवाना झाल्या आणि ३० जानेवारीला गांधीजींचा खून झाला.

जीवनाच्या या टप्प्यापर्यंत त्यांना गांधींची शीतल छाया लाभली होती. आणि आता तो आसरा कायमचा हरवल्यावर अहिंसेवर श्रद्धा बसलेल्या जयप्रकाशजींकडे त्या आल्या होत्या. त्यांच्या सेवेसाठी, त्यांना समजावण्यासाठी, अगदी कायमच्या त्यांच्या सहवासासाठी, त्यांना धीर देण्यासाठी !

—आणि गांधीजींचे कार्य पुढे चालवण्यासाठी, त्यांचा संदेश फैलावण्यासाठी, त्यांनी दिलेला शेवटचा आदेश पाळण्यासाठी त्या आता कायमच्या बांधल्या गेल्या होत्या.

जयप्रकाशांचे मार्क्सवादाचे अधिष्ठानच कोसळले होते. प्रभावती ह्या चमत्काराकडे अतिशय प्रेमाने, हळुवारपणाने आणि तृप्ततेने पाहत होत्या. त्यांच्या संघर्षाचे अधिष्ठानही कोसळले होते, नाहीसे झाले होते.

प्रभावती कृतकृत्य झाल्या होत्या. त्यांच्या व्रताची सांगता पूर्ण झाली होती.

प्रसन्न सात्त्विक तेजाने त्या तळपत होत्या. तृप्त झाल्या होत्या. उणीव एवढीच की हे बघण्यास गांधी हयात नव्हते. ते त्यांचे अंःतस्थ दुःख होते.

भूदानासाठी लोकांनी जमिनीचे दान करावे म्हणून जयप्रकाश जेव्हा विराट सभांमधून भाषण देऊ लागले, तेव्हा त्यांना भारतीय जनमनाची कल्पनाही नव्हती. एकदा एका सभेत ते म्हणाले, ''यह कर्ण की, हरिश्चंद्र की भूमी हैं, अपनी हड्डियों का दान देनेवाले दधीचि की भूमी हैं। कोई देगा यहाँ भूदान, संत विनोबा को?'' सर्व सभा स्तब्ध झाली. फाटके मळके कपडे घातलेला एक शेतकरी उठला. व्यासपीठाजवळ आला आणि म्हणाला, ''माझी सहा बिघे जमीन आहे. सर्वच्या सर्व दान करतो आहे. लिहून घ्या.''

''सर्व जमीन देऊ नकोस, तू काय खाशील?'' असे त्याला समजावण्याचा जयप्रकाश प्रयत्न करू लागले. पण तो म्हणाला, ''देवानं मला हातपाय दिले आहेत. मी कमावून खाऊ शकतो. आजपर्यंत मी जमीन असण्याचा आनंद भोगला. आता तो दुसऱ्या कुणा भूमिहीनाला भोगू दे.''

जयप्रकाश स्तंभित झाले! खरोखरच भोळेभाबडे कर्णासारखे, हरिश्चंद्रासारखे लोक भारतात आहेत ह्याचा ते साक्षात अनुभव घेत होते. एक मार्क्सवादी, लोकांकडून अहिंसक क्रांतीची दीक्षा घेत होता. प्रभावतीजी ते दृश्य अंतःकरण भरून भरून पाहत होत्या.

जयप्रकाशांचे भूदान विश्लेषणविवेचन ठिकठिकाणी चालू होते आणि त्याबरोबर चिंतनही! १९५४ च्या बोधगया येथील संमेलनात जयप्रकाशजींनी सांगितले, ''इस महान कार्य के लिये मैं अपना जीवनदान देता हूँ।''

प्रभावतीजींच्या डोळ्यांना खळ नव्हता. त्यांच्या उत्साहाला आता उधाण आले होते. त्यांचे कार्य द्विगुणित झाले होते. सोखोदेवरा आश्रमाचे काम आणि जयप्रकाशजींची काळजी! अनेक वर्षांपूर्वी प्रभावतींनी जयप्रकाशजींना लिहिले होते. ''...हम दोनों साथ रहकर सहयोग से काम करे...'' तो दिवस कधी उगवेल, असे त्यांना वाटले नव्हते. आज प्रभावती सर्वांच्या दिदी बनल्या होत्या आणि जयप्रकाशांच्या तर दिदी, माता सर्व काही होत्या. आजपर्यंत जयप्रकाशांच्या कार्यात त्यांचा सेवाभाव पणाला लागत होता. आता त्यांच्या कार्याचीही कसोटी होती. दोघांच्या विचारातील तफावत सरली होती.

समाजवादाच्या वाटचालीत जयप्रकाशांना उसंत नव्हती. आज ह्या गावात तर उद्या दुसऱ्या शहरात. आज दिल्ली तर उद्या मुंबई, परवा नागपूर, मद्रास, पाटणा असा अखंड प्रवास चालूच होता आणि त्यांच्या या झंझावाती प्रवासात त्यांची तैनात प्रभावती तितक्याच तत्परतेने ठेवीत होत्या. गांधींच्या शिकवणुकीत

तयार झालेल्या आणि जयप्रकाशांबद्दलच्या जिव्हाळ्याने जयप्रकाशांच्या गरजा आणि मन त्यांनी सांगण्याआधीच ओळखणाऱ्या प्रभावती कुठेच कमी पडत नव्हत्या. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या सर्वांबरोबरच स्वतःच्या कार्यातही त्यांनी कधी खंड पाडला नाही. पाटण्याची 'महिला चरखा समिती' प्रभावतींचेच अपत्य. स्त्रियांमध्ये जागृतीचे आणि विधायक रचनात्मक कार्य करणाऱ्या त्या समितीसाठी सर्व प्रकारचे कष्ट त्यांनी उपसले होते. मुंबईमध्ये जयप्रकाशजींचा मुक्काम असला की ह्या कार्यासाठी देणगी मिळविण्याचे काम त्या वेळात वेळ काढून करीत. जयप्रकाशांची सेवा व त्यांच्या कार्यक्रमाची चोख व्यवस्था ठेवून चरखा समितीचे काम त्या केव्हा आणि कसे करू शकत असतील, ह्याचे कोडे जयप्रकाशांचा स्वभाव आणि कार्याचा उरक माहिती असणाऱ्यांना नेहमीच पडे. पण सेवा हा प्रभावतींचा सहजधर्म होता. चंदनाच्या सुवासाला वेगळे कसे दाखवणार?

१९५२ सालच्या निवडणुकीसाठी समाजवादी पक्षाची मोहीम धुमधडाक्याने सुरू होती. जयप्रकाशांच्या पायाला फिरतीचा भोवरा बांधलेला होता. प्रचंड उत्साह, प्रचार सभा, बैठका आणि गर्दीही प्रचंड ! तितकेच प्रचंड नैराश्य, निकाल लागल्यावर ! रात्रंदिवस अनेक कार्यकर्ते, त्यांच्या चर्चा आणि हरण्याचे विश्लेषण ! त्याबरोबर जेवणखाण, नास्ता, चहा ह्यासाठीही काळवेळ नाही. प्रभावतीजी येथेही कमी पडल्या नाहीत. उदबत्तीचा सुवास दरवळत होता...

विनोबांची भूदानाची पदयात्रा अखंड चालू होती. अहिंसक क्रांतीचा विचार ऐकण्यास हजारो लोक जमत होते. उत्तर प्रदेशात बांदा जिल्ह्यात विनोबाजी पोचले. जयप्रकाश त्यांना भेटले. चर्चा झाली. विनोबा म्हणाले, ''क्या हिंसा कभी आम जनता की ताकद बन सकती है? वह तो मुठ्ठीभर लोगों की ही ताकद है। आम जनता की ताकद है—अहिंसा।''

विनोबांशी तासन् तास चर्चा झाल्यावर, ऐकून समाधान झाल्यावर जयप्रकाशांनी भूदानासाठी काही वेळ देण्याचे आश्वासन विनोबांना दिले.

जयप्रकाशांचे हे वैचारिक परिवर्तन प्रभावतीजी प्रत्यक्ष पाहत होत्या. त्यांच्या श्रद्धा सफल होत होत्या. वर्षानुवर्षे अंतःकरणात बाळगलेली आकांक्षा साकार होत होती.

पोस्टमन युनियनच्या मागण्यांच्या वेळी जयप्रकाशांनी आत्मशुद्धीसाठी केलेल्या एकवीस दिवसांच्या उपवासात जयप्रकाशांना आंतरिक शांती, अद्‌भुत आनंद, प्रसन्नता लाभली. त्यातून त्यांनी चिंतन केले. माणसाने चांगले का असले पाहिजे? चांगल्याच्या पाठीमागची प्रेरणा कोणती? त्यांना साक्षात्कार झाला की,

'डायलेक्टिकल मटिरियालिझम' (विरोध-विकासवाद) ह्याचे उत्तर देऊ शकणार नाही. केवळ भौतिकवादात ह्या प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही. ह्याही पलीकडे काहीतरी आहे. ह्या उपोषणात जयप्रकाशांभोवती प्रभावती छायेसारख्या वावरत होत्या. सेवेत चंदनासारख्या झिजत होत्या. त्याचा सुगंध जयप्रकाशांच्या अंतरात्म्यात भरून राहत होता आणि जयप्रकाशांना गीता म्हणण्याला आणि उपनिषदे वाचण्याला प्रेरणा देत होता.

सर्वोदयाचा विचार अधिक विज्ञाननिष्ठ, समृद्ध आणि केवळ मानवतावादी नव्हे, तर अधिक आध्यात्मिक झालेला आहे.

त्यांच्या एका नामवंत मित्राने लिहिले आहे की, ''जयप्रकाशांची जीवनगाथा म्हणजे गमावलेल्या संधीची कहाणी आहे.'' परंतु सत्य हे आहे की त्यांनी कधी संधी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. संधी आपोआप वेळोवेळी त्यांच्याकडे चालून आली. परंतु त्या संधीचा फायदा घेण्याची कल्पना जयप्रकाशांच्या मनातही आली नाही. येशूने म्हटले आहे, ''जो आपल्या जीवनात त्याग करतो, वैराग्य पत्करतो, त्यालाच जीवनाची सार्थकता लाभते.'' लोक असेही म्हणतात की, ''जयप्रकाश नेहमी बस चुकतच आले आहेत.'' पण खरी गोष्ट अशी आहे की, जयप्रकाशांनी बसची प्रतीक्षाच केली नाही. तिबेट, काश्मीर, नागालँड, बांगलादेश, भारत, पाकिस्तान ह्याबाबतच्या समस्यांची सोडवणूक व्हावी म्हणून त्यांनी आपले प्राणही पणाला लावले, एवढेच नव्हे तर आपली सारी प्रतिष्ठा व राजकीय जीवनच पणाला लावून टाकले होते. अशा तऱ्हेने स्वार्थाचे जिथे भानच नाही, तिथे संधी प्राप्त करून घेण्याची, अवसर शोधण्याची गरजच काय?

जयप्रकाशांची पराक्रमयात्रा जितकी उदात्त, रम्य व मनोज्ञ आहे, तेवढीच विचारयात्रादेखील आहे. पराक्रमयात्रेत क्रांतिकारी जयप्रकाशांची बुद्धी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार करताना कधी कुंठित झाली नाही, तशी शांतिसंपन्न क्रांतीचा शुद्धिपूर्वक पुरस्कार केल्यावर त्या मार्गातील वीरवृत्तीही केव्हाही कुंठित झाली नाही; अकुतोभयवृत्ती हे वीरतेचे लक्षण आहे. जेव्हा काश्मीर व अक्साई चीनच्या मामल्यात लोकमताच्या विरोधात ते आपली मते प्रकट करू लागले, तेव्हा दिल्ली येथे सार्वजनिक सभेत त्यांना धडा शिकविण्याचा काही लोकांनी विचार केला. त्या सभेत क्षुब्ध, तापलेले वातावरण पाहून काही शांतिसैनिकांनी आपले पिवळे दुपट्टे लपविण्याचा प्रयत्न केला. परंतु जयप्रकाश थोडेसुद्धा विचलित झाले नाहीत. असाच दुसरा एक प्रसंग काश्मीरमध्ये झाला तेव्हा त्यांनी शेख अब्दुल्लांच्या उपस्थितीत काश्मिरातील जनतेला सांगितले की, ''काश्मिरच्या भवितव्याचा विचार भारतीय संघराज्याच्या बाहेर जाऊन होऊच शकत नाही.''

अशा तऱ्हेने त्यांची ही अकुतोभयवृत्ती त्यांच्या कर्मकांडाबरोबर त्यांच्या विचारयात्रेलाही स्पर्शून गेली आहे. ते विचार करतात, त्या विचारांचे संपूर्ण निष्ठेने ग्रहण करतात; परंतु त्यांच्या निष्ठेने जिज्ञासेचा अंत होत नाही. त्यांची जिज्ञासा सतत कायम राहते. त्यामुळे मतांचा अभिनिवेश असूनही त्यांच्या वृत्तीत आग्रह नसतो., अनाग्रह हेच बुद्धिमंताचे खरे लक्षण आहे. दुसऱ्याची भूमिका समजून घेण्याची तत्परता जयप्रकाशांच्या बुद्धिनिष्ठेचा स्थायीभाव आहे. परिणामतः त्यांच्या स्वभावात उत्कटता असूनही असहिष्णुता नाही. ह्याचा शुभ परिणाम असा झाला की, त्यांची नवे विचार ग्रहण करण्याची क्षमता केव्हाच कमी झाली नाही.

अनाग्रहामुळेच त्यांचा स्नेह व सहृदयता मतभेदांना बाजूला सारून प्रतिस्पर्ध्याच्या हृदयाला स्पर्शून जाते. जयप्रकाशांचे स्वतःचे समर्थन कधी कधी आवेशपूर्ण झाल्याने असहिष्णुतेच्या सीमारेषेवर पोहोचल्यासारखे भासते. परंतु त्यांच्या हृदयाची उदारता साऱ्या मतभेदांना ओलांडून मानवी स्नेहसंबंधांना परिपुष्ट करीत असते. डॉ. लोहियांशी त्यांचे कित्येक वेळा मतभेद झाले. कटुता आली. परंतु मनात खोलवर असलेले सौहार्द जसेच्या तसे कायम राहिले व ते मृत्युसमयी प्रकट झाले. कोणत्याही प्रसंगी सत्याचा शोध घेण्याची दुर्दम्य आकांक्षा त्यांच्या मनात वसत असल्यामुळे क्षुद्र मताग्रहापासून ते नेहमीच बचावतात. साधारणतः कम्युनिस्टांवर त्यांचा फारसा विश्वास व श्रद्धा नाही, परंतु मागच्या निवडणुकीनंतर ज्योती बसूंनी सत्तारूढ पक्षावर जेव्हा गंभीर आरोप केले, तेव्हा ते सत्यपरिस्थितीचा शोध घेण्यासाठी आढेवेढे न घेता एकदम तयार झाले.

परंपरागत अर्थाने जयप्रकाश हे अशा व्यक्तींमधील नाहीत की ज्यांनी सत्याचा शोध हेच आपले जीवनाचे प्रयोजन मानले. परंतु वस्तुनिष्ठ व सत्यनिष्ठ विषयांबाबत त्यांची भूमिका नेहमी प्रशंसनीय राहिली. परिणाम असा झाला की, जेव्हा जेव्हा त्यांनी सत्याचे ग्रहण केले तेव्हा तेव्हा त्यांची अहंमन्यता कधीच आड आली नाही. चांडिल येथे १९५३ साली भरलेल्या सर्वोदय संमेलनात विनोबांचे अविस्मरणीय प्रवचन ऐकल्यानंतर त्यांनी एकदम भरसभेत जाहीर केले की आता माझ्या साऱ्या शंका दूर झाल्या आहेत. मी स्वतःला विनोबांचा शिष्य म्हणवून घेण्यास तयार आहे. अशी निरहंकारिता दर्शविणारे अनेक प्रसंग त्यांच्या जीवनात आले.

परिस्थितीजन्य आव्हान जेव्हा त्यांच्यासमोर उभे राहते, तेव्हा ते सहज प्रेरणेने त्याचा स्वीकार करतात. अशा वेळी ते उत्तेजित होत नाहीत. त्यांच्या जीवनात स्थित्यंतरे आली तेव्हासुद्धा त्यांनी आपल्या अंतःप्रेरणेचे दूरगामी निर्णय

अगदी सहजतेने घेतले. विनोबांच्या आंदोलनात सामील झाल्यावर वारंवार पार्टी सोडण्याबद्दल जेव्हा त्यांना विचारणा होऊ लागली, तेव्हा ते म्हणाले, ''माझ्या जीवनातील कोणतेही महान निर्णय, कोणतेही स्थित्यंतर करणारे संकल्प मी ठरवून घेतलेले नाहीत, ते निर्णय मी सहज प्रेरणेने घेतले आहेत.''

१९५४ साली बोधगया येथील सर्वोदय संमेलनात त्यांनी जीवनदानाची घोषणा केली तेव्हा त्यांना स्वतःलाही माहीत नव्हते की पुढच्या क्षणी ते अशी घोषणा उच्चारणार आहेत. त्यांच्या निर्णयामागे कधीही नफ्यातोट्याचा हिशेब नव्हता किंवा नफानुकसानीचा मापतोल नव्हता.

अशाच तऱ्हेने कोणत्याही सामाजिक अथवा राष्ट्रीय संकटाच्या वेळी त्यांनी जे निर्णय घेतले, ते असेच उत्स्फूर्त होते. ज्याला आपण दातृत्व अथवा उदारता म्हणतो, ती त्यांना कधी जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक जोपासावी लागली नाही. त्याचमुळे 'इलस्ट्रेटेड वीकली'च्या संपादकांनी लिहिले होते की, ''हा माणूस सतत देतच जातो, परत घेणे याला माहीतच नाही.''

बंगलोरमध्ये एका साधू पुरुषाच्या दर्शनाला जाताना मला त्यांच्याबरोबर राहण्याची संधी प्राप्त झाली होती. त्या साधूने वारंवार एकच गोष्ट सांगितली की, ''आपले हृदय अत्यंत शुद्ध आहे.'' जयप्रकाशांच्या बाबतीत हे त्रिवार सत्य आहे. कारण समाजात असे अनेक साधुवेशधारी पुरुष आहेत की ज्यांची हृदये ही राजकारण्यांची व मुत्सद्द्यांची आहेत. परंतु जयप्रकाशांचे हृदय खरोखरच संताचे आहे.

जयप्रकाशांच्या हृदयात जशी संततुल्य शुचिता आहे, तशी स्वभावामध्ये बालसुलभ ऋजुता व निरागसता पण आहे. ते सर्वोदय आंदोलनात आले तेव्हा त्यांना आपल्या राहणीमुळे खूप संकोच वाटत असे. त्यांच्या राहणीत विलासिता किंवा प्रसाधनप्रियता मुळीच नाही. परंतु सद्भिरुची व रसिकता भरपूर आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीचा ढंग 'ऐटबाज' वाटे. हे पाहून काही सर्वोदयी कार्यकर्ते कुजबुजत. धीरेंद्रभाईंनी हुजूर-मजूर शब्द वापरले तेव्हा जयप्रकाश फार संकोचले व बेचैन झाले व मोठ्या मुश्किलीने त्यांनी त्यांची बेचैनी दूर केली. ते स्तुतिपाठकांना हाताशी धरणारे नाहीत. लवकरच प्रसन्न होतात. बालकाप्रमाणे लवकरच रागावतात व लवकरच प्रसन्न होतात. त्यांची प्रांजलता स्फटिकाप्रमाणे आहे. त्यांच्या व्यवहारातील सौंदर्य व सभ्यता अनुकरणीय आहे. त्यांच्या स्वभावात औपचारिकता नाही. त्यामुळे त्यांचे स्वभावदोष दुसऱ्याला दुःखदायक नाहीत.

दुर्दम्य पराक्रमशीलता असूनही जयप्रकाशांच्या जीवनाला महत्त्वाकांक्षेने

स्पर्शही केला नाही. म्हणूनच त्यांच्या मित्रांनी त्यांच्या जीवनाला 'गमावलेल्या संधीची कहाणी' म्हटले आहे. प्रत्यक्षात अशी दोन-तीन उदाहरणे तर मला माहीत आहेत; त्यांना जनतेने व मान्यवर व्यक्तींनी पंतप्रधान व राष्ट्रपती होण्यासाठी गळ घातली आणि त्यांनी नम्रतापूर्वक व दृढतेने नकार दिला आणि असेही म्हटले की, "अहिंसेच्या ठिकाणी माझ्या मनात जी निष्ठा निर्माण झाली आहे ती लक्षात घेता मी ह्या पदांचा स्वीकार करू शकत नाही." ह्याच जयप्रकाशांनी बांगलादेश प्रकरणी निःसंकोचपणे म्हटले होते की, "कदाचित माझी अहिंसा एखाद्या शांतिसैनिकाइतकी संपूर्ण नसेलही, म्हणून मी शांतिसेनेतून निवृत्त होण्यास तयार आहे." त्यांच्या एका निकटतम समाजवादी मित्राने त्यांना सांगितले की, तुम्ही परिस्थितीशी मुकाबला करण्यालायक राहिले नाही, तेव्हा त्यांचे राजकीय सत्तेपासून दूर राहणे कसे योग्य आहे हे त्यांनी अत्यंत शांतपणे सांगितले. त्यांच्या व्यक्तित्वात अंतर्बाह्य प्रामाणिकपणा व वीरवृत्ती ह्या अभिन्न सहचारिणी होत्या.

जयप्रकाशांची हृदयशुचिता, असीम व्यापकता आणि अबाधित उदारता, चंबळ घाटीच्या व बुंदेलखंडातील डाकूंनी आत्मसमर्पण केले तेव्हा प्रत्ययास आली. डाकूंना समजाविण्यासाठी अथवा मनविण्यासाठी जयप्रकाश गेले नव्हते. दरोडेखोर आपणहून त्यांच्याकडे आले होते. ३१ मे १९७२ मध्ये जेव्हा बुंदेलखंडातील दरोडेखोरांच्या आत्मसमर्पणाचा समारंभ जयप्रकाशांच्या अध्यक्षतेखाली व्हावयाचा होता व त्यांच्या आजारपणाच्या कारणास्तव तो समारंभ पुढे ढकलण्याचा प्रसंग आला तेव्हा दरोडेखोरांनी सांगितले की जयप्रकाशांखेरीज दुसरा माणूस आम्हांला चालणार नाही. जेथे ते असतील तेथे जाऊन आम्ही त्यांना शस्त्रे समर्पित करू. जयप्रकाश जे काम घेतात, त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून देतात, त्यात काही कसर ठेवीत नाहीत. परंतु त्यांची एकाग्रता एकान्तवासात लुप्त होत नाही. एकनिष्ठेतेसोबत निरंतर सार्वत्रिक सावधानताही असते. म्हणून ह्या जगात घडणाऱ्या कोणत्याही महत्त्वपूर्ण घटनेबाबत ते आपले मत निर्भयतेने, विनासंकोच प्रकट करतात व काही सक्रिय पावले उचलावयाची असतील तर तेथेही मागे राहत नाहीत.

काही लोक त्यांच्यावर आरोप करतात की, जयप्रकाश राजकारणात हस्तक्षेप करण्यात रस घेतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, जयप्रकाशांनी संकुचित राजकीय क्षेत्राच्या मर्यादा सोडून विशाल लोकनीतीच्या क्षितिजव्यापी समाजप्रबोधनाच्या कार्यास स्वतः वाहून घेतले आहे. तलावातून समुद्रात प्रवेश केला आहे. पंतप्रधान वा राष्ट्रपती ह्यांसारखी पदे महान आहेत ह्यात शंका नाही. परंतु निरुपाधिक नागरिकता त्याहूनही महत्त्वाची आहे आणि त्या दृष्टीने

जयप्रकाशांचे व्यक्तित्व अधिक व्यापक बनत चालले आहे. स्वर्गीय हिंदी साहित्यिक रामवृक्ष बेनीपुरी यांनी अत्यंत सुंदर शब्दांत त्यांचे चरित्र लिहिले आहे. परंतु जयप्रकाश म्हणतात, ''त्यांनी अतिशयोक्ती केली आहे.'' हाच त्यांच्या जीवनाचा मापदंड आहे.

जयप्रकाशांच्या जीवनात व्रत व संकल्प ह्यांना स्थान नव्हते. परंतु प्रभावतीजींनी ब्रह्मचर्याचे व्रत घेतले व जयप्रकाशांनी ते सहयोगी म्हणून अंगिकारिले. त्यात त्यांना कोणतेही प्रयास पडले नाहीत. सहजस्फूर्त दाम्पत्य-ब्रह्मचर्य स्वीकारण्यात 'जय-प्रभा'ची जोडी अद्वितीय आहे. जयप्रकाशांच्या काही घनिष्ठ मित्रांना वाटते तेवढे प्रभावतीजींचे व्यक्तित्व भव्यदिव्य नसेलही, परंतु गुणात्मकतेच्या बाबतीत ते निःसंशय श्रेष्ठ होते. अशी दुर्दम्य सत्यनिष्ठा आणि अंतर्बाह्य शुचिता विरळाच दिसते. खरे तर त्यांना माहीतच नव्हते की, 'जय-प्रभा' ही एक दुसऱ्याहून अधिक सरस ठरणारी जोडगोळी होती. असे दुसरे उदाहरण माझ्या पाहण्यात नाही. जयप्रकाशांच्या विचारयात्रेचे हे दर्शन निःसंशयच उदात्त व उद्‌बोधक आहे.

❑❑

['मेरी विचारयात्रा—भाग १' ह्या जयप्रकाश नारायण ह्यांच्या पुस्तकास २५ ऑगस्ट १९७२ रोजी लिहिलेल्या मूळ हिंदी प्रस्तावनेचा मराठीत अनुवाद करून व त्यासोबत दादांनी जयप्रकाशांबद्दल त्याच सुमारास लिहिलेला अन्य मजकूर संकलित करून हा लेख तयार केला आहे. १८ जून १९८८ रोजी चेतःश्री प्रकाशन, अंमळनेर, ह्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'पहाटतारे' ह्या पुस्तकातून तो उद्‌धृत केला आहे.]

# २

# जयप्रकाशांची विचारयात्रा

*[जयप्रकाशांची जीवनयात्रा कोणतीही राजकीय प्रणाली, संप्रदाय, संस्था ह्यांच्या सीमांनी बंदिस्त होऊ शकली नाही. ते जुन्या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये होते; साम्यवादी होते, समाजवादी होते आणि नंतर सर्वोदयात! पण कोणतीही विचारधारा त्यांचे व्यक्तित्व सीमित करू शकली नाही. त्यामुळे नवीन विचार ग्रहण करणे व जुन्यापुराण्या विचारांच्या श्रृंखला तोडून टाकणे त्यांना जड जात नाही. त्यांच्या जीवनातील सजीवता हीच या सर्वांमागील मूळ प्रेरणास्रोत आहे! ]*

जयप्रकाशजींचे जे व्यक्तिमत्त्व उठून दिसते, ते एका वीरात्म्याचे आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचे मूळ अधिष्ठान वीरश्रीच आहे. त्यांचे सारे व्यक्तित्वच वीररसाने ओतप्रोत भरले आहे. त्यांच्या ह्या वीरश्रीला क्रांतिनिष्ठा आणि लोकनिष्ठा ह्यांनी परिष्कृत करून गौरवान्वित केले आहे. त्यांची वीरवृत्तीदेखील ऋजुतेने व सहज शालीनतेने संपन्न आहे. तसेच त्यांच्या व्यक्तित्वात वीरतेसोबत रसिकता व सुरुची निहित आहे. त्यांच्या आवाजात एक अभूतपूर्व वैभव व गंभीर मधुरता ह्यांचा मिलाप झालेला आहे. त्यांच्या शैलीत सहजता आणि शोभनीयता आहे. ही सारी लक्षणे त्यांच्या लेखनातून प्रतिबिंबित झाली आहेत.

आमच्या राष्ट्रात आत्मज्ञानासोबतच विश्वात्म्याशी अनुसंधान साधण्याची जी साधना असते, तिचे पथप्रदर्शक अशा काही महानुभावांची एक उज्ज्वल परंपरा आहे. ह्या विसाव्या शतकात ज्या महानुभावांनी भारतीय लोकात्म्याचे उद्‌बोधन केले आहे त्यात अरविंद, लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले ह्यांची नावे उल्लेखनीय आहेत. ही सारी नावे लोकशक्तीच्या विशिष्ट उपासकांची आहेत. ह्या लोकनेत्यांनी हे जाणले होते की, आमच्या देशाच्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये असलेल्या पुरुषार्थाच्या बळावर देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आमच्या विशिष्ट परिस्थितीतील सशस्त्र क्रांती करणे शक्य नव्हते आणि विनंत्या, मनधरणी व निषेध वापरूनही स्वातंत्र्य मिळणे शक्य नव्हते. म्हणून लोकसुलभ व सोपी

प्रतिकारशक्तीची पद्धत काय असावी ह्याचा शोध घेणे आवश्यक होते. अरविंद आणि लोकमान्य टिळक ह्यांनी निःशस्त्र प्रतिकाराचा आविष्कार शोधून काढला व त्याचे प्रयोग करण्यास प्रारंभ केला—विशेषतः टिळकांनी हे कार्य केले. गोखल्यांनी ह्या प्रतिकारपद्धतीचे फक्त समर्थन केले. परंतु प्रत्यक्ष प्रयोगात ही मंडळी कधी सामील झाली नाहीत. तथापि भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रगतीत त्यांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण होते. 'सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटी'ची स्थापना झाली तेव्हा त्यांनी असा संकल्प जाहीर केला की, आम्ही आध्यात्मिक मूल्यांचा उपयोग राजनीतीच्या क्षेत्रात करण्याचा प्रयत्न करू.

गांधीजी ह्याच परंपरेचे उत्तराधिकारी होते. बहुधा उत्तराधिकारी हा कधीच अनुयायी नसतो. कधीकधी तो नम्रतेने शिष्य म्हणवून घेत असतो. पण उत्तराधिकारी हा लकीरचा-फकीर नसतो. पूर्वीच्या लोकनेत्यांनी घालून दिलेल्या विशिष्ट दिशेने तो नवीन मार्ग प्रशस्त करतो, नव्या पाऊलवाटा चोखाळतो. गांधीजींनी लोकमान्यांद्वारा प्रतिपादित केलेल्या साधनांमध्ये सुधारणा घडवून आणली आणि त्यांस अधिक परिणामकारक बनविले. निःशस्त्र प्रतिकाराला सत्याग्रहात विकसित केले आणि त्यास एका अमोघ व सर्वकल्याणकारी अस्त्राच्या रूपात मानवसमाजापुढे उपस्थित केले. परंतु आपल्याला गोखल्यांचा शिष्य म्हणवून घेणारे गांधी 'सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटी'त मावू शकले नाहीत आणि लोकमान्यांच्या ह्या उत्तराधिकाऱ्याला लोकमान्यांच्या शिष्यांनी कधी आपल्या गोतावळ्यात सामावून घेतलेच नाही.

गांधीजींचे उत्तराधिकारी विनोबा हे आपल्याला गांधीजींचे शिष्य मानीत होते. परंतु त्यांनी गांधीमार्गाला अधिक संशोधित स्वरूप दिले. त्यांनी गांधींच्या अहिंसात्मक सत्याग्रहाची अधिक वैज्ञानिक व तर्कशुद्ध व्याख्या केली. क्रांतीच्या प्रक्रियेला सौहार्दाच्या साधनेचे आध्यात्मिक स्वरूप दिले आणि त्यास एका अद्भुत ललितकलेच्या स्तरावर अधिष्ठीत केले. भूदान व ग्रामदान ह्यांच्यामार्फत सहयोगात्मक क्रांतीचा अभूतपूर्व प्रयोग केला जो मानवीय प्रेमामृताने व भुवनव्यापी करुणेच्या रसाने तसेच पारस्पारिकतेच्या सुधारसाने ओतप्रोत होता. आमच्या इतिहासातील हे अभूतपूर्व पर्व जितके शानदार होते तितकेच उज्ज्वलही होते. जेथवर क्रांतीचे दर्शन आणि तिची संकल्पना ह्यांचा संबंध आहे, तेथे विनोबांच्या कल्पनाशक्तीच्या क्षितिजाला अजून कुणीही पार करू शकले नाही. समाजवादाच्या इतिहासात आदर्श समाजवाद्यांचे जे स्थान होते, ते केवळ सहयोगात्मक अहिंसक क्रांतीच्या इतिहासात विनोबांचेच असू शकते. ते केवळ दार्शनिक व द्रष्टा होते, एवढेच नव्हे तर प्रयोगवीरही होते. आपले तत्त्वज्ञान

लोकजीवनात अंमलात आणण्याचे नैष्ठिक प्रयोग त्यांनी केले. त्यात त्यांना संपूर्ण यश मिळाले नाही. परंतु हा प्रयोग करण्यामध्येच एका मानवीय प्रगतीच्या संपूर्ण सफलतेचे श्रेय दृष्टिपथात आले. असे प्रयोग घडवून आणणेही फार थोडक्या लोकांच्या नशिबी असते. ते भाग्यवान आहेत, ज्यांना ह्या प्रयोगात सहभागी होण्याचे भाग्य लाभले.

मी तर जयप्रकाशांना विनोबांचा उत्तराधिकारी मानतो. गांधींच्या सत्याग्रहात ज्याप्रमाणे गोखले आणि टिळक ह्यांच्या वारशाची मनोहारी उपस्थिती होती, त्याचप्रमाणे जयप्रकाशांच्या प्रयोगात गांधी व विनोबांच्या गुणसमुच्चयाचा वारसा निहित आहे. मी तर असेही म्हणेन की, लोकनायकाच्या रूपात जयप्रकाशांचे आगमन विनोबांच्या आंदोलनातून जन्मास आले आहे, असे म्हणणे मुळीच अनुचित ठरणार नाही. विनोबांच्या उपस्थितीतच त्यांचे उपनयन झाले व लोकनायकाच्या रूपात त्यांना द्विजत्व प्राप्त झाले.

क्रांतीचा हा यक्षप्रश्न असतो की, ज्या वर्गाला क्रांतीची आवश्यकता असते, तो पददलित, शोषित व वंचित मनुष्य क्रांतीचा अधिष्ठाता व अनुष्ठाता कसा होऊ शकेल? लोकमान्यांपासून लोकनायकांपर्यंत सर्वांची हीच उत्कंठा होती, हेच संशोधनाचे मूळ होते आणि जयप्रकाशांच्या आंदोलनानंतरही हा शोध चालूच राहणार आहे. ह्या आंदोलनाचे आविष्करण एका सीमेपर्यंतच येऊन पोहोचले आहे. परंतु त्या आविष्करणाचे प्रयोग अजून किनाऱ्यापर्यंतही पोहोचले नाहीत. ज्यांना क्रांतीची आवश्यकता आहे, त्यांच्यामध्ये अजून आकांक्षाच जर जागृतही झाली नाही, मग प्रेरणा तर दूरच राहिली.

जयप्रकाशजींच्या आंदोलनाचे प्रयोजन देशामध्ये लोकशाही सुदृढ व सुप्रतिष्ठित करणे हे असून त्याचा मूलाधार बळकट व्हावा हे आहे. म्हणून त्याचा आधार बदलणे आवश्यक होते. लोकशाहीची प्रतिष्ठा व त्यांस संमती, हे शस्त्रबळ असू शकत नाही. त्याचा शाश्वत आधार असतो, लोकसम्मती! ह्या आधाराला बळकट करून प्रतिष्ठित करण्याचा जयप्रकाशांनी प्रयत्न केला. त्या दृष्टीने पाहिले तर त्या वेळी तो सत्ताधीशांशी सहयोगच होता. वर दिसावयास तो प्रतिकार होता, पण खऱ्या अर्थाने सहयोग होता. पण त्या वेळी सत्ताधीशांनी हे समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही.

ह्याबाबत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. त्या निवडणुकांत नागरिक शक्तीची अभिव्यक्ती जरूर झाली. देशाला ही धन्यतेची गोष्ट आहे. पण हे पर्व आता इथेच संपुष्टात येणार का? आज तर असे वाटू लागले आहे की लोकशक्तीचे पर्यवसान पक्षशक्तीत होत आहे. सत्तापक्षाचा प्रादुर्भाव लोकसत्तेच्या

प्राणप्रतिष्ठेसाठी बाधक तर ठरणार नाही ना? जयप्रकाशांचे आंदोलन शेवटीशेवटी पक्षाच्या आंदोलनाचे संकीर्ण रूप घेऊ लागले आहे असे वाटू लागले होते. म्हणून ह्या विषयाचे गंभीर चिंतन होणे अत्यावश्यक आहे.

आता तर समाजातील शेवटच्या व्यक्तीसदेखील असा भ्रम होऊ लागला आहे की, ही शक्ती त्याच्याव्यतिरिक्त आणखी कुठे आहे काय? वस्तुतः ह्या शक्तीचा स्रोत व मूळ, अंतिम व्यक्तीच आहे. जो संपन्न आहे, प्रतिष्ठित आहे, त्याच्या शक्तीचे अधिष्ठानदेखील शेवटची व्यक्तीच आहे. परंतु ज्या व्यक्तीला त्याचे भान नाही, त्या व्यक्तीला त्याची जाणीव करून देणे हेच वास्तविक लोकशिक्षण आहे— समाज-प्रबोधन आहे. लोकक्रांतीच्या साऱ्या प्रयोगांचे उद्दिष्ट त्या शेवटच्या माणसाला आपल्या शक्तीचे प्रत्यक्ष भान करून देणे आणि त्याच्या ठिकाणी प्रेरणा जागृत करणे हे आहे. परंतु हे सारे प्रयत्न अजून प्रयोगावस्थेतच आहेत. पण या प्रयोगांची दिशा उचित असून प्रयोगदेखील प्रामाणिकपणे होत आहेत.

जयप्रकाशांचे नुकतेच झालेले आंदोलन त्या दिशेने केलेला एक प्रयोगच होता. ह्या प्रयोगाचा परिणाम असा झाला की, झोपी गेलेला व हरवलेला सामान्य माणूस आता जागा झाला आहे आणि तो आळोखेपिळोखे देऊ लागला आहे. माझ्यासाठी तरी ह्या आंदोलनाची ही फलश्रुती पुरेशी आहे. परंतु क्रांती करण्यासाठी ती पुरेशी नाही. ह्या आंदोलनातदेखील पूर्वी घडलेल्या आंदोलनांप्रमाणे भ्रम व उचित निर्णयांचा अभाव असल्यामुळे काही दोष व चुका झालेल्या आहेत. ह्या उणिवांमधून व चुकांमधूनच प्रकाशाची व आत्मनिरीक्षणाची वाट शोधण्याची आवश्यकता आहे. परंतु या दोषांना व चुकांना जमेस धरूनही ह्या आंदोलनाला जनतेच्या आत्म्याला आवाहन करण्यात अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळाले आहे, हे मान्यच करावे लागेल.

गांधी-विनोबांचे उत्तराधिकारी असूनही जयप्रकाशांनी त्यांच्याशी आपली तुलना केली नाही. त्यांच्या अंगात विनयशीलता मुरलेली होती. म्हणून त्यांनी सत्य, अहिंसा अशा परंपरागत शब्दांचा वापर करण्याचा स्वतःचा अधिकार मानला नाही. नम्रतापूर्वक 'शांतिमय प्रतिकार' हाच शब्दप्रयोग ते करीत राहिले. मी त्यांच्या आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतला नाही, पण मी त्यांचा सहयोगी व समर्थक होतो. मला हे सांगताना मुळीच संकोच वाटत नाही की, जयप्रकाशांचे आंदोलन जितक्या शांततामय मार्गाने झाले तेवढे शांत आंदोलन मी आपल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यात पाहिले नव्हते. भूदान-आंदोलनाची भूमिकाच मुळी भिन्न होती. दलित आणि संकटग्रस्त सामान्य माणूस ह्यांच्या पराक्रमाची योजना त्यात अवश्य होती, पण त्या योजनेतही त्याग व आत्मशुद्धीची

प्रेरणा प्रधान होती. जगाच्या पाठीवर इतिहासात अशा पद्धतीचे दुसरे कुठलेही आंदोलन झाले नसेल.

ह्या प्रसंगी विनोबांसंबंधी काही निवेदन करणे अप्रस्तुत ठरणार नाही. सत्याग्रहाचे एक लक्षण असे असते की, सत्याग्रही दुसऱ्याच्या भूमिकेतून त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. दुसऱ्याचे मत जाणण्याची सहिष्णुता असणे पुरेसे ठरत नाही. दुसऱ्याच्या मताबद्दल पुरेपूर आदर बाळगणे, ही सत्याग्रही वृत्तीची ओळख असते. परंतु ह्याविषयी विनोबांच्या भूमिकेला योग्य न्याय मिळाला नाही. साऱ्या देशभर त्यांच्याविषयी एक प्रतिकूल वातावरण व अनादर निर्माण झाला. त्यांची भूमिका समजून घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न झाले नाहीत. ह्यामध्ये खेदाची गोष्ट अशी की जे विनोबांचे प्रशंसक व मित्र होते, त्यांचादेखील त्यात हातभार होता/सहभाग होता. हे खरे आहे की काही ठिकाणी विनोबांची भूमिका अनाकलनीय होती, तथापि हे तर मान्यच केले पाहिजे की, जेवढा विनोबांशी मतभेद ठेवण्याचा अधिकार आम्हांला आहे, तेवढाच आमच्याशी मतभेद ठेवण्याचा अधिकार विनोबांना दिलाच पाहिजे. मतभेदामुळे प्रेम आणि पूज्य बुद्धी ह्यांमध्ये का बरे फरक पडावा? परंतु समाधान एवढेच वाटते की सर्वोदय क्षेत्रातील अधिकांश व्यक्ती ह्या विनोबांच्या टीकाकार होत्या, पण त्यांच्या निंदक बनल्या नाहीत. प्रेमामुळे त्यांच्यावर ते रागावले होते पण विनोबांच्या प्रती त्यांचा स्नेह व श्रद्धा कायम होती. जेव्हा विनोबांनी आचार्य संमेलन भरविण्यासंबंधी गैरसरकारी स्तरावर एक तिसरी शक्ती स्थापन करण्याची पावले उचलली तेव्हा साऱ्या सर्वोदय परिवाराने मनापासून त्याचे समर्थन केले. मागे वळून विचार केला असता असे जाणवते की, काही बाबतीत, ते आमच्यापेक्षा अधिक दूरदर्शी ठरले. सत्याग्रहात सौहार्द व मतभेद हे एकमेकांसोबत असले पाहिजेत.

विनोबांनी आम्हांला हाच आदेश दिला की 'आत्मदीपोभव.' आत्मप्रामाण्यालाच अंतिम प्रमाण मानावे. त्यांनी आम्हांला हेदेखील शिकविले की विश्वरूपाची डोकी अनंत असली, तरी हृदय मात्र एकच असते. ह्या त्यांच्या संकेतांना शिरोधार्य मानले तर आम्हांला समजून येईल की, आमच्या क्रांतीचा विधायक पक्ष विनोबांच्या कार्यक्रमाच्या आधारावरच क्रियान्वित होऊ शकतो. नामभेद झाला तरी वस्तुभेद होत नसतो.

गांधी, विनोबा व जयप्रकाश ह्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणखी एक फरक आहे. गांधी व विनोबांचे सारे संस्कार भारतीय सांस्कृतिक पुनर्जीवनाच्या परंपरेतून आले होते व ते त्यांच्या भाषेत व प्रतिपादनात दिसून आले, प्रतिबिंबित झाले. त्या

संस्कारांच्या अनुसार सांकेतिक शब्द सहजपणे त्यांच्या तोंडाबाहेर पडत. परंतु जयप्रकाश हे मार्क्सवादी व समाजवादी परंपरेतून सर्वोदयाकडे वळले होते. आणि ही फारच गंमतीची गोष्ट होती की, त्यांचे ह्या क्षेत्रात पदार्पण गांधींच्या काळात झाले नसून विनोबांच्या साक्षीने झाले. पुणे येथे जयप्रकाशांनी आत्मशुद्धीसाठी उपवास समाप्त केल्यावर ते पवनारला आले तेव्हा पवनार येथे आश्रमवासीयांबरोबर रहाट चालविण्यात सामील झाले. आपल्या अनुपम शैलीत त्यांनी लिहून ठेवले आहे की, त्या रहाटाच्या प्रत्येक फेऱ्याबरोबर माझे विचारचक्र चालू लागले आणि मला वाटले की मला येथून काही प्रकाश दिसू शकेल. आणि त्या क्षणापासूनच जयप्रकाशांचे उपनयन सुरू झाले.

परंतु हे तर विषयांतर झाले. आम्ही जयप्रकाशांवर झालेल्या संस्कारांची चर्चा करीत होतो. त्यांचे शब्द सर्वोदय आणि लोकशाहीला अविरोधी असून समाजवादी संस्कारातून उत्पन्न झाले आहेत. परंतु त्या शब्दांचा आशय मार्क्सवादापेक्षा भिन्न आहे. त्यांचा वर्गसंघर्ष हा शब्द ह्याचे उदाहरण आहे. जो गरीब आहे त्याच्या पुरुषार्थानेच क्रांती घडवून आणली पाहिजे आणि त्यासाठी त्याच्या ठिकाणी प्रतिकारशक्ती, प्रतिकार करण्याची क्षमता वाढली पाहिजे. नाही तर त्यांना संपन्न व प्रतिष्ठित लोकांच्या कृपाप्रसादावर व उदारतेच्या भरवशावर जगावे लागेल. असे जीवन अवमानित व शापित असते. म्हणून गरीब व्यक्तीच्या ठिकाणी प्रतिकाराची प्रेरणा आणि क्षमता जागृत करणे अत्यावश्यक आहे. अहिंसक प्रतिकाराच्या ह्या प्रक्रियेला जयप्रकाशांनी 'वर्गसंघर्ष' म्हटले आहे. ह्या ठिकाणी त्यांचा वर्ग शब्दाचा संदर्भ अगदी वेगळा आहे. परंतु समाजवादी संस्कारांमुळे हे शब्द त्यांच्या तोंडून सहजगत्या निघून जातात.

आज ह्या देशात सर्वांत महत्त्वपूर्ण व लोकप्रिय व्यक्ती जयप्रकाश आहेत आणि ह्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची वीरता-शौर्य ! जनमानसात शौर्याचे आकर्षण फार जबरदस्त आहे. वीरवृत्ती व संघर्ष ह्यांचा संबंध अतूट आहे. तसेच वीरवृत्ती व सैनिक आणि रणांगण ह्यांचाही संबंध अभेद्य आहे. वीरवृत्तीचे दुसरे लक्षण म्हणजे लढाऊ वृत्ती. म्हणूनच सैनिकांची एवढी प्रतिष्ठा असते. आश्चर्य तर ह्याचे वाटते की अध्यात्म आणि भक्तीच्या पारमार्थिक क्षेत्रातदेखील रणांगण व प्रेमाची भाषा खूप लोकप्रिय आहे. इतकेच नव्हे तर 'मुण्डकोपनिषदा'त प्रणवाची धनुष्याशी, आत्म्याची बाणाशी आणि ब्रह्म याची निशाणाशी तुलना करण्यात आली व तशीच उपमा देण्यात आली आहे. स्वतः विनोबांनीदेखील शांतिसेना ह्या शब्दाचा प्रयोग करीत भलेही त्यांनी सेना शब्दाच्या वंशावळीचा अभ्यासही केलेला असेल. भक्तीच्या क्षेत्रात तर श्रृंगाररसाचा मोठ्या गौरवाने उल्लेख

करण्यात येतो. मी वीररसाचा उल्लेख करीत होतो, जो जयप्रकाशांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रधान रस होता आणि त्याचा उद्देश होता संपूर्ण क्रांती ! जी मुख्यतः विधायक स्वरुपाची असू शकते. परंतु त्यामध्ये सत्तेशी संघर्ष असलाच पाहिजे हे अनिवार्य नसते. सत्तेच्या सहयोगाने इतर क्षेत्रात संघर्ष होऊ शकतो, परंतु ही सारी परिस्थिती असूनही संघर्षाची वेळ आल्याबरोबर लोकजीवन सजीव झाले. प्रभावतीजींच्या मृत्युमुळे हताश व निराश झालेले जयप्रकाश संघर्षाचा शोध घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते, पण आव्हानाच्या रूपाने ती संधी त्यांना अनायासे प्राप्त झाली आणि याप्रमाणे प्राप्त झालेल्या संधीकडे त्यांनी पाठ फिरविली नाही.

क्रांतिपुरुषांचे निर्णय कधीही तर्कशास्त्र व न्यायशास्त्राचा आधार घेऊन होत नसतात. ते नेहमी सहजस्फूर्त असतात. ह्या अंतःप्रेरणेला कुणी 'आतला आवाज' म्हणतात, तर कुणी परमात्म्याचा संकेत मानतात. परंतु ती अंतःस्फूर्तीच असते आणि अशी प्रेरणा होण्यासाठी कुठल्या तरी निमित्ताची आवश्यकता असते. महात्मा गांधींसाठी दक्षिण आफ्रिकेचा प्रसंग प्रेरणेचे निमित्त ठरले. तेलंगणाच्या परिस्थितीने विनोबांना प्रेरणा दिली आणि बिहारच्या विद्यार्थी आंदोलनाने जयप्रकाशांना स्फूर्ती मिळाली. निमित्त कुठलेही असो, प्रयोजन एकच होते आणि ते म्हणजे विपन्नावस्थेत मृतवत् जीवन जगणाऱ्या गरीब माणसामध्ये समाज-परिवर्तनाची प्रेरणा आणि सामर्थ्य जागृत करणे. एरवी लोकक्रांती करणे संभव होणार नाही. हा पराक्रम शांतिमयच असू शकतो, ह्यात आता काही संशय उरलेला नाही. हिंसक क्रांतीचा विचार आता जुनाट व गतकालीन झालेला आहे. आता हिंसक क्रांतीत अत्याधुनिक क्रांतिप्रक्रियेचे सत्त्व राहिलेले नाही.

ह्या देशातील मूर्च्छित जनतेत जे सुप्त सामर्थ्य होते ते मागील लोकसभेच्या निवडणुकांमध्ये अप्रत्यक्षरित्या प्रकट झाले आहे. याचे सारे श्रेय आमच्या देशातील नागरिकांना आहे आणि त्यानंतर जयप्रकाशांच्या राष्ट्रव्यापी आंदोलनाला आहे, ज्याने राष्ट्रीय चेतनेला आवाहन केले. अनिच्छापूर्वक का होईना, ह्या ऐतिहासिक लोक-जागरणाचे निमित्त इंदिरा गांधीजी बनल्या. त्यांनी स्वतःच एकदा विनोदाने असेही म्हटले होते की आणीबाणी उद्‌भवली नसती, तर आजच्या राज्यकर्त्यांना कुणी विचारले असते? म्हणून इंदिराजींना श्रेय तर द्यावेच लागेल. पण मी त्यांना आणखी एका कृतीबद्दल धन्यवाद देऊ इच्छितो. कुठल्याही कारणाने का असेना, त्यांनी निवडणुकांची घोषणा केली व त्याचा परिणाम म्हणून सांसदीय रीतीने आपले सत्त्व प्रकट करण्याची संधी जनतेला मिळाली. ह्या प्रसंगासाठी मी माजी ॲटर्नी जनरल निरेन डे ह्यांनाही धन्यवाद देऊ इच्छितो. आणीबाणीच्या राज्यव्यवस्थेची त्यांनी ज्याप्रकारे प्रांजळ व्याख्या विशद केली

तशी जयप्रकाशही करू शकले नाहीत. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे भाग आहे.

आमचा देश चमत्कारांनी भरलेला आहे. गेल्या दोनशे वर्षांत ह्या देशात जे चमत्कार घडले, त्यांपैकी पहिला चमत्कार म्हणजे भारतात इंग्रजी राज्याची स्थापना ! सहा हजार मैल इतक्या दूरवरून येऊन केवळ दीड लाख लोकसंख्या असलेल्या इंग्रजांनी काही प्रयास न करता भारतात आपले साम्राज्य प्रस्थापित केले. भारतासारख्या देशातच असा चमत्कार संभव होऊ शकला. ह्या देशात दुसरा चमत्कार तेव्हा घडला, जेव्हा केरळ प्रांतात मतदानपद्धतीने कम्युनिस्टांची सत्ता येऊन त्यांचे राज्य आले. हीदेखील जगाच्या इतिहासातील पहिलीच घटना होय. आणि तिसरा चमत्कार मार्च १९७७ मध्ये घडून आला जेव्हा काँग्रेस पक्षाचा अभूतपूर्व व दारुण पराभव झाला. जुने क्रांतिकारक असे मानत असत की सांसदीय पद्धतीने समाजपरिवर्तन असंभवनीय आहे. परंतु ह्या निवडणुकांच्या निकालानंतर ते त्यांना संभवनीय वाटू लागले आहे. ही जयप्रकाशांच्या आंदोलनाची फार मोठी फलश्रुती आहे असेच मानावे लागेल.

आता वेळ येऊन ठेपली आहे की, आम्ही लोकक्रांतीच्या पराक्रमाबाबत अंतर्मुख होऊन गंभीर चिंतन केले पाहिजे व संशोधनही केले पाहिजे. ह्यासंबंधी विचार करताना काही बाबी मांडणे अप्रस्तुत ठरणार नाही.

(१) शांतिमय प्रतिकार करताना क्रांतिकारी स्वतः कोणत्याही परिस्थितीत हिंसेचे अवलंबन करणार नाही. परंतु गैरसरकारी स्तरावरदेखील हिंसा उद्भवली तर तिला क्रांतीच्या मार्गातील अडथळा मानून थांबविण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. कोणत्याही स्वरूपातील हिंसक प्रतिकार हा शांतिमय क्रांतीमध्ये निषिद्ध मानला गेला पाहिजे.

(२) शांतिमय आंदोलनाची ही कसोटी असली पाहिजे की, जर त्या आंदोलनाने सर्वसाधारण जनता भयभीत होत असेल, तर तो आंदोलनाचा दोष मानून त्याची शुद्धी करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

(३) आमच्या विरोधकांचा आमच्या प्रामाणिकपणावर व सत्यतेबद्दल विश्वास असला पाहिजे. त्यांनी हा विश्वास बाळगला पाहिजे की आम्ही विरोधाचा प्रतिकार शेवटपर्यंत करत राहू, त्यात कुठलीही कसर ठेवणार नाही, पण त्यांना कदापि धोका देणार नाही. आमचे आंदोलन विश्वासघात करणारे, दमबाजीचे, फसवणूक करणारे राहणार नाही. ह्या शांतिमय आंदोलनाच्या लक्ष्मणरेषा असतील.

(४) ह्याच दृष्टिकोनातून भूमिगत आंदोलनाचाही आम्ही पुनर्विचार केला पाहिजे. अनुभव असा आला आहे की भूमिगत आंदोलनात आपण केवळ

विरोधकांचाच विश्वास गमावून बसतो, एवढेच नव्हे तर आमच्यात आपसातही संशय व अविश्वासाचे वातावरण निर्माण करत असतो. भूमिगत झालेली व्यक्ती आपल्या सावलीलादेखील भिते. अशा प्रकारची सतर्कता व भीती कुठल्याही संघटित कार्यासाठी विषासमान असते.

(५) बाह्यतः अहिंसक वाटणारी काही साधने शस्त्रापेक्षादेखील जास्त हिंसक बनतात. घेराव आणि प्राणांतिक उपोषण ह्या श्रेणीत जमा होऊ शकतात. तर्कशुद्ध व न्याययुक्त बौद्धिक संवादाची शक्ती व सहजपणे अनुरोध करण्याची शक्ती जेव्हा कुंठित होते, तेव्हा आत्मशुद्धी व प्रतिपक्षाचे हृदय परिवर्तन ह्यासाठी कुठल्यातरी अवांतर शक्तीचा प्रयोग करणे अनिवार्य होऊन बसते आणि अशा शक्तीचा प्रयोग करताना दबाव येतो. परंतु या दबावाचा उपयोग आपल्या आणि प्रतिपक्षांच्या उदात्त भावनांना आवाहन करण्याकरिताच झाला पाहिजे. म्हणून त्याला नैतिक दबाव असे नाव दिले जाते. अशा ह्या मर्यादांचे नेहमी भान ठेवले पाहिजे. प्रतिपक्षाला पराजित करणे हा सत्याग्रहीचा उद्देश असता कामा नये.

(६) शांतिमय प्रतिकार करण्यासाठी वीरवृत्ती जितकी अनिवार्य आहे तितकाच वैर-वृत्तीचा अभाव असणेही आवश्यक आहे. प्रतिपक्षासाठी विरोधवृत्ती असू शकते, परंतु त्यांचा द्वेष व तिरस्कार करता कामा नये. आम्ही त्यांचे वाईट करू इच्छित नाही. जयप्रकाशांच्या व्यवहारात व आंदोलनात अशी काही हृदयस्पर्शी उदाहरणे सामावलेली आहेत.

त्यांनी अमेरिकेस जाण्याचा प्रसंग होता. त्यापूर्वी दोन-तीन दिवसांची गोष्ट आहे. तेव्हा असे वाटू लागले होते की 'डायलिसीस'चा काही उपयोग होणार नाही व त्यांच्या जिवाला धोका उत्पन्न झाला आहे, त्या वेळी अमेरिकेला जाण्याच्या कल्पनेचा विचार झाला नव्हता. अशा परिस्थितीत सर्व भेटावयास आलेले लोक परतल्यावर ते मला एकान्तात म्हणाले, 'मला वाटते, आता माझा अंत जवळ आला आहे. ह्या देशाच्या बाहेर जाण्याचे काही कारणही उरलेले दिसत नाही. जगामध्ये दुसरे डॉक्टरलोक जे औषधोपचार करतील, ते सर्व करण्याची क्षमता आपल्या देशातील डॉक्टरांमध्येसुद्धा आहे. पण माझ्या मनात दोन गोष्टी राहून जातील. एक मी माझ्या कन्येचे कन्यादान करू शकणार नाही (जानकी पाण्डे हिचे प्रशांतशी होणारे लग्न) आणि दुसरी गोष्ट म्हणजे माझी मुलगी असूनही इंदिरा माझ्या मनातले विचार समजू शकली नाही. ह्याबाबत माझ्या मनात कुठलीही द्वेषभावना उरलेली नाही. मी तिला पदभ्रष्ट करू इच्छित नव्हतो. माझा तो कधी हेतूही नव्हता. तिला हटविणे, हे माझे प्रयोजन कधीच नव्हते, पण हे सारे मी तिला कसे समजावून सांगू?''

दुसरा प्रसंग होता, इंदिराजींनी पाठविलेल्या नव्वद हजार रुपये रकमेचा. त्या वेळेस मी त्यांच्याजवळच बसलो होतो. त्यांची सहज प्रतिक्रिया ती रक्कम स्वीकारण्याची होती. ते म्हणाले, ''जेव्हा इंदिरेनेच सहयोगाचा हात पुढे केला आहे, तर मी तो कसा झिडकारू शकतो? माझे उत्तर हेच असेल की, मी धन्यवाद देऊन त्या रकमेचा स्वीकार करीन.'' राधाकृष्णाला रकमेची स्वीकृती करण्याचा अधिकार देऊन दिल्लीस पाठविण्यात आले. परंतु त्यानंतर काही मित्रांच्या सल्ल्याने आणि आदरणीय व्यक्तींच्या घोर विरोधामुळे ते पैसे परत करण्यात आले, ही गोष्ट अलाहिदा. परंतु परत करण्याच्या वेळीदेखील जे पत्र लिहिले, ते अत्यंत मैत्रीपूर्ण व सौजन्यमय शब्दांनी भरलेले होते.

जयप्रकाशांच्या स्वभावात असलेली निर्वैरता दाखविणारे अनेक प्रसंग उल्लेखनीय आहेत, परंतु हे दोनच पुरेसे आहेत असे वाटते.

ही काही सत्ये आहेत, ज्यांचा शांतिमय प्रतिकाराच्या संदर्भात उल्लेख करणे आवश्यक होते. हे विवेचन येथे संपूर्ण होऊ शकत नाही, पण विस्ताराने लिहिण्यास मर्यादा आहेच.

*८ ऑक्टोबर १९७७*

❑❑

[जयप्रकाश नारायण ह्यांच्या 'संपूर्ण क्रांती की खोजमें' (विचारधारा भाग २) ह्या पुस्तकातील मूळ हिंदीमधील प्रस्तावनेचा तारा धर्माधिकारी ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.]

# ३

# भूदान व जयप्रकाश

*[भूदानाची चळवळ केवळ कष्ट निवारणाची वा दुःख निवारणाची चळवळ नव्हती; ती परंपरागत दानधर्माची चळवळ नव्हती, तर ती आर्थिक क्रांतीचा पाया घालणारी चळवळ होती. लोकशाहीच्या मार्फत क्रांती करायची तर कायदा लागतोच, पण त्या कायद्यासाठीसुद्धा सामाजिक वातावरण व अधिष्ठान ह्यांची आवश्यकता असते. भूदान ही अशी क्रांती होती की जेणेकरून वर्गकलहाशिवाय वर्गनिराकरण होते, म्हणून त्यात प्रतिक्रांतीस अवकाश राहत नाही. जनतेच्या जागृत पुरुषार्थानेच आपल्या समाजात इष्ट परिवर्तन घडून येऊ शकते, ही विनोबाजींची धारणा जयप्रकाशांना मान्य होती. म्हणून त्यांनी वीस वर्षेपर्यंत ह्या कामात लक्ष केंद्रित केले. मार्क्स, गांधी व विनोबा ह्या तिघांचे समन्वित नेतृत्व जयप्रकाशांच्या नेतृत्वात स्वतःच्या वैशिष्ट्यांसह प्रकट झाले.]*

भूदान आंदोलनाचे ते दिवस फार वैभवशाली होते. वातावरणात कुठलाही तणाव नव्हता, संघर्ष नव्हता. उदात्त विचारांनी आणि भावनांनी कार्यकर्त्यांची मने भारावलेली होती. विनोबा त्यात पूर्णतः तन्मय झाले होते. जणू काही नित्य समाधीतच आहेत, असे त्यांचे दैनंदिन व्यवहार चालत असत. सांख्ययोगाची व्यापक प्रमाणावर साधनाच चालू होती त्यांची. एका जागी मध्यरात्री अनपेक्षितपणे एक आंधळा इसम येतो आणि आपली बारा बिघे जमीन दान करून निघून जातो. त्या दिवशीच्या प्रवचनात विनोबा म्हणाले, "मित्रांनो, हा अंध नाही, ह्याच्या रूपाने भगवान श्रीकृष्ण स्वतः जातीने आले होते. अशा माणसात जर आम्हांला ईश्वराचे दर्शन होऊ शकले नाही, तर या दरिद्री डोळ्यांना ते होणार तरी केव्हा? लोक म्हणतात, मी तपश्चर्या करीत आहे, पण मी तप करीत नाही, तर मी आनंदाचा उपभोग घेत आहे. नित्य दररोज-दरक्षणी देवाचे दर्शन घेत आहे."

ईश्वराने विनोबांना अलौकिक दृष्टी दिली, दिव्य चक्षू दिले. गांधीजींचे ग्रंथनिष्ठ, संस्थानिष्ठ आणि व्रतनिष्ठ अनुयायी अनेक असतील, परंतु बापूंच्या प्रकाशात स्वयंप्रज्ञेने नवी पाऊलवाट चोखाळून चालणारा त्यांचा औरस

उत्तराधिकारी फक्त विनोबाच होते. बापूंच्या आत्म्याची ज्योत विनोबांच्या आत्म्यात विलीन झाली होती.

विनोबांची भूदान यात्रा एक उज्ज्वल ऐतिहासिक पर्व होते. सर्व क्षेत्रांतील नेत्यांनी, विद्वानांनी, प्रतिभावंतांनी त्याचे स्वागत केले होते. त्यातील काही लोक तर प्रत्यक्ष आंदोलनाच्या कामात सामीलही झाले होते. ह्या क्रांतिकारी आंदोलनाने देशातील प्रतिष्ठित साहित्यिकांच्या काव्यस्फूर्तीला प्रेरणा दिली. आंदोलनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे जयप्रकाश नारायण ह्यांचा आंदोलनातील प्रवेश ही होती, असे मला वाटते. त्या काळी सर्व देशात जवाहरलालजींच्या बरोबरीने जयप्रकाशांचे नाव घेतले जात होते. देशाच्या प्रथम श्रेणीच्या पुढाऱ्यांमध्ये ते अग्रगण्य मानले जात. भूदान आंदोलनात त्यांचा प्रवेश ही सामान्य घटना नव्हती. त्यांच्या प्रवेशाने यज्ञाच्या ह्या अश्वमेध अश्वाला 'उच्चैःश्रवा'ची जोड मिळाली. १९५१ साली परंधाम आश्रमात विनोबा विहिरीवरील रहाट ओढत ओढत प्रार्थना करीत असत. जयप्रकाश त्यात सामील होत. ते म्हणत असत की, 'त्या रहाटाबरोबर माझ्या बुद्धीलाही गती मिळाली.'

विनोबाजींच्या प्रार्थनेत जयप्रकाशजींना क्रांतीचा प्रत्यय मिळाला आणि भूदानयज्ञाला जयप्रकाशांची प्राप्ती झाली. विनोबांच्या वैजयंतीला कौस्तुभाची प्राप्ती झाली.

मी भूदान यज्ञाला लोकशाहीचे, अहिंसक समाजरचनेचे आणि नागरिक चारित्र्याचे वाहक मानले होते. आमच्यासारख्या स्वार्थी, लबाड, भित्र्या नागरिकांना सुधारण्याची गुणात्मक शक्ती या आंदोलनात होती. भारतीय नागरिकत्वाचा शोध घेण्यासाठी भूदान अवतीर्ण झाले आहे, असे वाटे.

जयप्रकाश कम्युनिस्ट होते. काँग्रेस सोशालिस्ट पार्टीचे तर ते आधारस्तंभच होते. नंतर प्रजासमाजवादी झाले व शेवटी सर्वोदयात सामील झाले. त्यांचा माझा निकट संबंध, ते सर्वोदयात आल्यानंतरच झाला. ती वेळ १९५३ ला झालेल्या चांडिलच्या संमेलनाची होती. त्या वेळी त्यांनी लाल टोपी घातली होती. त्यानंतर मी त्यांच्या बिहारमधील सोखोदेवरा आश्रमातदेखील गेलो होतो. त्यांच्या इच्छेनुसार मी तेथे सतत सात दिवस भाषणे केली होती. विषय होता, 'सर्वोदयाची भूमिका'! — सर्वोदयामध्ये समाजवादाचे खंडन नसून परिपूर्ती आहे. आर्थिक संयोजन, क्रांतीची प्रक्रिया इत्यादी संदर्भांमध्ये सर्वोदय हे समाजवादाच्या पुढचे पाऊल आहे. अशा प्रकारचे विवेचन त्या वेळी मी केले होते. भाषणाच्या वेळी जयप्रकाश एखाद्या विद्यार्थ्याच्या भूमिकेत नियमितपणे उपस्थित राहत असत. वस्तुतः त्या विषयाबाबत त्यांचे ज्ञान माझ्यापेक्षा कितीतरी अधिक

होते. परंतु त्यांची नम्रता अद्भुत होती. त्या वेळी विमल ठकार (विमलाबेन) माझ्यासोबत होती. तेव्हापासून प्रभावतीजी व विमल ह्यांचा चांगला स्नेह जमला. अशा प्रकारे माझा त्यांचा घरगुती संबंधही वृद्धिंगत झाला.

जयप्रकाशांना कधी काही पत्रक वगैरे काढावयाचे असेल, तर ते प्रथम मला दाखवीत व माझा सल्ला विचारीत. जवाहरलालजींच्या सोबत त्यांचे सखोल भावनिक संबंध होते. दोन-तीन वेळा ते मला आग्रहपूर्वक आपल्यासोबत जवाहरलालजींकडे घेऊन गेले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात आम्ही गेलो होतो, तेव्हा पूर्वीच जयप्रकाशांनी माझ्याविषयी जवाहरलालजींना सांगून ठेवले असले पाहिजे. जवाहरलालजींनी फार आस्थापूर्वक माझे स्वागत केले आणि चांगले बोललेदेखील ! परंतु त्या भेटीतून काही निष्पन्न झाले नाही.

जयप्रकाशांना मराठी माणसाबद्दल फार आत्मीयता होती आणि कदाचित ह्याच कारणास्तव माझे व विमलचे त्यांच्याशी मैत्रीचे संबंध फार घनिष्ट झाले. मराठी माणसाची स्वच्छता, टापटीप, व्यवस्थितपणा आणि काटकसरीने राहण्याची सवय, ह्या गुणांचे जयप्रकाशांना फार आकर्षण असे. त्यांना असे वाटत असे की, हे गुण बिहारी माणसात मुळीच नाहीत. मग असे असेल तर खरोखरच मला बिहारी म्हणावयास हवे, व जयप्रकाशांना मराठी म्हटले पाहिजे. माझ्या गलथान सवयींमुळे माझ्यासोबत राहणाऱ्यांची फारच गैरसोय होते.

जयप्रकाशांना महाराष्ट्रातील एक दुसरी गोष्ट अत्यंत महत्त्वाची वाटत होती. ती म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रीजीवन आणि स्त्रीस्वातंत्र्याची सहजता. जयप्रकाशांच्या कलात्मक नजरेने हे टिपले होते की, महाराष्ट्राच्या जीवनात कला व उपयुक्तता ह्यांचा सुंदर समन्वय झालेला होता. विनोबांच्या कल्पनेनुसार जीवनाचा प्रत्यक्ष व समग्र प्रयोग करण्याबाबत मराठी माणसाचे जीवन मार्गदर्शक ठरू शकेल अशी भावना त्यांच्या मनात असे.

जयप्रकाश भूदान आंदोलनात आले, ते काहीशा संकोचाने. भूदान आंदोलनाचे एक अद्वितीय प्रवक्ते आणि तत्त्वदर्शी धीरेंद्र मुजुमदार आर्थिक परिस्थितीचे वर्णन करीत असताना दोन शब्दांचा प्रयोग करीत—हुजूर आणि मजूर. त्याचे अत्यंत रुचिपूर्ण वर्णन ते विशद करून सांगत असत. ते ऐकून जयप्रकाश म्हणत असत की, धीरेंद्रभाईचे 'हुजूर'चे वर्णन मला लागू पडते. त्यांचे जे राहणीमान होते, सवयी होत्या, त्यामुळे आपण सर्वोदयवाल्यांसोबत राहण्यास पात्र नाही, असा संकोच त्यांच्या मनात नेहमी असे. तरीदेखील आंदोलनाचे काम करण्याची तीव्र इच्छा होती. मी नेहमी जयप्रकाशांना स्वतःचे उदाहरण देत असे. मी स्वतः चहा पीत असे आणि तोदेखील विशेष 'ट्रे'मध्ये तयार केलेला असे.

माझे सर्वोदयी मित्र माझ्यावर कृपा करीत आणि माझ्या चहाची व्यवस्थादेखील करीत असत. माझ्या सहवासामुळे जयप्रकाशांचा संकोच हळूहळू कमी होत गेला.

सोखोदेवरामध्ये एके दिवशी मी फिरत असताना जयप्रकाशांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातील एक रहस्य मला सांगितले होते "मी माझ्या आयुष्यातील कोणताही निर्णय विचारपूर्वक, नफातोट्याचा विचार करून, हिशेब करून घेतलेला नाही. मनात खोलवर कुठेतरी तो निर्णय आकार घेत असतो व कधीतरी एखादा क्षण येतो, जेव्हा तो निर्णय परिणत स्वरूपात व्यक्त होऊन जातो."

एका निराळ्या अर्थाने गांधी हे मार्क्सचे उत्तराधिकारी होते. १९२० पासून १९४७ पर्यंत गांधींना विधायक आणि प्रतिकारात्मक प्रयोग करावे लागले आणि त्या प्रयोगांच्या निमित्ताने एक त्यागी, निःस्पृह व पराक्रमी आणि लोकनिष्ठ कार्यकर्त्यांचा संच म्हणजे सैन्यच तयार झाले.

मी गांधी आणि विनोबा ह्यांची तुलना केव्हाच केली नाही. विनोबा गांधींचे उत्तराधिकारी होते, अनुयायी नव्हते. शिष्य तर ते अनेक गुरूंचे होते, पण तरीही कुणाचेच नव्हते. माझ्या मते 'गांधी बनाम विनोबा' हा केवळ बुद्धिवाद्यांचा एक सांस्कृतिक कार्यक्रम होता. विनोबांनी गांधी विचारांचा विकास व विस्तार केला. त्यांचे विचार अधिक विशद व विस्तृत केले. गांधींच्या सत्याग्रहाच्या सिद्धान्ताचा त्यांनी शास्त्रीय पद्धतीने विकास केला. त्यांनी समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत सत्य-प्रेम-करुणा यांचा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. क्रांतीच्या प्रक्रियेला सिद्धान्ताने एका ललित कलेचे स्वरूप दिले. ही त्यांची देणगी अपूर्व व अद्‌भुत आहे. ज्या संदर्भात गांधीजींनी प्रयोग केले, त्यापेक्षा विनोबांच्या युगाचे संदर्भ अगदी निराळे होते. म्हणून त्यांनी गांधींचे अनुकरण करावे अशी अपेक्षा करणेदेखील चुकीचे ठरते. परंतु हे इतके स्पष्ट दिसून येते की, गांधीजींनी ज्या प्रेममूलक व सहयोगात्मक प्रतिकाराचा उपक्रम आरंभला होता, त्यालाच उदात्त आणि उज्ज्वल स्वरूप देण्याचा प्रयत्न विनोबांनी भूदान यज्ञामार्फत केला होता.

भूदान यज्ञाची फलश्रुती कोणत्याही प्रकारे कमी लेखण्यासारखी नव्हती. त्यामध्ये जयप्रकाशांचे विभूतिमत्त्व व व्यक्तिमत्त्व आपल्या संपूर्ण क्रांतीच्या सोबतीने झळाळून उठले. मार्क्स, गांधी आणि विनोबा, ह्या तिघांचे समन्वित नेतृत्व जयप्रकाशांच्या नेतृत्वात स्वतःच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांसह व मर्यादांसह प्रकट झाले. समाजवाद, लोकसत्ता आणि सजीव भावरूप पण सक्षम शांतियोग ह्यांच्या समन्वयाचा मार्ग अदम्य क्रांतिकारी जयप्रकाश ह्यांच्यासमोर एकाएकी स्पष्ट होत गेला आणि तो मार्ग प्रशस्त करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. आपली सारी शक्ती, सारी प्रतिभा आणि कुशलता अप्रतिम एकाग्रतेने त्यांनी

भूदान यज्ञ यशस्वी करण्यासाठी सतत वीस वर्षेपर्यंत केंद्रित केली होती. हे समर्पणदेखील अद्वितीय, अलौकिक होते! कोणतेही मत, संप्रदाय अगर दर्शन किंवा राजकीय पक्ष ह्यांच्यासोबत त्यांचा विचार बांधलेला नव्हता, मर्यादित झालेला नव्हता. ह्याचा सर्वांत मोठा पुरावा म्हणजे त्यांनी बोधगयेत विनोबांच्या चरणी आपले जीवनदान केले. जीवनदान करून ते स्वतः कृतकृत्य झाले. त्या दिवशी जाहीर सभेत भूदान आंदोलनात मी जयप्रकाशांचे कृतज्ञतापूर्वक स्वागत केले होते.

शांतिमय प्रक्रियेच्या ठिकाणी जयप्रकाशजींच्या निष्ठेचा विकास कसा झाला ही एक आकर्षक वीरगाथाच आहे. शांतिमय शौर्याने त्यांच्या वीरवृत्तीला संशोधित व आलोकित केले. त्यांच्या भूमिकेत लोकनिष्ठेला आत्यंतिक महत्त्व होते. त्या भूमिकेला अनुरूपच त्यांनी लोकक्रांतीला उपकारक असलेल्या अर्थरचनेचे व लोकशाहीचे संशोधन केले. विनोबांच्या भूदान यज्ञाच्या फलश्रुतीतून असा एक सुयोग प्राप्त झाला की प्रतिकारात्मक लोकशक्ती आविष्काराची शक्यता दिसून येऊ लागली. परंतु मार्ग शोधण्यास ही लोकशक्ती असमर्थ होती. दंगा, हुल्लड, बंड, राजद्रोह, विद्रोह अशा एकएक जुन्या-पुराण्या मार्गांनी जात जात लोकशक्ती एका अंधाऱ्या गल्लीत जाऊन कुंठित झाली होती; निराश, हतबल व पराभूत होत होती. अशा परिस्थितीत सत्याग्रह, असहकार आणि भूदान आंदोलनात प्रशिक्षित आणि प्रबुद्ध झालेल्या जयप्रकाशांचे नेतृत्व घटनाचक्राच्या स्वाभाविक क्रमात सहज रित्या प्रकट झाले. त्यांचे १९७४-७५ चे आंदोलन ह्या साऱ्या परिस्थितीचा परिपाक होता. परिस्थितीत ज्या वेळी ज्या ज्या आकांक्षा व्यक्त होतात, त्याच व्यक्तींच्या रूपात अभिव्यक्त होतात, मुखरित होतात. परंतु जयप्रकाशांजवळ जेवढे विचारधन होते, त्या तुलनेने संघटनाचातुर्य नव्हते. संघटक व प्रशासक ह्या दोन्ही बाबतीत ते अयशस्वी ठरले.

दुर्भाग्यवश ह्या जगात जे अशुभ आहे—वाईट आहे, त्या वाईट गोष्टी कशा तऱ्हेने आल्या आणि का आल्या ह्याचे उत्तर कुणीही दार्शनिक किंवा प्रेषित देऊ शकलेला नाही. म्हणूनच जगात सैतानाला स्थान आहे. असे म्हणतात की साऱ्या शुभ गोष्टींचे उगमस्थान ईश्वर आहे आणि अशुभाचे सैतान आहे. ईश्वरच साऱ्या सृष्टीचा निर्माता आहे असे जर आम्ही मानीत असू तर मग सैतानही त्याचेच लेकरू असले पाहिजे. ही विधायक प्रतिभा गांधीजींची होती. त्यांनी कोणत्याही व्यक्तीला सैतानाची संतती मानले नाही. म्हणून वाईटाला दूर सारण्यासाठी कुणालाही मदत करणे हा गांधींच्या दृष्टीने सहकारच होता. अशुभाचा प्रतिकार

करणे वरवर पाहणाऱ्याला नकारात्मक भासत असले तरी वस्तुतः ते सकारात्मकच असते. माझ्या सर्वात आवडत्या माणसासमोरसुद्धा मी सत्याग्रह करीन, ही गांधींची भूमिका होती. गांधी म्हणत, मी अहिंसेचा कलाकार आहे. विनोबांनी म्हटले, ही कला केवळ कारागिरी नव्हे, ती ललितकला आहे आणि ह्याचे प्रेरक तत्त्व आहे प्रेम. ''आम्ही दुसऱ्याकडून ज्या व्यवहाराची अपेक्षा करतो, तोच व्यवहार आम्ही प्रथम दुसऱ्यांशी करू'' — हा सुवर्ण नियम म्हटला जातो. परंतु यात 'सौदा' आहे. 'जशास तसे'चे हे विधायक स्वरूप आहे. गांधी ह्यापुढे गेले होते. प्रेम केवळ देणेच जाणते, घेण्याची आकांक्षा त्याच्या ठायी राहत नाही. हे प्रतिकाराचे नितान्त रमणीय, शुभ व मंगलमय स्वरूप आहे. प्रतिकाराला विशेष परिष्कृत, परिमार्जित आणि संशोधित करण्याच्या दिशेने गांधी-विनोबांनी जे प्रयोग केले, ते समजून घेण्याची पात्रता भारतामध्ये विकसित झालेली नव्हती. म्हणून जयप्रकाशांनी अहिंसेपेक्षा शांतिमय प्रतिकारापर्यंतच आपले प्रयोग मर्यादित ठेवणे उचित मानले.

इंग्रजांच्या राज्यापेक्षा स्वराज्य वाईट राहील, हे माहीत असूनही ह्या देशाच्या नागरिकांनी स्वराज्य हेच आपले ध्येय मानले होते. अशाच प्रकारची काहीशी भावना जयप्रकाशांच्या आंदोलनाच्या वेळी लोकांच्या मनात येऊ लागली होती. कमीत कमी आणीबाणी घोषित केल्यावर तर माझ्याही मनात हेच विचार येत होते. त्या वेळी देशात अशी काही परिस्थिती बनली होती की, कुणीही देशप्रेमी नागरिक व सहृदय मनुष्य चिंताक्रांत व शंकाकुल झाल्याशिवाय राहिला नाही. चारही दिशांना भयाचे वातावरण पसरले होते. जनता एखाद्या पाळीव जनावरासारखी मूक आणि लाचार बनली होती. जनतेत सत्त्व तर उरलेच नव्हते, पण काही त्राणही राहिले नव्हते. राज्यकर्त्यांच्या विरुद्ध मत व्यक्त करण्याचे, अथवा भिन्न मत प्रकट करण्याचा काही मार्गच उरला नव्हता. इंग्रजांच्या वेळी शांततेला आम्ही 'स्मशान शांतता' म्हणत असू, पण ह्या वेळची स्थिती मानवी मूल्यांच्या दृष्टीने त्याहूनही भयानक होती. दर दिवसाला नवनवे वटहुकूम, अध्यादेश निघत होते. पोलीसखात्याचे अधिकार पोलिसांव्यतिरिक्त इतर सरकारी अधिकाऱ्यांनादेखील देण्यात आले होते आणि न्यायसंस्था लवकरच निःसत्त्व व निष्प्राण होण्याची लक्षणे दिसू लागली होती.

त्या वेळचे आमचे आंतरराष्ट्रीय राजकीय धोरण यशस्वीरित्या राबविले जात होते, असे काही लोकांचे मत होते. त्याप्रमाणे मलाही वाटत होते व त्याप्रकारे त्या धोरणाची प्रशंसादेखील मी करीत असे. परंतु त्यातही भ्रमनिरास झाला. बलवान राष्ट्रे, बांगलादेशसारख्या ह्या देशातील काही भागांना आपल्या खेळांचे क्रीडांगण

करणारच नाहीत हा विश्वास ढासळला होता.

एकूण काय की घटनात्मक एकाधिकारशाही किंवा अराजकता हे दोनच विकल्प देशाच्या त्रस्त नागरिकांसमोर आहेत, असे भय वाटू लागले होते आणि त्यावर एकच उपाय होता. न्यायपूर्ण व मुक्त निवडणूक शक्य तितक्या लवकर घोषित करणे.

सरकारतर्फे निवडणुकीच्या दृष्टीने अनुकूल वातावरण बनविणे आवश्यक होते. परंतु विरोधी पक्षालासुद्धा काही मुद्यांचा विचार करणे अपरिहार्य होते.

पहिला मुद्दा, हिंसा वा तोडफोडीचा अवलंब व समर्थन न करणे.

दुसरा, प्रतिपक्षाबद्दल द्वेष वा सूडाची भावना ठेवून वैरवृत्तीचा प्रसार न करणे.

तिसरा, राजकीय बंद, हरताळांना प्रोत्साहन न देणे.

चौथा, निवडणुकीसाठी स्वतः विदेशी पैसा न वापरणे, आणि दुसऱ्याने तसे केल्यास त्याला विरोध करणे.

पाचवा, निवडणुकीत पक्षपात किंवा चलाखी होऊ नये म्हणून प्रामाणिकतापूर्वक प्रयत्न करणे.

आमचा संकल्प तर शासनमुक्तीच्या दिशेने प्रगती करण्याचा होता, परंतु त्या वेळच्या सरकारने जी पावले उचलली होती, तिची वाटचाल सर्वंकष राज्यसत्ता प्रस्थापित करण्याकडे होती. समाजाला संस्कार देण्याचे साधन सत्ता आहे की शिक्षण? हा प्रश्न केवळ राजकीय नसून प्राणभूत मूल्यांचा आहे.

वाइटातली वाईट, मोडकळीस आलेली आणि अगदी साधारण प्रतीची लोकशाहीसुद्धा चांगल्यातल्या चांगल्या एकाधिकारशाहीपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ, श्रेयस्कर असते, असे मानणारांपैकी मी आहे. जयप्रकाशांच्या नेतृत्वाला मी लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी उपकारक आणि स्वागतार्ह मानत होतो. जे लोक ह्या संदर्भात त्यांच्या नेतृत्वाला हानिकारक आणि अनर्थावह मानत होते, त्यांच्याविषयीदेखील माझ्या मनात सद्भाव व सौहार्दाची भावना वसत होती. अशा प्रकारचे मतभेद मी निकोप व आवश्यक असे मानत होतो. सर्वोदयी संघटनांमध्ये मतभिन्नतेचा प्राणवायू असेल, तरच सर्वोदयात समन्वय, संवादित्व, सर्वानुमती आणि सर्वसंमतीचा मार्ग प्रशस्त होऊ शकेल, हाच सर्वोदय आणि दुसऱ्या संघटना ह्यांतील फरक आहे. आमचे धोरण 'तडजोडीचे, समझोत्याचे' (कॉम्प्रमाइझ) नसेल, तर 'समंजसपणाचे' (अंडरस्टँडिंग) असेल, ह्यांतूनच सौहार्दाचे अबाधित बंध निर्माण होतील. 'सहस्रशीर्ष पण एक हृदय' हे साम्यसूत्र आम्ही तेव्हाच सिद्ध करून दाखवू शकू. माझी अशी धारणा आहे की, विनोबांचे हे सूत्र खरोखरच 'आर्ष' व 'अपौरुषेय' आहे.

ह्या देशाची लोकशाही सुदृढ व बळकट करावयाची असेल तर त्याच्यामागे लोकशक्ती आणि लोकसत्तेचा आधार उभा केला पाहिजे, ही जयप्रकाशांची भूमिका होती. दुर्भाग्यवश शासनाने व सत्तारूढ पक्षाने जयप्रकाशांना आपले शत्रू मानले. सत्तेचा अर्थ आहे, प्रभावशाली अस्तित्व! संघर्ष हा शब्द काही जयप्रकाशांना विशेष आवडत नव्हता. तो शब्द ते टाळू इच्छित होते, परंतु तो शब्द शेवटपर्यंत सुटू शकला नाही. संघर्षात एक प्रकारचा आवेश असतो, जोष असतो व तेज असते. जिथे संघर्ष व आवेग असतो, तिथे कधीकधी साधनांचा अविवेक होऊ शकतो. अनेक सत्ताकांक्षी व लोकद्रोही स्वार्थी लोक ह्या वाहत्या गंगेत हात धुऊन घेतल्याशिवाय राहत नाहीत. मी पंचावन्न वर्षे सतत गांधीनिष्ठ आंदोलनात काम करीत होतो. मी आपल्या अनुभवाच्या व अवलोकनाच्या आधारे न डगमगता सांगू इच्छितो की, हिंसा आणि असत्य यांचे गालबोट लागले नसेल असे ह्या देशात एकही आंदोलन झाले नाही !

केवळ हिंसेच्या भीतीने आंदोलनच टाळावे, असे मी कधीही म्हणणार नाही. परंतु या वृत्तीच्या लोकांना एकाकी पाडून टाकून व प्रभावशून्य करून इतर उपायांनी काम फत्ते करण्याचे कौशल्य आम्हांला प्राप्त करावे लागते. हा संशोधनाचा आणि प्रयोगाचा विषय आहे.

मी जयप्रकाशजींना सुचविले होते की, ज्या प्रकारे आम्ही सरकारी दडपशाहीविरुद्ध उपवास करतो, तशाच तऱ्हेने गैरसरकारी हिंसा घडते, त्याचाही निषेध करून उपवास केला पाहिजे. गैरसरकारी लोक जी हिंसा करतात, तोदेखील लोकद्रोहच असतो ना? कारण ते अशांततेचे वातावरण पसरवीत असतात. भूदानाच्या वेळी संघर्ष आणि आवेश ह्याला काही स्थानच नव्हते. त्या कामाचे स्वरूप व दर्जाच वेगळा होता. ते आंदोलन नव्हते, आरोहण होते. त्यात संघर्षाला स्थान नसणे, ही काही लोकांच्या दृष्टीने त्या कार्यक्रमातील एक उणीवच होती.

कोणतेही आंदोलन कुठून सुरू होते व त्याचे मार्ग केव्हा बदलतात, हे निश्चित करणे कठीण असते. आंदोलनात जितका योजनेचा भाग असतो, तितकाच नियतीचादेखील असतो. आपणास मान्य असो वा नसो, पण नियतीचा एक भाग असा असतो की, त्यावर आपले काही नियंत्रणच नसते. परिस्थितीचे आपले एक तर्कशास्त्र असते, विज्ञान असते. जयप्रकाशांच्या आंदोलनात संघर्षामुळे एक प्रकारचा आवेश तर आला, पण त्या जोशामुळे आंदोलन नकारात्मक बनले. आंदोलनाची मूळ भूमिका अशी होती की, राज्यशक्तीवर अंकुश असावा, त्याचे नियमन व्हावे आणि ते करण्यासाठी एक जनशक्ती उभी राहावी. पण ही भूमिकाच

मुळी गौण ठरली, मागे राहिली. जयप्रकाशांना बिहारची विधानसभा विसर्जित करण्यापर्यंत उतरावे लागले. माझ्या दृष्टीने ही अत्यंत दुर्भाग्यपूर्ण घटना होती. परंतु त्यासाठी मी जयप्रकाशांना दोषी मानीत नाही. त्यांची बुद्धी व मन दोन्ही प्रथमपासूनच ह्या गोष्टीला गौण मानत होते. आपल्या व्यक्तिगत प्रतिष्ठेची, लोकहितासाठी आहुती देण्यास ते क्षणभराचाही उशीर करीत नसत. परंतु जनतेचा आत्मप्रत्यय ते क्षीण करू इच्छित नव्हते. मी हे पण कबूल करतो की, इंदिराजींनी ह्या प्रश्नाचा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला नाही. त्या लोकशाहीच्या सिद्धान्तावर अडून बसल्या. लोकशाहीत घटनेच्या/संविधानात्मक प्रश्नाला महत्त्व अवश्य आहे, पण ते मर्यादित आहे. तंत्र आणि मूल्य ह्यांच्यात जेव्हा विरोध निर्माण होतो, तेव्हा मूल्यांचे रक्षण करण्यासाठी तंत्राला गौण मानावे लागते.

जयप्रकाशजींची एक कमजोरी होती. ती म्हणजे अतिउत्कटता आणि अतिकरुणा, ही होय. माझा मुलगा जेव्हा आजारी पडतो, तेव्हा उपचारपद्धती कोणती असावी ह्याची मी चिंता करीत नाही. तो कोणत्याही पद्धतीच्या उपायांनी बरा व्हावा, ही माझी इच्छा असते. हेच जयप्रकाशांच्या स्वभावात होते. ह्याला तुम्ही गुण म्हणायचा तर गुण म्हणा, किंवा दोष म्हणावयाचा तर दोष म्हणा ! विनोबांनी त्यांना म्हटले, 'रणछोड बनो' — मैदान सोडा. जयप्रकाश म्हणाले, "मी 'रणछोड' बनू शकतो, मैदान तर सोडू शकतो, पण जे माझ्याबरोबर इथपर्यंत आले आहेत त्या माझ्या सहकाऱ्यांना मी कसा सोडू शकतो? आता जर मी आंदोलन थांबविले, तर हे सारे लोक हताश होऊन जातील." साथीदारांना सोडणे, जयप्रकाशांना एखाद्या संकटासारखे वाटत होते. प्रवाह पार करीत असताना कधीकधी थोडा वेळ प्रवाहाबरोबर वाहावेदेखील लागते. ह्याला मी समझोता केला असे मानीत नाही. हे गतिशीलतेचे लक्षण आहे.

जयप्रकाशजींना सिद्धान्तापेक्षा क्रांतीचे महत्त्व अधिक वाटत होते. त्यांनी 'अहिंसा' हा शब्द घेतला नाही, 'शांती' या शब्दाचा त्यांनी उपयोग केला. ह्या आंदोलनाच्या दरम्यान त्यांनी अशी काही पावले उचलली, जी मला फारच चमत्कारिक वाटली. असे एक पाऊल चमत्कारिक असूनही प्रवाहप्राप्त होते. १९७४ मध्ये इंदिराजींनी त्यांना निवडणुकीस उभे राहण्याचे आव्हान दिले आणि जयप्रकाशांनी त्याचा स्वीकार केला. ज्या मुक्कामावर हे आंदोलन जाऊन पोहचले होते, ते पाहता, जयप्रकाशांचा हा निर्णय मला चूक वाटला नाही, स्वाभाविकच वाटला !

जयप्रकाशांच्या आंदोलनात मला आस्था होती, एवढेच नव्हे तर त्यात रसही

होता. त्या आंदोलनाला मी ईश्वरीय वरदान मानले. त्या आंदोलनाची तर्कशुद्ध भूमिका मी  उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश ह्या राज्यांमधून लोकांसमोर मांडली होती. परंतु आंदोलनात मी प्रत्यक्ष भाग घेतला नाही. कारावास व शिक्षा याचे मला भय वाटत नव्हते, पण आमच्या लोकांमध्ये जे शीघ्र ज्वालाग्राही व अतिउत्साही तत्त्वाचे लोक होते, त्यांच्यासोबत तुरुंगात, अथवा बाहेरही राहण्यासाठी जे मनःस्वास्थ्य पाहिजे, ते माझ्याजवळ नाही, असे मला वाटत असे.

काहीसा किनाऱ्यावर राहून हे आंदोलन मी पाहत होतो आणि विचार करीत होतो. आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांना, काम करणाऱ्यांना, कधीकधी खरेखोटे, लाभहानी ह्याचा निर्णय घेणे कठीण होऊन बसते. पण मी किनाऱ्यावर असल्याने, मला आंदोलनाचे असे विश्लेषण करता येत होते. जवळपास पंचवीस वर्षे मला सर्वोदयाच्या लोकांसोबत सत्संगात राहण्याचे भाग्य लाभल्यामुळे मी काहीसा धीट बनलो होतो. तशी तर जयप्रकाशांजवळ बसण्याची आपली पात्रता आहे, असेही मी मानीत नव्हतो. परंतु सत्यस्थितीचे वर्णन करीत असताना पात्रतेचा विचार करणे अप्रस्तुत वाटले म्हणून ह्या दृष्टीने स्नेहप्राप्त सुयोगाची संधी साधून मी जयप्रकाशांना व त्यांच्या साथीदारांना पत्र लिहून अथवा प्रत्यक्षपणे आपले विचार कळवून देत असे.

जयप्रकाशांच्या आविर्भावामुळे उन्मादाने अंध बनलेल्या तरूणांना एक नवी दृष्टी प्राप्त झाली होती. मूर्च्छित झालेला नागरिक सावध होऊ पहात होता. ह्या आंदोलनाच्या यशातून काही रत्ने निर्माण व्हावीत ह्या उद्देशानेदेखील मी आपले विचार व्यक्त करीत असे. घेराव, बंद आणि मोर्चे मला आवडले नव्हते. त्याबद्दल मी तसे वेळोवेळी जयप्रकाशांना व त्यांच्या साथीदारांना कळवीत असे.

विनोबांना मी मत, मतांतरे व मान्यतांच्या पलीकडील समजत होतो, ते ज्या वेळी जे पाहत, त्याबद्दल मत प्रकट करून टाकीत. आमच्यासाठी ते आप्त होते. 'आप्तस्तु यथार्थवक्ता' — यथार्थचा अर्थ असा की जसे तो पाहतो व समजतो तसे तो मानीत नाही. त्याला मान्यता नसतात, पण त्याचे एक दर्शन असते. तो मंत्र तयार करीत नाही तर बघत असतो. म्हणून विनोबांशी असहमत असलो, तरी त्यांच्याबद्दलची आमची श्रद्धा व पूज्य बुद्धी यत्किंचितही कमी झाली नाही.

जयप्रकाशांची भूमिका फारच स्पष्ट व शुद्ध होती. एवढेच नव्हे तर उदार व मैत्रीपूर्ण होती. त्यांचा विनोबांबद्दलचा स्नेह व आदर इतर कुणापेक्षा कमी नव्हता. तरीसुद्धा बांगलादेश प्रकरण, अनेक परिसंवाद इत्यादींबाबत त्यांच्या काही स्वतःच्या विशिष्ट प्रवृत्ती असत. त्या प्रवृत्ती विनोबांपेक्षा भिन्न अवश्य होत्या. परंतु

समानांतर नव्हत्या. जयप्रकाशजींची भूमिका केवळ 'उभयान्वयी'च नव्हती तर 'सव्यसाची'देखील होती. त्यांनी विनोबांचे नेतृत्व स्वीकारले होते, तरीदेखील सदसद्विवेकबुद्धीचे अनुकरण करणे त्यांना शक्य होत असे. त्यांच्या विवेकाला जे पटत नाही त्याचा स्वीकार करताना विनोबाजींच्या मर्यादा भंग होऊ शकतात, असे जयप्रकाशांना वाटणे अगदी स्वाभाविक होते. स्वतः विनोबांचीदेखील तशी अपेक्षा असणे शक्य नव्हते. विनोबाजी व जयप्रकाश ह्या दोन विभूतींचे परस्पर संबंध जितके मैत्रीपूर्ण होते, तितकेच कोमलही होते. त्या दोघांचे मतभेद होऊ शकतील, अशी कुणाला कल्पनाही नव्हती. परंतु आपापल्या प्रामाणिक निष्ठा जपल्याकारणाने त्या दोघांत मतभेद झाल्यासारखे दिसून आले. त्यामुळे 'विनोबा विरुद्ध जयप्रकाश' ह्या प्रकारचे विवेचन व विश्लेषण करण्याचा मोह मोठमोठ्या विचारवंतांनासुद्धा झाल्याशिवाय राहिला नाही.

परंतु एक गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे की, मतभेद म्हणजे विरोध नव्हे. आमच्या लोकांचे विनोबांशी मतभेद काही अंशी पूर्वीही झाले होते. हिंदी भाषेच्या प्रश्नावरून दक्षिणेत १९६५ मध्ये भयानक स्वरूपाचे दंगे झाले होते. त्या सुमारास विनोबाजींनी अंतःस्फूर्तीने उपवास केला होता. त्या प्रसंगी आमच्यामध्ये अनेकांचे मतभेद होते. माझा तर होताच. इंग्रजीवर बहिष्कार करण्याबाबत मी राजाजींना मानत होतो, त्यांच्या मताचा होतो, तरीदेखील विनोबाजींच्या उपवासाबाबत मी राजाजींना भेटण्यासाठी गेलो होतो. दुसरा एक प्रसंग होता, बिहारच्या दुष्काळाचा ! त्या वेळीसुद्धा दुष्काळग्रस्तांना सहाय्य करण्याचे काम विनोबाजींनी आपले मानले नव्हते. परंतु जयप्रकाशांसोबत काम करणाऱ्या सर्वोदय संस्थांनी व कार्यकर्त्यांनी ते काम आपले मानले होते.

मला असे म्हणावयाचे आहे की, मतभेदाच्या हवेची एखादी झुळूकही ज्याला सहन होत नाही, अशी सत्यनिष्ठा आणि लोकनिष्ठा अगदी बेगडी व तकलादू असली पाहिजे. मैत्री आणि सौहार्द, एखाद्या काचेच्या भांड्यासारखी हलक्याशा धक्क्याने तुटू लागली, तर ती मानवतेच्या विकासासाठी पोषक सिद्ध होऊ शकणार नाही.

विनोबा व जयप्रकाश ह्या दोघांच्याहीसोबत काही मुद्यांवर माझे मतभेद होते. परंतु त्या दोघांच्याबद्दल माझ्या मनात जो आदर व श्रद्धा होती त्याला कधीही तडा गेला नाही. कदाचित हा माझ्या स्थायी स्वभावाचाही भाग असू शकतो.

टिळक-गोखले, टिळक-गांधी, गांधी-अरविंद, गांधी-बेझंट, गांधी-मालवीय, गांधी-गुरुदेव या सर्वांचे एकमेकांशी असलेले मतभेद प्रसिद्ध आहेत. इतके असूनही ह्या लोकांच्या आपसातील प्रेमात आणि आदरात कधी अंतर पडले

नाही. अशा सौजन्ययुक्त मतभेदांच्या पोषणामुळेच व्यक्तिस्वातंत्र्याचे अंकुर फुटू शकतात, पल्लवीत होतात, सुपुष्पित व सुफलित होत असतात. समाजात फक्त पुष्टी व तुष्टी पुरेशा ठरणार नाहीत. विवेक आणि मांगल्याशिवाय मानवनिष्ठेचा आविर्भाव होऊ शकणार नाही.

❑❑

['मनिषीची स्नेहगाथा' ह्या पुस्तकातून उद्धृत. दादांच्या ह्या चरित्रपर पुस्तकात त्यांची १९७५ साली दिलेली प्रदीर्घ मुलाखत असून ती अन्य कागदपत्रांवरही आधारित आहे.
संपादन : तारू भागवत, मराठी अनुवाद : तारा धर्माधिकारी, प्रकाशन (सप्टेंबर १९९६) : परंधाम प्रकाशन, पवनार.]

# ४

# जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीची आधारशिला

*[उमेदवारांची लोकशाही आमच्या कल्याणाची नाही, कारण तिच्यात नागरिकांच्या पराक्रमाला वाव नाही म्हणून अशा नागरिकाला आपल्याला शोधायचे आहे. संप्रदायनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष, भाषानिरपेक्ष आणि लिंगनिरपेक्ष असे नागरिकत्व— आपल्याला ह्या देशात निर्माण करावयाचे आहे. घटनेत नमूद केलेले असे नागरिकत्व अस्तित्वात आल्याशिवाय ह्या देशात राष्ट्रीयतेचाही विकास होऊ शकणार नाही.*

*स्वातंत्र्यपूर्व काळात जी देशभक्तियुक्त राष्ट्रीयता दिसत होती, ती आज खंडित झाली आहे. इतिहासकार ॲरनॉल्ड टायन्बी म्हणतो, "भारत म्हणजे जणू एकवटलेले अवघे जग". ह्या दृष्टीने भारतीय ऐक्याचा विचार हा जागतिक ऐक्याचाच विचार होय. नागरिक हा लोकशाहीचा आधार बनला पाहिजे. सरकार, सावकार किंवा शिपाई लोकशाहीचा आधार असू शकत नाहीत. लोकक्रांतीचा नायक नागरिक आहे. आणि तोच तिचा आधार असला पाहिजे. त्याच्याच पराक्रमातून ही क्रांती उदयास येईल. राजकीय लोकशाही बंदिस्त असते म्हणून आर्थिक क्षेत्रात लोकशाही आली पाहिजे. आर्थिक लोकशाही म्हणजे जीवनासाठी संयोजन. हे संयोजन मानवकेंद्रित असले पाहिजे. आणि त्यात वनस्पतीपासून माणसापर्यंतची अवघी जीवसृष्टी सामावली पाहिजे. ह्याचा अर्थ हिंसा, माणसामाणसांतील अलगाव आणि प्रदूषण या तीन गोष्टी टाळता आल्या पाहिजेत. मानवतावाद हा जयप्रकाश नारायण ह्यांच्या संपूर्ण क्रांतीचा आधार होता, म्हणून दादा धर्माधिकारी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.]*

संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात पहिली गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे : ती ही की मत असणे, मत बनवणे म्हणजे बुद्धीवर अत्याचार करणे आहे. मत बनवणे वेगळे आणि वस्तुस्थिती समजून घेणे वेगळे. मत एकदा बनले की बुद्धी क्षीण होते. मग मत आपले राहत नाही, आपणच मताचे गुलाम होऊन जातो. आणखी एक गोष्ट : आपला स्वतःचा एखादा विशिष्ट असा विचार असू नये. एखाद्या विशिष्ट विचाराची बांधिलकी पत्करणे ही वेगळी गोष्ट आहे आणि विचार करणे ही एक वेगळी गोष्ट आहे. एखाद्या विशिष्ट विचाराला बांधून घेणे इष्ट नाही; मग तो विचार कोणाचा का असेना ! अगदी गांधी-विनोबांचा विचार म्हटला तरीही

त्याच्याशीदेखील आपण स्वतःला जखडून घेता कामा नये. माणसाची बुद्धी विचार करायला मोकळी असली पाहिजे, एखाद्या विशिष्ट विचाराचा आपला आग्रह जसा जसा वाढत जातो तसे तसे सत्य कमी होत जाते, कारण विचार हा आपला असतो, पण सत्य मात्र सर्वांचे असते. कोणताही विशिष्ट आग्रह नसणारी तटस्थ, विनम्र बुद्धीच फक्त स्वतंत्र विचार करू शकते.

काही काही शब्द असे असतात की त्यांचा वारेमाप उपयोग केला जातो. त्यामुळे त्या शब्दांच्या अर्थाकडे दुर्लक्ष होऊ लागते. भाषेत कित्येक शब्द असे रुळलेले असतात की, त्यांचा अर्थ विचारला तर नेमका अर्थ आपल्याला सांगता येत नाही. लास्कीने आपल्या एका पुस्तकात कम्युनिझम शब्दाबद्दल असेच म्हटले आहे. तो म्हणतो, ''कम्युनिझम ही अशी एक टोपी आहे की जी सगळेच वापरतात आणि त्यामुळे असे झाले आहे की तिला स्वतःचा असा कोणताही आकार राहिलेला नाही !'' असाच एक प्रचलित झालेला शब्द 'क्रांती' हा आहे. असे शब्द फारसे खोलात जाऊन कोणी समजून घेत नाही. पूर्वी 'स्वराज्य' शब्दाचेही असेच होते. स्वराज्य शब्दाची व्याख्या करणारे वेगळे होते आणि स्वराज्य मिळवणारे वेगळेच होते. व्याख्या करणाऱ्यांचा व्याख्या करण्याचा उद्योग अजून चालू आहे. अद्यापि त्यांचा स्वराज्याचा शोध चाललेलाच आहे. 'संपूर्ण क्रांती' शब्दाची स्थितीही काहीशी अशीच आहे. हा शब्द वापरून वापरून जणू गुळगुळीत होऊन गेला आहे. संपूर्ण क्रांतीला मी लोकक्रांती म्हणतो. राज्यक्रांती आणि लोकक्रांती या भिन्न गोष्टी आहेत. बायबलमध्ये म्हटले आहे, 'एव्हरी थिंग वुइल बी ॲडेड इंटू इट'. लोकक्रांती म्हटले म्हणजे क्रांतीचे सर्व पैलू आपोआपच त्याच्याबरोबर येऊन जातात.

**लोकशाहीचे अधिष्ठान कोणते?**

लोकशाहीचे पाऊल लोकसत्तेच्या दिशेने कसे पडेल, हे शोधणे हा क्रांतीचा मुख्य हेतू आहे. लोकसत्तेचा पाया नसेल तर लोकशाही कधीही यथार्थ ठरू शकत नाही. आपल्या देशात किती तरी काळापासून लोकशाही आहे, असे गोडवे आपण गातो, पण लोकशाहीच्या नावाखालीच इथे एकाधिकारशाही स्थापन झाल्याचा अनुभव आपण नुकताच घेतला ! हा बदल घडताना शस्त्रास्त्रांचा खणखणाट झाला नाही की रक्ताचे पाट वाहिले नाहीत. शांततामय उपायांनी आणि घटनात्मक मार्गाचे नाव घेऊन देशावर एकाधिकारशाही लादली गेली ! ह्याचा अर्थ केवळ लोकशाही असणे पुरेसे नाही, असा होतो. लोकसत्ता हवी. 'लोक' हा शब्द तसा बराचसा अव्यक्ताचा द्योतक आहे. 'हे म्हणजे लोक' असे काही बोट दाखवून सांगता येत नाही. 'लोक' अनंत आहे. त्याचा क्षय कधी होत नाही. 'लोक-पीपल'

हा काही केवळ एक सिद्धान्त नाही, ते एक भावरूप सत्य आहे, पण ती एखादी व्यक्त वस्तू मात्र नव्हे. 'लोक' चे सगुण-साकार रूपडे म्हणजे व्यक्ती! म्हणूनच व्यक्ती स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे. इंग्रजीत व्यक्ती म्हणजे 'इंडिव्हिजुअल.' ह्याचा अर्थ असा घटक की ज्याचे तुकडे करता येत नाहीत. व्यक्ती संपूर्ण असते, समग्र असते. ह्याचा अर्थ असा की व्यक्ती परिपूर्ण असावी आणि ज्या समाजात ती राहते तो समाजही परिपूर्ण असावा. ह्याचा अर्थ काय? लोकशाहीचा अधिष्ठाता कोण आहे? अधिष्ठाता म्हणजे 'सँक्शन'चे प्रतीक असणारा माणूस. 'ही हू रिप्रेझेंट्स द सँक्शन'—लोकशाहीचा अधिष्ठाता—'सँक्शन' कोण असावा? सैनिक की नागरिक? जर सैनिक लोकशाहीचा अधिष्ठाता असेल तर शस्त्रशक्तीवर—फोर्सवर—तिला अवलंबून राहावे लागेल. लोकसंमतीवर ती लोकशाही विसंबून राहणार नाही. आमच्या लोकशाहीचे अधिष्ठान सैनिकशक्ती हेच होते आणि आजही तेच आहे. त्यामुळेच नागरिकाच्या साऱ्या मूलभूत अधिकारांचा अपहार होऊ शकला. जर लोकशाहीचे अधिष्ठान शस्त्रशक्ती हे नसते तर अशा रीतीची एकाधिकारशाही इथे येऊच शकली नसती.

घटनात्मक तरतूद ही एक अलग गोष्ट आहे आणि वास्तव लोकसत्ता ही अलग गोष्ट आहे. घटनात्मक तरतुदी अधिकार देऊ शकतात, पण ते अधिकार बजावण्याची शक्ती कोणतीही घटना देऊ शकत नाही. ती शक्ती लोकांत निर्माण करावी लागते. म्हणून क्रांती म्हणजे लोकक्रांती असली पाहिजे. लोकक्रांती केवळ लोकांसाठीची क्रांती नसते. लोकक्रांती म्हणजे लोकांसाठी, लोकांच्या पराक्रमातून सिद्ध झालेली आणि लोकांची क्रांती असते. लोकमान्यांनी 'गीतारहस्या'त ईश्वराला 'जनतात्मा' म्हटले आहे. 'श्रीशाय जनतात्मने' असे म्हणून त्यांनी 'गीतारहस्य' जनतात्म्याला अर्पण केले आहे. ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मा' म्हटले आहे. विवेकानंद आणि गांधी ह्यांनी 'दरिद्र-नारायण' असे म्हटले, पण लोकमान्यांनी 'जनतात्मा', 'लोकात्मा' म्हटले आहे. तर खरीखुरी लोकक्रांती आपल्याला करायची असेल तर नागरिकाला जागृत व्हावे लागेल. लोकयुगातला अवतार नागरिक हा आहे आणि त्याला ह्या गोष्टीचे भान असले पाहिजे. पण आपल्या देशात दोन बळीचे बकरे—स्केपगोट्स— आहेत. इथला नागरिक भल्याबुऱ्याचा धनी एक तर ईश्वराला तरी मानतो किंवा सरकारला तरी मानतो. त्यांच्यावर ठेपर ठेवून तो नामानिराळा राहतो. त्याच्या पोराला सर्दी झाली तर त्याला ईश्वर तरी जबाबदार असतो किंवा सरकार तरी जबाबदार असते. ईश्वराच्या खालोखाल सरकारला स्थान आहे. पण ईश्वर पडला परलोकात. त्यामुळे भूलोकी सरकारलाच मुख्य स्थान आहे. मिस रॉबर्सनने ह्या रोगाचे समर्पक वर्णन केले आहे. 'हायपर

ट्रॉफी ऑफ द स्टेट' म्हणजे राज्यसंस्थेचा अमर्याद विस्तार हा तो रोग आहे. आज नागरिक जीवनाच्या सर्व भागांवर राज्यसंस्थेची सावली पडली आहे. जीवनाच्या सर्व अंगोपांगांत राज्यसंस्था शिरली आहे. त्यामुळे सरकारावलंबनावाचून नागरिक जगूच शकत नाही. तो परप्रत्ययी झाला आहे. कोणताच निर्णय तो स्वतः करीत नाही. ह्यात मनुष्यत्वाची हानी आहे असे मला वाटते.

**माणसाने आपल्या कर्माची जबाबदारी घ्यावी**

देवयोनी आणि पशुयोनी या भोगयोनी समजल्या जातात. कर्माचा उपभोग घेण्यासाठीच जणू त्यांचा जन्म असतो. माणूस मात्र स्वतःच्या भल्याबुऱ्याला स्वतःच जबाबदार आहे. मानवी जीवनाचे हेच देखणेपण आहे आणि ह्यातच त्याची थोरवीही आहे. ईश्वरनिष्ठ माणसानेदेखील आपल्या कर्माची जबाबदारी कोणत्याही मानवेतर शक्तीवर किंवा संस्थेवर सोपवता कामा नये. मी केवढाही लहान असो, क्षुद्र असो, माझ्या कर्माची जबाबदारी माझी स्वतःचीच आहे, असे त्याने मानले पाहिजे. ही जबाबदारी जसजशी कमी होत जाईल तसतसे त्याचे स्वातंत्र्यही कमी होत जाईल. मानवी जीवनाचे हे वैशिष्ट्य आहे की तो स्वतःचे जीवन बदलू शकतो. तो चुकाही करतो आणि तो स्वतःच त्या दुरुस्तही करतो. तो नरकातही जाऊ शकतो आणि स्वर्गातही जाऊ शकतो. माणसाला नरकात जाण्याचेही स्वातंत्र्य असले पाहिजे असे मानणाऱ्यांपैकी मी आहे. दुसऱ्याने दिलेला स्वर्ग नरकाहूनही तुच्छ आहे आणि आपल्या मर्जीचा नरक स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहे. स्वातंत्र्य ही गोष्ट महत्त्वाची आहे. त्या स्वातंत्र्याची अनुभूती, त्याचा प्रत्यय, देशातील सर्वसाधारण नागरिकाला आला पाहिजे. तो जेव्हा स्वतःच्या जीवनाला स्वतःलाच जबाबदार समजू लागेल तेव्हा हे घडेल. स्वतःच्या जीवनाला जबाबदार तसाच आपल्या शेजाऱ्याच्या जीवनालाही जबाबदार, हीच मानवता आहे. माणूस संबंधांतून जगत असतो. जेथे संबंध नाही तिथे जीवन नाही. आम्ही परस्परांच्या जीवनाला जबाबदार आहोत. 'ओल्ड टेस्टॅमेंट'मध्ये — 'जुन्या करारा'त—एक उल्लेख येतो. आदमची दोन मुले होती. एकाचे नाव आबेल, दुसऱ्याचे केन. केनने ईर्षेपायी आबेलला मारून टाकले. देवाने त्याला विचारले, "तू आबेलला का मारलेस?" केनने देवाला उलट विचारले, "मी काय त्याचा संरक्षक आहे?" त्याचा अध्याहृत, गर्भित अर्थ असा असू शकतो की होय, प्रत्येक मनुष्य दुसऱ्या माणसाचा संरक्षक आहे. आम्ही परस्परांचे पालक आहोत. परस्पर प्रामाण्य आणि परस्पर दायित्व हा नागरिक जीवनाचा मूलाधार आहे. ह्या गोष्टींचा परिपोष करायचा तर नागरिक जीवनात पारिवारिक मूल्यांचा समावेश करावा लागेल.

**प्रतिनिधी नव्हे, नागरिक**

स्वातंत्र्य हे एक असे नाणे आहे की ज्याच्या एका बाजूला 'स्वातंत्र्य' लिहिलेले असते आणि दुसऱ्या बाजूला 'जबाबदारी' लिहिलेले असते. जिथे नागरिक बेजबाबदार असतो तिथे राज्य जबाबदार असू शकत नाही. अशा ठिकाणी दोन प्रकारचे लोक राहतात : एक असतात राज्याकांक्षी आणि दुसरे असतात सत्ताकांक्षी. हे दोघेही सत्तावादी, राज्यवादीच असतात. ह्याला 'स्टेटिझम' म्हणतात. राज्यवाद एक गोष्ट आहे आणि लोकसत्ता ही त्याहून अगदीच निराळी गोष्ट आहे. राज्यवाद जितका घटेल तितकी लोकसत्ता वाढेल. प्रतिनिधी कमी व्हावे आणि सत्ता व कारभार प्रत्यक्ष नागरिकाच्या हाती जावा, हाच लोकसत्तेच्या विकासाचा मार्ग आहे. लोकांना शासनातीत बनवण्यासाठी राज्यशासन आहे. राज्यशासनाचे हे शास्त्रीय प्रयोजन आहे. वैद्यकशास्त्रात जे औषध एकदा घेतल्यानंतर पुन्हा घ्यावे लागत नाही त्याला रामबाण औषध म्हणतात, त्यांप्रमाणे ज्यानंतर शासनाची आवश्यकताच राहत नाही ते राज्यशासन सर्वोत्कृष्ट ठरते. नागरिकांना जेव्हा परस्परांचे भय वाटते तेव्हा राज्यव्यवस्थेची आवश्यकता निर्माण होते. राज्यसंस्था हे एक अटळ संकट मानले जाते. आज ती अटळ वाटते ह्याचा अर्थ असा नाही की ती कायमच अटळ राहणार आहे. माणसाचे आदर्श नेहमीच नैतिक वा पारमार्थिक असतात, ते राजकीय वा आर्थिक नसतात. आजवर झाले असे की तत्त्वज्ञमूढ आणि विज्ञानमूढ व्यक्तींच्या हाती समाजपरिवर्तनाचे काम आले. आज तत्त्वज्ञ वेगळा आहे, वैज्ञानिक वेगळा आहे आणि नागरिक वेगळा आहे. अशा प्रकारच्या विभागणीमुळे मनुष्याचे व्यक्तित्वही विभागले जाते, ते समग्र बनत नाही. असे व्यक्तित्व लोकसत्तेचा आधार होऊ शकत नाही.

शंकराचार्यांनी 'लोक' शब्दाची फार सुंदर व्याख्या केली आहे. 'लोकयते इति लोकः', 'लोकयति इति लोकः' जे दिसतात ते लोक, जे पाहतात ते लोक. एकदा विमानातून प्रवास करताना मी शेजारच्या तरुणाला म्हणालो, "मित्रा, मला खिडकीजवळ बसू दे." त्यावर तो म्हणाला, "बाहेर अंधार आहे. काय पाहणार तुम्ही?" मी म्हणालो "अंधारच पाहीन झाले !" तो माझ्याकडे आश्चर्याने पाहतच राहिला. म्हणाला, "अंधार काय पाहणार? डोळे मिटून घ्या म्हणजे अंधारच अंधार दिसेल." मी म्हणालो, "ज्याचे डोळे बंद आहेत त्याला तर काय प्रकाशदेखील दिसणार नाही, मग अंधार कुठला दिसायला?" अंधार पहायचा तरी डोळे उघडे हवेत. माझ्या डोळ्यांत जो प्रकाश आहे त्याने अंधारदेखील उजळून निघतो ! ह्याला सत्ता म्हणतात. अंधारावरदेखील प्रकाशाची सत्ता असते.

त्याचप्रमाणे राज्यशक्तीसाठीही लोकशक्ती लागतेच. राज्य केवढेही प्रभावी असो, राजा केवढाही मोठा असो, त्याचे अधिष्ठान नेहमी लोकसत्ता हेच असते.

**लोकसत्तेचा लिलाव**

आज दोन प्रकारच्या लोकसत्ता आहेत : एकीला मी उमेदवारांची लोकसत्ता म्हणतो तर दुसरीला मी नागरिकांची लोकसत्ता असे संबोधतो. उमेदवाराच्या लोकसत्तेत लोकसत्तेचा लिलाव होत असतो. ही जी लोकशाही आहे ती सावकाराची, भांडवलदाराची बेटी आहे. सावकाराची बेटी असल्याने ती अजूनही फार महागडी आहे. भांडवलशाहीची दोन अपत्ये आहेत. एक आहे लोकशाही आणि दुसरे आहे समाजवाद. लोकशाही हे लाडके अपत्य असल्याने ते फार खर्चिक आहे. बाजारात ते विकले जाते. समाजवाद हे जे तिचे दुसरे अपत्य ते मूळ नक्षत्रावर जन्मलेले आहे. मार्क्सने त्याला जनकाचा मारक ('ग्रेव्ह डिगर ऑफ कॅपिटॅलिझम') असे म्हटले आहे. ह्या लोकसत्तेला, लोकशाहीला बाजाराच्या बाहेर आले पाहिजे. जोवर भांडवलशाही व्यवस्थेच्या अधीन लोकशाही असेल तोवर लोकशाही बाजारात विक्रीला येईल. मराठीचे एक विख्यात नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर ह्यांची मला ह्या संदर्भात आठवण येते. त्यांनी हरिश्चंद्राच्या जीवनावर 'सत्त्वपरीक्षा' नावाचे एक नाटक लिहिले आहे. हरिश्चंद्राने विश्वामित्राला आपले सर्वस्व दान केले. दान घेऊन विश्वामित्राने वर दक्षिणेची मागणी केली. दक्षिणेवाचून दानाची परिपूर्णता होतच नाही. हरिश्चंद्राने विचारले, ''किती दक्षिणा हवी?'' विश्वामित्राने 'हजार मोहरा' सांगितल्या. हरिश्चंद्र म्हणाला, ''घेऊन टाका तारामतीचे दागिने.'' त्यावर विश्वामित्र म्हणाला, ''असा कसा रे बावळट तू? ते तर आधीच माझे झाले आहेत. तू मला सर्वस्वाचे दान केलेस ना? मग त्यात तुम्हा सर्वांचे दागिनेही आले!'' हरिश्चंद्र निराश झाला. मनाशी म्हणाला, ''आता काय करायचे बुवा? माझ्याजवळ काही सुद्धा नाही.'' विश्वामित्र म्हणाला, ''एवढा कसला विचार करतोस? तू काय षंढ आहेस? अरे देवाच्या दयेने मिळालेला हा साडेतीन हाताचा देह तर आहे ना तुझ्यापाशी? त्याचा उपयोग कर.'' मग स्वतःला विकून घेण्यासाठी हरिश्चंद्र निघाला. पृथ्वीचे त्याने आधीच दान देऊन टाकले होते. मग जाणार तरी कुठे? काशीवर विश्वनाथाचे अधिराज्य असल्याने तो तिकडच्या रोखाने निघाला. काशीच्या बाजारात येऊन तो उभा राहिला. लोक चांगला धट्टाकट्टा माणूस पाहून त्याला 'काय येते?' विचारीत. तो म्हणे, ''मला राज्य करता येते.'' लोक म्हणत, ''आमच्याजवळ राज्य कुठे आहे?'' त्याला बिचाऱ्याला सुखासुखी खरेदी करण्याला कोण तयार

होणार? आज आपल्याकडील स्थितीही काहीशी तशीच आहे. आज नेता कुठे गेला की लोक विचारतात, ''तुम्हांला काय येते?'' ''बुक कीपिंग येते? टायपिंग येते?'' तो म्हणतो, ''मला फक्त नेतागिरी करता येते. ज्याला नेता पाहिजे त्याने मला खरेदी करावे.'' त्याला दोनच उत्तरे मिळतात. एक तर मंत्री बना, नाही तर भिकारी ! तिसरा मार्गच नाही. हरिश्चंद्राची अशीच स्थिती झाली. त्याचा मुलगा रोहिदास आईला विचारतो, ''आई, माणसे विकणे म्हणजे ग काय? माणसाला विकतात याचा अर्थ काय? माणूस विकला जाऊ शकतो काय?'' तारामती रडत रडत त्याला सांगते, ''बाळा, अजून तू लहान आहेस. तुला नाही ते समजणार?'' जिथे माणूस विकला जातो तिथे देवही विकला जातो. ह्यालाच भांडवलशाही म्हणतात. भांडवलशाहीत फक्त वस्तूच विकल्या जातात असे नाही, तर तिथे माणूसही विकला जातो आणि त्याचा परमेश्वरही विकला जातो.

**बाजार : एक प्रभावी संस्था**

एक सधन मनुष्य होता. त्याचा धंदा डबघाईला आला. दिवस वाईट आले. कसा मार्ग काढावा ह्यातून? घरात गणपतीची सोन्याची मूर्ती होती, ती विकायला तयार झाला अखेरीस ! सराफाला त्याने विचारले, ''काय भाव देणार या मूर्तीला?'' सराफ म्हणाला, ''देईन पंचवीस रुपये तोळ्याला.'' तो सधन माणूस म्हणाला, ''उंदराला हा भाव ठीक आहे, पण गणपतीला काय भाव देणार?'' सराफ म्हणाला, ''जो भाव सोन्याच्या उंदराला तोच भाव सोन्याच्या गणपतीला.'' सधन माणूस रागावला. म्हणाला, ''तुझे डोके ठिकाणावर आहे का? गणपती देव आहे आणि उंदीर एक तुच्छ प्राणी. दोन्हीचा भाव एकच सांगतोस?'' सराफ म्हणाला, ''हा गणपती जर देव असता तर देवघरातून असा बाहेर कशाला आला असता? आणि हा उंदीर तुच्छ प्राणी असता तर तो तरी इथे कशाला आला असता? बाजारात एकदा उतरल्यावर गणपती गणपती नाही आणि उंदीर उंदीर नाही.'' सांगण्याचे तात्पर्य असे की, आजच्या आमच्या लोकशाहीत प्रत्येक गोष्ट विकाऊ आहे. ह्यालाच भांडवलशाही म्हणतात. भांडवलशाहीत बाजार ही सर्वात प्रभावी संस्था असते. जीवनाच्या सर्व अंगोपांगांवर तिचा प्रभाव पडतो. अर्थशास्त्रात दोन शब्द आहेत : विक्रय आणि विनिमय. वस्तूच्या बदल्यात वस्तू ह्याला विनिमय म्हणतात आणि वस्तूच्या बदल्यात पैसा याला विक्रय म्हणतात. बाजारी व्यवस्थेत काम आणि श्रम ह्यांचे महत्त्व घटत जाते. माणसाला एखाद्या वस्तूचे किंवा उपयुक्त यंत्राचे रूप येते. जोवर माणूस ही विक्रीची वस्तू असेल तोवर लोकशाही हीदेखील एक विक्रीची वस्तूच बनेल. ह्यासाठी आपल्याला

भांडवलशाहीचा संदर्भच बदलावा लागेल. हा संदर्भ बदलल्यावाचून लोकक्रांती अंमलात येणे शक्य नाही.

**आशेला जागा**

मागच्या लोकसभा निवडणुकीमुळे एक नवी आशा उदयाला आली आहे. आपला देश हा एक चमत्कारांचा देश आहे. असा चमत्कार दुसऱ्या कुठे पाहायला मिळणार नाही. बर्नार्ड शॉ एकदा भारतात आले तेव्हा कोणी तरी त्यांना विचारले, ''तुम्ही इथे असे काय पाहायला आला आहात?'' तेव्हा बर्नार्ड शॉ म्हणाले, ''दोन गोष्टी पाहण्यासाठी मी इथे आलो आहे : एक ताजमहाल आणि दुसरी गांधी. हे दोन चमत्कार मला पाहायचे आहेत.'' पण असे किती तरी चमत्कार ह्या देशात पूर्वी झालेले आहेत. सर्वांत मोठा चमत्कार म्हणजे भारताचे पारतंत्र्य. पाच हजार मैलांवरून लाख दीड लाख माणसे येतात काय आणि तीस कोटी लोकांवर थोडीथोडकी नव्हे, दीडशे वर्षे राज्य करतात काय?— असा चमत्कार इतिहासात दुसरा कुठे आढळणार नाही! भारतवर्षातले आपण लोकच असला चमत्कार करून दाखवू शकतो. सर जॉन सिली नावाच्या एका इंग्रज लेखकाने लिहिले आहे : ''वुइ सीम टु हॅव पीपल्ड अँड काँकर्ड हाफ द ग्लोब इन ए फिट ऑफ ॲबसेन्स ऑफ माइंड—'' ''गफलतीने आपण अर्ध्या पृथ्वीच्या पाठीवर पसरलो आणि तिच्यावर राज्य करू लागलो.'' शालान्त परीक्षेच्या वेळी बहुधा हे मी वाचले होते. मी विचार केला की गफलतीने जर ब्रिटिशांना अर्ध्या दुनियेचे राज्य मिळाले असेल तर आम्हाला त्रैलोक्याचे राज्यच मिळायला हवे होते! कारण आमची बरोबरी करू शकतील असे गफलतबहाद्दर आपल्याला शोधूनही दुसरे सापडणार नाहीत. तर भारताच्या पारतंत्र्याचा हा एक चमत्कार. दुसरा चमत्कार म्हणजे भारतात मतदान पद्धतीने केरळमध्ये जगातले पहिले कम्युनिस्ट सरकार अधिकारावर आले. जगात दुसऱ्या कुठेही मतपेटीतून कम्युनिस्ट सरकार अधिकारावर आल्याची नोंद नाही. हा चमत्कारही या देशातच घडला; आणि तिसरा चमत्कार गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी जगाने पाहिला. असा चमत्कार दुनियेत पूर्वी कधी घडल्याची नोंद नाही. ज्या परिस्थितीत सामान्यतः मनुष्य विकला जातो त्या परिस्थितीतही इथल्या नागड्याउघड्या, उपाशी, गरीब माणसानेदेखील आपले मत विकले नाही! आधी भाकरी की आधी स्वातंत्र्य, हा सगळा वाद व्यर्थ आहे. दोन्ही बरोबरच का नको? भाकरीसाठी काय स्वातंत्र्य विक्रीला काढायचे? जर माणसाला भाकरी आणि स्वातंत्र्य दोन्ही गोष्टी आपण एकाच वेळी देऊ शकणार नसलो तर आपण समजले पाहिजे की माणसाच्या

बुद्धिमत्तेचे दिवाळे निघाले आहे! भाकरी आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी एकाच वेळी स्वतःच्या बळावर संपादन करण्याचा मार्ग मानवी बुद्धीच्या झेपेपलीकडचा आहे काय?

## आजचा कॉन्ट्रॅबॅन्ड व्होटर

पण आज तरी परिस्थिती फारच भीषण आहे. ह्या देशात सरकारवर लोकांचा विश्वासच उरलेला नाही. पण ज्या बिनसरकारी संस्था आहेत त्यांच्यासंबंधी तर त्याला अधिकच अविश्वास वाटतो. कमीतकमी अविश्वास त्याचा कोणावर असेल तर तो सरकारवर आहे. ह्यालाच मी सरकारावलंबन म्हटले आहे; आणि जोवर सर्व गोष्टींचे त्यातल्या त्यात विश्वासार्ह साधन सरकार असेल तोवर सत्ता-स्पर्धा चालणार आणि तोवर ही लोकशाही उमेदवारांचीच लोकशाही राहणार. नागरिकांची लोकशाही ती होणार नाही. मला वाटते, माझे राज्य व्हावे. तुम्हांला वाटते तुमचे राज्य व्हावे. त्यामुळे तुम्ही एक उमेदवार आणि मी दुसरा उमेदवार. माझे राज्य कोणावर मला हवे आहे? तुमच्यावर! आणि तुमचे राज्य तुम्हांला कोणावर हवे आहे? तर माझ्यावर! तर आपण दोघे एकमेकांच्या खांद्यावर बसण्यासाठी धडपडत आहोत! पूर्वी जी सत्ता राजसिंहासनाच्या अवतीभवती फक्त होती ती आता घरोघर जाऊन पोहोचली आहे. हे सत्तेचे विकेंद्रीकरण नव्हे, सत्ता-स्पर्धेचे हे विकेंद्रीकरण आहे. राजकीय पक्ष म्हणजे तरी दुसरे काय आहे? संघटित उमेदवारी म्हणजे राजकीय पक्ष. जोवर उमेदवारांचे पेव फुटलेले असेल तोवर बिचाऱ्या नागरिकाला मैदानात उतरायला जागाच कुठे आहे? वॉल्टेयर एकदा पॅरिसमध्ये प्रवेश करीत होता. जकात नाक्यावरचा माणूस त्याच्या घोडागाडीत डोकावून डोकावून पाहत होता. गाडीत एखादी बेकायदा गोष्ट तर नाही ना, हे तो शोधत होता. वॉल्टेयर हा मोठा विनोदी माणूस होता. तो मिस्कीलपणे हसत हसत म्हणाला, "ह्या घोडागाडीत माझ्याखेरीज बेकायदा (कॉन्ट्रॅबॅन्ड) वस्तू दुसरी कुठलीच नाही." उमेदवारांच्या भाऊगर्दीत बेकायदा आहे तो इथला मतदार, नागरिक. लोकशाहीत बिचाऱ्याला फक्त राज्यकर्ते निवडून द्यायचे असतात!

## रामराज्य आणि हरामराज्य

एकदा एक माणूस म्हणाला, "गांधीजी तर रामराज्याची गोष्ट करतात आणि तुम्ही मंडळी गांधीजींची आज्ञा मानणारी आहात ना?" मी त्याला म्हणालो, "गांधीजींनी सांगितले ते आम्ही करतो." पण गांधी हा शाबूत डोक्याचा माणूस आहे. गांधीजींनी ज्या रामराज्याचा उल्लेख केला ते काही दशरथपुत्र असणाऱ्या

रामाचे राज्य नव्हे. त्यांच्या रामराज्यात एक फार महत्त्वाची गोष्ट होती. त्यात सिंहासनाचे अधिकारी सर्वच होते, पण उमेदवार मात्र एकही नव्हता. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न ह्या चौघांनाही सिंहासन उपलब्ध होते, पण त्यांच्यात कोणीच उमेदवार नव्हता. जेथे अधिकार प्रत्येकाचा असूनही उमेदवार कोणीही नसतो त्याला म्हणायचे रामराज्य आणि जेथे जेवढे अधिकारी तेवढे सगळे उमेदवार असतात त्या राज्याला मी नाव दिले आहे हरामराज्य! ह्यालाच उमेदवारांची लोकशाही मी म्हणतो. ही उमेदवारांची लोकशाही आमच्या कल्याणाची नाही, कारण तिच्यात नागरिकाच्या पराक्रमाला वाव नाही. त्या पराक्रमी नागरिकाला आपल्याला शोधायचे आहे. खरोखर आपल्या देशात असा कोणी नागरिक आहे काय? हा प्रश्न वरवर पाहता आपल्याला चमत्कारिक वाटण्यासारखा आहे.

**चार प्रकारची नागरिकत्वे**

चार प्रकारची नागरिकत्वे आपल्याला पाहायला मिळतात. एक असते सांप्रदायिक नागरिकत्व. कोणाला आपण तो कोण म्हणून विचारावे, तो एकतर जातीचा उल्लेख करतो, फारतर धर्माचा उल्लेख करतो. नुसता 'भारतीय' असा उल्लेख क्वचित कोणी करतो. पूर्वी डॉ. आलम नावाचे एक गृहस्थ होते. लाहोरमधले ते एक मुसलमान बॅरिस्टर होते. त्यांना कोणीसे विचारले की तुम्ही प्रथम मुसलमान आहात का भारतीय? — त्या महंमद अल्लींनी सांगितले होते ना की मी प्रथम मुसलमान आहे आणि नंतर भारतीय; त्यामुळेच हा प्रश्न विचारण्यात आला होता. डॉ. आलम प्रश्नकर्त्याला म्हणाले, "दोस्ता, तुला नीट प्रश्नच विचारता येत नाही बघ. खरे म्हणजे तू असे विचारायला हवे होते की, तुम्ही प्रथम आईचे आहात की बापाचे? तर त्याला माझे उत्तर आहे, मी आईचाही आहे आणि बापाचाही आहे. एकाच वेळी दोघांचा आहे आणि म्हणूनच मी माणूस आहे. डॉ. आलम आहे." पण इथे असले प्रश्न विचारण्याची प्रथाच पडून गेली आहे. ह्याला मी सांप्रदायिक-डिनॉमिनेशनल नागरिकता म्हणतो. इस्लामियत हीच कौमियत किंवा हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हा ह्यातलाच प्रकार. ह्यातूनच पाकिस्तान जन्माला आले आणि पंजाबी सुभ्याची, खलिस्तानची मागणीही पुढे आली.

दुसरे नागरिकत्व म्हणजे 'हायफनेटेड' नागरिकत्व. दोन शब्द जोडण्यासाठी आपण त्यांच्यामध्ये जी छोटी रेघ देतो त्याला 'हायफन' म्हणतात. 'हायफनेटेड' नागरिकत्व म्हणजे सामासिक नागरिकत्व. तुम्ही कोणते भारतीय? तर मी महाराष्ट्रीय भारतीय, असामिया भारतीय, कन्नड भारतीय, गुजराती भारतीय,

बांगला भारतीय, इत्यादी. मी फक्त भारतीय आहे असे कोणी म्हणत नाही ! ह्यात आमची प्रादेशिक भाषिक आणि तत्सम अस्मिता येऊन जाते. त्यामुळेच ह्या देशात एक बहुराष्ट्रवाद— 'मल्टी नॅशनॅलिझम'— मूळ धरून बसला आहे.

तिसरे नागरिकत्व गौण नागरिकत्व आहे. दुय्यम नागरिकत्व आहे, गुजरातमध्ये जे इतर भाषिक किंवा महाराष्ट्रात जे इतर भाषिक नागरिक आहेत ते गौण नागरिक आणि स्त्रिया तर साऱ्या देशातच गौण नागरिक ! गौण नागरिक नव्हे, गौण मानव त्या आहेत. अद्यापि इथली स्त्री माणूसच बनली नाही, ती अद्यापि देण्याघेण्याची जणू वस्तू किंवा पशू समजली जाते. एखादी स्त्री पंतप्रधान झाली म्हणून स्त्रीचा गौण नागरिकत्वाचा दर्जा संपला आहे असे नव्हे.

चौथे नागरिकत्व आहे आंशिक—'फ्रॅक्शनल'— नागरिकत्व. ह्या मंडळींना संपूर्ण नागरिक समजले जात नाही. अस्पृश्य, आदिवासी यांना मिळते ते आंशिक नागरिकत्व.

**देशभक्ती आणि राष्ट्रीयता**

वर सांगितलेली नागरिकत्वे ह्या देशात जोवर कायम राहतील तोपर्यंत आपल्या घटनेत निर्देश केलेले नागरिकत्व अस्तित्वातच येणार नाही. घटनेत म्हटले आहे की जात, धर्म, वंश, प्रदेश किंवा स्त्रीपुरुषत्व अशा कोणत्याही कारणाने इथले नागरिकत्व खंडित होणार नाही. संप्रदायनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष, भाषानिरपेक्ष आणि लिंगनिरपेक्ष असे नागरिकत्व इथे निर्माण करायचे आहे. ह्यालाच सेक्युलर असे म्हणतात. जोपर्यंत सांप्रदायिक, सामासिक, गौण आणि आंशिक अशी चार प्रकारची नागरिकत्वे अस्तित्वात असतील तोवर घटनेत निर्देशित केलेले नागरिकत्व अस्तित्वात कसे येणार? आणि असे नागरिकत्व अस्तित्वात आल्याशिवाय ह्या देशात राष्ट्रीयतेचाही विकास होऊ शकणार नाही. मला एक गोष्ट आपल्याला स्पष्टपणे सांगितली पाहिजे आणि ती ही की इथे देशभक्ती काही प्रमाणात तरी आहे, पण राष्ट्रीयता मात्र फारशी नाही.

भारतात १८५७ मध्ये आणि त्यापूर्वीही देशभक्त होते. देशभक्ती म्हणजे 'पॅट्रिऑटिझम'. ज्या भूमीवर आपण वास्तव्य करतो त्या भूमीबद्दलचे प्रेम म्हणजे देशभक्ती. जे लोक अराष्ट्रीय असतात त्यांनादेखील ते राहत असलेल्या भूमीबद्दल प्रेम असतेच. राजे आणि जमीनदारदेखील आपल्या मालकीच्या जमिनीवर प्रेम करीतच होते. राष्ट्रीयतेसाठी देशभक्ती आवश्यकच आहे, पण देशभक्ती म्हणजे राष्ट्रीयता नव्हे. जुन्या काळात देशभक्त परंपरावादी होते, जीर्णमतवादी होते, पुराणाभिमानी होते. इंग्रजांविरोधी त्यांचा दृष्टिकोन उग्र होता. ते धर्माभिमानी,

संस्कृतीचे अभिमानी होते. हिंदूंतही असे लोक होते आणि मुसलमानांतही होते. मुसलमानांचे एक वैशिष्टय असे होते की त्यांचा धर्माभिमान राष्ट्राच्या सीमा ओलांडून पलीकडे जाणारा ('एक्स्ट्रॉटेरिटोरियल') होता. त्याचे कारण म्हणजे त्यांची धर्मभूमी भारताबाहेर आहे. पण त्यांनी असेही मानले की, त्यांची संस्कृतीदेखील भारताबाहेरचीच आहे. त्यांनी भारतीय संस्कृतीला कधी आपले मानले नाही. त्यामुळे गैरमुस्लिम राज्यात राहणे हराम आहे असा सिद्धान्त त्यांनी मानला. त्यामुळे देशभक्तीपेक्षा धर्माभिमानाची भावना त्यांच्यात अधिक बळकट बनली. इकडे हिंदूंतही काही अतिरेकी मंडळी होतीच. त्यांच्यातही देशापेक्षा धर्मभावना अधिक प्रबळ होती. तेही असे मानीत होते की म्लेंच्छांच्या राज्यात राहणे हराम आहे. गोमांस भक्षकांच्या राज्यात राहणे पाप आहे. पण ते मुसलमानांच्या राज्यात राहून चुकले होते. त्यामुळे त्यांच्यात तेवढी उग्रता नव्हती. स्वातंत्र्यपूर्व काळात आपण असे पाहिले की, जे राजकारणात जहाल होते ते समाजसुधारणेच्या विरोधी होते आणि जे समाजसुधारणेबाबत जहाल मताचे होते ते राजकारणात मवाळ होते. १८७७ च्या सुमारास महाराष्ट्रात एक अजब सशस्त्र क्रांतिकारी पुरुष जन्माला आला. त्याचे नाव वासुदेव बळवंत फडके. आपल्याला प्रजासत्ताक राज्य निर्माण करायचे आहे असे म्हणणारा हा पहिला सशस्त्र क्रांतिकारक ! ह्याच काळात देशात आणखीही एक महत्त्वाची घटना घडली : १८७७ साली सुरेंद्रनाथ बानर्जींनी पहिला अखिल भारतीय दौरा केला. ह्यापूर्वी अशा अखिल भारतीय यात्रा शंकराचार्य, महर्षी दयानंद इत्यादींनी केल्या होत्या, पण त्या धर्ममताच्या संस्थापनेसाठी केलेल्या होत्या. पण सुरेंद्रनाथ बानर्जी राजा नव्हते, सेनापती नव्हते, संत नव्हते, धर्म-संस्थापक नव्हते. ते एक नागरिक होते. त्यांचा दौरा एका लौकिक विषयाच्या अनुरोधाने झाला होता. लोकजीवनाशी संबंधित प्रश्नासाठी हा दौरा झाला होता. त्या काळातल्या आणखी एका नावाचा उल्लेख येथे केला पाहिजे. ते नाव म्हणजे दादाभाई नौरोजी. भारतीय देशभक्तांचे ते शिरोमणी शोभतील. विशुद्ध देशभक्तीचे ते प्रतीक होते. ज्याच्यात धर्म, भाषा, जात, संप्रदाय, संस्कृती असे कुठलेही हीण मिसळलेले नाही, अशा देशभक्तीचे ते प्रतीक होते. अशा प्रकारची विशुद्ध देशभक्ती इथल्या पारशी मंडळीत पाहायला मिळते. त्या नागरिकतेला दुसरे कोणतेही विशेषण लागत नाही. सांप्रदायिक, सामासिक, गौण, आंशिक अशी एकांगी नागरिकता त्यांच्यात कधीच नव्हती. अशांचे अग्रणी होते दादाभाई आणि त्यामुळे तीनदा कॉंग्रेस अध्यक्षपदी बसण्याचा मान त्यांच्या वाट्याला आला.

स्वातंत्र्यपूर्व काळात देशात जी देशभक्तियुक्त राष्ट्रीयता दिसत होती ती आज

खंडित झाली आहे, असा अनुभव येतो. त्यामुळेच राष्ट्रीयता म्हणजे काय त्याची एकदा फेरतपासणी केली पाहिजे. राष्ट्रीयतेची जुनी कल्पना आता कालबाह्य झाली आहे. आपली शक्ती वाढवून साऱ्या जगाला आपल्या वर्चस्वाखाली, निदान प्रभावाखाली आणता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे ही जुन्या काळातली राष्ट्रीयता होती. ह्या राष्ट्रवादाची परिणती साम्राज्यवादात झाली आणि त्याच्याच पोटी, पण मूळ नक्षत्रावर समाजवादाचा जन्म झाला. समाजवादाने ह्या जुन्या राष्ट्रवादाला फाटा दिला. हिटलर आणि मुसोलिनी वगळले तर त्या जुन्या राष्ट्रवादाचा निषेध सर्वच क्रांतिकारकांनी केला आहे. आज परिस्थिती अशी आहे की कोणत्याही राष्ट्राची समस्या ही त्या राष्ट्राची समस्या राहत नाही. आज तो पुराणा राष्ट्रवाद आपण येथे पुन्हा आणू अशा भ्रमात कोणी वावरत असतील तर ते शतकापूर्वीच्या काळातच अद्यापि वावरत आहेत एवढाच त्याचा अर्थ.

मग राष्ट्रवादाची आधुनिक कल्पना कोणती? आता राष्ट्रवाद नाही, राष्ट्रीयता हवी. 'नॅशनॅलिझम' नको, 'नॅशनॅलिटी' हवी. 'एक्झिस्टन्स ऑफ अ नेशन इज ए डेली प्लेबिसाइट, जस्ट ॲज द एक्झिस्टन्स ऑफ ॲन इंडिव्हिज्युअल इज ए कन्टिन्युअल अफर्मेशन ऑफ द विल टु लिव्ह.' मनुष्य जगतो म्हणजे प्रत्येक श्वासागणिक तो आपली जगण्याची जिद्द व्यक्त करतो. त्याप्रमाणे लोक दर क्षणाला आपले सार्वमत व्यक्त करतात आणि त्यातून राष्ट्रीयतेची जिद्द प्रकट होते. जिथले लोक परस्परांजवळ राहू इच्छितात व तसा संकल्प नित्य व्यक्त करतात त्या ठिकाणी राष्ट्रीयता आहे, असे मानता येईल.

### भारतीय राष्ट्रीयता व विश्वनिष्ठा

आपण जरी खरीखुरी भारतीय राष्ट्रीयता निर्माण करू शकलो, तर त्या भारतीय राष्ट्रीयतेत आणि विश्वनिष्ठेत गुणात्मक असे काहीच अंतर असणार नाही. त्या दोहोंत साधर्म्य आहे. आमच्या देशात जेवढी विविधता आहे तेवढी क्वचितच कुठल्या अन्य देशात आढळेल. जगात जेवढे म्हणून विविधतेचे प्रकार आहेत, जवळ जवळ ते सगळे आपल्याला इथे आढळतील. गिरिजन-नागरजन हा फरक इथे आहे. ब्राह्मण आणि भंगी असा भेद इथे आहे. भाषाभेद आहेत. संप्रदायभेद आहेत. खाण्यापिण्याचे आणि नेसण्या-पांघरण्याचे अनंत प्रकार आपल्याकडे आहेत. आपला हा देश खंडप्राय आहे आणि लोकही पासष्ट-सत्तर कोटी आहेत. हिंदुस्थानपेक्षा मोठा देश म्हणजे चीन. पण आपल्याइतकी विविधता चीनमध्येदेखील नाही. म्हणूनच जगद्विख्यात इतिहासकार अरनॉल्ड टायन्बी म्हणतो, ''इंडिया इज अ होल वर्ल्ड प्लेस्ड ॲट क्लोज क्वार्टर्स.'' भारत म्हणजे

जणू एकवटलेले अवघे जग ! ह्याच दृष्टीने भारतीय ऐक्याचा विचार हा जागतिक ऐक्याचाच एक प्रकारे विचार होय.

आपल्याकडे बुद्धिमंतांचे तीन प्रकार दिसून येतात. बुद्धिजीवी, बुद्धिवादी आणि बुद्धिनिष्ठ. बुद्धिजीवी बुद्धीचा व्यापार करीत असतात. त्यांची बुद्धी दाम मोजणाऱ्याच्याच बाजूची असते. दुसरे बुद्धिवादी. त्यांचा दुसऱ्याच्या बुद्धीवर विश्वास नसतो. बुद्धिनिष्ठ ते की ज्यांचा स्वतःच्या बुद्धिमत्तेवर जेवढा विश्वास असतो त्यापेक्षा काकणभर अधिक विश्वास इतरांच्या बुद्धीवर असतो. अलीकडेच एका पुस्तकाबद्दल वाचले—समता हा एक भ्रम आहे—'इक्वॅलिटी इज ए मिथ'—असे लेखक म्हणतो ! मला जॉर्ज ऑरवेलचे नाव एकदम आठवले. त्याची दोन पुस्तके फार गाजलेली आहेत. एकाचे नाव आहे 'ॲनिमल फार्म'— पशुस्थान आणि दुसऱ्याचे नाव आहे '१९८४'. त्यातले 'ॲनिमल फार्म' हे पुस्तक मोठे मनोज्ञ आहे.

**समतेची कल्पना**

एक होती पशूंची वसाहत. नाना तऱ्हेचे पशू त्यात होते. त्यांच्या मनात आले, आपल्याला चांगल्या तऱ्हेने राहायचे तर त्यासाठी परस्परांशी वागण्याचे काही नियम असावेत. त्यांनी त्यासाठी एक संविधानसभा भरवली. संविधानाच्या आरंभी त्यांनी लिहिले, "आम्ही या पशुस्थानातील मंडळी ह्या संविधान सभेच्या दालनात पशुस्थानाचे संविधान तयार करण्यासाठी जमलो असून हे संविधान अधिनियमित आणि आत्मार्पित करीत आहोत." मग संविधानाचे पहिले कलम : "कोणाही पशूने अन्य पशूची हत्या करू नये." हे कलम टाळ्यांच्या गजरात पास झाले आणि एक मांजर उठून म्हणाले, "म्हणजे मी आता उंदरांची हत्या करायची नाही? मग खाऊ काय आणि जीव जगवू कशी? तुमच्या बापाने कधी असे संविधान तयार केले होते?" एवढ्यात एक सिंह उभा राहिला आणि म्हणाला, "मी बकरी खायचे सोडून देऊ की काय?" एकामागून एक पशू उभा राहून बोलू लागला तेव्हा पहिली घटनादुरुस्ती पुढे आली. पहिले कलम तसेच कायम ठेवून मध्ये आणखी दोन शब्द फक्त जोडायची दुरुस्ती ! "कोणाही पशूने अन्य पशूची हत्या कारणाशिवाय करू नये !" अशा रीतीने ह्या घटनादुरुस्तीने सर्वांचीच सोय झाली. कारण काय प्रत्येकाजवळ असतेच. कोणी खाण्यासाठी हत्या करतो, कोणी भांडण झाले म्हणून हत्या करतो ! मग दुसरे कलम विचारासाठी आले. "सर्व पशू समान आहेत." आणि हत्ती उभा राहिला आणि म्हणाला, "मी आणि हे डुक्करडे बरोबरचे, समान काय?" घोडा खिंकाळून म्हणाला, "मी आणि हे गाढव

बरोबरीचे? हे कसले संविधान !" त्यामुळे मग या कलमालाही दुरुस्ती सुचवण्यात आली. "सर्व पशू समान आहेत, पण काही विशेष समान आहेत." मूळ कलम कायम, फक्त पुढे एक छोटेसे वाक्य तेवढे जोडले ! पण ही दुरुस्ती मुळावरच घाव घालणारी होती. तर मला सांगायचे हे आहे की संविधान नागरिकानेच बनवलेले असते. पण जेवढे अधिकार संविधानात नोंदवलेले असतात तेवढेच माणसाचे अधिकार असतात असे नाही. न नोंदलेलेही कितीतरी स्वयंसिद्ध अधिकार नागरिकाला असतात. संविधानाने दिलेले अधिकार बरेचसे औपचारिक असतात, पण त्याशिवाय कित्येक स्वयंसिद्ध अधिकार असतात. मनुष्य असल्यामुळे आणि नागरिक असल्यामुळे ते त्याला मिळालेले असतात. वकील आणि कायदेपंडित यांच्या परिभाषेत अशा अधिकारांना काय म्हणतात ते मला ठाऊक नाही, पण जोपर्यंत अशा अधिकारांचे भान आपण नागरिकाला करून देणार नाही तोपर्यंत ह्या देशात खरीखुरी लोकशाही अवतरणार नाही.

नागरिकाच्या शक्तीचा उगम कशात आहे, त्याचा शोध घेतला पाहिजे. आज तीन प्रकारच्या प्रतिष्ठांतून त्यांचा उगम झाल्याचे दिसते. तख्त, तिजोरी आणि तलवार ह्यातून त्या प्रतिष्ठा जन्माला आल्याचे दिसते. सरकार, सावकार आणि शिपाई ही त्या प्रतिष्ठांची तीन प्रतिके आहेत. आजच्या समाजात हे तीन लोक प्रतिष्ठित आहेत. हे बदलले पाहिजे. ह्या बदलाचा संकल्प म्हणजे क्रांतीचा संकल्प. हा वर्गसमन्वय नव्हे, हे वर्गनिराकरण आहे. वर्गनिराकरणावाचून क्रांती होऊ शकत नाही. ह्या तिन्ही प्रतिष्ठा एका तऱ्हेने मिथ्याच आहेत. खरे म्हणजे शक्तीचा उगम ह्यांपैकी एकाही गोष्टीत नाही.

कोणत्याही राजाने स्वतःचे तख्त तयार केल्याचे आपणास माहीत आहे काय? कोणत्याही सावकाराने आपली स्वतःची तिजोरी तयार केल्याची कोणाला खबर आहे का? कोणा शिपायाने स्वतःची तलवार बनवल्याचे आपण ऐकले आहे काय? ह्या तिन्ही वस्तू घडवणारा तो आहे की ज्याच्या हाती अवजार आहे. पण ज्याच्या हाती अवजार आहे, तोही आज भ्रमात आहे. हा भ्रम दूर करण्यासाठी क्रांती आहे. ज्याच्याजवळ शक्ती आहे तोही भ्रमात आहे आणि ज्याच्याजवळ खरोखरी शक्ती नाही तोही भ्रमातच आहे. ज्याच्याजवळ खरोखर शक्ती आहे त्याला आपण दुबळे आहोत असे वाटते आणि जो खरोखर दुबळा आहे तो आपण शक्तिमान असल्याचा तोरा मिरवताना दिसतो !

अवजारावाचून हत्यार कधी बनते काय? मार्क्सने ही गोष्ट नेमकी ओळखली आणि त्याने सांगितले की "एक दिवस जगात असा उगवेल की ज्या दिवशी दुनियेत हत्यारेही असणार नाहीत आणि लढाईदेखील होणार नाही." हे काही

कोणा धर्मसंस्थापकाचे वचन नव्हे. एका विचारवंताचा हा निष्कर्ष आहे. मार्क्सने एक अत्यंत मोलाची गोष्ट सांगितली आणि सर्वांनी ती मान्य केली. पण आज जगाची स्थिती अशी चमत्कारिक आहे की ज्या साधारण माणसाहाती अवजार आहे त्याचा त्याच्या अवजारावर विश्वासच राहिलेला नाही! विद्यावंताचा आपल्या विद्येवर विश्वास नाही. कलमवाल्याचा आपल्या कलमावर विश्वास नाही. उत्पादकाचा आपल्या उत्पादनसाधनावर विश्वास नाही. हे सगळे तलवारीला घाबरतात, तिजोरी पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटते आणि तख्त पाहून त्यांना त्याचा मोह पडतो. पण ज्यांच्यावर तख्त, तिजोरी आणि तलवार ह्यांचा प्रभाव पडला नाही तेच खरे क्रांतिकारक ठरले. सर्वसामान्य माणूस जेव्हा ह्यांच्या प्रभावापासून मुक्त होईल, इतिहासाच्या बेड्यांतून स्वतःची सुटका करून घेईल तेव्हाच तो क्रांती करू शकेल. आता ह्या सामान्य नागरिकाला इतिहासाचा विषय म्हणून राहायचे नाही. त्याला इतिहासाचा विधाता बनायचे आहे. तीन झेंड्यांचेच उदाहरण आपण घेऊ या. काँग्रेस, जनता आणि कम्युनिस्ट ह्यांच्या झेंड्यांकडे पाहिले तर काय दिसते? कोणती प्रतिके त्यांच्या ध्वजांवर आहेत? क्रांतीची काही प्रतिके असतात. काँग्रेसच्या ध्वजावर चरखा आहे, जनताच्या ध्वजावर हलधर आहे आणि कम्युनिस्टांच्या ध्वजावर विळाहातोडा आहे. कम्युनिस्ट 'व्हायोलन्स'ला — हिंसेला खुशाल नर्स—दाई म्हणोत, पण त्यांनी आपल्या ध्वजावर भीमाची गदा प्रतीक म्हणून स्वीकारलेली नाही. रामाचे धनुष्य किंवा शिवाजीची भवानी तलवार काही ह्यांनी कोणी आपल्या ध्वजावर प्रतीक म्हणून अंकित केली नाही. ह्यातून जो संकेत मिळतो तो हा आहे की क्रांतीत अवजारांची प्रतिष्ठा असेल, हत्यारांची असणार नाही.

### क्रांती शांतिमय असेल

हा काही हिंसा-अहिंसेचा तात्त्विक प्रश्न नाही. हिंसा-अहिंसेचा वाद आपण विसरून जाऊ या. सद्गुणांना सिद्धान्त बनवणे निरर्थक आहे. ज्या दिवशी सद्गुणांना सिद्धान्ताचे स्वरूप येईल त्या दिवशी सिद्धान्ताच्या नावाखाली माणसे परस्परांच्या जिवावर उठल्याचे दिसेल. अहिंसेच्या नावाने मग तलवारीला तलवारी भिडल्याचे दिसले तर आश्चर्य वाटायला नको. सद्गुणांना 'कन्सेप्ट्स' बनवू नका. मानवी जीवनाची ही अट आहे. अवजाराशिवाय तख्त बनू शकत नाही, तिजोरी तयार होत नाही आणि तलवारही घडवली जात नाही. पण आज ह्या वस्तू बनवणारा अन्नाला मोताद आहे, दबलेला आहे. ज्याच्या हाती अवजार आहे तोच आज हतबल आहे. त्यालाच जागवण्याची आवश्यकता आहे. त्याला पटवले

पाहिजे की, 'बाबारे, शक्ती तुझ्यात आहे. तुझ्यामुळेच हे सारे प्रतिष्ठित आहेत.' त्याच्यात हा आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. पण आपण त्याला उलटेच सांगत आहोत की तुझ्या हाती जेव्हा तलवार येईल तेव्हाच तुझी जीत होईल. जेव्हा तुझ्या हाती तख्त येईल तेव्हाच तुला विजय मिळेल. तुझ्या हाती तख्त, तिजोरी आणि तलवार येईल तेव्हा तू राजा, सावकार आणि शिपाई बनशील ! मग तुला अवजाराला हात लावण्याचे काही कारणच उरणार नाही. ह्याच्यासाठी ही क्रांती अहिंसक असावी लागेल. हे काही तात्त्विक दृष्टीने मी सांगत नाही, त्यावाचून गत्यंतरच नाही.

एका गावी राधाकृष्णाप्रमाणे सत्य-अहिंसेची मूर्ती असलेले एक देऊळ बनवण्यात आले होते. अहिंसेच्या हाती गदा दिल्याचे तिथे दाखवले होते. ती गदा कशासाठी तर म्हणे शांततेसाठी. शस्त्रास्त्रांचा उपयोग शांततेसाठी झाला पाहिजे, त्याचे ती मूर्ती हे प्रतीक होते. शांतता जेव्हा शस्त्रास्त्रांच्या आश्रयाला जाईल तेव्हा शांतता ही शांतता राहील काय? मग तर सत्ता शस्त्राची होईल. शांततेची, अहिंसेची सत्ता असणार नाही. अहिंसेलाही जर गदेपुढे शरणागती पत्करावी लागली तर ज्याची गदा मोठी असेल त्याचीच अहिंसा श्रेष्ठ ठरेल. ह्यात अहिंसेला कुठे जागाच नाही. त्यातून गदायुद्ध फक्त होईल.

एकदा पंजाबच्या एका शहरात माझे भाषण होते. अध्यक्ष गावचे एक प्रख्यात गृहस्थ होते. सभा प्रचंड होती. लोक फारच गडबड करीत होते. अध्यक्ष उभे राहिले आणि गरजले. ''हिंदूनो-बिंदूनो, शिखांनो-भिखांनो, मुसलमानांनो-चुसलमानांनो, खामोश राहा. जर गडबड कराल तर याद राखा, माझ्या हातात हा दंडा आहे... आता दादा धर्माधिकारी अहिंसा ह्या विषयावर भाषण करतील !'' त्या दिवसांत सभेत गांधी आणि अहिंसा ह्याविरुद्ध कोणी ब्र काढू शकत नसे. कोणी बोलले रे बोलले की मारामारी सुरू होई. अहिंसेने आतंक माजवला होता ! तेव्हा सत्य, अहिंसा हे काही सिद्धान्त नव्हेत हे ध्यानी घ्या.

जे लोक शस्त्रास्त्रांच्या गोष्टी करतात ते किमान शंभर वर्षे तरी मागे आहेत. क्रांतीचा आधुनिक विचार तो की जो अवजाराला अनुकूल असेल. ज्याच्या हाती अवजार असेल, त्याची क्रांती शांततामय असेल. आणीबाणीत जोवर शिपाई पुढे होता तोवर सगळे दबलेले होते. मला तर विद्यार्थ्यांची दया येते ! आज कुलगुरूंना हे घेराव करतात. जिकडे पाहावे तिकडे उपद्रव माजला आहे. मला आश्चर्य वाटते की आणीबाणीच्या काळात हे सगळे शूरवीर कुठे दडून बसले होते? कुठे पत्ता लागत नव्हता त्यांच्या तारुण्याचा ! 'रायट आणि इन्सरेक्शन'– दंगेधोपे आणि कटकारस्थाने यातून क्रांती होत नसते. असल्या दबावगटांनी जगात कधी क्रांती

केल्याचा दाखला नाही. दबावगट हा हितसंबंधी गट असतो. क्रांती नागरिक करीत असतो. ज्याच्या हाती अवजार आहे असा नागरिक क्रांतीचा अग्रदूत असेल आणि तो क्रांती स्वतःसाठी करणार नाही, सर्वांसाठी क्रांती करील. कारण तो जीवनोपयोगी वस्तू तयार करीत असतो. हत्यारे जीवनाचे अपहरण करीत असतात, अवजारे जीवन परिपुष्ट करीत असतात. जीवन नष्ट करणे हा हत्याराचा दुरुपयोग गणला जातो आणि जीवनाचे संगोपन करणे हा अवजाराचा सदुपयोग समजला जातो. ह्याउलट जीवनाचे संगोपन करणे हा शस्त्राचा दुरुपयोग ठरतो आणि जीवन नष्ट करणे हा अवजाराचा दुरुपयोग ठरतो. म्हणून ह्यापुढची क्रांती ही उत्पादक अवजारांतून जन्मास येणारी क्रांती असेल. ही जीवनदायी क्रांती असेल, लोकक्रांती असेल. क्रांतिकारी आंदोलनाची एक कसोटी ही आहे की, त्यामुळे सामान्य माणूस भयग्रस्त होता कामा नये. हे जे सगळे उपद्रव चालले आहेत, दंगे उफाळत आहेत त्यातून काय होईल? एक राज्य जाईल, दुसरे येईल, पण नागरिक मात्र जिथल्या तिथेच राहील.

आज वस्तू विकत घेणाराला मिळते. सत्ता तिजोरीची चालते आहे. उद्या ज्याच्या हाती दंडा असेल त्याला वस्तू मिळू लागतील. पण गरजवंताच्या वाट्याला मात्र ह्यामुळे काहीदेखील येणार नाही. तिजोरीची भांडवलशाही गेली आणि दंड्याची एकाधिकारशाही आली एवढाच त्याचा अर्थ होईल. नागरिक क्रांती ही अशी असणार नाही. नागरिक क्रांती हातोडा-विळ्याची असेल, फावड्या-कुदळीची क्रांती असेल, चरख्यामागाची क्रांती असेल. त्यातून अवजारांची प्रतिष्ठा वाढेल. त्यामुळे आम्ही सेनाशिबिरे चालवीत नाही, श्रमसंस्कार छावण्या चालवतो.

### माओच्या क्रांतीतील उणीव

जगातली पहिली शेतकरी क्रांती माओने चीनमध्ये केली. त्यापूर्वीच्या कोणत्याही क्रांतीत शेतकऱ्याला सामील करून घेतलेले नव्हते. पण माओदेखील क्रांतीत एक पाऊल मागेच राहिला. कारण त्याचा शेतातला किसान हा सैन्यातला जवान बनला. सैन्यातला जवान झाल्यावर किसान, शेतातला किसान राहत नाही. क्रांतिकारकांची मुळातली प्रतिज्ञा होती की क्रांतीनंतर शस्त्रे राहणार नाहीत, फक्त अवजारेच राहतील. म्हणून क्रांतिकाळातही एका गोष्टीची सावधगिरी बाळगली पाहिजे की प्रतिष्ठा शस्त्रास्त्रांची वाढता कामा नये, अवजारांची वाढली पाहिजे.

### क्रांतिसैनिकांनी उमेदवार बनू नये

एकदा दोन न्यायाधीश दिवा न लावताच सायकलवरून रात्री रस्त्याने चालले होते. पोलिसाने त्यांना हटकले. त्यांची नावे लिहून घेतली आणि दुसऱ्या दिवशी न्यायालयात यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी त्यांचे खटले एकमेकांपुढे येणार होते. पहिला न्यायाधीश पिंजऱ्यात उभा राहिला. त्याने आपला अपराध स्वीकारला. त्याला रुपया दंड झाला. मग दुसरा न्यायाधीश पहिल्या न्यायाधीशापुढे आरोपी म्हणून उभा राहिला. त्याने प्रश्नांची तीच कवायत केली आणि उत्तरांचीही तशीच कवायत झाली. त्याने दहा रुपये दंडाची सजा फर्मावली ! तेव्हा त्याने तक्रार केली. न्यायाधीश म्हणाला, "हा एकाच दिवशी घडलेला दुसरा गुन्हा आहे आणि अपराधी स्वतः न्यायाधीश आहे त्यामुळे ही वचक बसेल अशी सजा फर्मावणे भाग आहे !" राजकारणात हे असेच चालते आणि नागरिक बिचारा जिथल्या तिथेच राहून जातो. ह्यासाठी नागरिकाची सत्ता प्रस्थापित झाली पाहिजे आणि त्यासाठी अशा तरुणतरुणींची आवश्यकता आहे की जे कधीच उमेदवार बनणार नाहीत ! जयप्रकाश हे एक असे मोठे नेते आहेत की जे कधीच उमेदवार झाले नाहीत; आणि त्यामुळेच ते लोकनायक बनू शकले. आधी ते एका पक्षाचे पुढारी होते, पण विनोबांच्या चळवळीच्या भट्टीतून ते तावूनसुलाखून निघाले आणि लोकनायक झाले. जयप्रकाशांचे लोकनायकत्व हे विनोबांच्या चळवळीचे एक वरदान आहे. म्हणून ज्या तरुणतरुणींना क्रांतिकारी व्हायचे असेल त्यांनी सत्तेची आकांक्षा सोडली पाहिजे आणि कुठेही त्यांनी उमेदवार बनता कामा नये. अगदी महाविद्यालयातील निवडणुकीच्या वेळीदेखील उमेदवार बनता कामा नये.

अलीकडेच मी बिहारमध्ये गेलो होतो. तिथे महाविद्यालयातल्या निवडणुका चालू होत्या. एका उमेदवाराने रेडिओ सिलोनवर त्याबद्दल जाहिरात दिली होती ! साबण, तेले ह्यांच्या जाहिराती करून माल गळ्यात बांधला जातो त्याप्रमाणे उमेदवारही गळ्यात बांधण्याचा हा प्रकार आहे. ह्या लिलावात उभे राहण्याचे क्रांतिकारी तरुणांनी नाकारले पाहिजे.

### संपत्तीची व्यर्थ आकांक्षा

आणखी एक गोष्ट म्हणजे संपत्तीची लालसा. बिहारमध्ये पाच हजार विद्यार्थ्यांची एक परिषद झाली. मला त्यांनी बोलावले. ते म्हणाले, "आमच्याजवळ जमीन नसल्याने आम्ही भूदान करू शकत नाही, पैसा-अडका नसल्याने आम्ही संपत्तीदानही करू शकत नाही. विद्याभ्यास करीत असल्याने समयदानही आम्हांला जमणार नाही. मग आम्ही काय करावे? आम्हांला काही

तरी कार्यक्रम सांगा.'' मी त्यांना म्हणालो, ''मी कार्यक्रम तर तुम्हाला सांगू शकेन, पण तुम्हांला तो रुचणार नाही.'' ते म्हणाले, ''नाही, नाही, तसे काही नाही. तुम्ही जरूर कार्यक्रम सांगा.'' मी म्हणालो, ''तुम्ही तुमच्या पालकांना लिहून द्या की आमचा संपत्तीवर कोणताही अधिकार आजपासून नाही.'' तेव्हा सेक्रेटरी माझ्या कानात हळूच म्हणाला, ''मी चुकीच्या माणसाला बोलावले !'' संपत्तीची आकांक्षा तरुण जोपर्यंत सोडणार नाहीत तोवर काहीही होणार नाही. क्रांतीची मूल्ये आपल्या जीवनातून समूर्त साकार झाली पाहिजेत. जो सत्ता आणि संपत्ती ह्यांच्या स्पर्धेत सापडला आहे तो त्याचे निराकरण कसे करील? जो मनुष्य धनदौलत जमा करण्याच्या मागे लागला आहे त्याला सार्वजनिक मालमत्तेबद्दल विश्वासपात्र कसे मानता येईल? तेव्हा सत्तासंपत्तीच्या मोहजालात गुरफटलेले लोक, लोकशिक्षणही धडपणे करू शकणार नाहीत. जो स्वतःसाठी मतयाचना करणारा असेल तो आपले मत किती मूल्यवान आहे ते लोकांना समजावण्याची चिंता कशाला करील? तो अत्यंत प्रभावीपणे लोकांना हेच सांगेल की, ''लोक हो, स्त्रीला तिच्या सतित्वाचे जितके महत्त्व असते तितकेच महत्त्व नागरिकाला मताचे असते. एखाद्या स्वाभिमानी माणसाला आपल्या नेकीचे आणि एखाद्या धर्मनिष्ठाला आपल्या धर्माचे जितके महत्त्व असते तितके नागरिकालाही आपल्या मताचे महत्त्व वाटले पाहिजे...'' लोक ह्यावर म्हणतील, ''किती चांगले बोलताहेत !'' आणि हे सर्व सांगून झाल्यावर तो म्हणणार, ''तेव्हा तुमचे ते मूल्यवान मत आता तुम्ही मलाच द्या.'' मग लोक म्हणतील, ''हे सगळे रामायण मूठभर तांदळासाठी एकूण होते तर !'' अशा माणसाच्या सांगण्याचा लोकमानसावर कितपत प्रभाव पडेल त्याचा विचार करा. तेव्हा सत्ता, संपत्ती, मत ह्यांचा मोह सोडाल आणि शस्त्रभयाचा त्याग कराल तेव्हाच क्रांतिकार्यात सफलता मिळू शकेल. ह्याही ठिकाणी पुन्हा त्याच खाडिलकरांची आठवण होते. त्या हरिश्चंद्राच्या नाटकातच पुढे प्रसंग येतो. हरिश्चंद्र डोंबाकडे नोकरी करीत आहे. तो एकेकाळी राजा होता. तेव्हा फोडून फोडून किती लाकडे दिवसाकाठी फोडणार? रोज बिचाऱ्याला कर्ज होई. एक दिवस तो डोंब हरिश्चंद्राला म्हणाला, ''हे पहा, आता तुझ्या फक्त दोन भाकऱ्याच काय त्या माझ्याकडे उरल्या आहेत. दोन भाकऱ्यांचे हे पीठ घेऊन टाक. आता ह्यानंतर तुझे मी काही लागत नाही. उद्यापासून तुला सगळी कामे फुकट करावी लागतील हे ध्यानात ठेव.'' हरिश्चंद्र तारामतीजवळ जातो आणि तिला म्हणतो, ''तारामती, ह्या दोन भाकऱ्याच काय त्या आता उरल्या आहेत. ह्या साऱ्या संकटाचा धनी मी आहे. माझ्याशी लग्न करून तू स्वतःवर केवढे संकट ओढवून घेतलेस ! माझ्याशी लग्न करण्याचे एक पाप तू केलेस, त्याची फळे तुला

तर भोगावीच लागणार, पण हा छोटा बाळ रोहिदास; त्याचे काय होणार ग? त्याच्या चेहऱ्याची आता रया जाईल. भुकेने तो व्याकूळ होईल. मला ते काही पाहवणार नाही !'' हरिश्चंद्रासारखा निश्चयाचा महामेरूदेखील अशा स्थितीत डगमगून जातो. स्वतः तो वाटेल ते संकट सोसू शकतो. तारामतीला संकट सोसावे लागत आहे त्यामुळे ती दुःखी होईल, पण डगमगणार नाही. पण त्या बाळावरचे संकट त्याला असह्य वाटते. तो म्हणतो, ''आज ह्याला आपण एक भाकरी देऊ. उद्या अर्धी देऊ आणि परवाच्या दिवशीही अर्धीच देऊ शकू. पण त्यानंतर काय?'' एक भाकरी रोहिदासाच्या हातात आहे. तो हे सारे लक्षपूर्वक ऐकत आहे. तो एकदम म्हणतो, ''माझे हे पोट तुमच्या सत्याचरणाच्या आड येत आहे असे दिसते. हे पहा, मी माझे पोटच फेकून देतो कसे !'' आणि असे म्हणून तो ती हातातली भाकरी भिरकावून देतो.

लोकनायक जयप्रकाशांनी अशा तरुणांना साद घातली आहे की जे आपल्या उपजीविकेवर पाणी सोडायला तयार असतील. जे पोट फेकून देऊन सांगतील की आमचे पोट क्रांतीच्या आड येत आहे का, मग तेच आम्ही भिरकावून देतो ! ह्यालाच जयप्रकाशजींनी संपूर्ण क्रांती असे नाव दिले आहे. मी त्यालाच सर्वांगीण क्रांती म्हणतो. 'वर्ल्डवाइड रेव्होल्यूशन फ्रॉम टॉप टू बॉटम इन ऑल रेल्म्स ऑफ ह्यूमन कॉनशसनेस'— मानवी जीवनातील सर्वच जाणिवांच्या क्षेत्रात अंतर्बाह्य बदल ! संपूर्ण क्रांती ती की, जिच्यात प्रतिक्रांतीला वावच राहणार नाही. 'टोटल रेव्होल्यूशन'– संपूर्ण क्रांती म्हणजेच 'कंप्लिट रेव्होल्यूशन'– सर्वांगीण क्रांती. क्रांतीची ही दोन अंगे आहेत. ह्या पायावर पुढचे विचार आपल्याला चांगल्या रीतीने समजू शकतील.

❑❑

# ५

# मानवी विकासाचा अर्थ

क्रांतीची बाराखडी आपण शिकत आहोत. किती प्राथमिक गोष्टींचा आपण काथ्याकूट करीत आहोत, अशी समजूत होण्याची शक्यता आहे. पण मला दिसते असे की बुद्धिमंत काय किंवा अल्पशिक्षित काय, कोणीच क्रांतीबाबतच्या मूलभूत गोष्टी समजून घ्यायला फारसे उत्सुक नसतात. त्यामुळे अनेक प्रकारचे भ्रम लोकांत पसरल्याचे दिसते. त्यांचे निराकरण सुरुवातीलाच झाले तर बरे, असे मला वाटते. लोकशाहीच्या संदर्भात आणि लोकशाहीच्या मार्गाने आपल्याला लोकशाहीचे रूपांतर लोकसत्तेत करायचे आहे. लोकशाहीचा आधार नागरिक बनला पाहिजे. सरकार, सावकार किंवा शिपाई लोकशाहीचा आधार असू शकत नाही.

**असंभव संभव करावे लागेल**

सरकार फार फार तर अनुकूल अशी परिस्थिती निर्माण करू शकेल. जनता सरकारमुळे अशी काहीशी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. पण जगातले कोणतेच सरकार लोकक्रांती घडवून आणू शकत नाही. लोकक्रांतीचा नायक नागरिक हा आहे आणि तोच तिचा आधार आहे आणि असला पाहिजे. त्याच्याच पराक्रमातून ही क्रांती उदयाला येणार आहे. आपल्याला कोणत्या मुक्कामावर पोहोचायचे आहे ते स्पष्ट असणे चांगले. कोणत्या दिशेकडे जायचे त्याचे निश्चित भान झाले पाहिजे. क्रांतीचा तो शेवटचा टप्पा आमच्या हातात नसला तरी आटोक्यातला असला पाहिजे. हातातल्याकडून आटोक्यातल्याकडे जाणे ही क्रांतीची प्रगती होय. जी गोष्ट हातात आहे ती 'पॉसिबल, फीजिबल' आहे, ह्याबद्दल संशयाला जागा नाही. पण क्रांती ही राजकारणाप्रमाणे 'आर्ट ऑफ पॉसिबल्स'—संभव हाताळण्याची कला नव्हे. असंभवाला संभवाच्या कक्षेत खेचून आणणे ही क्रांतीची कला आहे. आजवर जो इतिहासाचा फक्त विषय मानला गेला, त्याला इतिहासाचा निर्माता बनवायचे आहे. तो इतिहासाचा निर्माता आहे असा आत्मविश्वास, प्रत्यय त्याला आणून द्यायचा आहे. ईश्वराचा अवतार आता

सर्वसामान्य माणसाच्या रूपातच होणार आहे. ज्याच्या हाती शस्त्र नसून अवजार आहे असा हा नवा अवतार असेल. सर्वसामान्य माणसाचा पराक्रम शांतिमय मार्गांनीच प्रकट होऊ शकतो.

## क्रांती व्यापक कशी होईल?

शिपाई नेहमीच मूठभर असतात आणि त्यामुळे हिंसेच्या मार्गाने नागरिकांचा पराक्रम प्रकट होऊ शकत नाही. सगळेच नागरिक शिपाई बनतील तेव्हा वेगळ्या शिपायांची काही आवश्यकताच राहणार नाही. प्रस्थापित राज्यसत्तेच्या विरुद्ध ज्याला क्रांती करायची असेल तो तिच्या मानाने शस्त्रबलात नेहमीच उणा राहील. कारण आज आपण राज्याच्या हातीच सर्व शस्त्रबळ सुपूर्द केलेले आहे. आपल्या सरकारजवळ सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांचा साठा असावा म्हणून सामान्य माणसानेच पैसाही पुरवलेला असतो आणि मतेही दिलेली असतात. त्याच सरकारविरुद्ध केलेला सशस्त्र उठाव सफल होण्याची शक्यता नाही. फार फार तर त्यातून अराजक निर्माण होऊ शकेल, क्रांती होणार नाही. सामान्य माणसाचा पराक्रम हिंसेच्या मार्गाने का प्रकट होऊ शकत नाही, त्याचे हेही एक कारण आहे. 'बुलेट आणि बॅलट', गोळी आणि मत ह्यात अंतर आहे. बुलेटमुळे आतंक माजतो, भय निर्माण होते आणि 'फियर इज ए डार्करूम इन वुइच ऑल निगेटिव्हज आर डेव्हलप्ड'—भय ही एक अशी काळोखी खोली आहे की जिच्यात अभावरूप गोष्टीच तेवढ्या तयार होतात. भयाच्या पंजात पकडला गेलेला माणूस कोणत्याही सद्‌गुणांचा विकास करू शकत नाही. भयाच्या वातावरणात दुर्गुणांचेच अमाप पीक फोफावत असते. आपला आणीबाणीला विरोध होता तो ह्यासाठी!

हे कम्युनिस्ट आणि नक्षलाइट काय सांगत आहेत? बंगालमधला एक नक्षलवादी एका मित्राला म्हणाला, ''आम्ही क्रांतिकारी आहोत, खुनी नाही. मग आम्ही हिंसा का करतो, असे तुम्ही विचाराल. हिंसा एक अटळ पाप—'नेसेसरी इव्हिल'—म्हणूनच आम्ही करतो. आम्हांला क्रांतीची तळमळ आहे. 'बुडती हे जन, देखवेना डोळा,' अशी आमची मनःस्थिती आहे. आमचा धीर आता सुटला आहे. त्यामुळे आम्हांला नाइलाजाने हिंसा करावी लागते.'' 'नेसेसरी इव्हिल'– अपरिहार्य पाप म्हणताना भर केवळ अपरिहार्यतेवर असता कामा नये, तो पापावरही असायला हवा. हे औषध कडू खरे, पण दुसरा इलाज नसल्याने घ्यावे लागते. आपण विचार करू की, रोग्यासाठी उपचार म्हणून दारू तयार केली. उपचार करणे तर अपरिहार्यच आहे, पण होते काय की दारूचेच व्यसन लागते. म्हणजे नाइलाज म्हणून जे करायचे ते नित्याचेच होऊन बसते, कारण त्यात जो

दोष, जे 'इव्हिल' आहे त्याचे विस्मरणच जणू होते. पापाचे भान सुटून जाते, नाइलाजाचेच भान तेवढे शिल्लक उरते. आजवर हिंसेच्या बाबतीत असेच घडत आले आहे. 'इव्हिल–पाप' वर भर न देता 'नेसेसरी–नाइलाजाने' वरच सर्व भर राहत आला. तुझा जीव घेण्यावाचून गत्यंतर नाही आणि तुझा जीव घेण्याची मनोमन इच्छाही आहे. येथे हिंसा आवडू लागते. ह्या पापाची अनिवार्यता कशी संपुष्टात आणता येईल हे शोधणे म्हणजे क्रांतीचा शोध घेणे ! ह्यासाठी रूढ क्रांतीच्या प्रक्रियेतच क्रांती करावी लागेल.

क्रांतिकारक आदर्शवादी असतो. वर्तमानकालीन समाजाच्या काही पावले तो पुढे असतो. त्यावाचून तो क्रांतिकारी होऊच शकत नाही. सर्व क्रांतिकारकांची आकांक्षा काय होती? हिंसा कमीत कमी करावी लागावी. कारण बहुजन आपल्याच पाठीशी असेल. बहुसंख्याकांना क्रांतीची आवश्यकता आहे. ऐंशी टक्क्यांवर लोक दुःखी कष्टी आहेत, दीनदलित आहेत. गरिबीने पिडलेले आहेत. ते तर आपल्या सोबतच असतील. एवढी मोठी संख्या असल्यावर हिंसा तरी कितीक करावी लागेल? नावापुरतीच हिंसा घडून भागेल आणि असे घडल्याचेही दिसते. रशियात बोल्शेविक क्रांती झाली त्या क्रांतीत किती लोक मारले गेले? प्रत्यक्ष क्रांतीत अवघ्या दहा माणसांना प्राण गमवावे लागले ! मग त्यानंतर क्रांती पूर्ण करण्याच्या नावाखाली स्टालिनला हिंसेचे एवढे तांडव का सुरू करावे लागले? त्याचे एक कारण आहे. बहुसंख्य लोकांना क्रांतीची आवश्यकता होती, पण त्यात त्यांची आकांक्षा नव्हती. ती आकांक्षा नागरिकांत आता जागवायची आहे. क्रांतीच्या संदर्भात ज्या ज्या ठिकाणी आणि ज्या ज्या पातळीवर हिंसा होईल, मग ती सरकारकडून होवो किंवा सरकारबाह्य यंत्रणांकडून होवो, त्या हिंसेचा आम्ही धिक्कार केला पाहिजे, तिला विरोध केला पाहिजे. हिंसेने कोणतीही लोकक्रांती करता येणार नाही.

### सत्याग्रहाचे स्थान

क्रांतीचे दोन शांततामय मार्ग आहेत. एक सांविधानिक मार्ग आणि दुसरा अतिसांविधानिक मार्ग— 'पार्लमेंटरी' आणि 'अल्ट्रा-पार्लमेंटरी.' सांविधानिक मार्ग म्हणजे मतांचा मार्ग. कायद्यासाठीही अधिष्ठान लागते. जिच्या हाती राज्यसत्ता किंवा सैनिकीसत्ता नाही, किंवा आर्थिक सत्ताही नाही अशी जनता हे कायद्याचे अधिष्ठान असते. ही जनता अल्पसंख्य असेल किंवा बहुसंख्य असेल, पण तिची संमती ही कायद्याची अधिष्ठात्री शक्ती बनेल. ही संमती जितकी निखालस असेल, तितकी लोकशाही विकसित होत जाईल. पण काही प्रसंगच

असे असतात की ज्या ठिकाणी मतांच्या पाठिंब्याला वावच नसतो आणि बुद्धिशक्ती कुंठित होऊन जाते. अशा प्रसंगी जनतेपाशी पर्याय कोणता? गांधीजींनी एक अपूर्व असा सत्याग्रहाचा पर्याय सुचवला, प्रतिकाराची एक अशी पद्धत की ज्यात शस्त्रनिरपेक्ष शौर्याला परिपूर्ण वाव आहे. शस्त्रनिरपेक्ष शौर्यात अल्पसंख्याकांनाही आशा आहे आणि यशाची शक्यताही आहे. आचार्य जावडेकर हे महाराष्ट्रातील एक थोर तत्त्वचिंतक होते. ते समाजवादी होते. 'आधुनिक भारत' नावाचा एक मोलाचा ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. त्यात त्यांनी 'सत्याग्रही समाजवाद' ही नवी कल्पना मांडली आहे. गांधी आणि मार्क्स ह्यांच्या विचारांचा उन्नत संकर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. लोकांनी सत्याग्रहाचे साधन आपलेसे केले तर त्यातून सत्याग्रही समाजवादाची स्थापना होईल, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

**संकटाला संधीचे रूप**

प्रत्येक क्रांतिकारकाचे हे वैशिष्ट्य असते की तो प्रतिकूलतेला अनुकूलतेचे रूप देतो. संकटाचे संधीत रूपांतर करतो. आमचा देश उपासमारी सोसणाऱ्यांचा देश आहे. उपासमारी सोसणाऱ्यांच्या ह्या देशात चळवळीची सुरुवात झाली ती उपासाने ! देशात बेकारी माजलेली आहे, पण चळवळीचा प्रारंभ झाला संपाने. देश शस्त्रास्त्रहीनांचा आहे, पण चळवळ सुरू झाली शस्त्रनिषेधाने. जनतेला आपल्या पाठीमागे उभे करण्यात गांधींना जे यश लाभले त्याचे रहस्य ह्यात आहे. भुकेल्यांत उपवास करण्याची शक्ती यावी, बेकारांत काम थांबवण्याचे सामर्थ्य संचरावे आणि निःशस्त्रांत शस्त्रत्यागाची हिंमत निर्माण व्हावी, अशी ही प्रक्रिया आहे. 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' आणि गांधींचा मार्ग ह्यात हा एक फार महत्त्वाचा फरक आहे. 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हे लाचाराचे शस्त्र आहे, त्यात शस्त्रनिषेध नाही. जेथे लाचारी असते तेथे शौर्य संभवत नाही. लाचारीने केलेला प्रतिकार यशस्वी होऊ शकतो, पण त्यातून विधायक–भावरूप शक्तीचा विकास होत नाही. गांधी ह्या गोष्टींच्या शोधात होते की प्रतिकार व्हावा, शस्त्रनिरपेक्ष प्रतिकार व्हावा, पण तो विधायक–भावरूप प्रतिकार असावा, शौर्ययुक्त प्रतिकार असावा. सत्याग्रहात शस्त्रनिरपेक्ष शौर्य आहे. धर्मयुद्धातले पराकोटीचे शौर्य तर त्यात आहेच, पण धर्मयुद्धात विहित मानलेली हिंसा मात्र त्यात अजिबात नाही. ज्यात विकार नाही, विजयाची आकांक्षा नाही, वैयक्तिक स्वार्थ नाही ते युद्ध धर्मयुद्ध होय. आपले प्राण पणाला लावायला तयार असणाऱ्या सैनिकाचा सन्मान होतो. जिथे आपल्या प्राणावर संकट नाही तिथे शौर्य नाही.

## निःशस्त्रीकरणाच्या जोडीला हृदयपरिवर्तन

शस्त्राशी शौर्याचा काय संबंध आहे? शस्त्राचे म्हणून काही सहचरी भाव असतात. आपल्या हाती उलथने आणि लाटणे दिले तर आपल्याला राग येईल. कारण त्याचेही काही सहचरी भाव आहेत. कानावर कलम असेल तर आपण म्हणतो हा कारकून आहे. एखाद्या मुलाच्या हाती बंदूक दिली की तो लगेच कोणावर तरी नेम धरील. शौर्य ख़रोखर शस्त्रात नसते. ते असते शस्त्र धारण करणाऱ्या हातात आणि मुख्य म्हणजे त्या पाठीमागच्या हृदयात ! शस्त्रधाऱ्याचे शौर्यही शस्त्रनिरपेक्ष असते. कारण शस्त्राचे सहचरी भाव ही मानवी हृदयाची उपज आहे. शस्त्राचा सदुपयोग हाही दुरुपयोगच होय आणि त्यामुळेच जगभरचे लोक निःशस्त्रीकरणाचे नारे लावत आहेत. निःशस्त्रीकरण समाजपरिवर्तनासाठी आवश्यक आहे, पण तेवढ्याने माणसाचे हृदयपरिवर्तन पूर्णपणे होऊ शकत नाही. शस्त्र न मिळाले तर माणसे उलथनी आणि लाटणी ह्यांचाच शस्त्रासारखा उपयोग करतील. मुलामुलांत भांडण जुंपते तेव्हा लाडू हेही हत्यार बनते ! माणसाचे मन, त्याची बुद्धी शाबूत नसेल तर तो जात, धर्म, वंश, साहित्य, संस्कृती, भाषा, देवदेवता ह्यांनाच लढाईतल्या हत्यारांचे रूप देईल. गांधी सेवा संघाच्या एका अधिवेशनात स्वतः गांधीच एकदा दुःखाने म्हणाले होते, ''माझी पुस्तके, 'नवजीवन', 'यंग इंडिया', 'हरिजन' ह्यांच्या फायली तुम्ही माझ्या शरीराबरोबरच जाळून टाका. ह्या गोष्टी माझ्या निधनानंतर शिल्लक राहिल्या तर लोक त्याच एकमेकांना फेकून मारतील. त्यांनाच हत्यारांचे स्वरूप येईल. प्रत्येकजण सांगू लागेल की मी म्हणतो तोच काय तो खरा गांधी विचार आहे !'' म्हणून निःशस्त्रीकरणाबरोबरच हृदयपरिवर्तनाचीही आवश्यकता आहे. प्रतिकाराच्या प्रक्रियेतून सर्वांचे शिक्षण होण्याची आवश्यकता आहे.

## हृदयपरिवर्तनाची पद्धती

संपूर्ण क्रांतीचे, लोकक्रांतीचे दोन भाग आहेत आणि प्रत्येक भागाचे चार चार उपविभाग आहेत.

एका भागात १-संदर्भ परिवर्तन (चेंज ऑफ कॉन्टेक्स्ट), २-मूल्य परिवर्तन (चेंज ऑफ व्हॅल्यूज), ३-संबंध परिवर्तन (चेंज ऑफ रिलेशनशिप) ह्या गोष्टी आणि गांधींनी जोडलेली आणखी एक गोष्ट ४-हृदयपरिवर्तन (चेंज ऑफ हार्ट) अशा चार बाबी येतात. हृदयपरिवर्तन ही खास गांधींची देणगी. दुसऱ्या विभागात १-राजकीय क्रांती, २-आर्थिक क्रांती, ३-सामाजिक क्रांती आणि ४-सांस्कृतिक क्रांती ह्या चार गोष्टींचा अंतर्भाव होतो. ह्या सर्व पैलूंचा आपण विचार करू या.

## आर्थिक क्रांती

आर्थिक क्रांतीबाबत पायाभूत गोष्ट कोणती आहे ते आपण पाहूया. लोकशाही जोवर फक्त राजकीय क्षेत्रात बंदिस्त असते तोपर्यंत ती निर्जीव असते. आर्थिक क्षेत्रात लोकशाही न अवतरली तर राजकीय क्षेत्रातली लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही. ह्याचा पुरावा म्हणजे लोकशाहीच्या संदर्भातच ह्या देशात आणीबाणी आणि एकाधिकारशाही आली आणि त्या वेळच्या संसदेने त्यावर पसंतीचे शिक्कामोर्तबही केले ! निर्जीव लोकशाही म्हणजे औपचारिक लोकशाही ! खरीखुरी लोकशाही आणायची तर आर्थिक लोकतंत्रही आवश्यक आहे. आर्थिक लोकशाही म्हणजे संयोजन ! हे संयोजन जीवनासाठी हवे; आणि जीवनात पृथ्वीच्या पाठीवरील सर्व प्रकारच्या जीवनाचा अंतर्भाव होतो. वनस्पतीपासून माणसापर्यंतची अवघी जीवसृष्टी त्यात येऊन जाते. संयोजन मानवकेंद्रित असले पाहिजे.

मानवकेंद्रित संयोजनासाठी पहिली गोष्ट म्हणजे जीवननिष्ठा. जीवनाच्या एकतेवर श्रद्धा असली पाहिजे. एका इंग्लिश तत्त्वज्ञाने फार नेटक्या रितीने ह्या निष्ठेचे वर्णन केले आहे. एकाही माणसाचे जीवन क्षीण होत असेल तर माझेच जीवन क्षीण होत आहे, त्याची प्रतिष्ठा क्षीण होत असेल तर माझी प्रतिष्ठाच क्षीण होत आहे, असे वाटले पाहिजे. संबंधावाचून जीवन नाही. संबंध म्हणजेच जीवन. जर्मनीच्या शार्डिनने 'बिल्डिंग द अर्थ' नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. पृथ्वीचे संयोजन कसे करावे ह्याची चर्चा त्याने पुस्तकात केली आहे. त्याने दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. माणसाने माणसाच्या निकट आले पाहिजे, ही एक गोष्ट ! परस्परांकडे जाणे हीच प्रगती होय. प्रगतीची दुसरी कोणतीच व्याख्या असू शकत नाही. प्रगतीच्या बाकी सर्व व्याख्या निरर्थक आहेत. दुसरी गोष्ट तो सांगतो ती अशी की एकमेकांकडे जात असतानाच त्यांनी एकमेकांना वरच्या पातळीवर नेण्याचाही सतत प्रयत्न करावा.

संयोजनात काही मूलभूत गोष्टी असतील तेव्हाच हे घडून येऊ शकेल. पहिली गोष्ट अशी की संपत्ती आणि स्वामित्व ह्याबद्दलचा माणसाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. संपत्तीच्या संदर्भातले माणसाचे परस्पर संबंधही बदलले पाहिजेत. माणसाचे अन्य जीवांशी व सृष्टीशी जे संबंध आहेत त्यातही बदल झाला पाहिजे. ह्याचाच अर्थ हिंसा, माणसामाणसांतील अलगपणा आणि प्रदूषण या तीन गोष्टी टाळण्याच्या दृष्टीने संयोजन करण्यात आले पाहिजे.

ह्यापुढे कोणी मालक आणि मजूर असता कामा नये. एक नोकरीला ठेवणारा व दुसरा नोकरीला राहणारा, अशी स्थिती असता कामा नये. एक माणूस विकून

घ्यायला तयार आहे आणि दुसरा खरेदी करायला तयार आहे, अशी अवस्था असता कामा नये. असले सर्व संबंध संपुष्टात आले पाहिजेत. आज जो मागसलेला आहे, दबलेला आहे, वंचित आहे, दुरावलेला आहे, त्याच्या पराक्रमातून हे संबंध बदलले पाहिजेत. आजच्या 'स्टॅटिस्टिक्स'ने माणसाला फक्त एक आकडा बनवले आहे. एक गमतीचे उदाहरण आठवले ते सांगण्यासारखे आहे.

एकदा पितृपक्षात माझा गयेला मुक्काम होता. भूदानाच्या भरभराटीचा तो काळ होता. एक दिवस पाटण्याला जाण्यासाठी गाडीत बसलो. तिथल्या म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी बरोबर होते. ते म्हणाले, ''ह्या वर्षी पितृपक्षात फार प्रगती झाली ! गेल्या वर्षी साडेसात टक्के माणसे कॉलऱ्याने दगावली होती, यंदा फक्त अडीच टक्के माणसे मृत्युमुखी पडली !'' मला फार बरे वाटले आणि मी त्या माणसाचे खूप कौतुक करू लागलो. माझ्या शेजारीच एक बाई बसलेली होती. ती रडू लागलेली दिसली, तेव्हा ती का रडते म्हणून मी चौकशी केली. ती संतापून म्हणाली, ''हे सेक्रेटरी काय बकताहेत ! त्यांच्या लेखी अडीच टक्के माणसे मेली असतील, पण माझ्या बहिणीचा नवरा तर शंभर टक्के मेला आहे!'' प्रत्येक मनुष्य पूर्ण असतो, समग्र असतो. तो मानवाचा अंश नसतो.

आज जे संयोजन होत आहे ते आपल्याला कुठे घेऊन चालले आहे? एक मोठा पटाईत घोडेस्वार होता. एक दिवस तो घोड्यावरून पडला. त्याचा घोडा शिकवून तयार केलेला होता. त्याने त्या स्वाराला पाठीवर घेतले आणि तो त्याला दवाखान्यात घेऊन गेला. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी छापून आली की असा अजब घोडा कुठे आढळला नव्हता ! जणू सर्कसमधला घोडा असावा ! स्वाराला दवाखान्यात नेऊन त्याने पोहोचवले. लोक त्या घोडेस्वाराचे अभिनंदन करण्यासाठी दवाखान्यात धावले. म्हणाले, ''तुमचा घोडा अजब दिसतो आहे. तुम्हांला त्याने दवाखान्यात आणून पोहोचवले. कमाल आहे त्या घोड्याची !'' स्वार म्हणाला, ''घोडा मोठा हुशार आहे, पण त्याने काय केले माहीत आहे? तो मला जनावरांच्या दवाखान्यात घेऊन गेला!'' आमच्या संयोजनाची स्थिती अशीच काहीशी झाली आहे.

आज माणूस झोपी गेला आहे आणि त्याचा देव हरवला आहे. बरट्रांड रसेलने एकदा लिहिले होते : ''ईश्वरावर माझा विश्वास आहे, पण हे जग त्याने निर्माण केले आहे, असे मला वाटत नाही. 'इट सीम्स टु मी दॅट द डेव्हिल मेड धिस वर्ल्ड व्हेन गॉड वॉज नॉट लुकिंग'—ईश्वराचा डोळा चुकवून सैतानाने हे जग बनवले असे मला वाटते.'' त्यामुळे ही अशी दुनिया तयार झाली आहे. सर्वसामान्य माणसाचा इथे कुणाला पत्ता नाही. विना टिळेमाळांचा आणि विना भजनाचा ('अनलेबल्ड

अँड अनकमिटेड') असा जो सर्वसामान्य माणूस आहे त्याचा कोणालाच पत्ता नाही ! आता ह्याच सर्वसामान्य माणसाच्या पराक्रमातून बदल झाला पाहिजे. कारण जो विपत्तीत आहे त्यालाच बदलाची उत्कंठा असणार. जो सुखात-आरामात आहे त्याला बदलाची काय जरुरी? पण जो दुःखात, अडचणीत, संकटात आहे त्याच्यात बदलाची प्रेरणा नाही. ही प्रेरणा आणि आकांक्षा जागवावी लागेल. ह्यालाच खरे लोकशिक्षण म्हणतात. राजकीय स्वातंत्र्य त्याला मिळाले आहे. इंग्रजी राज्याकडून जी वरदाने आम्हांला मिळाली आहेत त्यांचा विचार आपण केला पाहिजे. कृष्णमेघालाही चंदेरी कडा असतात. आमच्या देशात पूर्वी नसलेल्या कोणत्या गोष्टी इंग्रजी राज्यामुळे आपल्याला मिळाल्या आहेत?

कायद्यासमोर सर्व माणसे समान आहेत. त्यांची प्रतिष्ठा, त्यांचा मान सारखाच आहे. ब्राह्मण चोर असो की भंगी चोर असो, घनःशामदास बिर्ला चोरी करो की स्टेशनवरचा हमाल चोरी करो, कायद्यासमोर सगळे सारखेच आहेत. दुसरी गोष्ट प्रत्येक व्यक्तीला एकच मत आहे. सधन असो की निर्धन असो की भंगी असो, म्हातारा असो की तरुण असो, स्त्री असो की पुरुष, प्रत्येकाला मताचा समान अधिकार आहे. तिसरी गोष्ट सर्वांना शिक्षणाचा अधिकार आहे. ह्या तीन गोष्टींबरोबर आर्थिक स्वातंत्र्याची प्रेरणाही त्यांच्यात उत्पन्न झाली पाहिजे आणि त्या प्रेरणेबरोबर पराक्रम, पुरुषार्थ करण्याची जिद्दही निर्माण झाली पाहिजे.

**संयोजन आणि शिक्षण**

पहिली गोष्ट अशी की उत्पादन आणि वितरणाच्या प्रक्रियेतून माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास झाला पाहिजे. संयोजन आणि शिक्षणाचा सांधा इथे जुळतो. पण आज शिक्षण एका दिशेला चालले आहे तर संयोजन दुसऱ्याच दिशेला चालले आहे. ह्यामुळे शिक्षणही सफल होणार नाही आणि संयोजनही सफल होणार नाही.

एका खानसाम्याची गोष्ट मला आठवते. त्याचा मालक त्याला एक दिवस म्हणाला, हे पहा बाजारातून एक सारस पक्षी मी घेऊन आलो आहे. त्याची चांगली वस्तू तयार कर. त्या खानसाम्याची एक प्रेयसी होती ती नेमकी त्या दिवशी तिथे जाऊन पोहचली. म्हणाली, "तुझे माझ्यावर खरोखर प्रेम आहे का?" तो म्हणाला, "तुला शंका वाटते? तू म्हणशील ते करून दाखवीन, मग तर खात्री पटेल ना?" ती म्हणाली, "हे लटके बोलणे नसेल तर त्याचा पुरावा दे. ह्या सारस पक्ष्याची एक टांग मला देशील तर तुझे माझ्यावर खरेखुरे प्रेम आहे असे मी समजेन. सारस पक्ष्याची टांग फार स्वादिष्ट असते असे मी ऐकले आहे." खानसाम्याला ब्रह्मांड आठवले. तिला टांग दिली तर मालक काय म्हणेल ही

भीती ! पण दिलेला शब्द पूर्ण करायचा होता. तो एक साधासुधा खानसामा होता, मंत्रीबिंत्री नव्हता शब्द फिरवायला ! त्याने दिलेला शब्द पूर्ण केला. एक टांग प्रेयसीला देऊन टाकली. मग मालक जेवायला बसला. एकच टांग ताटात पाहून त्याने दुसऱ्या टांगेची चौकशी केली. खानसामा हजरजबाबी होता. म्हणाला, ''मालक, सारस पक्षाला एकच टांग असते ! तपस्व्यांसारखे एका टांगेवर ते उभे राहतात.'' मालक उभा राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी खानसाम्याला बरोबर घेऊन तो फिरायला निघाला. तलावावर गेला. तिथे कितीतरी सारस पक्षी होते. एकाच टांगेवर ते सवयीप्रमाणे उभे राहिले होते. खानसामा म्हणाला, ''पहा मालक, त्यांना एकेकच टांग दिसतेय की नाही? मी म्हणतच होतो.'' मालकाने टाळी वाजवल्याबरोबर दुसरी टांग घेऊन ते सारस पक्षी उडाले. मालक म्हणाला, ''पाहिलेस? आहेत दोन टांगा?'' खानसामा म्हणाला, ''मालक ह्यात एक गफलत झाली आहे बघा. आपण जेवणाच्या ताटासमोर अशीच टाळी वाजवली असती तर त्या सारसाने ही दुसरी टांग दाखवली असती !'' आम्ही निर्जीव संयोजन आणि शिक्षणापुढे अशाच टाळ्या पिटीत आहोत. संयोजन आणि शिक्षण ह्यांच्यात अनुबंध असला पाहिजे. हे झाल्याशिवाय बेकारी हटणार नाही आणि गरिबी मिटणार नाही. आज विद्यार्थी हैराण आहेत. काय करावे ते त्यांना समजत नाही, उमजत नाही. शिक्षण तर मिळालेले असते, पण पुढे काय? ज्यासाठी शिक्षण घेतले ते करायची संधीच नाही. मी त्या तरूणांना विचारतो की तुम्ही एकदा स्वतःलाच विचारून पाहा की आपल्याला नेमके काय हवे आहे? ह्या आजच्याच समाजात तुम्हांला प्रतिष्ठा आणि सन्मान हवा आहे की ह्या समाजव्यवस्थेत पूर्णपणे परिवर्तन तुम्हांला घडवून आणायचे आहे? आजच्या प्रस्थापित समाजरचनेत प्रतिष्ठा आणि सुख आम्हाला नको आहे, असा संकल्प त्यांनी केला पाहिजे. तरूण म्हणतात, आम्हाला नोकरी द्या. कोणी द्यायची नोकरी? सरकारने? सारे राष्ट्र सरकारी नोकरांचे आपल्याला बनवायचे आहे काय? तसे झाले तर सरकार परमेश्वर बनेल. मग नागरिकाला काही स्वतंत्र अस्तित्वच शिल्लक राहणार नाही. स्वायत्त—'ऑटॉनमस', स्वतंत्र जीवन त्याच्यासाठी मग शिल्लकच राहणार नाही.

**व्यक्तिविकास म्हणजे काय?**

मार्क्स म्हणाला होता, ''नॉट गव्हर्मेंट ऑफ मेन, बट ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ थिंग्ज— माणसावर शासन नको आहे, वस्तूंचे संयोजन हवे आहे.'' म्हणून मी म्हणतो की वस्तूंच्या उत्पादनाच्या प्रक्रियेतून माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास

साधायला पाहिजे. ह्या संदर्भात माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास म्हणजे काय, त्याचा आपण शोध घेऊया.

मानवी जीवनाचे एक अंग श्रम हे आहे. श्रम म्हणजे माणसाच्या इंद्रियांची आणि अवयवांची निर्माणशक्ती ! ह्या शक्तीचा विकास झाला पाहिजे. इंद्रियांना 'करण' अशीही एक संज्ञा आहे. करण म्हणजे इंद्रिय आणि उपकरण म्हणजे इंद्रियाच्या जवळचे. हात हे करण आहे आणि हातोडा हे उपकरण आहे. हातोडा असा असला पाहिजे की ज्याने हाताची शक्ती वाढेल. हाताच्या अनुरूप हातोडा असला पाहिजे. मुठीची शक्ती वाढवण्यासाठी हातोडा आहे, त्याने माझ्या मुठीची शक्ती काढून घेता कामा नये. चष्मा असा नसावा की ज्यामुळे माझ्या डोळ्यांची शक्तीच नाहीशी होईल. करण व उपकरण ह्यात साधर्म्य असले पाहिजे, ही गोष्ट सांस्कृतिक क्षेत्रातही लोकांनी मान्य केली आहे. वस्तूसंबंधी आदर ही रसिकतेची एक खूण आहे. असाच आदर निर्मितीच्या साधनांबद्दलही असला पाहिजे. रविशंकरांची सतार आहे. एकदा ते सतार न घेताच गेले. मेयर म्हणाले, "सतारीचे एवढे काय, कुठूनही आणून देता येईल." तेव्हा रविशंकर म्हणाले, "तुम्ही आणून द्याल, पण तिचा उपयोग होणार नाही. माझ्या सतारीशी माझा जिवंत संबंध जडला आहे. माझ्या शरीराचा अवयव माझी सतार बनली आहे." ही आत्मीयता म्हणजे परिग्रहाची भावना नव्हे, ही रसिकता आहे. तेव्हा अवजारांनी अवयवांची शक्ती वाढली पाहिजे ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट म्हणजे त्यामुळे कलेचा विकास झाला पाहिजे. माणसाची कलादेखील त्याच्या अवयवांवर आणि उपकरणांवर अवलंबून असते. माणसात आपली स्वतःची कला असली पाहिजे. पण आज कला 'व्हायकेरियस' म्हणजे बनावटी झाली आहे. दुसऱ्याच्यामार्फत तिचा लाभ घ्यावा लागतो.

राजाजींच्या जीवनातला हा प्रसंग आहे. राजाजी मोठे रसिक होते. एकदा श्रीमती रुक्मिणी अरुंडेल ह्यांनी एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. एका परदेशी नर्तकीने सुंदर नृत्य सादर केले. राजाजी कार्यक्रमाला आले होते. त्यांना विचारले, "कसा वाटला कार्यक्रम आपल्याला? आवडला?" राजाजी म्हणाले, "तसा ठीक होता कार्यक्रम, पण तिने बाथरूम कॉसच्युम घालून नृत्य का केले? तिच्या बिचारीजवळ कपडे नसावेत. सर्व कपडे तिने का परिधान केले नव्हते?" उत्तर देणारा हजरजबाबी होता. म्हणाला, "आमचे शिव-पार्वतीदेखील असेच नाचत असत." राजाजीही काही कमी नव्हते. ते म्हणाले, "शिव-पार्वती स्वतः नाचत होते. ते दुसरे नाचताना पाहायला जात नव्हते !" ह्याला प्रत्यक्ष कलाभिरुची म्हणतात. संयोजनात माणसाचा स्वतःचा सहभाग असला पाहिजे,

नाहीतर ते संयोजन 'व्हायकेरियस'— बनावटी होऊन जाते. सर्व धार्मिक विधी जसे ब्राह्मणांकरवी होतात तशाच सेकंडहॅन्ड पद्धतीने आमचे मनोरंजन होत असते. त्यातून संजीवन मिळत नाही. म्हणून मी म्हणतो की माणसाच्या कलेचाही त्याच्या निर्मितीबरोबर विकास झाला पाहिजे.

तिसरी गोष्ट म्हणजे निर्मितीप्रक्रियेबरोबर त्याच्या गुणांचाही विकास झाला पाहिजे. ह्यालाच 'कॅरेक्टर' असे मी म्हणतो. 'कॅरेक्टर' हे प्रत्येक माणसाचे वैशिष्ट्य आहे. 'एव्हरी मॅन हॅज सम एक्सलन्स ऑर अदर'— प्रत्येक व्यक्तीत काही ना काही उत्कृष्ट असतेच. 'कॅरेक्टर' म्हणजे चारित्र्य. जे माणसामाणसांत जवळीक निर्माण करते ते चारित्र्य होय. हीच संस्कृती. क्रांतीच्या प्रक्रियेत आणि क्रांतीनंतर माणसामाणसांतील जवळीक आणि आपलेपणा वाढला पाहिजे.

ह्या सर्व गोष्टींतून माणसाचे व्यक्तित्व आकारास येत असते. ह्यालाच मानवी विभूती म्हणतात. संयोजनातून मनुष्याच्या व्यक्तित्वाचा, त्याच्यातील विभूतितत्त्वाचा विकास झाला पाहिजे.

**दोन विचारप्रवाह**

दोन विचारप्रवाह आहेत. एक आहे लुई मम्फोर्डचा आणि इरिक फ्रॉमचा. इरिक फ्रॉमचे एक पुस्तक आहे 'मॅन फॉर हिमसेल्फ'—मानव स्वतःसाठी. तो म्हणतो, उपकरणांचा शोध लागण्याआधीपासूनच माणसात माणसाबद्दलच्या जवळिकीचा गुण दिसून येतो. ह्याचा अर्थ संस्कृतीची सुरुवात उपकरणांचा शोध लागण्याआधीच झाली होती.''

मेजर मॅक्लुहान यांचा विचार दुसरा आहे. 'अन्डरस्टॅन्डिंग द मीडिया—द एक्स्टेनशन ऑफ द मॅन.' ''माणसाची परस्परांशी व्यवहार करण्याची जी साधने आहेत त्यातूनच मानवी शरीराचा विस्तार झाला आहे. दात आणि नखे ह्यांच्याच विस्ताराचे नाव चाकू असे आहे.'' प्रथम माणसाने आपल्या मर्यादा जाणून घेतल्या. सिंहाला नखे आहेत, दात आहेत. हत्तीला प्रचंड असे शरीर आहे. हरणाला चपल असे पाय आहेत, पण माणसाजवळ ह्यांपैकी काहीच नाही. हे माणसाला समजले की त्याला त्याच्या मर्यादा समजतात. त्यानंतर माणूस 'ॲम्प्लिफाय' होतो. संपन्न होतो. उपकरणांमुळे संपन्न, समृद्ध होतो. परिपुष्ट होतो. समग्रतेच्या, संपूर्णतेच्या दिशेने त्याची वाटचाल सुरू होते. उपकरणवान मनुष्य पूर्वीच्या माणसापेक्षा अधिक धष्टपुष्ट झाला. त्यानंतर त्याचा विस्तार झाला. त्याची इंद्रिये परिवर्धित झाली. त्यानंतर झाला 'मॅन इमिटेडेड.' माणसाची नक्कल होऊ लागली. 'कॉम्प्युटर' आला. यंत्र माणसाची नक्कल करू लागले. उपकरणांचा

विकास होऊ लागला. त्यातून 'मॅन ट्रान्सप्लांटेड'ची अवस्था आली. माणूस आपल्या स्थानापासून च्युत झाला. त्याचे स्थानांतर झाले. आता गाणे हवे– रेडिओ दिमतीला आहे. हिशेब करायचाय–कॉम्प्युटर आहे. विद्यार्थ्यांना धडा शिकवायचा आहे–टेपरेकॉर्डर आहे. आता माणसाजवळ स्वतःचे असे काय राहिले आहे? त्याला आता काम नाही. तो आता लोहाराचा भाता बनला आहे. हवा आत घेतो, बाहेर सोडतो ! जीवनाला काही 'फंक्शन'च उरले नाही. व्यवसाय राहिला नाही. त्यातून 'मॅन-मॉडिफॉइड' ह्या अवस्थेला माणूस पोहचतो. परिवर्तित मानव ! उपकरण आणि माणूस ह्यांच्यातला संबंध हा आजच्या सांस्कृतिक क्रांतीचा आर्थिक क्षेत्रातला अंतिम विचार आहे. संस्कृती ह्याच ठिकाणी थबकणार आहे काय? सांस्कृतिक विकास ह्याचा अर्थ जीवाचा विकास आणि जीवनाचा विकास असा आहे : माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास, पशूच्या विभूतिमत्त्वाचा विकास आणि सृष्टीच्या, प्रकृतीच्या विभूतिमत्त्वाचा विकास सांस्कृतिक विकासात अभिप्रेत आहे.

### जीवनात पशूचे स्थान

आज मनुष्य अशा एका अवस्थेला येऊन पोहचला आहे की, त्याच्या उत्पादनाचा अधिकाधिक संबंध जमिनीशी आला पाहिजे. ही नवी 'इकॉलॉजी' आहे. बायबलमध्ये म्हटले आहे : ''तू मातीचा बनलेला आहेस, मातीत मिळणार आहेस.'' ज्या धरतीच्या मातीतून तो घडला तिच्याशी त्याचा जिवंत– ऑरगॅनिक–सेंद्रिय–संबंध आहे. उत्पादनात माणसाची शक्ती, त्याची कला आणि त्याचे गुण यांचा संपूर्ण विनियोग झाला पाहिजे. माणसाच्या पाठोपाठ येतो पशू. अलीकडे परदेशांतून खूप मंडळी इकडे येतात. अशीच एक मुलगी आली आणि तिने उंदीर पाहिला आणि बेहद्द खूष झाली ! म्हणाली, ''पॅरिसमध्ये आम्हाला उंदीरदेखील पाहायला मिळत नाही !'' पशूंबद्दल प्रेम हा मानवी स्वभाव आहे. आता तर मगर, सुसर, साप, गांडुळे आणि पाली पाळणारेदेखील पुष्कळ आढळतात. पण शौक म्हणून किंवा खेळणे म्हणून नव्हे तर सहकारी म्हणून त्यांचे संगोपन केले पाहिजे. ज्या दिवशी माणसाने मनुष्येतर प्राण्याला आपल्या जीवनात दाखल केले आणि त्याचा समावेश उत्पादन-प्रक्रियेत केला त्या दिवशी संस्कृतीच्या दिशेने त्याने एक पाऊल पुढे टाकले. पशूंबाबत आपल्या देशाने काही मर्यादा आखून घेतल्या आहेत. गायीला आम्ही मारणार नाही ही एक मर्यादा. ही आता एक सांस्कृतिक मर्यादा बनली आहे. हिंदूंनी तिला एक सांप्रदायिक मर्यादा मानल्यामुळे ती सार्वत्रिक होऊ शकली नाही. ज्या दिवशी तिचे सांप्रदायिक रूप

टाकून दिले जाईल, त्या दिवशी समाजजीवनात गाईची कदर होऊ लागेल. सांप्रदायिक मर्यादा आहे की नाही ते ठरवण्याची एक कसोटी आहे. माणसाला गायीपेक्षा श्रेष्ठ मानणे ही ती कसोटी आहे. आपण माणूस गायीपेक्षा गौण मानला, पण व्यवहारात मात्र गायीला डुकरापेक्षाही तुच्छ मानले जाते. गायीला अवध्य मानायचे ते समस्त जीवनाची प्रतिष्ठा मानण्याचे एक प्रतीक म्हणून ! तर मला सांगायचे हे आहे की पशूच्या शक्तीचा, गुणांचा आणि कलेचाही उत्पादनात विनियोग झाला पाहिजे. पशूतही मैत्रीची, सख्याची, आपलेपणाची एक जाणीव असते. घोडा, कुत्रा, गायी, बैल सारे पशू माणसाशी मैत्री करू इच्छितात. पशूचा मानवी जीवनात सहकारी म्हणून प्रवेश होणे हा सांस्कृतिक क्षेत्रातला एक फार मोठा टप्पा आहे.

**यंत्राचे स्थान**

आज आपल्या जीवनातून एकेक पशू बहिष्कृत होत आहे आणि त्याची जागा यंत्रोपकरण घेऊ लागले आहे. ह्याचाच अर्थ जीवनाचा विकास कुंठित होत आहे. एक जण मला सांगत होता, ''तो कॉम्प्युटर आहे तो कधीही चूक म्हणून करणार नाही. मानवी मेंदूच्या जागी तो आला तर किती छान होईल !'' पण कॉम्प्युटरची एक मर्यादा आहे. कॉम्प्युटर वेडावून जात नाहीच, पण तो जीनियस-बुद्धिमंतही बनू शकत नाही. यंत्राची मर्यादा आहे. माणूस एखाद्या गोष्टीसाठी वेडावून जाऊ शकतो आणि जीनियसही बनू शकतो, प्रतिभाशाली बनू शकतो.

यंत्र आले कशासाठी? माणसाला स्वतंत्र करण्यासाठी ! माणसाची कठोर परिश्रमातून सुटका व्हावी म्हणून. पण आज काय झाले आहे? यंत्र माणसाच्या हातात राहिले नाही, माणूसच यंत्राच्या हाती गेला आहे. यंत्रव्यवस्थेचा मनुष्य भाग झाला आहे. ह्या माणसाच्या रूपाला 'टेक्नॉलॉजिकल मॅन' असे म्हणतात. यांत्रिक मनुष्य. पश्चिमेकडच्या सर्व संपन्न राष्ट्रांपुढे हा प्रश्न उभा आहे. तिथे फुरसतीच्या वेळेचा एक नवाच प्रश्न उभा राहिला आहे. यंत्रयुगात नवनव्या अवजारांचा शोध लागला. ह्या अवजारांचा काय परिणाम होईल? उत्पादन जास्त होईल आणि माणसे कमी लागतील. ह्यामुळे माणसे अधिकाधिक बेकार होऊ लागतील. जिथे मनुष्यशक्ती अमाप असेल तिथे यांत्रिकीकरणामुळे रिकामपण वाढत जाईल. पण आपल्या देशात मनुष्यशक्ती बेकार पडली आहे. जे बेकार असतील ते गरीब, दरिद्री होत जातील. गरीब, वस्तू खरेदी करू शकणार नाहीत. उत्पादन वाढेल, पण त्याची विक्री होणार नाही. हा अंतर्विरोध आहे. त्यामुळे यंत्रयुगाबरोबर नकाशा बदलून गेला. मग त्यावर पुस्तके लिहिली गेली. 'द

फेल्यूअर ऑफ टेक्नॉलॉजी' –यंत्रतंत्राचा पराभव. लुई मम्फर्डच्या दुसऱ्या पुस्तकाचे नाव आहे, 'द मिथ ऑफ द मशीन'–यंत्राबाबतचे भ्रमजाल. त्याचे सांगणे आहे की आर्थिक आराखड्यात आता बदल झालाच पाहिजे.

देशात आपल्याला संपन्नता हवी आहे, वैपुल्य हवे आहे, पण मानवनिष्ठ संपन्नता आणि मानवनिष्ठ वैपुल्य हवे आहे. जीवननिष्ठ समद्धीचे आपण भुकेले आहोत. म्हणून उत्पादनाच्या प्रक्रियेतून माणसाला खो मिळता कामा नये. त्याचप्रमाणे उत्पादनाच्या प्रक्रियेत पशूलाही स्थान असले पाहिजे. पशू असा असला पाहिजे की जो माणसाच्या जीवनात समरस होऊ शकेल. म्हणजे संयोजनात त्याचा उपयोग झाला पाहिजे. जो पशू उपयोगी नसेल त्याचा बचाव परमेश्वरदेखील करू शकणार नाही ! तो पशू दुसऱ्या पशूंची हत्या करणारा नसला पाहिजे. म्हणजे तो हिंस्र पशू असता कामा नये. पशू असा असला पाहिजे की माणसाला त्याच्याबद्दल माया वाटावी. आपल्या देशाने गायीची गणना अशा पशूंत केली आहे. माणसाच्या आणि पशूंच्या कलागुणांचा विकास उत्पादन आणि वितरण प्रक्रियेत झाला पाहिजे.

### निसर्गाचे स्थान

माणसाचा निसर्गाशी कोणत्या प्रकारचा संबंध असला पाहिजे? एकोणिसाव्या शतकाला 'द सेंच्युरी ऑफ काँक्वेस्ट अँड होप' असे म्हणत. निसर्गावर विजय संपादन करणारे आशेचे शतक असे एकोणिसाव्या शतकाला म्हणत. खरोखर निसर्गाशी आपले काही वैर आहे काय? निसर्ग ही जीवनाची विभूती आहे. ज्या साधनांनी जीवन संपन्न होते त्याला विभूती म्हणतात. मी पाँडिचेरीला गेलो होतो. तिथे एका फर्निचरवर लिहिले होते, 'एव्हरी फर्निचर हॅज इट्स पर्सनॅलिटी, गार्ड इट्स ऑनर !' प्रत्येक वस्तूचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व असते आणि त्याबद्दल आदरभाव बाळगला पाहिजे. आपल्याकडे त्याला विभूतियोग म्हणतात. हा 'ॲनिमिझम' नव्हे. माणसाचे एक भावविश्व असते. त्यात कविता, कला, संगीत असते. त्याच्या दृष्टीने जमीन फक्त जमीन नसते, ती मातृभूमी असते. गंगा हे फक्त पाणी नसते, तीर्थ असते. हिमालय हा केवळ एक पर्वत नसतो, देवतात्मा असतो. तर ह्या निसर्गाच्या विभूतिमत्त्वाची आम्ही लूट करणार नाही, त्याचे शोषण करणार नाही. जीवन संपन्न करण्यासाठी आम्ही त्याच्याशी सहकार्य करू. शाकुंतलात देवदारूसंबंधी म्हटले आहे, ''पुत्रीकृतोऽसौ वृषभध्वजेन.'' त्याला भगवान शंकरांनी आपला पुत्र मानले आहे आणि जेव्हा शकुंतला पतीकडे जायला निघाली तेव्हा कण्व वर्णन करतात, कोणती शकुंतला?

तिला अलंकाराचा इतका सोस असूनही एक पानदेखील ती खुडत नाही. कारण तुमच्याबद्दल तिच्या मनात माया आहे ! 'टेक्नॉलॉजिकल मॅन : द मिथ ॲन्ड द रिॲलिटी' नावाचे एक पुस्तक व्हिक्टर नावाच्या एका माणसाने लिहिले आहे. 'यांत्रिक मानव : काल्पनिक आणि वास्तविक' म्हणजे काय ते तो सांगतो. तो म्हणतो, ''एका नव्या निसर्गप्रेमाची— 'न्यू नॅचरॅलिझम'– आता आवश्यकता आहे.'' त्याची दुसरी ओळ आहे –'न्यू होलिझ्म– एक नवी समग्रता.' सृष्टीत जितकी म्हणून द्रव्ये आहेत, विभूती आहेत त्यांच्यात असा समतोल आहे की त्यामुळे जीवन संपन्न होत जाते, जीव संपन्न होत जातो. 'डिसिप्लिन ऑफ पीस'– शांततेचे अनुशासन नावाचे एक पुस्तक आहे. शांतता हवी असेल तर निसर्गाच्या संदर्भात एक नवे अनुशासन स्वीकारावे लागेल. आजवर जीवनात फ्रॅगमेन्टेशन, कम्पार्टमेन्टेशन म्हणजे तुकडे होते. विशेषज्ञांची ती दुनिया होती.

एकदा एक रोगी एका विशेषज्ञाकडे तपासणीसाठी गेला. बिचारा भांबावून गेला. डोळे तपासायचे तर दोन्ही डोळे एकच डॉक्टर तपासतील की दोन तपासतील? अशा रितीने एकेका अंगाचा विकास झाला, पण समग्रतेचा ऱ्हास झाला. विशेषज्ञांच्या परिषदेत विचारण्यात आले : समग्र माणूस कुठे आहे? तेव्हा उत्तर मिळाले, त्याला आमंत्रितच केलेले नव्हते ! तर आता एका नव्या समग्रतेची, एका नव्या संपन्नतेची आवश्यकता आहे. माणसाच्या उपजीविकेचे जे संयोजन होते त्याचा प्रभाव जीवनावर पडतो म्हणून जीवन आणि उपजीविका यांचे संबंध शंभू आणि अंबिका ह्यांच्यासारखे अभिन्न होऊन जातात.

### श्रम आणि विश्राम

संयोजनात श्रम आणि विश्राम ह्यांच्यात काम आणि आराम ह्यांच्यात सामंजस्य असले पाहिजे. ह्या दृष्टीनेच उत्पादनाच्या अवजारांत सुधारणा केली पाहिजे. त्याची एक अट आहे ती अशी की त्यातून वैपुल्य आले पाहिजे. गरजा भागल्या पाहिजेत. त्यासाठी सर्वांना श्रम करावे लागले तर केले पाहिजेत. सर्वांत, राष्ट्रपती-पंतप्रधानांपासून तो भंगी, झाडूवाल्यापर्यंत सगळे येतात. हे जे आवश्यक, अनिवार्य श्रम ते यंत्राकरवीसुद्धा करविले जाऊ शकतील. परंतु माणसाला शरीर स्वास्थ्यासाठी परिश्रमाची आवश्यकता असते.

अनेकदा मला युरोपीय समाजवाद्यांचे मोठे आकर्षण वाटते. त्यांची कल्पना-शक्ती अमर्याद होती. त्यांना अवैज्ञानिक म्हणून नावे ठेवण्यात आली. त्यांचा समाजवाद हे स्वप्नरंजन आहे, युटोपिया आहे, अशी दूषणे त्यांना देण्यात आली. पण खराखुरा समाजवाद ह्याच मंडळींनी आपल्या स्वप्नात रंगवला. केवढी

भव्योदात्त होती त्यांची स्वप्ने ! फ्रान्सचे फेरियर हे ह्या मालिकेत होते. त्यांनी म्हटले आहे, ''लीझर—फुरसत आणि लेबर—श्रम हे परस्परांच्या जवळ येतील आणि ज्या दिवशी उत्पादक, परिश्रम खेळासारखा आनंददायी होईल आणि उत्पादनाची अवजारे खेळणी बनतील तो क्रांतीच्या परिपूर्णतेचा दिवस असेल.''

रवींद्रनाथांनी म्हटले आहे की श्रम आणि विश्राम ह्यांनी जीवनाचे संजीवन होत असते. श्रम आणि विश्राम ह्यांचा अनुबंध असला पाहिजे. संयोजन आणि शिक्षण ह्यांचा समन्वय झाला पाहिजे. मग त्या पाठोपाठ व्यायामही येईल आणि संजीवनही येईल.

**आमने-सामने समाज**

उद्योग छोटे असावे की मोठे असावे, ह्याबद्दल इकडे वादविवाद चालला आहे. हे सारे लोकांच्या मनाची पकड घेणारे शब्द आहेत. त्यांच्या भानगडीत न पडलेलेच बरे. एकदा एक जावईबुवा सासुरवाडीला गेले. काही दिवस तिथे राहिले. त्याला एक पत्र आले. ते पाहून तो रडायला लागला. त्याच्या बायकोला वाटले, काहीतरी दुःखद बातमी पत्रात असावी म्हणून तीही रडायला लागली. त्या दोघांना रडताना पाहून सासूही सहानुभूती म्हणून रडायला लागली. शेजारीपाजारीही रडू लागले. तेवढ्यात तिकडून एक भला गृहस्थ जात होता. त्याने चौकशी केली तेव्हा प्रत्येकजण दुसऱ्याकडे बोट दाखवू लागला. शेवटी जावईबापूंचा नंबर आला, तेव्हा त्यांना विचारण्यात आले की तुम्ही का रडता? तेव्हा जावईबापू म्हणाले, ''मी फक्त ठळक अक्षरे तेवढी वाचायला शिकलो आहे व पत्र तर लपेट्या अक्षरांत लिहिलेले, मला वाचता येईना म्हणून मला रडू कोसळले !'' 'लार्ज स्केल–स्मॉल स्केल', ठळक अक्षरे आणि बारीक अक्षरे ह्यांचा मामला असाच काहीसा आहे. हे 'शिबॉलिथ्स' आहे. मूलभूत गोष्ट मी आधीच सांगितली आहे. ज्या उद्योगांमुळे माणसाचा, पशूचा विकास होत असेल ते उद्योग हवेत. सृष्टीशी त्याचे जे संबंध आहेत त्यांचा त्यातून विकास साधायला हवा. ही कसोटी पुरेशी आहे.

ह्यासाठी आमने-सामने असणारा—'फेस टु फेस'—समाज हवा. असा समाज की जेथे निर्माता आणि उपभोक्ता परस्परांना अपरिचित नसतील. 'नो इम्पर्सनल प्रॉडक्शन अँड नो ॲनॉनिमस डिस्ट्रिब्यूशन'. आज अशी परिस्थिती राजकारणातही नाही आणि अर्थकारणातही नाही. राजकारणात नागरिक अनाम राहिला आणि पक्ष आजच्यासारखेच राहिले तर काय होईल? डोक्याच्या मापाची टोपी नाही तर टोपीच्या मापाचे डोके करावे लागेल. जो पक्ष सत्तेवर असेल त्याच्या मापाचे डोके घडवायचे. मग सलूनमध्ये केस कापायला जाण्याऐवजी

डोकेच तासून घ्यायला जायची पाळी येईल. कारण टोपीच्या मापाचे डोके करावे लागणार आहे. अशा रीतीने 'ॲनॉनिमस प्रॉडक्शन' आणि 'ॲनॉनिमस डिस्ट्रिब्युशन'मध्ये माणसाच्या मापाची वस्तू तयार होणार नाही, वस्तूच्या मापाचे माणसाला बनावे लागेल. ह्याला 'कन्झ्यूमर्स सोसायटी' असे म्हणतात. असा समाज हा अमानवीय समाज होय. उत्पादक आणि उपभोक्ता दोघे नामवंत असले पाहिजेत. उत्पादकाची उपभोक्त्याला आणि उपभोक्त्याची उत्पादकाला ओळख असली पाहिजे. ह्यालाच 'फेस टु फेस सोसायटी'— आमने-सामने समाज म्हणतात. 'ॲनॉनिमस सोसायटी' म्हणजे काय? 'ए सोसायटी इन वुइच देअर आर सेव्हरल ह्यूमन बिइंग्ज हू डू नॉट बिलॉंग टु एनी ट्राइब.' भटक्या जमाती- 'नोमॅडस' असतात ना, तसलाच समाज आजच्या महानगरात असतो. मधमाशांच्या पोळ्यांसारखी घरे असतात त्यात राहणाऱ्यांचा समाज हा असा असतो. त्यांच्याबद्दल मी बोलत नाही. इथे 'ट्राइब' म्हणजे कुटुंब. 'फॅमिली सोसायटी', कौटुंबिक समाज. 'इन्स्टिट्यूशनल सोसायटी' आणि 'फॅमिलिस्टिक सोसायटी' ह्यात असा फरक आहे की संस्थात्मक समाजात सदस्यत्व असते आणि कौटुंबिक समाजात माणसामाणसांत नातेसंबंध असतो. नव्या समाजात सर्वांचा परस्परांशी नातेसंबंध बदलता येत नसतात. संस्थात्मक समाजात 'ऑर्गनायझेशन ऑफ मेन' माणसांच्या संघटना होतात. माणसाची ही आणखी एक आवृत्ती झाली. पहिल्यांदा 'मार्केट ओरिएंटेशन' झाले, नंतर 'सायकॉलॉजिकल ओरिएंटेशन' झाले, हल्ली 'ऑर्गनायझेशनल ओरिएंटेशन' चालले आहे. संस्थेचा मनुष्य ! आता माणूस असा कुठे राहिलेलाच नाही. माणूस आता संस्थेत हरवून गेला आहे. 'टोटेलेटेरियन सोसायटी'— एकाधिकारशाही समाजातच असे झाले आहे असे नव्हे, तर आपण ज्याला कल्याणकारी समाज— 'वेल्फेअर सोसायटी' म्हणतो तिच्यातही माणसाची गत अशीच काहीशी झाली आहे. व्यक्तीला काही स्थानच राहिलेले नाही. तोही एक प्रकारचा राज्यवाद— 'स्टेटिझमच' आहे. 'डिक्टेटरशिप'मध्ये जसा 'स्टेटिझम' आहे तसाच, तो 'वेल्फेअर सोसायटीत'ही आहे. तेथेही आता माणसाची किंमत राहिलेली नाही.

## मूल्य आणि किंमत

ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करायला हवे? आपण 'प्राइसकडून व्हॅल्यू'कडे म्हणजे किमतीकडून मूल्याकडे गेले पाहिजे. 'वुइ वॉंट ए व्हॅल्यू ओरिएंटेड इकॉनॉमी अँड नॉट ए प्राइस ओरिएंटेड वन.' 'प्राइस टॅग' प्रत्येक वस्तूवर असणाऱ्या अर्थव्यवस्थेला 'इकॉनॉमी ऑफ एक्सचेंज व्हॅल्यू' असे

म्हणतात. जे काही उत्पादन होईल ते एकतर वस्तुविनिमयासाठी तरी होईल किंवा विक्रीसाठी तरी होईल. जर माझ्या गरजा अशा असतील की ज्यांच्याबाबत वस्तुविनिमय शक्य नाही आणि खरेदी करण्याची शक्तीदेखील माझ्याजवळ नाही तर मग मरण्याशिवाय मला गत्यंतरच नाही ! हे कोण्या गांधींचे काही मी सांगत नाही. हाच मार्क्सवादी दृष्टिकोन आहे. हाच सोशॅलिझम आहे, कम्युनिझम आहे. उत्पादन उपयोगासाठी व्हावे, बाजारासाठी होऊ नये. प्रतिमूल्यासाठी ('एक्स्चेंज'साठी) होऊ नये. प्रतिमूल्यासाठी नसेल आणि उपयोगासाठी असेल तर काय होईल? तर 'इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन' होईल. 'शेअरिंग' होणार नाही. क्लबातून काय होते? पन्नास सभासद आहेत आणि पाचशे लाडू तयार करण्यात आले आहेत. प्रत्येकाचे दहा दहा झाले. मग तिथला आचारी स्वतःसाठी दहा लाडू आधीच काढून ठेवतो. का ठेवतो? प्रत्येक सभासदाने दहाऐवजी अकरा लाडू खाल्ले तर माझ्या वाट्याला काय येईल? समाजवादात समान वितरण आहे. ऐंशी वर्षाच्या बोळक्या तोंडाच्या म्हाताऱ्यालाही दहा लाडू व दहा महिन्यांच्या पोरालाही दहा लाडू ! परिवारात वितरण होत नसते, 'शेअरिंग' होत असते. आजोबा दोन लाडू खात असतील तर दोनच घेतील. मुलगा वीस लाडू खाऊ शकत असेल तर त्याला वीस मिळतील, शेवटी आईच्या वाट्याला एकही लाडू न आला तर ती त्यानेच आनंदित होईल. म्हणेल, सर्वांना लाडू खूप आवडले हे छान झाले.

हा जो भावनात्मक आशय आहे तो संघटनेत येत नाही, नातेसंबंधात येतो. म्हणून माणसाचे वैशिष्ट्य नातेसंबंध हे आहे. अलगतेमध्ये, दुराव्यात जीवन नाही. जीवन म्हणजे सहजीवन. माणसाने माणसाबरोबर माणसासारखे राहणे म्हणजे सहजीवन. अशा समाजात प्रत्येक मनुष्य शेजाऱ्यासाठी, दुसऱ्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे उत्पादन, उपयोगी परिश्रम करील.

**शेजारी कोण?**

आणि हा शेजारी कोण? बायबल म्हणते, पृथ्वीच्या पाठीवर जेथे कोठे दुःख असेल तेथे तुमचा शेजारी आहे असे समजा. ते माझ्यासाठी मानवतेचे सगुण रूपच आहे, मानवतेचे विश्वरूप आहे. मॅन कॅपिटल आहे. माझा शेजारी म्हणजे मानवतेचे साक्षात चतुर्भुज रूप आहे. ह्यातून तीन गोष्टी आपल्यापुढे आल्या—

नफ्यासाठी उत्पादन – भांडवलशाही
उपयोगासाठी उत्पादन – समाजवाद
शेजाऱ्यासाठी उत्पादन – मानवता

मी याला गांधीवाद म्हणत नाही. कारण गांधींवर लेबल लावले तर गांधी गांधी राहणार नाहीत. गांधी 'वॉज ओन्ली द अनलेबल्ड इंडिव्हिज्युअल, दॅट वॉज बॉर्न आफ्टर सेंच्युरिज'—गांधी हा एकच मुद्रा न उठवलेला केवळ माणूस होता, शतकाशतकांनंतर जन्माला येणारा माणूस !

उत्पादन मनुष्यासाठी झाले पाहिजे. शेजाऱ्यासाठी झाले पाहिजे. या शेजारपणाला गांधीजींनी 'स्वदेशी' असे नाव दिले. हा गांधीजींच्या ग्रामोद्योगाचा अर्थ आहे. ग्रामसंजीवनाचा अर्थ आहे. शेजाऱ्यासाठी उत्पादन; आणि हा शेजारी कोण? तर माझ्या शेजारी, माझ्या गावात, माझ्याबरोबर राहणारा तो शेजारी. आणि तो अमेरिकेत राहणारा तोही माझा शेजारीच आहे. क्षितिजापर्यंत सगळे माझे शेजारीच आहेत. पण आज होते काय? आम्ही परस्परांच्या शेजारी वास्तव्य करतो, पण एकमेकांच्या सोबत राहत नसतो. सर्व धर्मांनी शेजाऱ्यावर प्रेम करण्याचा आदेश दिला आहे. ह्या विधानाचे मला फार आश्चर्य वाटत असे. हे सांगायला खरोखर धर्माची काय गरज आहे, असे वाटे. पण जसजसे वय वाढत गेले तसतसे लक्षात आले की शेजाऱ्यावर प्रेम करणे मोठे अवघड आहे. जगात कोणावरही प्रेम करता येईल, पण शेजाऱ्यावर प्रेम करणे महाबिकट आहे. त्याचे एक कारण असे आहे की शेजाऱ्याची काही आम्ही निवड केलेली नसते. ती आपल्या हातची गोष्ट नाही. हा माझा मित्र आहे. मित्र कसा झाला? मी मित्र केला. तो कोण आहे? तो माझा शत्रू आहे. शत्रू कसा झाला? मी शत्रू केला. मी मानला म्हणून मित्र, मी मानला म्हणून शत्रू. पण शेजारी माझ्या मानण्या न मानण्यावर अवलंबून नाही. तो आहे म्हणून आहे. हा शेजारी माझा मित्र झाला पाहिजे.

आमने-सामने समाजात माणसे एकमेकांच्या ओळखीची असतील. मग त्याला तुम्ही नाव काहीही द्या. गाव म्हणा हवे तर. पण आजचे गाव क्रांतीला अनुकूल नाही. आजचे गाव जीर्णमतवादी आहे. लोक म्हणतात, खेडे ईश्वराने बनवले आणि शहर माणसाने निर्माण केले. खेडेगावची माणसे साधीसुधी, चांगली असतात. मोठी सत्‌शील असतात. त्यांना संधी नसल्यामुळे ते सत्‌शील आहेत. त्यांना जेवढी संधी मिळते तेवढा वाईटपणा करायला ती माणसे सोडीत नाहीत. शहरातल्या माणसांना वाईट करायची संधी अधिक असते. शहरी माणसांची लालसाही वाढत जाते. मुंबईच्या माणसाला विचारले तर तो म्हणतो मी सत्तर लाखांतला एक आहे. खेड्यातला मनुष्य सातशेतला एक असतो. त्याच्या जीवनाचा आशय, भावनात्मक भाग बदलतो. आपल्याला क्षेत्रवादात बुडून चालणार नाही. त्यातून बुटकी माणसे 'ड्वार्फस' तयार होतात. आपल्याला माणसाची उंची वाढवायची आहे. त्याला भव्य करायचे आहे. त्याचे हृदय विशाल

बनवायचे आहे. माणसाचे मन आणि त्याचे शरीर दोन्ही निकोप हवे. तो सर्व बाजूंनी धडधाकट असला पाहिजे. अशा तऱ्हेचा समाज आकाराने लहान असला तरी त्याचे अंतरंग मोठे असेल.

**कोणाची नक्कल करू नका**

तरुणांनी कोणाची नक्कल बनू नये. स्वतंत्र असावे. 'बी ओरिजिनल'. क्रांतीची कुठेही पुनरावृत्ती होत नसते, नक्कल करता येत नसते. आजवर हे कुठे घडले आहे काय, असा प्रश्न नका विचारू. हिलरी आणि तेनसिंग एव्हरेस्टवर चढून गेले तेव्हा त्यांनी विचारले होते काय, की पूर्वी कोणी एव्हरेस्टवर चढून गेला असेल तर सांगा. कोलंबस नव्या जगाच्या शोधासाठी निघाला तेव्हा त्याने पूर्वी कोणी नव्या जगाचा शोध लावला आहे काय, असे विचारले नव्हते. सिद्धार्थाने महालाचा आणि कुटुंबाचा त्याग केला तेव्हा पूर्वी कोणी तसे केले होते काय, ह्याची चौकशी केली नव्हती. तलवारीवाचून कोणी स्वराज्य मिळवले असेल तर सांगा, असे गांधींनी कोणाला पुसले नव्हते. ह्या वेळी लोकआंदोलन केले तर त्यात यश मिळेल काय, असे जयप्रकाशांनी कोणाला विचारले नव्हते. क्रांतिकारक पूर्वानुभवांची चौकशी करीत नाही. तो सरळ पाऊल उचलतो. पहिले पाऊल कोण टाकणार, असा प्रश्न आहे. सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहत बसले तर 'मी' चे बहुवचन 'आम्ही' कधी होणार नाही. सर्वच जण मागेपुढे करत राहतील. त्रैराशिक मांडून अशा प्रश्नाचे उत्तर मिळत नसते. ह्यासाठी लागतात 'डेयर डेव्हिल्स.' 'हू विल रश व्हेअर एंजल्स फीअर टु ट्रेड.' क्रांतीसाठी अशा तरुणांची गरज आहे की जेथे देव जायला का कू करतात तिथे बिनधास्तपणे ते जातील. पंचाहत्तरीतला तरुण 'डेयर डेव्हिल' हे आवाहन करतो आहे. ह्याचे कारण मला वयाचे भानच होत नाही. काही माणसांना मोजायला काही उरत नाही तेव्हा ते वर्षे मोजू लागतात ! जयप्रकाश ही एक अशी व्यक्ती आहे की जिच्याशी काळ खेळखंडोबा करू शकत नाही. काळ आपले ठसे त्यांच्यावर उमटवू शकत नाही. अशा प्रकारच्या विरळा व्यक्तींपैकी जयप्रकाश एक आहेत. त्यांनी ह्या देशातल्या तरुणांना आणि तारुण्याला हाक दिली आहे. देशातली तरुणाई त्यांच्या हाकेला योग्य प्रतिसाद देईल अशी मला आशा आहे.

❑❑

# ६

# आत्मवान अजिंक्यच असतो !

संघर्ष आणि झगडा किंवा भांडण ह्या एकच गोष्टी नव्हेत, हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. झगड्यात किंवा भांडणात लोक परस्परांचे शत्रू असतात, पण संघर्षात शत्रुत्व नसते. झगडा होतो तिथे तणाव असतो, माणसामाणसांत दुरावा निर्माण होतो. क्रांतीत विरोधाची प्रक्रिया असली तरी त्यात झगड्यासारखे शत्रुत्व मात्र नसते. कोठेही आणि कोणत्याही पातळीवर हिंसा आणि विध्वंस झाला की क्रांतीच्या मार्गात अडथळे येतील. हिंसा आणि विध्वंस जो करतो तो क्रांतीचा शत्रू असतो, आज सर्वत्र दंगाधोप्याचे हिंसेचे वातावरण आहे. त्यातून लोकराज्य उदयाला येणे शक्य नाही, त्यातून गर्दीची अवस्था फक्त निर्माण होईल. 'पीपल' आणि 'क्राउड' किंवा 'मॉब' एक नव्हे, हे समजून घेतले पाहिजे. 'मॉब'मध्ये डोकी खूप असतात, पण मेंदू मात्र शोधून सापडायचा नाही. 'मॉब'मध्ये छात्या पुष्कळ असतात, पण हृदय किंवा अंतःकरण मात्र नसते. 'मॉब'चे राज्य म्हणजे लहरी महंमद तुघलकाची राजवट. अशी राजवट म्हणजे लोकशाही नव्हे. हे जर नीट समजून न घेतले, तर आपण करायला जाऊ एक आणि प्रत्यक्षात घडेल मात्र भलतेच. लोकशाहीतून आपल्याला लोकसत्तेकडे जायचे आहे. पण जर नीट समजूत नसेल तर आपण गुंडांच्या राजवटीत पोहोचू. त्यामुळे पोलीस राज्याला निमंत्रण दिल्यासारखे होईल.

लोकशाहीत प्रत्येकाला हा अधिकार आहे की त्याने आपले गूज सांगावे आणि लोकांपर्यंत ते पोहोचवावे. रोमन कॅथॉलिक चर्चमध्ये एक 'डिग्निटरी', एक प्रतिष्ठित असतो. त्याला 'ॲडव्होकेट्स डायबोलिकस'—सैतानाचा वकील म्हणतात. ईश्वरानेच जर सर्वांना निर्माण केले तर सैतानालाही त्यानेच घडवले असणार हे उघड आहे. तोही ईश्वराचा पुत्रच होय. त्यालासुद्धा आपले म्हणणे मांडण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे. 'डिसेंट इज द ऑक्सिजन ऑफ डेमॉक्रसी'—मतभिन्नता हा लोकशाहीचा प्राणवायू आहे, ही गोष्ट आम्ही कधीही विसरता कामा नये. हा अधिकार आणीबाणीच्या वेळी आपल्याला नव्हता आणि

तीच तर आपली मुख्य तक्रार होती. जी गोष्ट हजारो लोकांनी हजारो वेळा ऐकली तिचीच पुनरावृत्ती मी करीत आहे. पण अशा गोष्टी आपण विसरून जातो आणि म्हणून त्यांची आठवण करून द्यावी लागते.

### विश्वस्त कल्पना

सांस्कृतिक क्षेत्रातील क्रांतीचा विचार आपल्याला करायचा आहे. आपल्याला किंमतीकडून मूल्याकडे वाटचाल करायची आहे. वस्तूचे जीवनातील जे महत्त्व त्याला मूल्य म्हणतात. हवेची काही किंमत नाही, पण तिच्यावाचून आपण क्षणभरही जगू शकत नाही. जीवनासाठी जी वस्तू जितकी आवश्यक तितकी ती सुलभ असली पाहिजे. हवा मोफत मिळायला हवी, पाणी मोफत मिळायला हवे आणि शक्य झाले तर अन्न आणि वस्त्रही मोफत मिळाले पाहिजे. येथून मूल्यपरिवर्तनाची सुरुवात होते. गांधीजींनी ह्या दृष्टीने विश्वस्त कल्पना पुढे मांडली. हे काही पुराणातले तत्त्वज्ञान नव्हे, ही एक व्यवहार्य गोष्ट आहे. स्वामित्व आणि संपत्ती ह्यांचे निराकरण करण्याचा तो एक मार्ग आहे. लोकांना वाटते की व्याज घ्यायला आणि संपत्तीत वाढ करायला 'ट्रस्टीशिप'मधे सोय आहे. संपत्तीची आसक्ती असली तरी बिघडत नाही. फक्त एकच करा, या सगळ्याचा नैवेद्य परमेश्वराला दाखवायला विसरू नका, म्हणजे झाले ! परंपरेने आणि परिस्थितीने जे धन आपल्याला मिळाले असेल ते दुसऱ्याचे समजून त्यातून लवकरात लवकर स्वतःची सुटका करून घेणे म्हणजे 'ट्रस्टीशिप.' किशोरलालभाई मश्रुवालांनी सार्वजनिक संस्थांबाबत लिहिले होते की सार्वजनिक निधीतही व्याज घेऊन भर घातली जाते. जर व्यक्तिगत परिग्रह आणि व्यक्तिगत संग्रह निषिद्ध असेल तर सार्वजनिक संग्रह कमी निषिद्ध का समजावा?

'ट्रस्टीशिप'चे दोन पैलू आहेत. एक आहे संक्रमणकालीन व्यवस्था. भांडवलशाही समाजाकडून आम्हाला श्रमनिष्ठ समाजव्यवस्थेकडे वाटचाल करायची असेल तर त्यासाठी संग्रहाचे विसर्जन करण्याची आवश्यकता आहे. 'ट्रस्टीशिप'चा दुसरा पैलू असा की केवळ धनिकांनी ट्रस्टी व्हायचे असे नाही तर श्रमिकांनीही ट्रस्टी बनायचे आहे. केवळ मोठ्या संपत्तीवाल्यांसाठीच ही योजना आहे असे नव्हे, तर छोट्या संपत्तीवाल्यांनीही हेच करावे अशी अपेक्षा आहे. श्रमिक जे काय करतो ते समाजाचे आहे. त्या कामाची उपकरणेसुद्धा समाजाचीच आहेत, त्याच्या मालकीची नव्हेत. आम्ही आधी ही मागणी करतो की उत्पादकाचा कब्जा उत्पादनाच्या साधनांवर असला पाहिजे. नंतर आम्ही मागणी करतो की उत्पादकही त्यांचा विश्वस्त असला पाहिजे. तो त्या

उपकरणांचा आणि उत्पादनाचा स्वतःला मालक मानणार नाही. ही शाश्वत ट्रस्टीशिप झाली.

**गरिबी-अमिरीचा झगडा**

संपत्तिनिराकरणाचे तीन मार्ग आजवर चोखाळले गेले आहेत. प्रतिहरण करणे किंवा हिसकावून घेणे–'एक्सप्रोप्रिएशन' करणे–हा एक मार्ग. जप्त करणे किंवा 'कॉनफिस्केशन' हा दुसरा मार्ग. करआकारणी हा तिसरा मार्ग आहे. संपत्तिमानांवर अशी करआकारणी करावी की त्यांची संपत्ती हळूहळू घटत जावी. आजवर ह्या तीन मार्गांनी प्रयत्न झाले. गांधीजी म्हणाले की ह्यातून माणूस माणसाच्या जवळ येणार नाही. स्वामित्व आणि संपत्ती ह्यांचे निराकरण झाले पाहिजे. पण ही निराकरणाची प्रक्रिया अशी असावी की ज्यातून माणूस माणसाच्या जवळ येईल. आज परिस्थिती अशी आहे की अमीर आणि गरीब ह्यांच्या मनोवृत्तीत काहीच फरक नाही. प्रत्येक गरिबाला अमीर बनण्याची उत्कंठा असते आणि प्रत्येक अमीर गरिबीला भितो. प्रत्येक मालक दामचोर आहे आणि प्रत्येक श्रमिक कामचोर आहे. ह्या दोघांचे स्वास्थ्य बिघडलेले आहे. दोघेही आजारी आहेत. गरिबाची गरिबी हे आजारपण आहे. तर अमिराची अमिरी हे आजारपण आहे. गरिबाला वाटते, आपण आजारी आहोत आणि अमिराला वाटते की मी मात्र आजारी नाही. एवढाच काय तो फरक. पण हे काही 'सायकॉलॉजिकल क्लासेस' किंवा मानसिक वर्ग नाहीत. पण तरीही जयप्रकाशांनी वर्गसंघर्षाचा मुद्दा काढला आणि हा संघर्ष अहिंसक सत्याग्रह असला पाहिजे असेही सांगितले. ह्याचा अर्थ इतकाच आहे की, जयप्रकाशांचे संस्कार गांधी–विनोबांच्या संस्कारांहून वेगळे आहेत. गांधी–विनोबांचे संस्कार वेदान्ती आहेत, भारतीय आहेत. जयप्रकाशांचे संस्कार भारतीय आहेतच, पण मार्क्सवादी अधिक आहेत. त्यामुळे त्यांच्या मांडणीत आणि शब्दावलीत फरक पडतो.

मला सांगायचे हे आहे की जो गरीब आहे, वंचित आहे, हरवलेला आहे त्याच्या पराक्रमाने क्रांती झाली पाहिजे. 'क्लासवॉर' किंवा वर्गसंघर्ष ह्याचा हाच अर्थ आहे. ज्या वर्गाला क्रांतीची गरज आहे त्याच 'प्रोलातारिएत' वर्गातर्फे, श्रमिक वर्गातर्फे क्रांती झाली पाहिजे. पण परिभाषेच्या बेड्यांत अडकून पडण्यात फारसा अर्थ नाही. परिभाषा विद्वानांसाठी असते. विद्वान परिभाषेत बोलतात, भाषेत बोलत नाहीत ! परिभाषा एवढ्यासाठी की लोकांवर त्यांच्या विद्वत्तेचा वचक असावा. एकदा जॉन्सनला कोणी तरी विचारले 'नेट'–जाळे कशाला म्हणतात.

टेनिसचे जाळे असते त्याची व्याख्या कोणी झाले तरी कशी करणार? पण जॉन्सनने आपला वचक बसवला. तो म्हणाला, "इट इज ए रेटिक्युलेटेड फॅब्रिक डेक्युसेटेड ॲट रेग्युलर इंटरव्हल्स !" म्हणजे जाळेच. पण ह्या व्याख्येमुळे त्याचा वचक तर निर्माण झाला !

**सहयोगात्मक क्रांती**

हवा-पाण्यानंतर येते अन्न. आपला देश आहे किसानांचा, शेतकऱ्यांचा ! शेतीचा देश आहे. पण त्याचबरोबर हा देश भुकेल्यांचाही आहे. त्यामुळे इथला मुख्य प्रश्न अन्नाचा आहे. ह्यावर उपाय आहे अन्नोत्पादनाची साधने, अवजारे आणि अन्न ह्या तीनही गोष्टींचे बाजारभाव नसावे, त्यांचे फक्त मूल्य असावे. ह्याचा प्रयोग इतिहासात पहिल्यांदा विनोबांनी केला. भूदान-ग्रामदान हा तो प्रकार. सहयोगात्मक क्रांतीचे हे पर्व जगाच्या इतिहासातले एक अद्‌भुत असे पर्व आहे. ह्या कामात जेवढे यश विनोबांना मिळायला हवे होते तेवढे मिळाले नाही, पण मला त्याचा खेदखंत नाही. अशा भव्य प्रयोगातले अपयशसुद्धा भाग्याचे लक्षण आहे. प्रयोग करण्याची हिंमत होणे हीदेखील एक मोठी गोष्ट आहे.

लोकमान्य टिळकांच्या जीवनातला एक प्रसंग आहे. त्यांच्याकडे एक माणूस येऊन त्यांना सांगू लागला की, "पोहण्याच्या तलावात मी सर्वांना पोहणे शिकवू चाहतो." लोकमान्यांनी विचारले, "तुमची योजना काय आहे?" तो म्हणाला, "मी पाण्यात कधी गटांगळ्या खाल्ल्या नाहीत !" लोकमान्य म्हणाले, "मीसुद्धा दोन-चार गटांगळ्या खाल्ल्यात, पण तुम्ही एकदेखील गटांगळी खाल्ली नाहीत म्हणजे तुम्ही मोठे जलतरणपटू असाल? तेव्हा तुम्ही जरूर लोकांना पोहणे शिकवा. पण एक सांगा, तुमच्यापाशी असा कोणता गुण आहे की ज्यामुळे तुम्ही कधीच गटांगळी खाल्ली नाही?" त्यावर तो माणूस म्हणाला, "मी कधी पाण्यातच उतरलो नाही आणि त्यामुळे एकही गटांगळी खाल्ली नाही !" ज्यांनी कधी प्रयोग करायची हिंमतच केली नाही, त्यांना अपयश कधीच येत नाही. परीक्षेलाच जो बसला नाही तो अनुत्तीर्ण कसा होणार?

**श्रम आणि उपभोग**

मी 'ट्रस्टीशिप'बद्दल सांगत होतो. 'ट्रस्टीशिप'मध्ये भावना दानाची नाही, सहकार्याची आहे. संविभागाची आहे. वाटून घेण्याची आहे. स्वामित्व आणि संपत्ती विसर्जित करण्याची आहे. कोट्यवधी रुपये जमा करा आणि दान करीत जा, ही 'ट्रस्टीशिप' नाही, ती एक सौदेबाजी आहे. 'ट्रस्टीशिप' वर्गनिराकरणासाठी

आहे, वर्गसमन्वयासाठी नाही. वर्गसमन्वय अयोग्यही आहे आणि अशक्यही आहे. विनोबांचे भूदान-ग्रामदान जमीन बाजारातून उठवण्यासाठी नव्हते. भूमीला भाव नसावा ही त्यापाठीमागची कल्पना आहे. अवजारांनाही भाव नसावा. अन्नालाही भाव नसावा. जमिनीवर कोणाची मालकी नसावी. जो मेहनत करतो त्याच्या मेहनतीलाही मोबदला नसावा. शेवटी समाजवाद, साम्यवाद म्हणजे दुसरे काय आहे? काम आणि दाम यांचा संबंध साधणेच त्यात अभिप्रेत आहे. शक्तीप्रमाणे काम आणि गरजेप्रमाणे दाम म्हणजे समाजवाद.

भांडवलशाही म्हणजे तरी काय? बदला जितका मोठा असेल, संपत्ती तितकी मोठी असेल. मेहनत ही संपत्ती आहे असे भांडवलशाही मानते. भांडवलशाहीचा दोष असा की ज्याची मेहनत त्याची संपत्ती नाही. भांडवलशाहीत मेहनत कामगाराची आणि दौलत माणसाची असते. भांडवलशाहीची सुरुवात होते सौदेबाजीने, तिची वाढ होते सट्टेबाजीने आणि भांडवलशाही पराकोटीला पोहोचते जुगाराने ! सौदा, सट्टा आणि जुगार म्हणजे भांडवलशाही. संग्रह, भीक आणि चोरी ह्या दोषांचे जनकत्व भांडवलशाहीकडे जाते.

संग्रह, भीक आणि चोरी हे दोष घालवण्यासाठी समाजवाद पुढे आला. समाजवादाचे पहिले पाऊल होते, ज्याची मेहनत त्याची दौलत ! मार्क्सने लिहून ठेवले आहे, ''श्रमिकाचे जीवन समृद्ध करण्याचे साधन परिश्रम हे असेल.'' मार्क्सचे दुसरे सूत्र, दुसरे पाऊल होते, ''मेहनत प्रत्येकाची आणि दौलत सर्वांची.'' ह्यालाच सामुदायिक संपत्ती असे म्हणतात. ह्यातून दोन गोष्टी घडून आल्या. एक म्हणजे कल्याणकारी राज्य आणि दुसरे राज्य-स्वामित्व. व्यक्तीची सावकारी बंद झाली आणि समाजाची सावकारी आणि दुकानदारी सुरू झाली. ह्याच्यापुढे जायला हवे. सामुदायिक संग्रहाचा लोभही सोडला पाहिजे. तेव्हा आता आपले पुढचे पाऊल असे असेल, ''मेहनत माणसाची, दौलत देवाची.'' त्यामुळे श्रमाला पावित्र्याचे ओज येईल.

### धर्म म्हणजे अध्यात्म नव्हे

माणसाची किंमत नसावी, मूल्य असावे, पण आज माणसाच्या कपाळावरही किंमतीची चिट्ठी लावलेली दिसते. माणसाची माणुसकी ही आज विक्रीची गोष्ट झाली आहे. आता माणसाने माणसाकडे गेले पाहिजे. 'एलिनेशन'— अलगपणाकडून रिलेशनशिपकडे—नातेसंबंधाकडे आपण गेले पाहिजे. आज ही अलगता कशामुळे आहे? त्याचे पहिले कारण धर्म हे आहे. ही गोष्ट वरवर पाहता भयंकर वाटली तरी ती खरी आहे. धर्म म्हणजे अध्यात्म नव्हे. 'रिलिजन इज नॉट

स्पिरिच्युॲलिझम, रिलिजन इज नॉट गॉडलीनेस, रिलिजन इज नॉट मोरॅलिटी.' अध्यात्म, ईश्वर आणि नीती वगळल्यावर जे उरते त्याला धर्म म्हणतात.

एक माणूस खोटे बोलतो. दुसराही खोटे बोलतो. तरीही त्यातला एकजण हिंदू आहे आणि दुसरा मुसलमान. ते खरे बोलत असले तरीही त्यातला एक जण हिंदू आणि दुसरा मुसलमान असणार. ते दोघे ईश्वराची भक्ती करीत असले तरीही त्यातला एक हिंदू आणि दुसरा मुसलमानच राहणार. खरे बोलणे, खोटे बोलणे, ईश्वर मानणे ह्या गोष्टी दोघांच्याही बाबतीत असल्यामुळे त्यांचा परस्परांना छेद बसतो. गणिताच्या समीकरणात दोन्ही बाजूंना जे समान घटक असतात ते रद्द होतात. मग जे शिल्लक राहते तो धर्म म्हणायचा. मग राहते एकाचे जानवे आणि शेंडी तर दुसऱ्याचा खलना आणि दाढी. ह्याला म्हणायचे संघटित धर्म. संघटित धर्म म्हणजे अधर्म. 'ऑर्गनाइज्ड रिलिजन इज इर्रिलिजन.' संघटित धर्माचा समाज बनतो. एखादा मुसलमान बनतो म्हणजे काय होते, तो हिंदू समाज सोडून मुस्लिम समाजात जातो. मुसलमान खिश्चन होतो म्हणजे काय होते तर तो एक समाज सोडून दुसऱ्या समाजात जातो.

विनोबा गीता वाचतात, कुराण वाचतात, बायबल वाचतात. त्या सर्व धर्मग्रंथांना ते समान मानतात. अवेस्ता ते वाचतात, जपुजीही वाचतात. माणूस गीता वाचून हिंदू, कुराण वाचून मुसलमान, बायबल वाचून खिस्ती बनतो. अशा रितीने समाज बनतात. एकदा कोणीसे विनोबांना विचारले, तुम्ही कोकणस्थ की देशस्थ? विनोबांनी त्याला मोठे गमतीदार उत्तर दिले, "मी देहात राहतो म्हणून कायस्थ आहे, देशात राहतो म्हणून देशस्थ आहे आणि शेवटी स्वतःत राहतो म्हणून स्वस्थ आहे! म्हणजे मी सबकुछ आहे." पण असा प्रश्नच आपण का विचारतो? मी हिंदू आहे म्हणून मुसलमान नाही असे थोडेच आहे? मी हिंदुस्थानात राहतो म्हणजे तुर्कस्थान माझा नाही असे थोडेच आहे?

### संघटित धर्म म्हणजे संप्रदायच

धर्म संघटित होतो तेव्हा त्याचा समाज बनतो आणि मग धर्माच्या नावाने युद्धे होतात. धर्माच्या नावाने जेवढा रक्तपात आजवर झाला तितका स्त्रिया किंवा जमीन ह्यांच्यासाठीसुद्धा झालेला नाही. राजसिंहासनासाठीदेखील एवढे रक्त सांडले नसेल. ही सैतानाची व्यवस्था आहे. संघटित धर्म देवाचा नाही, सैतानाचा आहे. ही अपवित्र व्यवस्था आहे. आज ज्यांना आपण धर्म म्हणून ओळखतो ते सगळे एकजात संप्रदाय आहेत. 'डिनॉमिनेशनल' म्हणजे सांप्रदायिक. उपासना ही गोष्ट वेगळी आहे. विष्णूची पूजा करा की शिवाची पूजा करा. पण त्याला संघटित रूप

कशाला द्यायचे? संप्रदायात संख्येला महत्त्व असते. मनुष्य आणि ईश्वर गौण आहेत. एक ह्याचा ईश्वर, दुसरा त्याचा ईश्वर. एक असेपर्यंत ईश्वर, अनेक झाले की ते सारे सैतान होतात. गोल्डस्मिथ एकदा विनोदाने म्हणाला होता, "मी माझे जोडे जसे चांभाराकडून घेतो तसा माझा धर्म मी पुरोहिताकडून घेतो !"

**सांप्रदायिकता पाकिस्तानची जनक**

संघटित समाज हा बंद समाज–'क्लोज्‌ड सोसायटी' असतो. मी कोणा विशिष्ट गटाच्या माथी दोष मारू इच्छित नाही, पण मला हे सांगितलेच पाहिजे की, ह्या देशातील संप्रदायवादाला इथला मुसलमान कारणीभूत आहे. अपवाद आपण सोडून देऊ, पण इथल्या बहुसंख्य मुसलमानांनी इथल्या संप्रदायवादाला खतपाणी घातले आहे. त्यांनी असे मानले की इस्लामियत हीच कौमियत आहे. ज्यांनी ह्या बहुसंख्यकांच्या धाकापुढे मान तुकवली नाही ते काफीर गणले गेले. मुसलमान असूनही त्यांना काफीरची उपाधी चिकटवण्यात आली. गांधींनाही काफीर ठरवले गेले. एका ख्यातनाम मुस्लिम नेत्याने उद्‌गार काढले होते की, "माणूस ह्या दृष्टीने गांधीजी फार थोर आहेत, पण धर्माच्या दृष्टीने गांधी कोणत्याही सामान्य मुसलमानापेक्षाही छोटे आहेत !" मी इस्लामला मानतो म्हणून माझे राष्ट्र वेगळे. त्यातूनच पाकिस्तान जन्माला आले. ही धर्माश्रित राष्ट्रीयता आहे. 'व्हेन यू मेक युवर डिनॉमिनेशन ऑर कम्युनिटी द बेसिस ऑफ युवर सिटिझनशिप यू आर कम्युनल'–धर्मश्रद्धा किंवा समाज हाच नागरिकत्वाचा पाया जे समजतात ते जातीयवादी होत. संप्रदायवादाची ही व्याख्या आहे आणि ह्या जमातवादाचा आरंभ ह्या देशात मुसलमानांनी केला, ही वस्तुस्थिती आहे. डोके शाबूत असणारे मुसलमान आणि डोके शाबूत असणारे हिंदू, हे त्यांनाच ह्या संप्रदायवादाबाबत जबाबदार धरतील.

**संप्रदायवाद**

संप्रदायवादाला तोड म्हणून प्रतिसंप्रदायवाद जन्माला येतो. 'कम्युनॅलिझम अँड काउंटर कम्युनॅलिझम्.' हा प्रतिसंप्रदायवाद 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' असे प्रतिपादन करतो. एक अल्पसंख्याकांचा जातिवाद, दुसरा बहुसंख्याकांचा जातिवाद. बहुसंख्याकांचा जातिवाद राष्ट्रीयता म्हणून तोरा मिरवू शकतो. त्यामुळे अनेकांची फसवणूक करू शकतो. मुसलमान सांगत असतो की इस्लाम हा भारतीयतेपेक्षा व्यापक आहे. भारतीय नागरिकत्वापेक्षा मुसलमान होणे हे मोठे आहे. इस्लाम हा तुर्कस्तान, अरब देश, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश

अशा कितीतरी देशांत आहे आणि त्या दृष्टीने विचार करता इस्लामियत भारतीयतेपेक्षा व्यापक आहे ही गोष्ट मान्यच केली पाहिजे. पण ती भारतीयता नव्हे. ती 'नॅशनॅलिटी' नाही. इस्लामियत ही कौमियत नाही. अरबस्तानची राष्ट्रीयता, तुर्कस्तानची राष्ट्रीयता ह्यांच्याहून इस्लामियत व्यापक आहे, पण ती बरोबरीची मात्र नाही. त्याचप्रमाणे हिंदुत्वही व्यापक आहे. मॉरिशसचे रामगुलाम हिंदू आहेत. नेपाळातही हिंदू आहेत. अमेरिकेतही हिंदू असतील. पण भारतीयता आणि हिंदुत्व एक असूच शकत नाही. इथेच मतभेद आहेत. मानवता ही ह्या सर्वांत व्यापक आहे आणि माणसाला माणसाशी माणसासारखे वागता आले पाहिजे. धर्म जेव्हा ते करू देत नाही तेव्हा त्याला संप्रदायाचे रूप येते.

एका अर्थाने राष्ट्रीयता अधिक व्यापक आहे. त्यामुळे भारतात राहणारा भिन्न धर्मीय, परदेशात राहणाऱ्या स्वधर्मीयापेक्षा मला जास्त जवळचा वाटतो. त्याच्याबद्दल मला अधिक आपलेपणा—'किनशिप'—वाटते. परदेशांतल्या हिंदूंपेक्षा इथल्या मुसलमान–ख्रिश्चनाबद्दल मला अधिक जवळीक वाटते. याला भारतीयता म्हणतात. इस्लामियत किंवा हिंदुत्व राष्ट्रीयतेहून निश्चितच व्यापक आहे. कम्युनिझमदेखील असाच आहे. त्यालाच कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया असे म्हणतात. प्रथम इंडियन कम्युनिस्ट पार्टी असे नामकरण करण्याचा विचार होता, पण असे नाव ठेवू शकत नव्हते, कारण इंडियन कम्युनिझम अशी काही गोष्टच नाही. पण भारतीय नागरिकता ही एक अशी व्यापक कल्पना आहे की जिच्यात सर्वांचा अंतर्भाव होतो. ह्या देशात जितके धर्म आहेत, संप्रदाय आहेत ते सर्व भारतीयतेत सामावून जातात. कवी इक्बाल असेच म्हणाले आहेत; 'हिंदी हैं हमवतन है, हिंदोस्तां हमारा'. पूर्वी सर्वांसाठी हिंदू हा शब्द प्रचलित होता. इथला मुसलमान अमेरिकेत गेला की त्यालाही हिंदू संबोधीत. त्या काळी हिंदू शब्द इंडियन किंवा भारतीय ह्या अर्थाने वापरला जात होता. पण आता प्रश्न असा आहे की जो मुसलमान नाही, ख्रिश्चन नाही, यहुदी नाही, पारशी–शीख नाही, बौद्ध वा जैन नाही त्याला काय म्हणायचे?

**संप्रदायाची लक्षणे**

मुस्लिम, ख्रिस्ती, यहुदी....हे सगळे संप्रदाय आहेत. संप्रदाय म्हणजे ज्यात प्रवेश करता येतो. मुसलमान, ख्रिस्ती, जैन, बुद्ध, शीख आपण बनू शकतो, पण हिंदू बनता येत नाही ! संप्रदायाची दुसरी ओळख अशी की त्यात व्यक्तीही असते आणि समाजही असतो. शीख व्यक्तीही आहे, समाजही आहे. पण हिंदू केवळ व्यक्ती आहे, हिंदू समाज ही केवळ एक कल्पना आहे, ती वास्तवता नव्हे. जो

समाज जातिबद्ध आहे त्याच्यात सांप्रदायिकता नसणार. हिंदू समाज जातिबद्ध, संकुचित आणि संकीर्ण समाज आहे. असा समाज अन्य समाजविन्मुख असतो. संप्रदायात दरवाजा खुला असतो. संप्रदाय नेहमी आक्रमणशील असतो. तो इतरांना निमंत्रण देत असतो. आणण्याचा प्रयत्नही करीत असतो. पण हिंदू समाज हा चुस्त संप्रदाय बनूच शकत नाही.

**हिंदू कोणाला म्हणावे?**

१९०८ साली मोर्ले-मिंटो सुधारणा आल्या. मुसलमानांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. त्या वेळी दोन भाग पडले. मुस्लिमांचा एक भाग आणि बिगर मुस्लिमांचा दुसरा भाग. त्या वेळी हिंदूंचाही स्वतंत्र मतदार संघ करण्याची मागणी झाली. तेव्हा हिंदू कोण? असा प्रश्न निर्माण झाला. आदिवासींनीदेखील स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. मग सर्व हिंदूंना लागू होईल असे लक्षण शोधणे भाग होते. १९१० मध्ये हिंदू सभेची स्थापना झाली. मग हिंदूंची व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला. अनेक प्रकांडपंडितांनी प्रयत्न केला, पण त्यांना व्याख्या करता आली नाही ! न्यायमूर्ती गुरुदास बानर्जी म्हणाले, ''हिंदुत्वाची अशी व्याख्याच करता येत नाही की जी कायदेशीर ('लीगल'ही) असेल आणि तर्कशुद्धही असेल''. न्यायमूर्ती चिंतामण विनायक वैद्य म्हणाले, ''जो स्वतःला हिंदू म्हणवून घेतो तो हिंदू.'' तेव्हा हरिजनांनी, आदिवासींनी व बौद्धांनी सांगितले की, ''आम्ही हिंदू नाही.'' त्यामुळे नंतर सावरकरांची व्याख्या पुढे आली, ''ज्याची भारतवर्ष ही पुण्यभू आणि पितृभू आहे तो हिंदू.'' ह्या व्याख्येतही एक दोष राहिला. हिंदुत्वाची ती व्याख्या होऊ शकत असली तरी ती राष्ट्रीयत्वाची व्याख्या होऊ शकत नाही. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व ही एक प्रतिक्रिया होती. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व होऊ शकत नाही. कारण ख्रिस्ती माणसाची ही पुण्यभू नाही. इथल्या इतर धर्मीयांचीही ही पुण्यभू होऊ शकत नाही. ह्या उलट नेपाळच्या हिंदूंची ही पुण्यभू आहे, पितृभू नाही. त्यामुळे हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व होऊ शकत नाही. हिंदुत्व हे सांप्रदायिक नाही, कारण त्यांच्या तत्त्वज्ञानात व्यापकता आहे आणि विचारात स्वातंत्र्य आहे. पण त्याचबरोबर तत्त्वज्ञानात अद्वैत आणि व्यवहारात विषमता आहे !

**जातीयतेचे निराकरण**

एकदा गाडीतून प्रवास करताना एकाने मला विचारले, ''आपले नाव काय?'' मी म्हणालो, ''दादा धर्माधिकारी.'' पण एवढ्याने प्रश्न संपत नाही ! एखाद्या

मुसलमानाला विचारले, ''तुझे नाव काय?'' तो म्हणाला, ''सैयद महमूद.'' प्रश्न संपले ! पण दादा धर्माधिकारी म्हटल्यावर संपत नाही. तो पुढे विचारतो, ''तुम्ही कुठले? कोणत्या गल्लीत राहता?'' आणि माझ्याकडून जात वदवून घेईपर्यंत प्रश्नांची ही मालिका थांबत नाही. कारण हिंदू म्हटल्याने पुरेसा बोध होत नाही. कोणी ब्राह्मण आहे, कोणी तेली आहे, कोणी माळी आहे, तर कोणी भंगी आहे. एक मुलगा स्टेशनरीच्या दुकानात जाऊन पन्नास पैशांची स्टेशनरी मागू लागला. दुकानदार म्हणाला, ''स्टेशनरी म्हणजे तुला काय हवे? रबर हवे, पेन्सिल हवी की शाई? स्टेशनरी नावाची कोणतीही वस्तू इथे मिळत नाही.'' त्याचप्रमाणे हिंदू नावाची कोणतीच वस्तू नाही. इथे जाती आहेत ! हिंदू समाजात जात ही वास्तवता आहे आणि वर्ण, धर्म या केवळ कल्पना आहेत.

**तीन लक्षणे**

जातीची तीन लक्षणे आहेत : पहिले लक्षण जातीत कोणी येऊ शकत नाही. कोणी ब्राह्मण तेली बनल्याचे, मराठा माळी बनल्याचे कधी ऐकले आहे काय? मुसलमान, ख्रिश्चन बनता येते, पण अमक्या जातीतल्याला तमक्या जातीचे बनता येत नाही. जातीत प्रवेश करण्याला एकच प्रवेशद्वार आहे आणि ते आईच्या कुशीचे !

जातीचे दुसरे लक्षण आहे : माणसापासून जो जितका दूर असेल तितका तो पवित्र समजला जातो. जो दुसऱ्या जातीत विवाह करीत नाही तो एक पवित्र. जो दुसऱ्या कोणाबरोबर बसून जेवत नाही तो आणखीनच पवित्र आणि त्यापेक्षाही पवित्र तो की जो दुसऱ्याबरोबर उठत-बसत नाही, दुसऱ्याला शिवत नाही. जो दुसऱ्याकडे ढुंकूनही पाहत नाही तो तर स्वर्गातच जाऊन पोहचतो ! माणसाबद्दल तो जितका दुरावा दाखवतो तितका तो पवित्र. जिथे दुरावा हीच पावित्र्याची कसोटी आहे त्या समाजात मानवतेचा विकास कसा होणार? त्यामुळेच ह्या देशात सर्वांत मोठी कोणती उणीव असेल तर ती मानवतेच्या मूल्याची आहे. इथे जन्मावर, संप्रदायावर माणसाची किंमत केली जाते, माणूस म्हणून माणसाला काही किंमत दिली जात नाही.

जातीयतेचे तिसरे लक्षण असे की येथे प्रवेशद्वार नाही, पण बाहेर जाण्यासाठी मात्र दरवाजा सताड उघडा आहे. ज्याला जातीत सुखाने, प्रतिष्ठेने राहणे शक्य नाही त्यांना हिंदू समाज सोडण्यावाचून काही गत्यंतरच राहत नाही. डॉ. आंबेडकरांनी खूप प्रयत्न करून पाहिले, पण शेवटी त्यांना हिंदू धर्माचा त्याग करावा लागला. दुसरे काय करणार? ज्या घरात सन्मानाने राहता येत नाही ते घर

सोडणे ह्याच मग सन्मानाचा मार्ग असतो. ज्या जातीला प्रतिष्ठा नाही त्या जातीच्या लोकांनी करावे तरी काय? परिणाम असा झाला की हिंदू समाजात फक्त निर्यातच मोठ्या प्रमाणावर चालू राहिली, आयात फारशी कधी झालीच नाही. या देशातील मुसलमान, ख्रिस्ती, शीख सांप्रदायिकतेचे जनकत्व हिंदूंच्या जातिव्यवस्थेकडे जाते. जातिसंस्था जोवर कायम राहील तोवर सांप्रदायिकतेचा शेवट होणार नाही. जातिसंस्था ही हिंदू समाजाची कमजोरी आहे. जोवर ही कमजोरी राहील तोवर नखशिखान्त शस्त्रास्त्रे धारण केली तरी हिंदू समाजात सामर्थ्य येणार नाही.

**आपली खेडी म्हणजे जातिस्थाने**

आमची गावे अद्यापि समाज बनू शकलेली नाहीत. तिकडे पाकिस्तान आहे तर इकडे गावोगावी जातिस्थान आहे ! एकेका मोहल्ल्याची एकेक जात आणि गावाबाहेर राहणारे अस्पृश्य. आजच्या गावचे हे चित्र आहे. हे चित्र बदलले पाहिजे. ह्याचे प्रतीक जानवे आहे असे जयप्रकाश सांगत आहेत आणि म्हणूनच 'जानवे तोडा, माणसे जोडा' असा नवा घोष धुमवला जात आहे. जानवे हे जातिप्रथेचे एक बाह्य प्रतीक आहे. ब्राह्मणाच्या मुलाने जोड्याचे दुकान काढले तरी तो चांभार बनत नाही आणि चांभाराचा मुलगा प्राध्यापक झाला तरी ब्राह्मण बनू शकत नाही ! डॉ. आंबेडकर केवढे प्रकांड विद्वान होते, पण कोण्या ब्राह्मणाने त्यांच्याशी सोयरसंबंध जोडला काय? हे सगळे समजून घ्यायला हवे. शाकाहार-मांसाहार हा प्रश्न अगदी वेगळा आहे. त्याचा जाती आणि जन्म यांच्याशी कोणताही संबंध नाही. शाकाहार-मांसाहाराच्या प्रश्नाचा वैज्ञानिक, सांस्कृतिक दृष्टीने विचार केला जाऊ शकतो. तसा तो करायलाही हवा. बर्नार्ड शॉला कोणीतरी विचारले, "तुम्ही मांसाशन का करीत नाही?" तेव्हा तो म्हणाला, "आय डू नॉट वॉंट टु इट कॅरकसेस—मी मुडदे खाऊ इच्छित नाही !" मुसलमान आणि ख्रिस्ती ह्यांना मांस खाणे सक्तीचे थोडेच आहे? हा एक अगदी वेगळ्या भूमिकेचा प्रश्न आहे.

तेव्हा प्रथम संप्रदाय निराकरण, जातिनिराकरण झाले पाहिजे. संप्रदाय निराकरणासाठी धर्मांतरावर बंदी आली पाहिजे. सर्व धर्म समान असतील तर दुसऱ्या धर्मात जाण्याची आवश्यकताच काय? उपासना आपण कोणत्याही पद्धतीची करू शकतो. धर्मांतर बंद झाले पाहिजे. जातिनिराकरण करायचे असेल तर सजातीय विवाह बंद झाले पाहिजेत. जातिनिराकरणासाठी संमिश्र विवाह आवश्यक आहेत. एलिनेशनचे—दुराव्याचे हे जे प्रकार आहेत ते माणसामाणसांत विच्छेद निर्माण करतात. ह्यापुढे 'अपार्थेड' म्हणजे वर्णभेद आहे. काळे आणि गोरे.

आफ्रिकेतल्या काळ्या लोकांना वेगळ्या वस्तीत ठेवा. त्यापुढे स्पृश्यास्पृश्य हे जातीयतेचे पराकोटीचे रूप. ह्यातून उदयाला येतो 'झेनोफोबिया'. हे सर्व जोवर आहे तोवर माणूस माणसाला भेटू शकणार नाही.

### दलालांची गरज नाही

समाजात तीन प्रकारचे दलाल आहेत आणि त्यांचा निर्देश ह्या ठिकाणी केला पाहिजे. एका दलालाचे नाव आहे पुरोहित. भगवान आणि भक्त ह्यांना जवळ येऊ न देणे हे त्याचे काम. दुसरा आपल्या सर्वांना माहीत असणारा व्यापारातला दलाल. त्याचे काम उत्पादक आणि ग्राहक यांना जवळ येऊ न देणे. तिसरा दलाल म्हणजे राजकीय नेता. त्याचे काम एका नागरिकाला दुसऱ्या नागरिकाच्या जवळ येऊ न देणे. समाजातून हे तीनही प्रकारचे दलाल हटवले पाहिजेत. त्यावाचून क्रांती होणार नाही.

### भाषावाद

ह्याशिवाय आणखी एक प्रश्न आपल्या देशात आहे आणि त्याचा सखोल विचार आपल्याला केला पाहिजे. ह्या देशात भाषेचा प्रश्न फार गुंतागुंतीचा झाला आहे. दुसऱ्या देशातल्यासारखा इथला भाषेचा प्रश्न नाही. इतर ठिकाणी क्षेत्रनिष्ठ भाषा आहेत म्हणजे एका देशाची एक भाषा असा प्रकार आहे. आपल्याकडे तशी स्थिती नाही. आपल्याकडे भाषेचा आणि लिपीचा संबंध संप्रदायाशीदेखील आहे. आपण उर्दूचेच उदाहरण घेऊ. उर्दू ही मुसलमानांची भाषा असण्याचे काहीही कारण नाही. अरबी, फारसी शब्द मुसलमानांबरोबर आले असतील, लिपी त्यांच्याबरोबर आली असेल, पण त्यामुळे उर्दूला मुसलमानांची भाषा म्हणणे चूक आहे. मलबारमधला मुसलमान काही उर्दू बोलत नाही. तामीळनाडूच्या मुसलमानाला उर्दू येत नाही. इराण, तुर्कस्थान, अफगाणिस्तानच्या मुसलमानाला उर्दू येत नाही. पण राजकारणी मंडळींत 'महाराष्ट्रात उर्दू शाळा नकोत' म्हणण्याची हिंमत नाही. भाषेत राजकारण घुसू देता कामा नये. उद्या एखादा मराठी भाषिक माणूस मुसलमान झाला तर त्याची भाषा काय उर्दू होईल? पाकिस्तानचे जनक असलेल्या जिनांना अखेरपर्यंत काही धड उर्दू येत नव्हती ! भाषेचे लग्न आम्ही संप्रदायाबरोबर लावून दिले आहे. परिणाम असा झाला आहे की एकेका भाषेची ही दोन दोन राज्ये अस्तित्वात आली आहेत. दोन बंगाल, दोन पंजाब ! त्यानंतरही उरलेल्या पंजाबचे भाषेच्या नावाखाली दोन तुकडे झाले. पंजाब आणि हरयाणा.

## लिपी आणि भाषा

आपल्या देशात तर गंमत ही आहे की लिपीलाही भाषा समजण्यात येते. 'सरदार गृह' हा शब्द रोमन लिपीत लिहिला की इंग्रजी झाला आणि 'ग्रँड हॉटेल' देवनागरीत लिहिले की मराठी झाले ! हे कसे काय होते ते मला काही समजत नाही. एके काळी उत्तरेत रोमन अक्षरे पुसून टाकण्याची मोहीम झाली. दादा धर्माधिकारी रोमनमध्ये लिहिले रे लिहिले की इंग्रजी झाले. चला पुसून टाका ! ह्या चळवळीत पुढाकार कोणाचा होता? कॉलेज विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा ! सगळी शिकली सवरलेली मंडळी. त्यांच्या मेंदूची दया येते. त्यांच्या डोक्यात एक साधी गोष्ट आली नाही की नागालँड आणि मेघालय अशा राज्यांची लिपी रोमन आहे. आपापल्या भाषा ते रोमनमध्ये लिहितात. उर्दू जर ह्या देशाची लिपी असू शकते तर रोमन लिपी तशी का होऊ शकत नाही? भाषा वेगळी आणि लिपी वेगळी. विनोबांनी एक गोष्ट चालवली. अलग अलग भाषा आणि बोली असतील तर असू द्या, पण एक लिपी तर करा. 'सत्यमेव जयते' तरी सर्वांना वाचता येवो. मी चंदीगढहून भाकरा-नांगलला गेलो तर मैलाचे दगडही मला वाचता आले नाहीत आणि नावाचे फलकसुद्धा समजू शकले नाहीत. माझे नाव लिहिलेलेही मला वाचता आले नसते. तिथे गेल्यावर मी एक महानिरक्षर ठरलो !

## भाषिक राज्ये

ह्या देशात दोन दुर्घटना झाल्या. पहिली दुर्घटना पाकिस्तान आणि दुसरी भाषिक राज्ये. महाराष्ट्रात फक्त मराठी बोलणारे राहतील, तामीळनाडूत फक्त तामीळ भाषा बोलणारे राहतील. आसाममध्ये फक्त असामिया बोलणारे. पूर्व प्राथमिकपासून पदव्युत्तरपर्यंतचे सर्व शिक्षण प्रादेशिक भाषेतून घेणारे भिन्न प्रदेशातले सज्जन कर्म-धर्मसंयोगाने प्रवासात एकत्र आले तर हावभावाशिवाय दुसऱ्या मार्गाने समनुयोग साधण्याची शक्यता नाही. ह्या सर्व चळवळी, आपण एकमेकांच्या सोबत राहू शकू नये, ह्यासाठी जणू चालतात. न बोललेले हे उद्दिष्ट त्याच्या मुळाशी असते.

भाषेचा संबंध बोलणाऱ्या संख्येशी खरे म्हणजे असू नये. तो भाषेच्या व्यापकतेशी असावा. व्यापक भाषा ती की जी भिन्न भाषी आपसांत वापरतात. भाषांतर न करता ज्या भाषेत लोक परस्परांशी बोलतात ती व्यापक भाषा. एक गोष्ट मी आपल्यापुढे मांडणार आहे. पण ती समजून घेणे आपल्याला बिकट जाईल. पण अभ्यास करीत असतो त्यामुळे सांगतो. मी सांगत आलो आहे की माणसाची मातृभाषा अशी कोणतीच नसते. शिकल्यावाचून माणसाला कोणतीही

भाषा येत नाही. फक्त पशूलाच जन्मतः भाषा येते. तो रेकू लागतो. हंबरतो. भुंकतो. हे पशूच करू शकतो. माणसाला 'आई'सुद्धा म्हणायला शिकावे लागते. 'मम्मी' म्हणायलाही शिकावे लागते. महादेव देसाईंचा मुलगा नारायण. नारायणची सासू बंगाली आणि सासरे उडिया भाषा बोलणारे आहेत. त्या दोघांची मुलगी ती नारायणची बायको. आता नारायणच्या मुलांची मातृभाषा कोणती? नारायणच्या एका मुलीने एका मराठी मुलाशी लग्न केले आहे. तर काय, मातृभाषासुद्धा माणसाला शिकावीच लागते, इतर भाषाही तो शिकू शकतो. माणसांच्या भाषेचे हे वैशिष्ट्य आहे की तिचे भाषांतर होऊ शकते. पशूंच्या भाषांचे भाषांतर होत नाही. हंबरण्याचे भुंकण्यात भाषांतर होऊ शकत नाही. माणूस अनेक भाषा शिकू शकतो. जितक्या जास्त भाषा एखाद्याला येतात तितका तो मोठा समजला जातो. विनोबांना वीस भाषा येतात. ते महान भाषापंडित आहेत. काही पुस्तकांचे अनेक भाषांत अनुवाद होतात आणि तो त्या त्या लेखकाचा गौरव समजला जातो. भाषा ही परिस्थितीतून आकाराला येत असते. म्हणून आपण भाषेचा आग्रह सोडलेला बरा. एका भाषेचा आग्रह धरला की त्याची प्रतिक्रिया इतर भाषिकांत होते. 'यू मेक युवर ऑपोनंट लँग्वेजकॉन्शस'. परंतु हिंदी ह्या देशाची एक व्यापक भाषा आहे. अशी भाषा की जी पुष्कळसे लोक समजू शकतात. ती राष्ट्रभाषा होऊ शकेल.

**राष्ट्रभाषेच्या कसोट्या**

भाषेबाबत तीन गोष्टींचा विचार करावा. पहिली गोष्ट म्हणजे ती इथली, ह्या देशातली असावी. दुसरी ती स्वाभाविक असावी, स्पाँटेनियस असावी. वेगवेगळ्या भाषा बोलणारे सर्वसामान्य नागरिक एकत्र आल्यानंतर आपसांत ज्या भाषेत बोलण्याची धडपड करतात ती भाषा. तिसरी गोष्ट म्हणजे ती कोणाचीतरी प्रत्यक्षात भाषा असावी, कल्पनेतली भाषा नसावी. ह्या तीन कसोट्यांना हिंदी उतरते. पण ह्यासाठी कोणाचा आग्रह नसावा. सुरुवातीला काही काळ देशातल्या भिन्न भाषिकांची इंग्रजी ही सामान्य भाषा बनली. जुन्या काळात जशी संस्कृत ही पंडितांची परस्पर विनिमयाची भाषा होती तशी बाबूंची इंग्रजी बनली. त्यामुळे इंग्रजीची भूमिका हिंदीच्या भूमिकेपेक्षा अधिक व्यापक बनली. भाषा आपली–परकी नसते. आपला पोषाख, आपला चेहरा आणि आपली भाषा आपल्यासाठी नसतातच. मनुष्य आपला चेहरा आरशात पाहतो. कशासाठी पाहतो? दुसऱ्यांना आपण कसे दिसू ते त्याला जाणून घ्यायचे असते त्यासाठी. भाषादेखील दुसऱ्यासाठी असते. आपल्या खानेसुमारीत असे आढळले आहे म्हणे की अशी

एक भाषा नोंदवण्यात आली आहे की जी फक्त एकाच माणसाची भाषा आहे! केवढे आश्चर्य! तो कसे बोलत असेल? स्वतःशीच बोलत असेल तर वेडाच समजला जाईल. संकीर्णतेत भाषेचा अभिमान नाही, असंस्कृतपणा आहे. भाषेहून माणूस मोठा आहे. मला दुसऱ्याशी बोलायचे आहे. गीतारहस्याचा अनेक भाषांत अनुवाद झाला तेव्हा मला मोठा अभिमान वाटला! खरे तर माझी तक्रार अशी असायला हवी होती की लोकमान्यांनी अभिमानाने हा ग्रंथ मराठीत लिहिला आणि हे लोक त्याचा अनुवाद काय करतात? कसले लोक आहेत! लोकमान्यांचा अपमान करतात म्हणजे काय? पण असे काही कोणी म्हणाल्याचे ऐकिवात नाही. भांडायचे झाले तरी भाषा एक हवी. नाही तर भांडता कसे येईल? काय गंमत आहे पाहा, आलिंगनाशिवाय कुस्तीसुद्धा करता येत नाही इथे. एका इंग्रज लेखकाने 'रियल इंडिया' नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. तो १९३१ पर्यंत ह्या देशात राहिला. तो उत्तर प्रदेशातल्या कुठल्या तरी गावात गेला असेल. तिथे एक अडाणी शेतकरी त्याला पाहून म्हणाला, "हा सासरा कुठून टपकला कोणाला ठाऊक!" तर तो इंग्रज़ मनुष्य शेजाऱ्याकडे चौकशी करू लागला की तो मनुष्य काय म्हणाला? शेजाऱ्याने सांगितले, "तो तुम्हाला आपल्या बायकोचा बाप म्हणतो आहे!" तो इंग्रज हे ऐकून फार खूश झाला. बायकोचा बाप काय आणि स्वतःचा बाप काय! दोघांची एकच भाषा असती तर किती रागावला असता, नाराज झाला असता! तामीळनाडूच्या मुख्यमंत्र्यांशी पंतप्रधानांना बोलणे करायचे असेल आणि इंग्रजी वा हिंदी न येणारा मुख्यमंत्री असेल आणि दुभाषी बेवकूब असेल तर काय होईल, जरा कल्पना करा!

पट्टाभी सीतारामय्या ह्यांनी काँग्रेसचा इतिहास लिहिला. त्यात एक वाक्य असे लिहिले आहे : "दीज लीडर्स वेअर कॅननाइज्ड." 'कॅननाइज्ड' म्हणजे त्यांना देवतारूप बनवण्यात आले होते. त्याचा कोणी अनुवाद केला की ह्या नेत्यांना तोफेच्या तोंडी देण्यात आले! कारण त्यात कॅनन हा शब्द आहे! माझे एक स्वप्न आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे, भावनात्मक एकात्मतेचे. एक दिवस असा उगवलेला मला पाहायचा आहे की ज्या दिवशी ह्या देशातले शिकले-सवरलेले परस्परांशी भाषांतरातून बोलणार नाहीत. अशा तऱ्हेचा एक समयबद्ध क्रमवार कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. ह्या देशात दोनच ऐच्छिक माध्यमे आहेत. हिंदी आणि इंग्रजी. ज्याला पाहिजे त्याने ते माध्यम निवडावे. सक्ती कशाचीच नाही. ह्यापैकी जिची विजिगीषा अधिक असेल ती राहील. माणसांना परस्परांना भेटायचे आहे. भाषेला माणसांना तोडण्याचे साधन नका बनवू. माणसांना परस्परांशी जोडणे म्हणजे संस्कृती. माणसाला माणसापासून तोडण्याला विकृती म्हणतात. 'फंडामेंटल

युनिटी ऑफ इंडिया' नावाचे एक पुस्तक राधाकुमुद मुखर्जी ह्यांनी लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, ''ह्या देशात लोकशाही आली तर ती जातीय (कम्युनल) लोकशाही असेल, असा हा गमतीचा देश आहे.'' अशी जातीय किंवा सांप्रदायिक लोकशाही तिकडे बिहारमध्ये आहे आणि इकडे महाराष्ट्रातही आहे. ही जी भाषिक राज्ये आहेत ती जातीय राज्ये आहेत. त्या त्या प्रदेशातल्या तुलनात्मक प्रभावी जातींची ती राज्ये आहेत. सांस्कृतिक क्रांतीसाठी संप्रदायनिराकरण, जातिनिराकरण आणि भाषावाद निराकरण आवश्यक आहे.

### स्त्री-पुरुष संबंधांचे शुद्धीकरण

स्त्री-पुरुष संबंधांच्या शुद्धीकरणाचीही नितान्त आवश्यकता आहे. नागरिकत्वाच्या क्षेत्रात स्त्री-पुरुष भेदाचे निराकरण करायला हवे. इंग्लंड-अमेरिकेच्या आणि रशिया-चीनच्या घटनांत अशी प्रतिज्ञा करण्यात आली आहे की, नागरिकत्वाच्या क्षेत्रात आम्ही स्त्री-पुरुष असा भेद मानणार नाही. आपल्याही घटनेत तसेच नमूद केले आहे. पण व्यवहारात मात्र स्त्री ही केवळ गौण नागरिकच नव्हे तर गौण मानव समजली जाते. खरे तर तिला माणूसही मानले जात नाही, वस्तू समजण्यात येते.

### स्त्री ही खरेदीविक्रीची वस्तू

जुन्या काळात स्त्री एकाच भूमिकेत वावरताना बहुधा आपल्या दृष्टीस पडते. कोणाला मोहात पाडायचे असले, एखाद्या तपस्व्याला भ्रष्ट करायचे असले की बिचारी स्त्री येते. सर्वांत पराक्रमी माणसाला द्यायची वस्तू कोणती असे? तर स्त्री. राजा फार खूश झाला तर अर्धे राज्य आणि आपली मुलगी बक्षीस म्हणून तो द्यायचा. स्त्री ही खरेदी करण्याची, जिंकण्याची, अपहरण करण्याची, नजराणा म्हणून देण्याची वस्तू होती आणि त्यामुळे विक्रीचीही वस्तू होती. सामान्यतः आपण असे समजत असतो की जुन्या काळी स्त्रियांच्यासंबंधी फार उच्च आदर्श होते. इतर बाबतीत उच्च आदर्श असतीलही, पण मला विनयपूर्वक हे सांगितले पाहिजे की जुन्या काळातले स्त्रीविषयक सर्व आदर्श हे मानवतेला कलंक फासणारे व अपमान करणारे होते. त्यामुळे आजचा सहनागरिकत्व मानणारा समाज त्या आदर्शांप्रमाणे चालू शकणार नाही. कोणत्याही धर्मात स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तित्व कधीच नव्हते. माझी आई कोणताही धार्मिक विधी कधीही एकट्याने करू शकली नव्हती. माझ्या वडिलांची ती सहधर्मिणी होती. ती स्वतः मुख्य धर्मिणी कधीही नव्हती. वडील नसले की तिचा स्वतःचा असा कोणताच धर्म नसे. वडील जे पुण्य

करीत त्याचा अर्धा वाटा तिला आपोआप मिळत असे आणि तिने पाप केले तर त्याचा अर्धा भाग वडिलांच्या नावे जमा होत असे. ती जे पुण्य करी त्याचा अर्धा वाटा वडिलांना मिळत नसे आणि वडिलांच्या पापाचा अर्धा वाटा तिच्याकडे येत नसे. ही मर्यादा आहे. कारण ती 'रक्षित' होती आणि वडील 'रक्षक' होते. स्त्री पलित आहे आणि पुरुष पालक. त्यामुळे मुख्य धर्म, मुख्य कर्तव्य पुरुषाचे असते. स्त्री ही केवळ सहधर्मचारिणी आहे. ती सहजीविनी आहे, तिचे स्वतःचे जीवन नाही. जैन आणि बौद्ध ह्यांचे काही प्रयत्न सोडले तर आजपर्यंत जी परंपरा आणि समाजस्थिती आहे त्यात स्त्रीची भूमिका गौण आणि दुय्यमच राहिली आहे. समाजाने तिला कधी व्यक्ती मानलेच नाही, त्यामुळे ब्रह्मचर्य हा तिचा मुख्य धर्म कधी मानण्यातच आला नाही.

### ब्रह्मचर्याचा सामाजिक अर्थ

ब्रह्मचर्याचा सामाजिक अर्थ काय? स्त्रीचे शरीर हे पुरुषाच्या आक्रमणाचा विषय होऊ नये आणि स्त्रीला पुरुषाची भीती वाटता कामा नये. पुरुष आक्रमणशील नसावा आणि स्त्री रक्षणाकांक्षिणी नसावी. सामाजिक क्षेत्रात ह्याला ब्रह्मचर्य असे नाव आहे.

### सहजीवन आणि सहनागरिकत्व

स्त्री रक्षणाकांक्षिणी राहील तोवर ती नागरिक बनू शकणार नाही. ती फक्त कुटुंबिनी राहू शकेल. कुटुंबात ती तीन भूमिकांत वावरू शकेल. एक तर ती आई, बहीण, मुलगी असेल, नाही तर दुसऱ्या कुटुंबात ती पत्नी म्हणून दाखल होऊ शकेल. रक्तसंबंध किंवा यौनसंबंध हे दोनच पर्याय तिच्यासाठी आहेत. पण ज्या ठिकाणी रक्तसंबंधही नसेल आणि यौनसंबंधही नसेल त्या ठिकाणी स्त्री–पुरुष संबंध नागरिकत्वाचे असतील. ह्याला मी सहनागरिकत्व म्हणतो. ह्याचा विचार फक्त कम्युनिझममध्ये केलेला आहे. आज त्यांचे विचार ह्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले आहेत की स्त्रीची जी कौटुंबिक भूमिका ती नागरिकत्वाने समृद्ध झाली पाहिजे. स्त्रीच्या कौटुंबिक भूमिकेत व तिच्या नागरिकत्वाच्या भूमिकेत द्वैत असता कामा नये. सुरुवातीला त्यांनी कुटुंबसंस्थेला एवढ्यासाठी विरोध केला की कुटुंबसंस्थेत स्त्री ही दासी होती. पण आज ते असे म्हणू लागले आहेत की समाजाची प्रगती ही गोल जिन्याच्या पायऱ्यांसारखी चक्करदार आहे आणि क्रांतीनंतर कुटुंबसंस्था पूर्वीपेक्षा अधिक उन्नत अवस्थेत असेल.

स्त्री नागरिक झाली की कुटुंबव्यवस्थेतील मातृत्वाचा आशय बदलून जातो.

भगिनीत्व आणि कन्यात्व ह्यांचा आशयही बदलून जातो. स्त्रीचे नागरिकत्व जर आपल्याला यथार्थ करायचे असेल तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांतील तिची भूमिका बदलावी लागेल. आज स्त्रीसाठी नीतीचा मापदंड एक आहे आणि पुरुषासाठी दुसरा आहे.

एक स्त्री सती गेली. आपण म्हणतो किती त्याग, किती बलिदान! हा एक मोठा आदर्श आहे. पण एक पुरुष आपल्या पत्नीबरोबर चितेवर आरूढ होऊन मेला तर आपण त्याला लंपट ठरवून मोकळे होतो! मूर्ख पुरुषच बायकोसाठी अशारितीने मरतो! पुरुषनिष्ठ स्त्री 'पतिव्रता' आणि स्त्रीनिष्ठ पुरुष 'लंपट' असा हा विपरीत न्याय आहे. किती भयानक ही गोष्ट आहे!

**स्त्रियांसाठी ब्रह्मचर्य**

स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक नीतिमान असतात, असे मला सांगतात. अधिक नीतिमान याचा अर्थ अधिक संयमी, अधिक ब्रह्मचर्यनिष्ठ आहेत असा नाही. स्त्रियांना ब्रह्मचर्य निषिद्ध समजले जाते. वृद्ध कुमारिकेला 'वृषली' म्हणतात. मुलींच्या शाळेत जाऊन पुढारी व्याख्यानात सांगतात, ''तुम्ही वीरमाता बना. शिवाजीची, गांधींची माता बना.'' पण मुलांच्या कॉलेजात जाऊन ते असे कधी सांगत नाही की, ''मुलांनो, तुम्ही वीरपिता बना.'' कारण पुरुषाचे व्यक्तित्व स्वतंत्र आणि स्वायत्त आहे. स्त्रीचे जीवन तसे नाही. असा विरोध असताना लोकशाही यथार्थ कशी बनू शकेल?

मला एक जुना प्रसंग आठवतो. आशादेवी आर्यनायकम् ह्या नयी तालीमच्या क्षेत्रातल्या मोठ्या अधिकारी. त्या एकदा भाषणात म्हणाल्या की मातृत्वावाचून स्त्रीच्या जीवनाचे सार्थक नाही. प्रेमाबाई कंटक तिथे होत्या. त्या उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, ''म्हणजे माझे जीवन व्यर्थ म्हणायचे! विनोबा पिता झाले नाहीत तर त्यांचे जीवन धन्य झाले आणि मी माता बनले नाही म्हणून शिव्या-शापांची धनी झाले!'' मातृत्वाची अनिवार्यता स्त्री-जीवनातून समाप्त झाली पाहिजे. मातृत्व हा संस्कृतीचा गौरीशंकर आहे. पितृत्वदेखील गौरीशंकर आहे, परंतु पुरुषाला पितृत्व अनिवार्य नाही, स्त्रीसाठी मातृत्व अनिवार्य नाही. असे होईल तेव्हा स्त्री मनुष्य बनेल.

**स्त्रियांनी भयाचा त्याग करावा**

पुरुषाने आक्रमण न करणे आणि स्त्रीने न भिणे हा सामाजिक ब्रह्मचर्याचा अर्थ आहे. पण आज छात्र सेनेतील मुलगी छात्र सेनेतल्या मुलाला भिते! स्त्री पोलीस

पुरुष पोलिसाला भिते. स्त्री जीवनातला हा अंतिम प्रश्न आहे. तिला ह्या आघाडीवर आपल्यासाठी लढावे लागेल.

**जग माणसाचा मकबरा न बनो**

एकदा मी आगऱ्याला गेलो होतो. हरिभाऊ कामत बरोबर होते. नागपूरहून आम्ही दिल्लीला जात होतो. ड्रायव्हरने विचारले, ''इथे काय पाहण्यासारखे आहे?'' मी म्हणालो, ''चल, तुला दाखवतो.'' त्याला ताजमहाल पाहण्यासाठी मी घेऊन गेलो. त्याने बारकाईने सगळे पाहिले. मग त्याने विचारले, ''हे काय आहे?'' मी म्हणालो, ''जगातली ही सर्वांत सुंदर इमारत आहे.'' मग त्याने विचारले, ''ह्या सुंदर इमारतीत कोण राहते?'' त्याने विचारला तसला प्रश्न मी कधी ऐकला नव्हता ! पण त्याचा प्रश्न स्वाभाविक होता. मी म्हणालो, ''इथे कुणीच राहत नाही.'' त्यावर तो म्हणाला, ''हे रुग्णालय आहे काय?'' मी म्हणालो, ''नाही, हे काही रुग्णालय नाही.'' त्याने फिरून विचारले, ''मग काय ही शाळा आहे?'' मी म्हणालो, ''नाही बाबा, ही शाळाही नाही.'' मग तो म्हणाला, ''मग ही धर्मशाळा असेल?'' मी सांगितले, ''ही धर्मशाळाही नाही.'' शेवटी तो म्हणाला, ''इथे कुणी राहत नाही; हे रुग्णालय नाही, शाळा नाही; धर्मशाळा नाही; मग हे आहे तरी काय?'' मी म्हणालो, ''ही एक कबर आहे. एका राणीची कबर.'' ह्यावर तो म्हणाला, ''अरे देवा ! रामप्रहरी तुम्ही मला कुठे स्मशानात घेऊन आलात !'' शिकल्या-सवरलेल्यांनीही अशा माणसांपासून शिकावे. त्यांच्याजवळ एक अशिक्षित शहाणपण-'अनलेटर्ड विसडम' असते. त्या ड्रायव्हरने मला मोठा धक्का दिला ! त्याच्या प्रश्नांमुळे एक गोष्ट माझ्या ध्यानी आली ती अशी की आधुनिक विज्ञानाने आज जगाला संपन्न केले आहे. सुभग, सुंदर केले आहे. किती इमारती, किती वस्तू ! सुंदर सुंदर रस्ते, सुंदर सुंदर धरणे आणि कालवे. पण मानवी मनोबुद्धी ठिकाणावर नसेल तर पाहता पाहता एक दिवस हे सुंदर जग म्हणजे मनुष्याची कबर बनेल. मनुष्याची समाधी बनेल.

**वेदान्त–विज्ञान–विश्वास**

ह्या जगाचा ताजमहालासारखा मकबरा बनायचा नसेल तर विनोबा म्हणतात की तीन गोष्टी हव्या : वेदान्त, विज्ञान आणि विश्वास. विज्ञानाच्या एका बाजूला वेदान्त आणि दुसऱ्या बाजूला विश्वास, वेदान्त म्हणजे मानवता. विज्ञानाच्या जोडीला ह्या दोन गोष्टी हव्यात. आज स्त्री–पुरुषांत भीती आहे. काळ्या–गोऱ्यांत भीती आहे. वरिष्ठ–कनिष्ठांत भीती आहे. गरीब–अमीरात भीती आहे. त्यांच्यात

भीतीऐवजी विश्वास निर्माण झाला पाहिजे. हे केव्हा घडून येईल? गांधी म्हणाले होते; "माझ्या राज्यात राव आणि रंक बरोबरीचे असतील." लोकांना वाटले, गांधीजींचे हे बरे आहे. राव राव राहील, रंक रंक राहील आणि शिवाय दोघे बरोबरीचे राहतील ! एका सर्कशीत सिंह आणि बकरी एकत्र पाणी पिताना मी पाहिले होते. तेव्हा मी छोटा होतो. आणि काकाबरोबर सर्कस पाहायला गेलो होतो. तेथे सिंह आणि बकरी ह्यांच्या मधोमध एक फलक लावला होता. त्यावर लिहिले होते: 'ब्रिटिश रूल !' मी विचारले, "ब्रिटिश रूलचा हा फलक इथे कशासाठी लावला आहे?" माझे काका म्हणाले, "हे इंगजी राज्यातच घडते आहे. ह्यापूर्वी रामराज्यात असे काही घडले असेल तर कोणाला ठाऊक ! आज ब्रिटिश राज्यात सिंह आणि बकरी एकाच घाटावर पाणी पिताना आपल्याला दिसत आहे !" मी म्हणालो, "हे खोटे लिहिले आहे. ह्यात इंग्रजी राज्य कुठले? इथे रिंगमास्टरच्या हातातल्या चाबकाचे राज्य आहे. रामराज्य म्हणा की इंग्रजीराज्य म्हणा इथे असते तर सिंहाचे क्रौर्य आणि बकरीचा भ्याडपणा इथे आढळला नसता. जेव्हा रावाचे रावपण आणि रंकाचे दारिद्र्य समाजातून समाप्त होईल तेव्हाच त्यांच्या वागण्यात बरोबरी येईल. ते एका पातळीवर येतील. गांधी हा शाबूत डोक्याचा माणूस होता. त्यांनी राव-रंकाचा उल्लेख ज्या काळात ते जगत होते त्या काळाच्या संदर्भात केला. जेव्हा गरिबाची गरिबी आणि अमिराची अमिरी संपेल, जेव्हा ब्राह्मणातले ब्राह्मण्य आणि भंग्यातला भंगीपणा नाहीसा होईल, जेव्हा हिंदूमधले हिंदुत्व आणि मुसलमानातील इस्लामियत विलयाला जाईल तेव्हाच निखळ माणूस माणसाला भेटेल आणि तेव्हाच संपूर्ण क्रांती, समग्र क्रांती अस्तित्वांत येईल आणि मग प्रतिक्रांतीचा धोकाही राहणार नाही.

कोणी विचारतात, ह्या ठिकाणी कधी कोणी पोहोचू शकेल काय? त्या 'ॲलीस इन वंडरलँड' पुस्तकातली जी रेड क्वीन आहे ती ॲलीसला सांगते, "यू सी हियर, इट हॅज टेकन ऑल द रनिंग यू कॅन डू टु कीप इन द सेम प्लेस अँड इफ यू वाँट टू गेट समव्हेअर एल्स, यू वुइल हॅव टु रन ॲट लीस्ट ट्वाइस ॲज मच ॲज दॅट !"—आज तू ज्या ठिकाणी आहेस तिथेही तुला टिकून रहायचे असेल तर त्यासाठीदेखील तुला खूप धावावे लागेलच, पण त्याहून एक तसूभरदेखील तुला पुढे जायचे असेल तर तुला तुझी गती आजच्यापेक्षा किमान दुप्पट तरी करावी लागेल !

धावावे लागेल, प्रारंभ करावा लागेल. मूठभरच लोक सुरुवातीला असतील, अपयश पदरी येईल. पण ते अपयशदेखील जीवन उजळून टाकणारे असेल. गौरवास्पद असेल. मिलने म्हटले होते, "इट इज बेटर टु बी ए मॅन्

डिस्सॅटिस्फाइड, दॅन ए पिग सॅटिस्फाइड, ए सॉक्रिटिस डिस्सॅटिस्फाइड दॅन ए फूल सॅटिस्फाइड, अँड इफ ए फूल थिंक्स अदरवाइज, इट इज बिकॉज ही नोज हिज साइड ऑफ द केस.'' बेवकुफाला जर असे वाटत असेल की संतुष्ट बेवकूफ राहण्यातच सुख आहे, असंतुष्ट माणूस राहण्यात दुःख आहे तर त्याचा अर्थ क्रांतीचे मूल्य तो जाणत नाही, एवढाच होतो.

**आत्मवान पुरुष**

आयरिश स्वातंत्र्यवीर टेरेन्स मॅक्स्विनी! आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी त्याने उपवास करून आत्मबलिदान केले. शहात्तराव्या दिवशी, मृत्यूच्या सान्निध्यात तो जे म्हणाला ते माझ्या कानात अद्यापि गुंजत आहे. तो म्हणाला होता, ''वन आर्मड् मॅन कॅन बी कॉंकर्ड बाय टु, टु बाय ट्वेंटी, ट्वेंटी बाय टु हंड्रेड, टु हंड्रेड बाय ॲन आर्मी, ॲन आर्मी बाय काउंटलेस लिजन, बट नॉट ऑल द आर्मिज ऑफ ऑल द एंपायर्स ऑफ द वर्ल्ड कॅन क्रश द स्पिरिट ऑफ ए ट्रु मॅन.''— एका सशस्त्र सैनिकाला दोन सशस्त्र सैनिक जिंकून घेतील. दोघांना वीस जिंकून घेतील. विसांना दोनशे पराभूत करतील. दोनशेंना सैन्याची तुकडी भारी ठरेल. त्या तुकडीला सैन्य शिकस्त देईल. पण दुनियेतल्या सर्व साम्राज्यांच्या सर्व सेना एकत्रित केल्या तरी एका आत्मवान पुरुषाला पराभूत करू शकणार नाहीत.''

❑❑

[संपूर्ण क्रांती : जनबोध प्रकाशन, ५ जून १९७८ : संपूर्ण क्रांती घोषणा दिन.]

# ७

# जयप्रकाशांची धर्मदृष्टी

जयप्रकाशांच्या धर्मदृष्टीबद्दल लिहिणे म्हणजे केवळ साहसच नव्हे तर ते लिहिण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अतिधारिष्ट्य करण्याचा प्रयत्नच ठरेल ! ज्याने या विषयाचा अभ्यास केला नसेल, व त्यांची या विषयाबाबत चर्चा केली नसेल, त्याने अशाप्रकारे केलेल्या दुःसाहसाला व धारिष्ट्याला सीमाच उरणार नाही. ही गोष्ट समजून घेऊनही लेखक हेच काम करण्यास धजावला आहे. ज्या ठिकाणी प्रवेश करण्यास देवदूतही घाबरतात, त्या ठिकाणी व त्या क्षेत्रात आज लेखकाने बेधडक प्रवेश केला आहे. जयप्रकाशजींचे व्यक्तिमत्त्व तसेही वादग्रस्त मानले जाते. त्यांच्याविषयी कित्येक जाणकारांचे समीक्षणही अत्यंत विविध प्रकारचे व परस्पर विरोधी असते. त्यांचे समग्रजीवन ज्याप्रमाणात व इतके सार्वजनिक राहिले आहे, तितके सार्वजनिक जीवन गेल्या कित्येक वर्षांत एखाद्या फारच विरळा भारतीय व्यक्तीचे राहिले असेल. त्यांच्या जीवनात अधिकांश वर्षे त्यांचे व्यक्तिगत व खाजगी आयुष्य जवळपास नसल्यासारखे होते. या माझ्या म्हणण्यात मला कुठलीही अतिशयोक्ती वाटत नाही.

गांधींनी स्वतःविषयी लिहिताना म्हटले होते, ''या जगात धार्मिक व्यक्तित्वाच्या नावाखाली जगणारे बहुतेक लोक राजकारणी असतात. परंतु मी स्वतः मात्र राजकारणी वेषात वावरणारा एक धार्मिक पुरुष आहे.'' इतके असूनही देशातच काय पण विदेशातही कित्येक समीक्षकांनी त्यांना बुद्धधर्माची पताका घेऊन चालणारा परिव्राजक इत्यादि काय काय म्हणून ठेवले आहे. जयप्रकाशांनी तर स्वतःला धार्मिक वा साधुपुरुष म्हणण्याचा दावाही केलेला नाही. ते कोणताही धर्म मानत नव्हते, किंवा धर्मकांडावर व त्यातील विधानांवर विश्वासही ठेवत नव्हते. तरी देखील, कृष्णमूर्ती ज्याला 'धार्मिक मनुष्य' मानीत, त्या अर्थाने काही अंशी तरी ते अवश्य धार्मिक होते.

जॉर्ज बर्नार्ड शॉचे 'दि डेव्हिल्स डिसाइपल' नावाचे एक नाटक आहे आणि चार्ल्स डिकन्सची 'दि टेल ऑफ टू सिटीज' नावाची कादंबरी आहे. यामध्ये

सिडनी कार्टन नावाचे एक पात्र आहे. शॉ आणि डिकन्सच्या या दोन पात्रांमध्ये तुलना करणे तर शक्य नाही, तरी देखील या दोन पात्रांमध्ये एक समानता आहे आणि ती अशी की या दोन्ही पात्रांनी आपल्या स्वार्थाचा यत्किंचितही विचार न करता दुसऱ्याच्या हितासाठी आपले प्राण ओवाळून टाकले होते. 'डेव्हिल्स डिसाइपल' च्या नायकाचे चरित्र पाहून तर स्वयं पुरोहित देखील विस्मयचकित झाला होता.

असीसीचे संत फ्रान्सिस यांनी तर जंगलातील जनावरांना, खारींना, उंदरासारख्या प्राण्यांना देखील आपले मित्र मानले होते. संत तुकाराम म्हणाले होते ना, 'वृक्ष वल्लरी आम्हा सोयरी'. 'हे वृक्ष, या लतावेली आणि जंगलातील हिंस्र पशू माझे आप्त स्वजन आहेत'. आणि कृष्णमूर्ती म्हणाले, ''मला तर असे वाटते की हे चेरीचे वृक्ष आणि हिरवीगार पाने ही जणू मी स्वतःच आहे.''

गांधीजींनी जवाहरलालजींचा परिचय विनोबाच्या नंतरचे, नंबर दोनचे सत्याग्रही या स्वरूपात दिला होता. यावर गांधीनिष्ठांनी हरकत व्यक्त करताना म्हटले होते, ''जवाहरलाल निरीश्वरवादी आहे, आणि इतर काही नव्हे तर अज्ञेयवादी तर आहेच आहे.'' सत्याग्रहींच्या बाबतीत गांधीजींची अशी एक अट होती की सत्याग्रहीची ईश्वरावर श्रद्धा असली पाहिजे. जवाहरलालजींना सत्याग्रही म्हणण्याला विरोध करणाऱ्या गांधीनिष्ठांना उत्तर देताना विनोबांनी म्हटले होते, ''रामाचे भक्त दोन प्रकारचे असू शकतात. एक कौसल्यासारखे आणि दुसरे सीतेसारखे असतात. कौसल्या रात्रंदिवस क्षणाक्षणाला 'माझा राम, माझा लाडका राम,' म्हणून हाका मारीत होती. परंतु जेव्हा लोकांनी सीतेला विचारले, राम तुझा कोण लागतो? तेव्हा सीतेने केवळ इशाऱ्याने इतकेच सांगितले की ते तर माझे प्राणनाथ आहेत. परंतु लक्ष्मणाचे नाव घेत ती म्हणाली, तो तर माझा दीर आहे.''

जवाहरलालजी ईश्वराचे नाव घेत नसत, परंतु ते सदैव त्यांच्या मार्गाचे अवलंबन करीत जगणारे होते. राम-सीता यांच्या आख्यायिकेचा संकेतही हाच आहे. जयप्रकाशजींना देखील या आख्यायिकेतील संकेत लागू करता येतील.

हे सर्वांना विदितच आहे की जयप्रकाश तरुणपणीच अध्ययन करण्यासाठी अमेरिकेत गेले व तेथे राहत असताना मार्क्सवादाच्या प्रेमात पडले. जयप्रकाशजी कम्युनिझमवर बेहद्द खूष झाले आणि आपल्या जीवनदर्शनात त्यांनी त्या विचारधारेला आत्मसात केले. एकदा नेपोलियनने पाहिले तेव्हा लेपलेस आकाशाचे चित्र काढीत होता. नेपोलियनने त्याला विचारले, ''तुझ्या या आकाशात ईश्वर कुठे आहे?'' उत्तर देताना लेपलेस म्हणाला, ''माझ्या या योजनेत ईश्वराला कुठलेच स्थान नाही.'' साम्यवाद आणि समाजवाद या दोघांचे नातेही

काहीसे असेच आहे. मार्क्सने तर येथपर्यंत म्हणून टाकले होते की "धर्म ही अफूची गोळी आहे. त्या नशेत माणूस स्वतःला व आपल्या ऐहिक जीवनाला विसरून एका वेगळ्याच कल्पना-विश्वात रमून जातो."

एकदा मार्क्सवाद आत्मसात केल्यावर जयप्रकाशांचा परंपरागत धर्माशी संबंध तुटून गेला. कित्येक वर्षानंतर जेव्हा ते अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महामंत्री होते तेव्हा त्यांना कुणीतरी विचारले, "तुम्ही कधी भगवद्गीता वाचली आहे काय? त्याबाबत आपले विचार काय आहेत?" उत्तर देताना जयप्रकाश म्हणाले होते, "हे पुस्तक दुसऱ्यांदा वाचण्यालायक नाही. आपण ते पुस्तक एकदा नीटपणे न्याहाळून घेतले, तरी पुरेसे आहे."

प्रथम जेव्हा भूदान आंदोलनात जयप्रकाश सामील झाले होते, तेव्हा ते सामूहिक प्रार्थनेस उपस्थित राहत असत. परंतु ही उपस्थिती केवळ अनुशासनाच्या भावनेने प्रेरित झालेली असे. विनोबांच्या मौन व सामूहिक प्रार्थनेतदेखील ते याच भावनेने सामील होत असत. परंतु विनोबांच्या यात्रेत पडावावर/मुक्कामावर जी प्रार्थना होत असे, तेव्हा त्यांना थोडे अडचणीचे वाटत असे. अडचण ही होती की त्यात रामधून आणि इतर देवदेवतांच्या भजनांचा समावेश होत असे. या व्यतिरिक्त त्या प्रार्थनेत गीता-उपनिषद इत्यादी अवतरणांचा पाठ होत असे आणि या तेच तेच रोज तोंडपाठ म्हणत बसण्याचा अर्थ त्यांना कळत नव्हता. या विषयाबाबत त्यांची विनोबाजींशी चर्चाही होत असे. त्यांना भजन ऐकताना अत्यंत आनंद वाटत असे, यात तीळमात्र शंका नाही. परंतु हे एक केवळ त्यांच्या रसिकतेचे लक्षण होते. त्यात भगवद्भक्तीचे लक्षण नव्हते.

जसजसा त्यांचा विनोबांशी संपर्क वाढत गेला तसतसे ते त्यांच्या कार्यक्रमात बारकाईने लक्ष घालू लागले. सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व त्यांच्या लक्षात येऊ लागले. याबाबत त्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तन त्या वेळी जागृत झाले, जेव्हा त्यांची बुद्धी या निर्णयाप्रत येऊन पोहोचली की केवळ भौतिकवादात चांगुलपणाचा स्रोत असूच शकत नाही. त्याचे मूळ उगमस्थान कुठेतरी दुसरीकडेच असले पाहिजे. या विषयाबाबत त्यांनी आपले जे अनोखे आत्मनिवेदन प्रसृत केले आहे, त्याचे सर्वोदय साहित्यात फार महत्त्वाचे व उच्च स्थान आहे.

श्री अरविंदानी एका ठिकाणी लिहिले होते, "मनुष्याला नैतिकतेचे शिक्षण दिले जाऊ शकत नाही, कारण बुद्धी ही हृदयाचे/अंतःकरणाचे स्थान घेऊ शकत नाही. नैतिकतेच्या शिक्षणाचे द्वार हृदय असते, बुद्धी नव्हे !" जयप्रकाशजी एक अत्यंत सहृदय व्यक्ती होती. त्यांच्या हृदयाची व्यापकता असीम होती. चांगल्या कामांमध्ये ते अत्यंत सहजतेने प्रवृत्त होऊन भाग घेत असत. केवळ चांगले काम

करावयाचे म्हणून ते मुद्दाम चांगुलपणाने वागत नसत. त्यांच्या हातून चांगली कामे, चांगुलपणाची कृती सहजतेने होत असे.

जयप्रकाशजी एक नीतिमान व्यक्तिमत्व होते, कारण ते प्रथम एक सहृदय व्यक्ती होती. यात प्रभावतीजींचे योगदान फारच प्रभावशाली होते, कारण प्रभावतीजी जयप्रकाशांची प्रिय सखी होती. इतकेच नव्हे तर प्रेरणा देणारी प्रेरक मित्र देखील होती. जयप्रकाशजी त्यांना 'देवी' मानत. प्रभावतीजींच्या चित्तातदेखील जयप्रकाशजींबद्दल पूज्यभाव होता, त्या जयप्रकाशजींच्या जीवनाचा एक अनमोल ठेवा होता. प्रभावतीजींच्या मृत्यूनंतर ते रामचरित मानसाचे नित्य पठण करू लागले होते. याच प्रकारे त्यांनी जप, यज्ञ इत्यादी सुरू केले. ते कोरे बुद्धिवादी व रुक्ष नव्हते. त्यांची बुद्धीनिष्ठा हृदयनिष्ठेद्वारा संपन्न व समृद्ध बनली होती. हृदयात व्यक्ती आस्तिक असते, नास्तिक नव्हे. आस्तिक त्याला म्हणतात जो जीवनाचे मूल्य इतर अवांतर मूल्यांच्या मदतीने कधी मोजत नाही. त्याच्यासाठी जीवन हेच परममूल्य असते. जीवनाचे मूल्य मोजण्यासाठी दुसरा कुठलाही निकष नसतो. ते एक निरपेक्ष मूल्य आहे.

सर्वसाधारणपणे आम्ही ईश्वरनिष्ठेलाच आस्तिकता मानतो. परंतु कधीकधी असेही आढळून येते की ब्रह्मनिष्ठ व्यक्ती आम्हा सामान्य माणसाच्या दृष्टीने ईश्वरनिष्ठ नसतात. शंकराचार्यांनी देखील ईश्वराला 'माया समन्वित ब्रह्म' अर्थात शबल ब्रह्मच मानले आहे. जे मुक्त झालेले असतात, त्यांच्यासाठी तर ईश्वरही नसतो. कारण ब्रह्म निरुपाधिक असते. आणि ईश्वर सोपाधिक असतो. म्हणूनच शंकराचार्यांनी ईश्वराच्या सिद्धीसाठी केनोपनिषद् नावाचे दुसरे एक भाष्य लिहिले. ईश्वरनिष्ठेपेक्षा ब्रह्मनिष्ठा अधिक व्यापक असते. कृष्णमूर्तीसारख्या ब्रह्मनिष्ठ व्यक्तींना सर्वसाधारण अर्थाने ईश्वरनिष्ठ म्हणता येणार नाही. कपिल मुनींनी ब्रह्माचे अस्तित्व मान्य केले, परंतु ईश्वराविषयी एक सूत्र लिहून म्हटले आहे की ईश्वराच्या अस्तित्वाचा काहीच पुरावा नाही. आस्तिकता आणि निरीश्वरता यातील फरक समजून घेण्यासाठी एवढे विवेचन करणे आवश्यक वाटले, म्हणून ते प्रस्तुत केले आहे.

सारांश एवढाच की, निरीश्वरवाद हे अधार्मिकतेचे लक्षण नव्हे. आमच्या परंपरेनुसार बौद्ध व जैन धर्म पाळणारे लोक ईश्वराला मानीत नाहीत. परंतु धार्मिकतेच्या बाबत ते इतर कुणाही पेक्षा कमी नाहीत. साऱ्या जगावर एक नजर टाकली तर असे आढळून येईल की मानवतावादाचे प्रवर्तक ईश्वरनिष्ठ नव्हते. तरी कित्येक ईश्वरपरायण व्यक्तींनी मानवनिष्ठेला ईश्वरनिष्ठेच्या बरोबरचे तूल्यबळ मानले. या संदर्भात इलियटची 'अबू बेन ॲडम'ची कविता प्रसिद्धच आहे.

आमच्या सोबत्यांमध्ये प्राध्यापक गोरा नास्तिकवादी होते आणि त्याबद्दलचे प्रतिपादन ते आग्रहपूर्वक करीत असत. परंतु साधुत्व व नैतिकता याबाबत त्यांची बरोबरी करणारा इसम विरळाच असू शकेल. जरी ते स्वतः निरीश्वरवादी होते तरी त्यांच्याबाबत म्हणताना असेच म्हणावे लागेल की, त्यांच्यासमान देवात्मा फारच विरळा सापडेल. समाजवादी व साम्यवादी विचारप्रणाली मानणाऱ्यांमध्ये सुद्धा अशा देवतुल्य व्यक्ती दिसून येतात. त्यांचे जीवन अतिशय शुद्ध व सदाचारपूर्ण असते. परंतु हे लोक ईश्वरनिष्ठेला आणि धर्माला पाखंड अथवा मूर्खपणा मानतात.

जॉर्ज बर्नाड शॉचे उदाहरण घेऊ या. ते आपल्या तऱ्हेने एका ढंगाचे समाजवादी होते. धर्म अथवा ईश्वर यासारख्या गोष्टी ते मानत नव्हते. आपल्या ''एन्ड्रोक्लीज ॲन्ड दि लायन'' नामक कृतीमध्ये तर त्यांनी हजरत ईसाचे देखील मनोवैज्ञानिक पद्धतीने विश्लेषण केलेले सापडते. परंतु सेंट-जोन लिहिताना त्यांची भूमिका काहीशी बदललेली आढळून येते, आणि त्याची प्रस्तावना लिहिताना तर त्यांच्यात रूपांतर झाले आहे असेच वाटू लागते. आपल्या त्या रचनेमध्ये त्यांनी जीवनशक्तीलाच जणू परमतत्त्वाच्या रूपात प्रतिष्ठित केले आहे. ही जीवनशक्ती आमची दुर्गा, अंबिका आदि शक्तीपेक्षा भिन्न आहे. ब्रह्माप्रमाणेच त्यांचीही काही व्याख्या वा परिभाषा करता येणार नाही.

निःसंशयपणे मला हे म्हणता येणार नाही की जयप्रकाशजींनी अशी ब्रह्ममीमांसा वा आत्ममीमांसा करण्याचे धाडस केले होते काय? अशाप्रकारे साहस करणे माझ्या तर शक्तीपलीकडचे आहे. आपल्या अंतरात्म्याचा शोध करण्याचा प्रयत्न करू लागलो तर असे वाटू लागते की जणू आपण कांद्याचे एकेक पापुद्रेच उकळीत आहोत काय? त्यातून काय प्राप्त होते हे मी सांगू शकत नाही. म्हणूनच मी म्हणतो की याबाबत जयप्रकाशजी काही विचार करीत होते की काय अथवा त्यांनी कधी याचा विचार केला होता की नाही हे मला माहीत नाही. मला फक्त येथे एवढाच उल्लेख करावासा वाटतो की ईश्वरभक्ती व ब्रह्मनिष्ठा किंवा ब्रह्मजिज्ञासा या दोन्ही भिन्न भिन्न भावनेच्या भूमिका आहेत.

जेव्हा आम्ही जयप्रकाशांसारख्या व्यक्तीच्या विषयी त्यांची धार्मिकता व नैतिकता यांचा विचार करू इच्छितो, तेव्हा आम्ही त्यांच्या समग्र जीवनाचा विचार करणे आवश्यक ठरते. आपल्या जीवनात ते कित्येक वेळा अज्ञातवासात राहिले होते. त्या अवस्थेत त्यांनी आपली वेशभूषा बदलली व नावही बदलले होते. एवढेच नव्हे तर कुठल्या अन्य स्त्रीचा आपली पत्नी म्हणून परिचयही दिला होता. शुद्ध तात्त्विक दृष्ट्या पाहू गेल्यास हे सारे असत्य आचरणच आहे, असे मानले जाऊ शकते. अशाप्रकारे असत्याचरण करून त्यांच्या निकटवर्तियांनी १९७४

मध्ये लोकव्यापी आंदोलन चालविले. गांधी-विनोबांच्या दृष्टीने असे असत्याचरण असमर्थनीयच मानले जाऊ शकते. तथापि हेही सत्य आहे की गांधी-विनोबांच्या आंदोलनातही त्यांच्या काही साथीदारांनी अज्ञातवास पत्करला होता. या साऱ्या गोष्टी माहीत असूनही गांधीजींनी या गोष्टींचा जाहीर उल्लेख कधीही केलेला नाही. आंदोलन काळात एका जागेहून दुसरीकडे पत्र वा संदेश पोहोचविण्यासाठी मोठ्या कौशल्याने गुप्तहेरगिरांची कामे करावी लागत.

परंतु जयप्रकाश स्वतः अज्ञातवासात राहिले होते व त्यांनी अज्ञातवासात राहणाऱ्यांचे समर्थनही केले होते. एका बाजूने ही दुहेरी नीती होती. इंग्रजीत यालाच 'डुप्लीसिटी' म्हणतात. या दुहेरी नीतीत कट-कारस्थानाचा समावेश असतो. येथे या विषयाचे थोडे विवेचन करणे आवश्यक वाटते.

प्राचीन काळी, अर्थात पौराणिक काळाच्या पूर्वी देखील अशाप्रकारची दुहेरी चाल अनेक ठिकाणी पाहावयास मिळे. श्रीराम आणि श्रीकृष्ण यांनी देखील अशाप्रकारच्या नीतीचा उपयोग केला होता. आपल्या अशा आचरणामुळे रामाला वाल्मीकीचे समर्थन मिळू शकले नाही. वाल्मीकीने त्याला 'सन्मार्गच्युति' असेच मानले. परंतु दुसरीकडे श्रीकृष्णाच्या अशा आचरणाचे निरपवादपणे समर्थन केले गेले आहे. शुक्राचार्य म्हणतात,

"समरथ को नहि दोष गुसाइ ।
जिमि सब वस्तु अग्निमँह जरि जाहिं ।"

ब्रह्मनिष्ठ मुक्त पुरुषासाठी काहीच बंधनकारक नसते. उपनिषदात याचे वर्णन करताना येथपर्यंत म्हटले आहे की, "त्या माणसाला या साऱ्या गोष्टींची चिंता करावी लागत नाही की मी चांगले काम का केले नाही अथवा हे पाप काय म्हणून केले? अशा माणसाला माता-पित्याचा वध केला असता वा भ्रूणहत्या केली तरी पाप लागत नाही. तो 'निस्रैगुण्य' म्हणजे त्रिगुणरहित मानला जातो. त्याच्यासाठी काही विधिनिषेध उरत नाही." या विषयावर टिळक आणि गांधी यांच्यात मूलभूत मतभेद होता. 'ये यथा मां प्रपद्यन्ते' तथा "हत्वापि सः इमान् लोकान् न हन्ति न निबद्धयते." याविषयी 'अनासक्ति योग' आणि 'भगवद्गीता रहस्य' यातील विवेचनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. 'गीतारहस्या'चा 'सिद्धावस्था आणि व्यवहार' नामक अध्यायात लोकमान्यांच्या जीवनदर्शनाचे सार-सर्वस्वच आहे. याविषयी गांधी आणि टिळक यांच्यात झालेला वादविवाद काही अंशी 'यंग-इंडिया'त छापला गेला होता. त्यामध्ये टिळकांनी 'सिद्धावस्था आणि व्यवहार' या शीर्षकाखाली आपल्या या अध्यायाचा पुरावा दिलेला होता.

गांधीजी म्हणत असत, "या जगात ईश्वर असा एकच एकटाच असू शकतो,

की ज्याला हत्या केल्यावरही पाप लागत नाही. मनुष्याला असा अधिकार नाहीच. मग तो भलेही मुक्त पुरुष का असेना!'' याबाबत टिळकांचे म्हणणे असे की ''मनुष्याला यथाशक्ती ईश्वराच्या आचरणाचे अनुसरण केले पाहिजे. गीतेतही म्हटलेच आहे. 'मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।' अर्थात ईश्वराने जो मार्ग घालून दिला आहे, मनुष्याने यथाशक्ती त्याच मार्गावरून जाणे योग्य आहे. पण अट एकच असली पाहिजे, की ते कर्म निष्काम भावनेने केले पाहिजे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची लालसा तृप्त करण्याची वृत्ती नसावी. कधीकधी लोककल्याणासाठी आपद्धर्म म्हणून असत्याचा व कपटाचा उपयोग करावा लागतो. तो क्षम्य तर असूच शकत नाही, परंतु आवश्यक असतो.'' टिळकांनी, अरविंदांनी व त्यांच्या समान असणाऱ्या इतर सशस्त्र क्रांतिकारकांनी आवश्यकतेनुसार हिंसा व असत्याचा आश्रय घेतला असल्यास त्यांना त्या कारणास्तव दुराचारी अथवा अनीतिमान मानता येणार नाही. श्रीरामाने त्राटिका, शूर्पणखा व वाली यांच्या प्रती असत्य आचरण केले, जो स्वयं ऋषीपुत्र होता अशा रावणाचा वध केला; मेघनाथाचा वध केला, जो सुलोचनेचा पती होता. हे दोन्ही वध करूनही रामाला 'मर्यादा पुरुषोत्तम'च संबोधण्यात येते. श्रीकृष्णाने जरासंधाचा व जयद्रथाचा वध केला, तेव्हा असत्याचा आश्रय घेतला. व धर्मराज युधिष्ठिराच्या तोंडूनही 'नरो वा कुंजरो वा' वदवून घेतले, परंतु त्यांना पूर्णावतार मानताना त्यात तसूभरही त्रुटी वाटली नाही. आपल्या एका वर्गात 'हत्वापि स इमान् लोकान्' चा गीतेतील श्लोक समजविताना विनोबांनी देखील या आशयाचे निवेदन केले होते. मला आठवते की, त्या वेळी त्यांनी 'गीताई चिंतनिका'मधील काही अंश वाचून दाखविले होते. त्या सर्वांचे सार असे होते की सर्वांच्या कल्याणासाठी असत्याचा आणि हिंसेचा उपयोग गांधीच्या पूर्वीही आध्यात्मिक पुरुषांनी निषिद्ध मानलेला नाही. देवादिकांनी देखील अशा प्रकारच्या दुहेरी नीतीचा उपयोग इष्ट मानला.

श्रीकृष्णाने वत्सासुराचा वध केला, कारण की तो राक्षस वत्साचे रूप घेऊन आला होता. या कारणास्तव लोकांनी देखील कधी असे म्हटले नाही की गोपालन करणाऱ्या श्रीकृष्णाने गायीच्या वत्साचा वध केला. स्वतः गांधीजींनी वेदनेने तडफडणाऱ्या एका बछड्याला करुणेने प्रेरित होऊन मरणदान दिले होते. प्राणान्तिक वेदनेने असह्य दुःखामुळे अखेरच्या क्षणापर्यंत पीडित असणाऱ्याला मरणदान देणे हे देखील पुण्यकर्मच आहे. मराठ्यांच्या इतिहासातील काही दाखले देऊन विनोबांनी ही गोष्ट समजावून सांगितली होती. अशाप्रकारे 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' या वचनाची सत्यता जीवनात अनेक वेळा प्रचितीस येते.

अध्यात्मनिष्ठ पुरुषांमध्ये जयप्रकाश, श्री अरविंद, भगवान, रमण महर्षी आणि कृष्णमूर्ती यांना श्रेष्ठ मानीत, परंतु त्यांचे श्रद्धास्थान तर गांधी-विनोबाच होते. यांमध्ये गांधींपेक्षाही विनोबांवर अधिक श्रद्धा होती. परंतु विभूतिनिष्ठा आणि विभूतिप्रामाण्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. स्वयं गांधीजींनी व विनोबांनी अनेक व्यक्तींना पूजनीय मानले आहे. काही विभूतींना श्रद्धेय मानून त्यांना प्रणाम देखील केला आहे. परंतु स्वतःच्या जीवनात त्यांनी आत्मप्रामाण्यालाच सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आहे. या विषयात जयप्रकाशजींनी स्वाभाविकपणे या लोकांचेच अनुसरण केलेले आहे.

पाश्चात्त्य शांतीवादी लोकांकडूनही गुप्त आंदोलनाबाबत वैचारिक मतभिन्नता आढळून येते. काही विशिष्ट परिस्थितीत त्यांनी त्या गोष्टी अनिवार्य मानल्या आहेत. म्हणजे त्याचे अवलंबन योग्य मानले, इष्ट मानले, त्याचा निषेध केला नाही. जयप्रकाशजींच्या व्यक्तिमत्वात श्री अरविंद, टिळक, मार्क्स, गांधी, विनोबा या साऱ्यांचे शुभ संस्कार सम्मीलित होते.

याच संदर्भात मला हेनरी मिलरची एक रूपक कथा आठवते. तसे पाहू गेल्यास हेनरी मिलर अश्लील साहित्याचा लेखक मानला जातो, परंतु याची ही गोष्ट, रूपक कथा विलक्षण आहे. एका मनुष्याने बावन्न खून केले. मग त्याला या गोष्टीचा पश्चाताप होऊ लागला. त्याने विचार केला की हे पाप प्रक्षालन करण्यासाठी एखाद्या गुरुला शरण गेले पाहिजे. त्या काळी एका महात्म्याची फार प्रसिद्धी होती. म्हणून तो मनुष्य त्या महात्म्याच्या आश्रमात गेला. त्याने पाय धरून नमस्कार केला आणि अत्यंत नम्रपणे म्हणाला, ''भगवान्, मी घोर पापी आहे. मी बावन्न हत्या केल्या आहेत, आपल्या या पापांचे क्षालन करण्यासाठी मी आपल्या पायाशी आलो आहे, आपण माझा उद्धार करावा.''

त्या महात्म्याने पूर्ण दोन वर्षेपर्यंत त्या मनुष्याला आपल्या आश्रमात ठेवून घेतले. त्याच्याकडून विविध नियमांची व व्रतांची उपासना करविली. शरण आलेल्या त्या माणसाचे दोन वर्षांपर्यंतचे आचरण पाहून महात्म्याला संतोष झाला. ते म्हणाले, ''आता तू बिनधास्तपणे जगात वावरण्यासाठी जाऊ शकतो, तू शुद्ध झाला आहेस, आता कुठल्याही प्रकारची भीती शिल्लक राहिली नाही.'' त्या महात्म्याने त्याला एक काळे वस्त्र पांघरण्यास दिले आणि म्हणाला, ''ज्या दिवशी हे काळे वस्त्र शुभ्र होईल, तेव्हाच तुझी सारी पापे धुतली गेली असे समज. परंतु जोपर्यंत हे होणार नाही, तोपर्यंत मी दिलेले नियम, व्रते व आचार याचे पालन करीत राहा.'' मग तो बिचारा पापी माणूस तिथून निघाला व बाहेरच्या जगात राहून गुरुच्या आदेशानुसार व्रत-नियमांचे आचरण करीत राहिला. तीर्थयात्रा

केल्या आणि तीर्थक्षेत्रांच्या पवित्र जलाशयात आपले वस्त्र घासून घासून धुवू लागला. परंतु ते काही शुभ्र होईना. अशा प्रकारे दोन वर्षे निघून गेली. अखेरीस हताश होऊन त्याने विचार केला, चला पुन्हा गुरुकडेच जाऊ आणि त्यालाच, पुढचा मार्ग विचारू. असा विचार करून तो आश्रमाच्या वाटेकडे चालू लागला. आता तो आश्रमाच्या अगदी जवळपासच पोहोचला. तेवढ्यात त्याने पाहिले की एक गुंड कोण्या एका स्त्रीला त्रास देत होता. तिच्यावर अत्याचार करीत होता, आणि ती स्त्री त्रस्त होऊन मोठमोठ्याने किंचाळत होती. काही वेळाने या पापी माणसाला राहवले नाही. त्याने जवळ जाऊन त्या माणसाला नम्रपणे विनविले, समजाविले व त्याने अत्याचारापासून परावृत्त व्हावे म्हणून प्रयत्न केले. परंतु त्या माणसाने ऐकले नाही. अखेरीस त्या स्त्रीचे कष्ट पाहणे तो पापी माणूस सहन करू शकला नाही. मग त्याने विचार केला की आपण काय करावे? आपल्या हातून आणखी एक हत्या घडेल, आधी बावन्न वधांचे पाप आपल्या माथी आहेच, एक आणखी वाढेल ! असा विचार करत करत, त्याने त्या दुष्टाची हत्या केली. त्यानंतर तो पुन्हा आश्रमात जाण्यास तयार झाला. परंतु पुढे पाऊल टाकताच, त्याच्या ध्यानी आले की त्याच्या खांद्यावरील वस्त्राचा रंग शुभ्र झाला आहे. तो आश्चर्यचकित झाला !

तात्पर्य स्पष्ट आहे की सहजस्फूर्त निष्काम प्रेरणा आपल्या उद्धाराचाही विचार सोडून देते. त्यामध्ये स्वतःच्या स्वार्थाचा विचार शिल्लकच राहत नाही. तेथे संपूर्ण निर्ममत्वच शिल्लक उरते. अशा प्रेरणेच्या ठायी 'अहं' चा प्रवेश होऊच शकत नाही, होतच नाही. त्या अपराधी माणसाने आपल्या उद्धाराचा विचार सोडून दिला आणि तेव्हाच त्याचा अंतिम अपराधही त्याच्या उद्धाराचे साधन बनला.

एके दिवशी कुणी एक मुलगी विहिरीचे पाणी काढत होती. पाणी काढता काढता ती विहिरीत पडली. जवळच एक मनुष्य उभा होता. त्याला राहवले नाही. त्याने विहिरीत उडी मारली, ती दोघे पाण्यात बुडू लागली. विहिरीवर येणाऱ्या माणसांनी त्यांना बुडताना पाहिले. सर्वजण आरडाओरडा करू लागले, मग काही लोकांनी विहिरीत दोर टाकला व दोघांना वाचविले. मग कळले की ज्याने मुलीला वाचविण्यासाठी विहिरीत उडी मारली होती, त्यालाच पोहता येत नव्हते. लोक म्हणू लागले. "भल्या माणसा, तुलाच पोहता येत नव्हते तर तू उडी का मारलीस?" त्याने उत्तर दिले, "मला राहवले नाही, म्हणून उडी मारली. मला दुसरा विचार सुचलाच नाही." आणि हाच जीवनाचा शुभ आवेश असतो. यालाच 'पॅशन' म्हणतात. यामध्ये विचाराला काही स्थानच नसते, विवेकाचे जागरण होण्यापूर्वीच आचरणाची कृती घडून जाते.

जीवनाचा हा आवेश जयप्रकाशजींमध्ये भरपूर होता. अशा प्रकारच्या व्यापक जीवननिष्ठेतूनच करुणेचा उद्‌गम होत असतो! जयप्रकाशांचे व्यक्तिमत्त्व अशा करुणेने ओतप्रोत भरले होते. त्यांच्या सोखोदेवरा आश्रमात त्यांच्या राहण्याच्या जागेजवळ एक मोठा डेरेदार वृक्ष होता. आश्रमासाठी घराची आखणी करताना अभियंत्याने सांगितले की हा वृक्ष पाडून टाकावा लागेल. जेव्हा जयप्रकाशांना हे कळले तेव्हा त्यांना गहिवरून आले व ते म्हणाले, "नको, नको भाईसाहेब आपण आपला नकाशा बदलून टाका, पण या वृक्षाला हात लावू नका." याचेच नाव आहे, अदम्य जीवननिष्ठा. या व्यापक जीवननिष्ठेत पशू, पक्षी, वनस्पती आणि चराचर साऱ्या सृष्टीचा समावेश असतो. या निष्ठेनुसार संपूर्ण सृष्टीच परमात्म्याचे सगुण रूप धारण करीत असते. जयप्रकाशजींनी कधी अशा सगुण साकार रूपाची उपासना केली होती की नाही, हे आश्रमवासीच अधिक जाणत असतील. परंतु मला हे माहीत आहे की जयप्रकाशजी अशा सगुण साकार रूपाचेच उपासक होते. माझे हे अवलोकन आहे. जयप्रकाशजी जितके आणि जसे करुणावान होते, तसेच व तितकेच विश्वासपरायणदेखील होते. ते कधीही व कुणाशीही अविश्वासाने व्यवहार करीतच नसत. कधीकधी त्यांचीही विश्वासपरायणता अगदी भोळेपणाच्या सीमेला जाऊन भिडत असे, पोहोचत असे.

एकदा जयप्रकाशांनी विनोबांना भूदानासंबंधी विचारले होते की, "आपल्या या अनुष्ठानात कधी काही दोष राहून जात नाही काय? या दोषांकडे 'डोळेझांक' करणे योग्य मानले जाऊ शकते काय?" यावर विनोबा म्हणाले होते, "हे अनुष्ठान उपासनेचे आहे. उपासनेमध्ये काही अंशी भ्रम असतोच ना! पण त्याच्या आधारेच तर उपासना चालू राहते ना? दुसरीकडे खजूर आणि ताडाची झाडे कापण्याचे अभियान अशुद्ध आहे, कारण त्यामध्ये व्यर्थ वृक्षांची हत्या होत आहे. आम्ही ही गोष्ट विसरता कामा नये की या सर्व वृक्षांचा कोणत्या न् कोणत्या प्रकारे उपयोग असतो. आमचे ब्रह्मचर्य सिद्ध करण्यासाठी आम्ही सर्व स्त्रियांची सार्वत्रिक हत्या करणे योग्य ठरेल काय?" पुढे जाऊन गीतेचा दाखला देत विनोबा म्हणाले होते, 'सर्वारम्भा हि दोषण घूमेनाग्निरिवावृताः ।' भूदान आंदोलनाचा उपसंहार करताना तर त्यांनी इथपर्यंत म्हणून टाकले की "भूदान बोगस, बिहार बोगस, और बाबा भी बोगस" यात केवळ व्यंग नाही, प्रामाणिक वस्तुकथन आहे, आणि प्रामाणिकपणाही आहे ही नम्रतेची जननी आहे. या विनयशीलतेतच विनोबांच्या विभूतीमत्त्वाची महानता निहित आहे. संत पुरुषांमध्ये बालसुलभ सरलता असते. काही संप्रदायामध्ये तर असे मानण्यात येते की कधी कुण्या महान व्यक्तीचे निर्वाण झाले, तर त्याला परमधामास नेण्यासाठी एक निर्दोष बालक

येऊन त्याचा हात धरून घेऊन जाते. निखळ बालवृत्ती ही महान विभूतींची ओळख असते.

नक्षलवाद्यांनी दिलेल्या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी, त्यांचे आव्हान स्वीकारून जयप्रकाशजी मुसहरीला गेले होते. एकदा त्यांना कुणीतरी सांगितले की नक्षलवाद्यांनी धमकी देऊन एका माणसाला हुसकून लावले आणि त्याची झोपडी जाळून टाकली. त्याचे वृद्ध आईबाप निराधार होऊन रस्त्यात पडले आहेत, आणि त्या सर्वांची उपासमारीने मरण्याची पाळी आहे. हे ऐकताच जयप्रकाश व प्रभावतीजींचे मन विरघळून गेले आणि ते दोघे लगेच धावून गेले. अशा विशुद्ध करुणेत आपले व दुसऱ्याचे हा विचारच मनात उभा राहत नाही. मनुष्यांची संकटे व दुःख पाहून गंगेच्या धारेसारखी ती सहजच वाहू लागते.

१९४२ सालच्या आंदोलनात पूज्य काका कालेलकर व पूज्य किशोरलाल-भाईसारख्या समान पवित्र पुरुषांनी देखील स्वातंत्र्याच्या लढाईत तोडफोड व गुप्तता याचे समर्थन केले होते. परंतु नंतर त्यांनी हे मान्य केले की ही त्यांची चूक होती.

या ठिकाणी हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की अशुद्ध आचरणात आपल्या वा समूहाच्या स्वार्थासाठी केल्या जाणाऱ्या अशुद्ध आचरणाची कधीच तुलना होऊ शकत नाही.

गांधींच्या आंदोलनात देखील तुरुंगात गेलेले काही आमच्यासारखे सत्याग्रहीसुद्धा, वेगवेगळ्या प्रकारचे भ्रष्टाचार करीत. तुरुंगाच्या कर्मचाऱ्यांना कर्तव्यभ्रष्ट करण्यास देखील ते मागेपुढे पाहत नसत. मला आठवते की विनोबा-समान महापुरुष सागरचे केशवलालजी खांडेकर आणि अकोल्याचे दादासाहेब पंडित अशी काही मोजकी माणसे सोडली तर सर्व सत्याग्रहींचा त्यात समावेश होऊ शकत होता. या व्यक्ती तर जन्मसिद्ध साधू पुरुषच होत्या. त्यांची साधुता-साधुत्व प्रयत्नपूर्वक मिळविलेले नव्हते. अशा व्यक्ती आमच्या आंदोलनाचे गौरवस्थान होते. परंतु त्या काळी केलेल्या आपल्या भ्रष्टाचाराची कडू फळे आज आम्ही स्वराज्यानंतरही भोगत आहोत. एकदा तर जयप्रकाशांनी देखील लपूनछपून जेलच्या बाहेर पत्र पाठविण्याचा प्रयत्न केला होता, परंतु प्रभावतीजींनी दृढतापूर्वक, निर्धाराने ते पत्र घेऊन जाण्यास नकार दिला होता. मला तर यात देखील त्यांच्या पतिप्रेमाचेच दर्शन होते.

जयप्रकाशजी एक वीर पुरुष होते. वीर पुरुषाचे हृदय उदार असते. उदार म्हणजे दर्यादिल, समुद्रासारखे ! असे हृदय ज्यात साऱ्यांचा समावेश होत असतो. या उदारतेचा जन्म व्यापक प्रेमातूनच होत असतो. दलित, पीडित, वंचित

मानवासाठी, त्यांचे हृदय व्यथित होत असे. सर्वच क्रांतिकारकांच्या हृदयात ही व्यथा खूपत असते. अशाप्रकारे मार्क्सवाद्यांचा क्रोध देखील या करुणेचेच अपत्य असते. खऱ्या अर्थाने धार्मिक तोच असतो, जो दुसऱ्याचे दुःख पाहून दुःखी होतो. 'दया धर्म का मूल है ।' अशाप्रकारची करुणा जयप्रकाशांच्या व्यक्तित्वाचा विकसित पोत नव्हता. त्यांचे संपूर्ण जीवनच अशाप्रकारच्या करुणेने ओतप्रोत भरलेले होते. त्यांच्या सर्व प्रतिकारांमध्ये आणि उपोषणामध्ये मूळ प्रेरणा या करुणेचीच होती. भूदान आंदोलनात सामील होण्यापूर्वी जयप्रकाशजींनी दिनशा मेहताच्या प्राकृतिक चिकित्साकेंद्रात जो उपवास केला, त्यामुळे त्यांची करुणा अधिक विशुद्ध व उदात्त रूपात प्रकट झाली, कारण त्याला प्रतिकाराचा गंधही नव्हता. शुद्ध करुणाच करुणा होती. अशा व्यक्तीला धार्मिक म्हणावे की नाही, ते आपणच ठरवावे ! जयप्रकाशजींनी अशा 'लेबलांची' कधी पर्वाच केली नाही !

❑❑

---

[अनुवाद : तारा धर्माधिकारी, जयप्रकाश 'गौरवग्रंथा'तून.]

# ८

# जयप्रकाशजी : एक संभाषण

*[२५ मार्च १९७७ च्या सुमारास दादा धर्माधिकारी हे म्हैसूर येथे श्रीपाद जोशी ह्यांच्याकडे विश्रांतीसाठी गेले होते. जयप्रकाश नारायण ह्या व्यक्तीविषयी आणि त्यांचे विचार व आंदोलन ह्याविषयी दादांचा दृष्टिकोन काय आहे हे जाणून घेण्यासाठी दादांची बातचीतवजा प्रदीर्घ मुलाखत श्रीपाद जोशी ह्यांनी ह्या मुक्कामात घेतली. ती मुलाखत नंतर शब्दबद्ध करून 'जयप्रकाश : एक संभाषण' ह्या नावाने किर्लोस्कर प्रकाशनाने १९७७ साली प्रसिद्ध केली. श्रीपाद जोशी ह्यांनीच त्या मुलाखतवजा संभाषणाचे शब्दांकन केले होते. त्यांत काही चूक राहू नये म्हणून ते दादांकडून वाचून, दुरुस्त करून घेतले होते. असे श्रीपाद जोशी यांनी नमूद केले आहे. ते संभाषण येथे उद्धृत करीत आहोत.]*

दादांना मी पहिला प्रश्न असा विचारला की, "जयप्रकाश नारायण ह्यांच्याशी तुमचा संबंध प्रथम केव्हा आला, कसा आला? तो कसकसा वाढत गेला?"

त्यावर दादा म्हणाले, जयप्रकाशांना मी पहिल्यांदा पाहिले ते १९३४ सालानंतर केव्हातरी. नागपूरला पु. य. देशपांडे ह्यांच्याकडे ते उतरले होते. काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या स्थापनेनंतर ते प्रथमच नागपूरला आले असावेत. त्या खाजगी बैठकीत मी त्यांचे पहिले भाषण ऐकले. त्यांच्यातील उत्कटतेचा, जिव्हाळ्याचा, बिनतोड युक्तिवादाचा माझ्या मनावर त्या वेळी चांगला ठसा उमटला. 'मजूर व मालक ह्यांच्यातील वाद ह्या वेळी उपस्थित करू नये, कारण त्यामुळे वर्गविग्रह निष्कारण वाढेल, आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात अडथळा निर्माण होईल,' असा जो आक्षेप मजूर चळवळीवर त्या वेळी काँग्रेसकडून घेतला जात होता त्याला उत्तर देताना जयप्रकाश म्हणाले होते, 'सवर्ण आणि अस्पृश्य ह्यांच्यातला वाद उपस्थित केल्यास स्वराज्यप्राप्तीच्या मार्गात अडथळा निर्माण होईल, असे जे लोक म्हणतात, त्यांचे म्हणणे काँग्रेसला मान्य नाही; आणि ते बरोबर आहे. जे वाद किंवा विरोध प्रत्यक्ष विद्यमान आहेत त्यांना मान्यता देण्याने राष्ट्रीय चळवळीत दुही उत्पन्न होईल, असे समजणे चूक आहे. हीच गोष्ट किसान

आणि मजूर ह्यांच्या प्रश्नांच्या बाबतीतही लागू करण्यात आली पाहिजे. त्यांचा प्रश्नही अस्पृश्यतानिवारणाइतकाच महत्त्वाचा आहे. त्यात वर्गविग्रहाचा प्रयत्न नसून वर्गनिराकरणाचीच भूमिका आहे.' अर्थात ह्या शब्दांतच ते बोलले असतील असे नाही; पण त्यांचे प्रतिपादन ह्या अर्थाचे होते, असे मला अजून स्मरते.

### 'व्हाय सोशलिझम?'

त्यानंतर मी त्यांचे 'व्हाय सोशलिझम?' (समाजवादच का?) हे पुस्तक वाचले. त्यात गांधींवर बरीच प्रतिकूल टीका आहे. पण त्या पुस्तकातलाही एक मुद्दा मला विशेष विचार करण्यासारखा वाटला. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ''समाजवादाचा मनुष्यस्वभावावर विश्वास नाही, असा आक्षेप घेतला जातो. पण तो बरोबर नाही. कारण किसान-मजुरांचे राज्य स्थापन झाल्यावर सत्ता व संपत्ती त्यांच्याच प्रतिनिधींच्या हातात केंद्रित होईल; आणि तरीही ते त्या दोन्ही साधनांचा दुरुपयोग करणार नाहीत, असा विश्वास समाजवादाच्या मुळाशी आहे. म्हणून मनुष्यस्वभावावर समाजवादाचा विश्वास नाही, हे म्हणणे बरोबर नाही.''

त्यानंतर त्यांचा-माझा संबंध असा फारसा आला नाही. मुंबईला अमर हिंद मंडळाच्या व्याख्यानमालेत भाषण द्यायला मी एकदा गेलो होतो. त्यावेळी प्रभाकर पाध्ये ह्यांच्या घरी योगायोगाने जयप्रकाश आणि प्रभावतीजी ह्यांची थोडा वेळ भेट झाली होती. त्या वेळी जयप्रकाशांनी लाल टोपी घातली होती. (नवविवाहित मधू — चंपा लिमयेही त्या वेळी तेथे होते.) ह्या भेटीत मला असे आढळून आले की जयप्रकाशांची समाजवादाविषयीची निष्ठा दृढ असली तरी इतरांच्या म्हणण्यातला मुद्दा समजून घेण्याची व स्वीकारण्याची त्यांची तयारी असे. त्याच्या आधी किंवा नंतर पुण्याला डॉ. दिनशा मेहता ह्यांच्या नेचर क्युअर क्लिनिकमध्ये त्यांचा उपवास चालू असताना भाऊ धर्माधिकारी मला त्यांना भेटायला घेऊन गेले होते. त्या भेटीत त्यांच्या सौजन्याची व ऋजुतेची छाप माझ्या मनावर पडली होती. अर्थात, हे सारे तुरळक व फुटकळ प्रसंग समजावयाचे.

### चांडिलचे सर्वोदय संमेलन

जयप्रकाशांशी खरा, जवळचा संबंध ते सर्वोदय आंदोलनात आल्यावरच जडला. बिहारमधील चांडिल ह्या गावी इ. स. १९५३ मध्ये सर्वोदय संमेलन भरले होते. त्या संमेलनापूर्वी विनोबा नुकतेच मोठ्या आजारातून उठले होते. त्या वेळी विनोबांच्या मुक्कामावर एक खासगी बैठक भरली होती. ह्या बैठकीला जयप्रकाश आपली लाल टोपी घालून आले होते. रंगूनच्या जागतिक समाजवादी परिषदेला

हजर राहून ते तेथे आले होते. त्या बैठकीत ते म्हणाले, "देशाची राजकीय– आर्थिक–सामाजिक वाटचाल सध्या थबकलेली दिसते. त्यातून कोणत्याही राजकीय पक्षाला वाट काढता येईल असे मला वाटत नाही. तुम्हा सर्वोदयी लोकांमध्ये मला आशेचा किरण दिसतो. तुमच्यात शक्ती आहे; पण धाडसाचा अभाव आहे !" त्या वेळी त्यांनी, सीतेच्या शोधासाठी श्रीरामाने लंकेला कूच केले, त्या प्रसंगाचा दाखला ह्या संदर्भात दिला. उडी मारून समुद्र कोण ओलांडू शकेल असा प्रश्न होता. सगळे वानर हिरमुसले होऊन बसले होते. तेव्हा जांबुवंत मारुतीला म्हणाला, "अरे, तुझ्या ठिकाणी ते सामर्थ्य आहे; पण तुला त्याचे भान नाही. ते भान तुला राहणार नाही, असा तुला शाप आहे. पण इतर कुणी त्याची आठवण करून दिल्यास ती जाणीव जागृत होईल असा उःशापही आहे. तुम्हा सर्वोदयवाल्यांची स्थिती अशीच काहीशी असावी असं मला वाटतं. तुमच्या ठिकाणी असलेल्या त्या सामर्थ्याचं भान, एक लहान माणूस असलो तरी, मी तुम्हाला करून देऊ इच्छितो. तुम्ही उठा आणि समस्यांना हात घाला !"

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी मांडला. ते म्हणाले, "भूदानामुळे राज्यांतर्गत छोटी-छोटी ग्रामराज्ये उभी राहतील. आणि असे अनेक सवते-सुभे निर्माण झाल्यास त्यायोगे एकराष्ट्रीयत्वाला बाध येईल, असा आक्षेप घेतला जातो. पण तो तर्कदुष्ट आहे. ही छोटी-छोटी ग्रामराज्यं गांधीजींनी कल्पिलेल्या सागरी वर्तुळासारखी–ओशियानोग्राफीक सर्कल्ससारखी–असतील. त्या सर्व वर्तुळांचे केंद्र एकच असते. त्यामुळे त्यांच्यांतून फुटीरवृत्ती वाढेल, ही भीती व्यर्थ आहे."

हा एक प्रसंग मला आठवतो.

चांडिलच्या सर्वोदय संमेलनात विनोबांचे जे अभूतपूर्व समर्पक प्रवचन झाले त्याला भूदान आंदोलनाचा जाहीरनामा असे नाव प्राप्त झाले. ते प्रवचन ऐकल्यावर जयप्रकाश स्वयंस्फूर्तीने उठून म्हणाले, "या प्रवचनानं माझ्या सगळ्या शंकांचं निरसन झालं आहे. माझ्या साऱ्या प्रश्नांना उत्तरं मिळाली आहेत. आता मी विनोबांचा शिष्य व अनुयायी बनलो आहे, असं मी निःसंकोचपणाने जाहीर करतो." तेव्हापासून ते भूदानाच्या चळवळीत सक्रियपणे भाग घेऊ लागले. त्यांच्यामुळे भूदान आंदोलनाच्या नेतृत्वाला फार मोठे ऐश्वर्य लाभले. विनोबा आणि जयप्रकाश मिळून एक संयुक्त विभूतिमत्त्व निष्पन्न झाले; आणि आमचे परस्परसंबंध अधिक घनिष्ठ झाले.

### जीवनदानाची उत्स्फूर्त घोषणा

त्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १९५४ साली बोधगया (बिहार) येथे सर्वोदय

संमेलन भरले. त्या वेळचा तो रोमांचकारी प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. त्या संमेलनात अगदी अकल्पितपणे जयप्रकाशांनी जीवनदानाची घोषणा केली. व्यासपीठावर जाण्यापूर्वी त्यांना स्वतःलाही त्या घोषणेची कल्पना नसावी. जयप्रकाशांच्या स्वभावाचे हे एक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या आयुष्यातील स्थित्यंतरकारी निर्णय असेच अंतःप्रेरणेने, अभावितपणे घेण्यात आलेले आहेत. भूदान चळवळीत आल्यावर त्यांनी समाजवादी पक्षाशी असलेला आपला संबंध तोडावा, असे टुमणे आमच्यापैकी अनेकांनी त्यांच्या मागे लावले, पण त्यांनी तसे काही केले नाही. ह्यासंबंधात त्यांच्याशी झालेला एक संवाद मला आठवतो.

त्यांच्या बिहारमधील सोखोदेवरा आश्रमाच्या सुरुवातीच्या काळातली ही गोष्ट आहे. त्यांच्याबरोबर तिथे फिरत असता त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातील हे रहस्य मला सांगितले. ते म्हणाले, "आतापर्यंत आयुष्यातील कुठलाही निर्णय मी साधकबाधक विचार करून आणि लाभालाभाचा हिशेब मांडून घेतलेला नाही. माझ्या मनात तो नकळत शिजत असतो; आणि केव्हातरी असा क्षण येतो की तो परिणत स्वरूपात बाहेर पडतो."*

भूदानाच्या चळवळीत जयप्रकाश अतिशय संकोचाने, लाजत लाजत आले. भूदान आंदोलनाचे एक अद्वितीय प्रवक्ते व तत्त्वदर्शक धीरेंद्र मुजुमदार हे नेहमी आर्थिक परिस्थितीचे वर्णन–विश्लेषण करताना हुजूर व मजूर या दोन शब्दांचा प्रयोग करीत; आणि त्या दोघांच्याही जीवनाचे मोठे विशद व रसाळ वर्णन करीत. ते ऐकून जयप्रकाशांना सहजच वाटे की धीरेनदाच्या हुजुराचे वर्णन आपल्याला लागू पडते. (कारण त्यांचे जीवन मोठे नीटनेटके व टापटिपीचे असे. आजही आहे.) म्हणून आपण या सर्वोदयवाल्यांच्या पंक्तीला बसण्याच्या योग्यतेचे नाही, असे त्यांना वाटे. पण हे काम तर आपल्याला करायचे आहे. तेव्हा काय करावे? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राही. अशा वेळी मी त्यांना माझा स्वतःचा दाखला देत असे. त्या वेळी मी चहा घेत असे; आणि सर्वोदयी मंडळीत फक्त माझ्यासाठीच काय तो, अनुकंपा म्हणून, चहा तयार करण्यात येई. माझ्या सहवासामुळे हळूहळू जयप्रकाशांची भीड चेपली; आणि धीरेनदाच्या

---

* कवी किंवा कलाकार ह्यांच्या मनात त्याची कलाकृती अशीच आकार धारण करीत असते काय?— माझ्या मनात विचार येऊन गेला; आणि मला आठवले की जयप्रकाश तरुणपणी कवीही होते. अमेरिकेत असताना त्यांनी इंग्रजीत कविता केल्या होत्या. एवढेच नव्हे तर इंदिरा गांधींच्या नजरकैदेत असताना अगदी अलीकडे त्यांनी केलेली ('स्वगत'मध्ये असलेली) कविता किती सुंदर आहे ! जणू त्यांची जीवनदृष्टीच तिच्यात व्यक्त झाली आहे !

— श्रीपाद जोशी

आश्रमातही त्यांना साधेपणाबरोबरच सुरूचिपूर्ण पद्धतीने, मोकळेपणाने राहता येऊ लागले.

**जयप्रकाशांची विनम्रता**

ह्या संदर्भात मला आणखी एक प्रसंग आठवतो. त्यांच्या सोखोदेवरा आश्रमात त्यांच्याच इच्छेवरून अखंड सात दिवस माझी भाषणे ठेवण्यात आली होती. 'सर्वोदयाची भूमिका' हा त्या भाषणमालेचा विषय होता. सर्वोदयामध्ये समाजवादाचे खंडन नसून त्याची परिपूर्ती कशी आहे, आर्थिक संयोजन, क्रांतीची प्रक्रिया इत्यादी बाबतीत सर्वोदय हे पुढचे पाऊल कसे आहे, ह्याचे विवेचन मी त्या वेळी केले. त्या भाषणांना जयप्रकाश एखाद्या सामान्य विद्यार्थ्याच्या भूमिकेतून नियमितपणे उपस्थित राहत. वस्तुतः ह्या क्षेत्रातील त्यांचे ज्ञान माझ्यापेक्षा कितीतरी अधिक होते. परंतु त्यांची विनम्रताही अद्‌भुत होती. (अर्थात त्यांनी समाजवादावर तेथे जी भाषणे दिली त्यांना मीही आवर्जून बसत असे.) त्या वेळी विमल* (कु. विमलाताई ठकार) माझ्याबरोबर होती. त्या काळात बिहारमध्ये तेथील लोक विनोबांनंतर विमलला मानीत असत. हळूहळू प्रभावतीजी आणि विमल ह्यांच्यातील स्नेहभाव वृद्धिंगत होत गेला; आणि अशा प्रकारे आमचा घरोबा वाढत गेला.

**मराठी माणसाबद्दल आपुलकी**

जयप्रकाश आणि प्रभावतीजी ह्यांना मराठी माणसांबद्दल विशेष आपुलकी वाटे, हेही कदाचित आमच्या घनिष्ठ स्नेहाचे एक कारण असेल. मराठी लोकांविषयी त्यांना आत्मीयता व आदर वाटण्याची दोन प्रमुख कारणे होती : (१) मराठी लोकांच्या राहणीतील आटोपशीरपणा, स्वच्छता, टापटीप, व्यवस्थितपणा, हिशेबीपणा, काटकसर वगैरे गुणांचे फार कौतुक त्यांना वाटे. महाराष्ट्रीय जेवणाबद्दलही त्यांना भारी कौतुक. अगदी थोड्या पैशात रुचकर जेवण तयार करण्याची किमया मराठी लोकच करू जाणोत, असे ते म्हणत. (२) महाराष्ट्रातील स्त्री जीवन : स्त्री स्वातंत्र्यातील सहजता त्यांना मराठी लोकांच्या जीवनात दिसून येई. प्रभावतीजी सेवाग्रामला राहिल्यामुळे त्यांना मराठी स्त्रीचे जीवन जवळून पाहता आले. त्यांना

---

* कु. विमलाताई ठकार ह्या आज जागतिक कीर्तीच्या अध्यात्मवादिनी विदुषी म्हणून प्रख्यात आहेत. देशात व परदेशात त्यांचे असंख्य भक्त आहेत. त्यांच्या मार्गदर्शनासाठी त्या दरसाल सहा-आठ महिने परदेशात जातात. दादांच्या त्या मानसकन्या. त्याही भूदानात बराच काळपर्यंत कार्य करीत होत्या.

— श्रीपाद जोशी

महाराष्ट्रीय स्त्री आदर्श वाटे. तिच्यात सुधारणेला वाव असल्याचे त्या मान्य करीत; पण एकूण भारताचा विचार करता त्यांना मराठी स्त्रीच अधिक अनुकरणीय वाटे. पुढे विमल, कुसुम, निर्मला (देशपांडे भगिनी) वगैरे मुलींच्या संपर्कात आल्यामुळे मराठी स्त्रीची प्रतिमा जयप्रकाश व प्रभावतीजी ह्यांच्या मनात उजळतच गेली.

प्रभावतीजी ह्या मूलतःच काहीशा सोवळ्या वृत्तीच्या (प्युरिटन) होत्या. पण जयप्रकाश रसिक आहेत. त्यांना कलापूर्ण जीवनाची आवड आहे. महाराष्ट्राच्या जीवनात कला आणि उपयुक्तता ह्यांचा चांगला समन्वय साधला आहे, असे त्यांना वाटते. हा समन्वय इतरत्रही साधला जावा, अशी त्यांची इच्छा आहे. विनोबांच्या कल्पनेप्रमाणे आपल्याला साध्या जीवनाचा प्रत्यक्ष प्रयोग करता यावा, अशी त्यांची सतत धडपड असे. त्याबाबतीत मराठी लोकांचे जीवन आपल्याला मार्गदर्शक ठरू शकेल असे त्यांना वाटे. योगायोगाने त्यांच्यावर अलोट प्रेम करणाऱ्यांमध्ये पटवर्धन बंधू, ना. ग. गोरे, एस. एम., मधू लिमये वगैरे मराठी मंडळींचा भरणा विशेष होता.''

**गांधींचा साधेपणा**

''महाराष्ट्रीयांचा साधेपणा व गांधीचा साधेपणा हे दोन्ही एकाच प्रकारचे म्हणता येतील काय?'' मी दादांना विचारले.

दादा म्हणाले, ''नाही. त्यात बराच फरक आहे. मराठी माणसाचा साधेपणा हा त्याचा जन्मजात गुण आहे. त्यासाठी त्याला काही विशेष प्रयत्न करावा लागत नाही. ह्याच्या उलट गांधींचा साधेपणा हा जाणीवपूर्वक स्वीकारलेला, बाणवलेला गुण होता. त्यात एक प्रकारची ऐट, शान होती. गबाळेपणा नव्हता. त्यांचा पंचा साधाच पण स्वच्छ, झुळझुळीत, नीटनेटका असे. त्यांचे रूबाबदार घड्याळही त्यांच्या साधेपणाचाच भाग बनले होते. हा असला सुरूचिपूर्ण, कलायुक्त, साधेपणा जयप्रकाशजींच्या प्रकृतीशी मेळ राखणारा होता. ह्या साधेपणाच्या बाबतीत गांधी व जयप्रकाश ह्यांच्यात खूपच साम्य होते. प्रभावतीजींना हे साम्य मनापासून आवडे. तरीपण हिंसा-अहिंसेच्या प्रश्नावर गांधी व जयप्रकाश ह्यांच्यात खूपच मोठी दरी प्रारंभिक काळात होती. ती कालांतराने भरून निघाली.''

**नेहरू व जयप्रकाश**

''पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्याशी जयप्रकाशजींचे संबंध फारच स्नेहाचे होते, असे म्हणतात. ह्या बाबतीत तुम्हांला आपले काही अनुभव सांगता येतील काय?'' मी विचारले.

''एक-दोन अनुभव ह्या संदर्भात सांगता येण्यासारखे आहेत.'' दादा म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी एकदा जयप्रकाश मला आग्रहाने नेहरूंना भेटायला घेऊन गेले. तत्पूर्वी त्यांनी नेहरूंना माझ्याविषयी सांगितले असावे. त्यामुळे नेहरूंनी मोठ्या आस्थेने माझे स्वागत केले. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत जयप्रकाश जे काही सुचवतील ते करण्यास पंडितजी व पंतजी तयार होते. ह्याचा अर्थ एवढाच की, जयप्रकाश व पंडितजी ह्यांच्यात मतभेद असूनही त्यांना एकमेकांविषयी विश्वास व आदर वाटत होता. पण दुर्दैवाने त्या वेळी इतर कारणांमुळे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटू शकला नाही.

नेहरू व जयप्रकाश ह्यांचे मतभेद अनेकदा फार उग्र भाषेत प्रकट होत. १३ ऑगस्ट १९५५ रोजी पाटण्यात विद्यार्थ्यांवर गोळीबार झाला. त्या वेळी त्या गोळीबाराविरुद्ध पंडित नेहरूंना संबोधून जयप्रकाशांनी काढलेले पत्रक फारच कडक होते. पुष्कळदा असे पत्रक काढण्यापूर्वी मला ते दाखवीत. मी माझे मत त्यांना स्पष्ट शब्दांत सांगे. परंतु माझ्या विवेकापेक्षा त्यांचा उमाळा अधिक जोरदार असे. त्या वेळी ते सामान्य जनतेचे प्रतिनिधी असत. एकदा त्यांनी संतापाच्या भरात पंडितजींना 'प्रिय भाई' असे नेहमीप्रमाणे संबोधित करण्याऐवजी 'डियर सर' हे औपचारिक संबोधन पत्रामध्ये वापरले. त्याचे पंडितजींना इतके वाईट वाटले की त्यांनी जयप्रकाशांना बोलावून घेतले आणि भरल्या गळ्याने ते त्यांना म्हणाले, ''मतभेद झाला म्हणून काय असं लिहायचं?''

असा होता त्यांचा मधुर स्नेहसंबंध !

असाच आणखी एक प्रसंग आठवतो, चीनने भारतावर आक्रमण केले त्या वेळचा ! त्या दिवशी जयप्रकाश आणि मी काशीला होतो. पंडितजींचे आकाशवाणीवर भाषण झाले. त्यांचा आवाज ऐकून जयप्रकाशांच्या डोळ्यांना पाणी आले. ते म्हणाले ''ह्या वेळी आपण सर्वांनी पंडितजींची इभ्रत राखली पाहिजे. देशाचे पंतप्रधान म्हणून तर त्यांचे स्थान महत्त्वाचे आहेच; पण वैयक्तिक स्नेहाचाही ह्या भावनेत फार मोठा वाटा आहे.''

मी त्यांना विचारले, ''तुम्ही ह्या बाबतीत काय करू शकणार?''

जयप्रकाश म्हणाले, ''चिनी आक्रमणाचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करण्याची जबाबदारी आपण सर्वोदयवाद्यांनी उचलावी, असे मला वाटते.'' अहिंसक मार्गाने प्रतिकार करणाऱ्यांची एक आघाडी तयार करावी, जेथे प्रत्यक्ष लढाई चालू असेल तेथेही त्या आघाडीने प्रतिकार करावा, आणि युद्धभूमीच्या पिछाडीच्या भागातही जनतेला अहिंसक प्रतिकारासाठी तयार करावे. लोकांचे मनोधैर्य टिकून राहील अशी खटपट करावी, अशा स्वरूपाची जयप्रकाशांची

योजना होती. ती योजना घेऊन सर्व सेवा संघाचे सिद्धराज ढड्ढा ह्यांच्यासह मी विनोबांकडे गेलो. त्या वेळी ते बंगालमध्ये महाराजपूर ह्या ठिकाणी होते. त्यांनी ती योजना ऐकून घेतली; परंतु तिला आपली मान्यता मात्र दिली नाही.

**पंतप्रधानकीस नकार**

त्यानंतरची आणखी एक घटना. जयप्रकाश व मी त्या वेळी दिल्लीला होतो. चिनी आक्रमणाच्या वेळी भारताचा जो फजितवडा झाला होता तो लक्षात घेता नेहरूंनी ह्यापुढे पंतप्रधान राहू नये, ते पंतप्रधानपदावरून स्वेच्छेने दूर झाले नाहीत तर त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव आणावा, अशा प्रकारची हालचाल दिल्लीत चालू होती. परंतु नेहरूंच्या नंतर कोणी पंतप्रधान व्हावयाचे? पुरुषोत्तमदास त्रिकमदास, अशोक मेहता, वगैरे मंडळींना नेहरूंनंतर जयप्रकाशांनी पंतप्रधान व्हावे, असे वाटत होते. म्हणून त्यांनी जयप्रकाशांशी दोनदा बोलणी केली. परंतु नेहरूंची जागा घेण्यास जयप्रकाशांनी साफ नकार दिला. आपल्या ह्या निर्णयाची त्यांनी जी कारणे दिली त्यांपैकी तीन मला अजूनही स्मरतात. ते म्हणाले, "पंडितजी अडचणीत सापडले असता त्यांना दूर सारून त्यांची जागा घेणे हे अत्यंत नीचपणाचे ठरेल. दुसरी गोष्ट अशी की, नेहरूही अहिंसेला बांधलेले असले तरी अहिंसेशी माझी बांधिलकी ही त्यांच्या बांधिलकीपेक्षा अगदीच वेगळी आहे. ती बांधिलकी घेऊन मी पंतप्रधान बनूच शकत नाही. तिसरी गोष्ट अशी की, ते माझे वैयक्तिक मित्र आहेत. ह्या वेळी त्यांना पदच्युत करण्याऐवजी सर्वांनीच त्यांना पाठिंबा दिला पाहिजे, असे मला वाटते."

**पंडितजींना पाठिंबा**

ह्याच सुमारास जयप्रकाशांच्या बरोबर मी पंडित नेहरूंना त्यांच्या सचिवालयात भेटलो. अर्थात काम जयप्रकाशांचे होते. मी फक्त त्यांच्या सोबत उपस्थित होतो. चीन-भारत तंटा सोडवण्यासाठी रशियन पुढाऱ्यांचा किंवा इतर कोणाचा तरी लवाद भारताने स्वीकारावा किंवा चीनच्या काही अटी मान्य करून चीनशी तडजोड करावी, असे दोन मार्ग सुचविण्यात आले होते. अमेरिकेच्या मदतीने चीनशी झुंज द्यावी, असे मानणारेही काही लोक होते. मात्र अमेरिकेची मदत मिळवायची असेल तर पाकिस्तानला काश्मीर देऊन त्याच्याशी समेट करणे भाग होते. काश्मीरचा सौदा केला असता तर अमेरिकेची मदत मिळाली असती. हा मार्ग जयप्रकाशांना मान्य नव्हता. चीनशी तडजोड करावी या मताचे ते होते. पंडितजींचेही तेच मत होते. पण ते म्हणाले, "मैं ऐसा कहूँगा तो पार्लमेंट मुझे मुँह

नहीं खोलने देगी।'' म्हणून जयप्रकाशांनीच तो पर्याय लोकांना समजावून द्यावा, असे पंडितजींनी सुचवले. त्यांनी जयप्रकाशांना असे आश्वासन दिले की, 'अमेरिकेचे वर्चस्व स्वीकारून मी चीनचा प्रतिकार करणार नाही, एवढे निश्चित. अमेरिकेने शस्त्रास्त्रे देण्यासाठी पाकिस्तानला काश्मीर देऊन टाकण्याची अट घातली तर ती अट मी कधीही मान्य करणार नाही. तशी पाळीच आली तर मी चीनशी लाठ्या-काट्यांनी लढेन !'

ह्या घटनेनंतर चीनला अक्षयचीन (अक्साईचीन) देऊन टाकून त्याच्याशी तडजोड करावी, असा जाहीर प्रचार जयप्रकाशजी करू लागले. त्याबद्दल त्यांच्यावर टीकेची झोड उठली. वस्तुतः त्यांच्या ह्या मताला पंडितजींचा पाठिंबाच होता. परंतु ह्या बाबतीत पंडितजींशी झालेले आपले संभाषण जयप्रकाशांनी कधी जाहीर केले नाही.

**पंडितजींकडून प्रतिसाद**

जयप्रकाशांनी पंडितजींवर असे एकनिष्ठ प्रेम केले. त्यांच्या स्नेहाखातर बदनामीही सहन केली. पंडितजींविषयी त्यांना वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे जहाल समाजवाद्यांमध्ये ते अप्रिय झाले. ह्या त्यांच्या स्नेहाचे प्रतिफल त्यांना काय मिळाले? पंडितजींनीही त्यांच्यावर असेच उत्कट प्रेम केले काय? मला स्वतःला ह्याविषयी शंका आहे. कदाचित इतरही अनेकांना तशीच शंका असेल. पूर्वी उल्लेख केलेल्या जयप्रकाश चरित्राचे लेखक ॲलन अँड वेंडी स्कार्फ यांनी तर यापुढे जाऊन स्वतःचे स्थान मजबूत करण्यासाठी पंडितजींनी जयप्रकाशांचा वापर केला, त्यांची फसवणूक केली, असा स्पष्ट शब्दांत आरोप केला आहे. उदाहरणार्थ, एके ठिकाणी पंडितजींविषयी ते म्हणतात,

"This talent of political self-preservation and his firmness in the pursuit of power for himself led him to play a watching game with Jaya Prakash (पृष्ठ २०५)." पुढच्याच पानावर ते लिहितातः "For his part Jaya Prakash had a naive trust in Nehru, the result of it being that no other man in his life, under a pose of affection, so successfully deceived him or damaged his career."

स्कार्फ दांपत्यांच्या ह्या उद्‌गारांविषयी दादांची प्रतिक्रिया मी विचारली असता ते मूल्यमापन मान्य नसल्याचे त्यांनी मला सांगितले. तरीपण त्यासंबंधी त्यांचे अधिक खुलासेवार मत कळावे म्हणून मी त्यांना ता. २५-४-७७ रोजी एक पत्र लिहून विचारणा केली. त्या पत्राला दादांनी ता. २७-४-७७ रोजी मुंबईहून उत्तर पाठविले. त्यात ते लिहितात,

"ॲलन अँड वेंडी स्कार्फ ह्यांनी आपल्या पुस्तकात जयप्रकाशांच्याबद्दल जे लिहिले आहे ते बव्हंशी खरे आहे. जयप्रकाशांच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण आणि मूल्यमापन ह्या पुस्तकात फार चांगले व सुंदर भाषेत केलेले आहे, ह्यात शंका नाही. परंतु गांधी, जवाहरलालजी व विनोबा ह्यांच्याविषयीचे त्यांचे उद्‌गार बरेच चुकीचे व गैरसमज निर्माण करणारे आहेत. ह्याचे कारण असे की त्या त्या वेळच्या परिस्थितीचे नीट आकलन लेखकांना झालेले नाही. हा दोष त्यांच्या संस्कारांचा आहे. ज्या वातावरणात ते वाढले त्या वातावरणात आणि आपल्या इकडील वातावरणात बराच फरक आहे. म्हणून काही घटना व थोर व्यक्तींचे वर्तन ह्यांवरून ह्या पुस्तकात काढलेले निष्कर्ष लेखकाच्या दृष्टीने स्वाभाविक असले तरी तर्कदुष्ट व विसंगत आहेत. वास्तविकता अगदी निराळी आहे.

"मी तुम्हाला सांगितले होते की १४ नोव्हेंबर १९७६ रोजी पाटण्याला जयप्रकाश जवाहरलालजींच्या चित्रासमोर उदबत्त्या लावून चित्राला हार घालून बसले होते; आणि जवाहरलालांचा व आपला संबंध कसा होता ह्याचे वर्णन सद्‌गदित होऊन करीत होते. बोलता बोलता त्यांचा कंठ दाटून येत होता. जयप्रकाशांच्या बाजूने केवढा जिव्हाळा व आपुलकी होती आणि जवाहरलालजी त्यांच्याशी एखाद्या निगरगट्ट, हृदयहीन मुत्सद्याप्रमाणे वागले हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. लेखकांना तसा निष्कर्ष काढावासा वाटला ह्याला कारण त्यांचे अज्ञान व संस्कार. गांधी व विनोबा ह्यांच्या बाबतीतही असाच प्रमाद घडला आहे. इमर्सनने म्हटले होते, 'टुबी ग्रेट इज टुबी मिसअंडरस्टुड'. ते अनेक महापुरुषांच्याबाबतीत खरे ठरले आहे."

स्कार्फ दांपत्याने काढलेल्या निष्कर्षाशी अनेक भारतीय विचारवंत सहमत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कदाचित इतक्या परखड शब्दांत त्यांनी विचार मांडले नसतील. परंतु आपल्या कन्येला आपल्या गादीचा वारसा मिळावा ह्यासाठी जवाहरलालजींनी जी खटपट केली (पाहा : श्री. दुर्गादास यांचे 'इंडिया : फ्रॉम कर्झन टु नेहरू अँड आफ्टर,' पृ. ३६८-७२), ती पाहता आपली सत्ता टिकविण्यासाठी त्यांनी इतरांचा वापर केलाच नसेल असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही.

## जयप्रकाशांवरील हल्ला

पंडितजीसंबंधी चर्चा चालू असता दादांना अचानक जयप्रकाशांवरील हल्ल्याशी संबंधित काही घटना आठवल्या. ते म्हणाले,

"जयप्रकाशजींचे आंदोलन (१९७४ चे) सुरू झाल्यानंतरची एक घटना मला

आठवते. ग्वाल्हेरच्या एका ज्योतिष्याने असे सांगितले होते की, '१९७५ च्या फेब्रुवारीपर्यंत जयप्रकाशांच्या जिवाला धोका आहे. त्यांच्यावर मारेकरी घालण्यात येईल. त्या मारेकऱ्याची नेमणूकही झाली आहे.' आम्ही उज्जैनला असताना अतींद्रिय ज्ञान असलेल्या दोन गृहस्थांनी मला सांगितले की, 'एक माणूस कट्यार घेऊन येणार आहे; आणि अमुक तारखेच्या सुमारास जयप्रकाशांवर हल्ला करणार आहे.' मी जयप्रकाशांना ह्या दोन्ही गोष्टी सांगितल्या, तेव्हा ते मुळीच अस्वस्थ न होता, अगदी सहजपणे म्हणाले, 'मैं तो भीडमें ही रहता हूँ। कौन किस वक्त मेरे पास आयेगा और कौन मुझे पकड लेगा, नहीं कहा जा सकता। सार्वजनिक जीवन में ये सारी बातें अंगभूत हैं। जिन्होंने आपको सूचित किया, उन्हें धन्यवाद है। जैसी नियति होगी, होगा!' असे ते आपल्या प्राणांच्या बाबतीत निरिच्छ होते.''

**प्राणांवर बेतले, पण...**

''जयप्रकाशांसारख्या राजकीय पुढाऱ्याच्या बाबतीत प्राण सदैव धोक्यात असणे, ही तर गृहीत धरलेलीच गोष्ट असते. तरीपण ह्या संबंधात तुम्ही अधिक काही सांगू शकाल काय?'' मी दादांना विचारले.

''तसे ठामपणे काही सांगता येणार नाही. कारण त्या घटनांची तपशीलवार छाननी कधी करण्यात आली नाही. उदाहरणार्थ, अलीकडेच जयप्रकाश हरियाणात गेले असता कुणा एका अपरिचित इसमाने त्यांना कडकडून मिठी मारली. त्या धृतराष्ट्राच्या मिठीने जयप्रकाश बहुधा स्वर्गवासीच झाले असते. पण नुसत्या बरगड्या दुखावण्यावर निभावले. अर्थात ही घटना सहज योगायोगाने घडली की ती जाणूनबुजून आखण्यात आली होती, हे सांगणे कठीण आहे. स्वतः जयप्रकाश मात्र असल्या घटनांना कधी फारसे महत्त्व देत नाहीत किंवा त्यांचा गाजावाजा करीत नाहीत.''

**तो गाजलेला हल्ला!**

४ नोव्हेंबर १९७४ रोजी पाटण्याला जयप्रकाशजींच्या प्रचंड मिरवणुकीवर पोलिसांनी जो हल्ला चढविला होता व ज्यात जयप्रकाशांनाही मार बसला होता, त्या कृत्याचा सर्व सज्जनांनी निषेध केला होता, त्याच्या संबंधी मी दादांना विचारले असता ते म्हणाले,

''बिहारचे पोलीस जयप्रकाशांच्या सभा-मोर्चांवर हात उचलणार नाहीत याची खात्री असल्यामुळे तेथील व्यवस्था राखण्याचे काम राज्य राखीव

पोलिसांकडे (एस.आर.पी.कडे) सोपविण्यात आले होते. जयप्रकाशांच्या संरक्षणाची जबाबदारी ज्या बिहारी पोलिसावर सोपविण्यात आली होती त्याने हल्ला करणाऱ्या राखीव पोलिसाला 'यह जयप्रकाश साहब हैं, इन्हें मत मारो,' असे सांगून आपला बिल्ला त्याला दाखविला; पण त्या शिपायाने तो बिल्ला फेकून दिला; आणि जयप्रकाशांवर हल्ला केला ! सुदैवाने त्या वेळी नानाजी देशमुख जयप्रकाशांजवळ होते. त्यांनी तो वार स्वतःवर झेलला. त्यायोगे नानाजींचा हात मोडला, पण जयप्रकाश थोडक्यात बचावले. त्यांना वाचवणाऱ्या बिहारी पोलिसावरही अठरा वार बसले !! त्या दिवशी जयप्रकाश मारलेच गेले असते; पण योगायोगाने वाचले. त्या पोलिसाच्या अंगावरील वळ मी स्वतः पाहिले होते. तो सांगत होता. 'माझं हे म्हणणं तुम्ही टेप करून घ्या. त्यापायी माझी नोकरी गेली तरी मला त्याची पर्वा नाही!' ह्यावरून जयप्रकाशांविषयी पोलिसांची निष्ठा दिसून येते.''

## जयप्रकाशांची काही स्वभाववैशिष्टये

''जयप्रकाशांच्या स्वभावातील तुम्हांला जाणवलेली वैशिष्टये कोणती?'' मी विचारले.

दादा म्हणाले, ''हाती घेतलेल्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून देणे, मग त्यासाठी आपल्या जिवाचीही पर्वा न करणे, हे जयप्रकाशांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हे काम वेगळ्या वेळी वेगवेगळे असते. त्यामुळे त्यांच्यावर चंचलतेचा आरोप केला जातो. पण त्या-त्या क्षणी त्यांना तेच कार्य महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांच्या राजकीय जीवनात सुसंगती नसावी असा भास काही लोकांना होतो. दुसरी गोष्ट अशी की, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, त्यांनी आपल्या आयुष्यात कुठलाही निर्णय साधक-बाधक विचार करून किंवा लाभालाभांचा हिशेब मांडून घेतलेला नाही. ज्या वेळी जी गोष्ट लोकहिताची वाटली, जनतेवर आलेले संकट दूर करण्यासाठी ती हाती घेणे निकडीचे आहे, असे त्यांना वाटले, त्या वेळी त्यांनी ती हाती घेतली. तसे करताना आपल्या पक्षाशी किंवा सहकाऱ्यांशी त्यांनी विचारविनिमय केलेला असतोच, असे नाही. त्यामुळेही काही गैरसमज निर्माण होत आले आहेत. इतर सर्व गोष्टींपेक्षा त्यांनी लोकहित हे प्रधान मानले; आणि ते साधण्यासाठी ज्या गोष्टी करणे आवश्यक वाटले, त्या त्यांनी केल्या. सर्वसामान्य राजकीय पुढाऱ्यांच्या वृत्तीपेक्षा ही वृत्ती अगदी वेगळ्या प्रकारची म्हणावी लागेल.

''कुठलेही आव्हान समोर उभे राहिले की, जयप्रकाश स्वतःला आवरू शकत

नाहीत. प्राणपणाने ते त्या आव्हानाचा स्वीकार करतात, त्याला सामोरे जातात. तरुणपणी तसे करताना ते हिंसा-अहिंसेचा विचार करीत नसत. परंतु सर्वोदयाचा मार्ग स्वीकारल्यानंतर कोणतेही आव्हान स्वीकारायचे तर शांतीखेरीज दुसरा मार्ग नाही, हे त्यांना पूर्णपणे पटले आहे.

**दुटप्पीपणा नाही**

"आत एक व बाहेर एक, असला मुत्सद्यांचा दुटप्पीपणा जयप्रकाशांमध्ये सुतराम नाही. एखाद्या बाबतीत मतभेद झाला की ते सांगतात, 'मला ही गोष्ट मनातून पटत नाही. ती मी वरपांगी कशी मान्य करू?' पक्षाच्या शिस्तीत हा सरळपणा बसत नाही. त्यामुळे ते राजकीय पक्षांच्या चौकटीत बसू शकले नाहीत."

जयप्रकाशांच्या स्वभावातली एक गमतीदार गोष्ट दादांना अचानक आठवली; आणि तसा तिचा संदर्भ प्रस्तुत नसताही ती त्यांनी सांगून टाकली. ते म्हणाले, "स्वतःला आवडणारी खाद्यपेयं इतरांना खाऊ-पिऊ घालणे हा जयप्रकाशांचा एक आवडता छंद आहे. काही वर्षांपूर्वी आम्ही बिहारमधून मोटारीने प्रवास करीत होतो. वाटेत एक गाव लागले. तिथले मोतीचुराचे लाडू प्रसिद्ध आहेत. जयप्रकाशांनी मोटार थांबवून लाडू विकत घेतले; आणि सर्वांना तृप्त होईपर्यंत खाऊ घातले. त्यातच जणू त्यांचा सारा आनंद सामावला होता !"

"याच सुमारास जयप्रकाशांना भारताचे राष्ट्रपती बनवण्याचा बूट निघाला होता. गोविंदराव देशपांडे आमच्याबरोबर होते. त्यांनी जयप्रकाशांना विचारले, 'राष्ट्रपती बनायला काय हरकत आहे?' त्यावर जयप्रकाश म्हणाले, 'कोणताही मानमरातब स्वीकारावा, अशी माझी अंतःप्रेरणाच नाही. कुठल्याही मोठ्या स्थानाचे मला आकर्षण वाटत नाही. दुसरी गोष्ट अशी की, जोपर्यंत काँग्रेसची राजवट चालू आहे तोपर्यंत सत्ताधारी पक्षाशी माझे खटकेच उडत राहतील; किंवा सत्तेसाठी चालणाऱ्या त्यांच्या साठमारीत मला नाइलाजाने सामील व्हावे लागेल. हे सारे मला न मानवणारे, न पटणारे आहे."

**लाभालाभौ जयाजयौ...**

जयपराजयाच्या भावनेला जयप्रकाशांच्या अंतःकरणात मुळीच स्थान नाही. एखादे कार्य न साधल्यास तेवढ्यापुरते ते खट्टू होतील; पण जय मिळाला नाही म्हणून त्यांचा कधी हिरमोड होत नाही. अपयश म्हणजे पराजय असे त्यांनी कधी मानले नाही. त्यामुळे अमुक गोष्ट साध्य झालीच पाहिजे, असा त्यांचा आग्रह

नसतो. एका पद्धतीने एखादी गोष्ट साध्य झाली नाही तर दुसरी पद्धत अवलंबिण्याची त्यांची तयारी असते. अयश स्वीकारायला आणि त्या अपयशाची कारणे समजून घ्यायलाही ते मोकळ्या मनाने तयार असतात. समाजातला शेवटचा, तळाचा, माणूस वरच्या माणसाच्या बरोबरीला आला पाहिजे, हा त्यांचा ध्यास आहे.

अंत्योदय हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र. अस्पृश्य, निग्रो, दलित राष्ट्रे ह्या सर्वांचा उद्धार कसा होईल, ह्याचीच काळजी ते जन्मभर करीत आले आहेत. मात्र हा उद्धार इतरांनी करून होणार नाही, त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्यातूनच तो झाला पाहिजे, असे ते मानतात. त्या कामी आपल्याकडून होईल तेवढी मदत आपण करावी, असे त्यांना वाटते. ह्या ध्येयाला त्यांच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे.

ते कम्युनिस्ट होते. काँग्रेस सोशलिस्ट पक्षाचे तर ते आधारस्तंभ होते; त्यानंतर ते प्रजा समाजवादी झाले आणि शेवटी सर्वोदयात सामील झाले. याचे कारण अंत्योदयाचा एक मार्ग कुंठित झाल्याचा अनुभव आल्यानंतर ते दुसऱ्या मार्गाकडे वळले. ते मतवादी नाहीत, कोणत्याही मताचा आग्रह त्यांनी बाळगला नाही. सिद्धान्तापेक्षा ते क्रांतीला अधिक महत्त्व देतात. आपल्या समग्र क्रांतीचा प्रयोग त्यांनी प्रामुख्याने बिहारमध्ये केला. तेथे त्यांना तरुणांकडून भरपूर पाठिंबा मिळाला. परंतु सत्ता व संपत्ती ह्यांनी एकवटून प्रतिकार केल्याने त्यांचे काही चालले नाही.''

### संघटन-शक्तीचा अभाव

''एवढे गुण असूनही एखादा मजबूत पक्ष बांधण्याच्या बाबतीत जयप्रकाश यशस्वी का झाले नाहीत?'' मी विचारले.

दादा म्हणाले, ''जयप्रकाशांजवळ जेवढे विचार-धन आहे त्यामानाने त्यांच्याजवळ संघटना चातुर्य नाही. इतरांकडून काम करवून घेण्याची हातोटी त्यांना साधलेली नाही. संघटक व प्रशासक या दोन्ही दृष्टींनी ते अयशस्वी ठरले आहेत. मार्गदर्शन व स्वतःपुरते आचरण एवढे ते करू शकतात. त्यांच्या वृत्तीत आग्रह कमी आहे. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी निग्रह व निश्चयही कमी असल्याचा अनेकदा भास होतो. पण ते खरे नाही. संकटाने ते डगमगत नाहीत. पत्करलेल्या कामासाठी मरून जायलाही त्यांची तयारी असते. अशा वेळी इतर कोणी आपल्याबरोबर येईल किंवा नाही, ह्याचीही पर्वा त्यांना नसते. याबाबतीत गांधी-विनोबांशी त्यांचे पुष्कळच साम्य आहे.''

## जयप्रकाश अव्यावहारिक आहेत काय?

"जयप्रकाशांमध्ये राजकारणी व्यक्तीला अत्यावश्यक असणारा व्यावहारिकपणा अभावानेच जाणवतो, असे मला वाटते. माझे हे मत बरोबर आहे काय?" मी विचारले.

"होय !" दादा म्हणाले, "जयप्रकाश हे एका अर्थाने तत्त्वनिष्ठ, सिद्धान्तवादी आहेत. अर्थात पुष्कळदा ते व्यवहारी तडजोडही करतात. परंतु व्यावहारिक राजकारणात गुरफटून जाणे त्यांच्या स्वभावात नाही. ह्याचे एक कारण असे की ते मूलतः क्रांतिकारक आहेत. त्यांचे मन सदैव क्रांतीच्या विचारात गुंतलेले असते. त्यांना आपल्या मनातील क्रांतीचे पुढचे टप्पे दिसत गेले. त्यामुळे ते एखाद्या कार्यक्रमावर टिकून राहिले नाहीत. एका दृष्टीने हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. कारण तसे घडले नसते तर त्यांचे एकूण जीवनदर्शनच कुंठित झाले असते. मात्र याच कारणामुळे ते कुठल्याही संस्थेत, संघटनेत अथवा पक्षात मावू शकले नाहीत. एखाद्या संघटनेत काम करीत असतानाही त्यांची झेप त्या संघटनेच्या कक्षेत न येणाऱ्या गोष्टीचा ठाव घेण्यासाठी तयार असे.

## गांधीजी आणि जयप्रकाश

गांधीजींच्या महानिर्वाणानंतर गांधी मार्गाचे पथप्रदर्शक म्हणून विनोबांकडे लोकांची दृष्टी वळली. परंतु त्या दोघांमध्ये (गांधी व विनोबा ह्यांच्यामध्ये) मूलभूत वृत्तीचाच फरक असल्याने—गांधीजी प्रवृत्तिमार्गी व विनोबा निवृत्तिमार्गी असल्याने ज्या प्रकारचे राजकीय-सामाजिक-आध्यात्मिक मार्गदर्शन गांधींनी केले तशा प्रकारचे मार्गदर्शन विनोबा करू शकले नाहीत. गांधीमार्गाकडून खूप मोठ्या अपेक्षा बाळगणाऱ्या मंडळींची घोर निराशा झाली. अशा वेळी जयप्रकाशजी गांधीविचारांची शिदोरी घेऊन राजकीय क्षितिजावर प्रकट झाले. त्यांच्याविषयी अनेकांना खूप आशा वाटू लागली. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर तर जयप्रकाश हे गांधींचे सच्चे वारसदार असल्याचेच लोकांना प्रतीत झाले. गांधींनी परकीय सत्तेपासून देशाला मुक्त केले; तर जयप्रकाशांनी स्वदेशी हुकूमशाहीतून शांततापूर्ण पद्धतीने मुक्त होण्याचा मार्ग भारताला व भारताच्याद्वारे जगाला दाखवला. पहिल्या क्रांतीचे जनक गांधी होते; तर दुसऱ्या क्रांतीचे प्रेरणादाते जयप्रकाश ठरले. खऱ्या अर्थाने त्यांनी देशाला प्रकाश दाखवला. त्याला अंधारातून प्रकाशाकडे नेले. त्यामुळे ह्या दोन युगपुरुषांमध्ये तुलना करण्याची इच्छा साहजिकच अनेकांना होते.

त्या अनुषंगाने मी दादांना विचारले, ''गांधी आणि जयप्रकाश ह्यांच्यातील साम्य-भेदांवर तुम्ही काही प्रकाश टाकू शकाल काय?''

**मूलभूत फरक**

त्यावर दादा म्हणाले, ''गांधीजींचे विभूतिमत्त्व फारच भव्य होते. तेवढी भव्यता किंवा विशालता जयप्रकाशांच्या व्यक्तित्वात नाही. शिवाय दोघांचे पूर्वसंस्कारही भिन्न होते. साम्यवाद-समाजवादाच्या संस्कारांतून जयप्रकाश आले होते. त्यामुळे कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण (अॅप्रोच), आधुनिक परिभाषेत बोलावयाचे तर, जास्त वैज्ञानिक राहिला आहे. ह्याचा उलट गांधींचा दृष्टिकोण मुख्यतः धार्मिक-आध्यात्मिक होता. गांधींनी सत्याग्रहाचा आविष्कार केला. क्रांतीच्या प्रक्रियेला त्यांचे ते मौलिक योगदान होते. जयप्रकाश त्यांच्यानंतर आले. गांधीमार्ग हे साम्यवादाच्या पुढचे पाऊल आहे, हे त्यांनी ओळखले; आणि त्याप्रमाणे प्रयोग केले. क्रांतीच्या प्रक्रियेला त्यांच्याकडून मिळालेली ही मौलिक देणगी आहे. जयप्रकाशांनी गांधींचा 'अहिंसा' हा शब्द न वापरता 'शांती' हा शब्द स्वीकारला, हे लक्षात घेतले पाहिजे. तो शब्द त्यांनी विचारपूर्वक स्वीकारला आहे. त्यांचे शांतिमय किंवा शांततापूर्ण आंदोलन हे गांधींच्या सत्याग्रह आंदोलनापेक्षाही अधिक अहिंसक (शांततापूर्ण) होते, असा माझा अनुभव आहे. अर्थात गांधींच्या चळवळीनंतर जयप्रकाशांचे आंदोलन आल्यामुळे त्यांना पूर्वानुभवाचा लाभ झाला, हेही मान्य केलेच पाहिजे.''

''गांधीजींमध्ये आपल्या लढ्यासाठी व्यूहरचना करण्याचे एक अद्‌भुत चातुर्य होते तसे चातुर्य जयप्रकाशांमध्ये नाही. त्यामुळे पुष्कळदा ते गोत्यात येतात. अनेकदा स्नेही व अनुयायी ह्यांच्या आग्रहालाही ते बळी पडतात. उदाहरणार्थ, बिहारची विधानसभा विसर्जित करण्याची मागणी असणारे त्यांचे आंदोलन हे त्या राज्यापुरतेच मर्यादित राहील, इतरत्र त्याचे अनुकरण होऊ नये, असे त्यांचे ठाम मत होते. गुजरातमधील नवनिर्माणाच्या चळवळीत किंवा दिल्लीच्या मोर्चात ते जाऊ इच्छित नव्हते. पण जुन्या सोबत्यांनी गळ घातल्यामुळे ते त्यात ओढले गेले. अर्थात गांधीही सोबत्यांच्या व लोकमताच्या दडपणाला बळी पडून तडजोड करीत. कायदेमंडळाच्या कार्यपद्धतीला त्यांनी दिलेली मान्यता आणि पाकिस्तानच्या निर्मितीला दिलेली स्वीकृती ही ह्या बाबतीतील दोन उदाहरणे म्हणून सांगता येतील. पण अशी उदाहरणे अपवादादाखलच असत. चौरीचौऱ्याला गांधींचा जयजयकार करीत लोकांनी तेथील पोलिसांची हत्या केली, म्हणून गांधींनी आपली चळवळ मागे घेतली. परंतु आपले हे आंदोलन जनतेचे

आंदोलन असल्याने इतरांच्या चुकांसाठी जयप्रकाशांनी ते मागे घेण्याचे नेहमीच नाकारले. असा फरक गांधी व जयप्रकाश ह्यांच्यात दाखवता येईल.

गांधी व काँग्रेस ह्यांना एकमेकांकडून शक्ती मिळाली. तसे जयप्रकाशांच्या बाबतीत घडले नाही. त्यांच्याकडून पक्षांना सामर्थ्य प्राप्त झाले; पण त्यांना मात्र पक्षांकडून सामर्थ्य मिळाले नाही.

**गांधींचे वारसदार**

गांधींकडून जयप्रकाशांनी सविनय, शांततापूर्ण प्रतिकाराचे किंवा सत्याग्रहाचे तंत्र घेतले. सत्याग्रहाचा अवलंब न करता क्रांती यशस्वी होऊ शकेल असे विनोबांना वाटले. आणि त्यांचे ते मत प्रारंभीच्या काळात जयप्रकाशांनाही पटले असावे. परंतु कालांतराने विनोबांचे भूदान आंदोलन सरकारच्या सहकार्यावर अधिकाधिक विसंबून राहत गेले; व म्हणून त्याप्रमाणात ते सफल होऊ शकले नाही. प्रतिकार समूळ वगळला गेल्यामुळे त्या आंदोलनातून गरिबांचा पराक्रम व्यक्त होऊ शकला नाही, खरी लोकशक्ती निर्माण झाली नाही, हे ओळखून जयप्रकाशांनी आपल्या आंदोलनात सत्याग्रहाला किंवा शांततापूर्ण प्रतिकाराला महत्त्वाचे स्थान दिले. ह्या बाबतीत त्यांनी गांधींचा वारसा समर्थपणे चालविला असे म्हणता येते.

राजनीतीला लोकनीतीचे म्हणजे नैतिकतेचे अधिष्ठान हवे, ह्यालाच कोणी भगवंताचे अधिष्ठानही म्हणतील — अशी जयप्रकाशांची स्थायी, शाश्वत निष्ठा आहे. ह्या निष्ठेचे मूळही गांधी विचारातच आहे. भौतिक लाभांचे प्रलोभन देऊन लोकांना सद्‌गुणी बनविता येत नाही (Material incentive to goodness is not enough; किंवा Materialism cannot furnish incentive to goodness.) ही त्यांची भूमिकाही गांधीजींच्या मूलभूत विचारसरणीशी मिळती-जुळतीच आहे."

**बुद्धिमंतांचा पाठिंबा**

"गांधीजींच्या चळवळीला बुद्धिमंतांचा पाठिंबा ज्या प्रमाणात मिळाला त्या प्रमाणात जयप्रकाशांना आपल्या चळवळीला बुद्धिमंतांचा पाठिंबा मिळविता आला नाही, असे म्हटले जाते. ह्याबाबतीत तुमचे काय मत आहे?" मी विचारले.

"हे विधान बरोबर नाही." दादा म्हणाले, "जयप्रकाशांच्या आंदोलनाला सुरुवातीपासूनच बुद्धिमंतांचा पाठिंबा मिळत आला आहे. प्रत्यक्ष काँग्रेसचे पाठीराखे आणि आपल्या ज्ञानक्षेत्राच्या बाहेर पडू न इच्छिणारे बुद्धिमंत— purely academic intellectuals — वगळल्यास वकील, साहित्यिक,

प्राध्यापक, कुलगुरू, न्यायाधीश, रॉयिस्ट वगैरे विविध क्षेत्रांतील बुद्धिमंत जयप्रकाशांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुढे सरसावले. अर्थात काही विशिष्ट विषयांच्या किंवा प्रश्नांच्या बाबतीत जयप्रकाशांच्या मतांना विरोध करणारे बुद्धिमंत आजही आहेत. पण गांधींच्या बाबतीतही असे घडले आहे.

गांधींनी जेव्हा मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग सुरू केला तेव्हा शिक्षण हे गांधींचे क्षेत्र नसल्यामुळे त्यांनी त्यात अनधिकारपणे ढवळाढवळ करू नये असे सांगणारे शिक्षणतज्ज्ञ त्या वेळीही होतेच. त्याचप्रमाणे जयप्रकाशांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनास पूर्णपणे पाठिंबा देणारे अनेक बुद्धिमंत जयप्रकाशांनी शिक्षणसुधारणेच्या बाबतीत काही बोलू नये, असे मानत होतेच. ह्या संदर्भात एक जुनी घटना नमूद करण्यासारखी आहे. मार्क्सच्या काळी त्याच्या समकालीन अर्थशास्त्रज्ञांनी त्याला अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता देण्यास नकार दिला होता. परंतु नंतरच्या काळात तो फार मोठा क्रांतिकारक अर्थशास्त्रज्ञ ठरला.''

''खुद्द जयप्रकाशांना मात्र बुद्धिमंतांचे मोठे आकर्षण आहे. ते त्यांच्या मताला फार मान देतात. ते भूदानाचे काम करीत होते तेव्हा चर्चासत्रे (सेमिनार) वगैरे आयोजित करून भूदानाला बुद्धिमंताचा पाठिंबा मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. (अर्थात प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांच्यासारखे काही अपवाद वगळता फारच थोड्या अर्थशास्त्रज्ञांनी भूदानाला पाठिंबा व्यक्त केला होता, ही गोष्ट वेगळी !) त्याचप्रमाणे आपल्या समग्र क्रांतीच्या आंदोलनालाही विद्वानांचा, बुद्धिमंतांचा पाठिंबा मिळवण्याचा त्यांनी भरपूर प्रयत्न केला. त्यांच्या सभांना पुष्कळ बुद्धिमंत हजर राहत. पण बुद्धिमंतांना जन-आंदोलनाची कल्पना सहसा मानवत नसल्याने ते प्रत्यक्ष प्रतिकाराच्या कार्यक्रमात फार मोठ्या संख्येने कधीच सामील होत नसत. गांधींच्या चळवळीच्या बाबतीतही असेच घडले होते. त्या मानाने जयप्रकाशांच्या चळवळीला मिळालेला बुद्धिमंतांचा पाठिंबा महत्त्वपूर्णच समजला पाहिजे.''

### जयप्रकाश स्वप्नाळू आहेत काय?

''जयप्रकाशांचे सारे राजकारण स्वप्नाळूपणाचे असल्याचा आरोप केला जातो. त्यात कितपत तथ्य आहे?'' मी विचारले.

ह्या प्रश्नाचा अधिक खुलासा करण्यासाठी मी म्हणालो, ''व्यावहारिक राजकारणात जयप्रकाशांचा नेहमीच पराभव होत आला आहे. असे का? त्यांच्या समाजवादी सहकाऱ्यांशीही त्यांचे का जमले नाही? ते सहकारी अधिक व्यवहारवादी होते आणि जयप्रकाश स्वप्नाळू ध्येयवादी होते, हे त्याचे कारण असू शकेल काय?''

यावर दादा म्हणाले, "स्वप्नाळू म्हणजे निष्क्रिय, असा जर तुम्ही अर्थ करीत असाल तर तुमचे हे विधान चूक आहे. जयप्रकाश कधीच निष्क्रिय नव्हते. परंतु स्वप्नाळू म्हणजे व्यवहारवादाची पर्वा न करणारा, असे जर तुम्हांला अभिप्रेत असेल तर तुमचे विधान बरोबर आहे. कारण मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे जयप्रकाश व्यवहारवादी नाहीत. खरे म्हणजे कोणताही लोकनेता सामान्य अर्थाने व्यवहारवादी नसतोच. लोकांच्या दृष्टीला अव्यवहारी वाटणारी ध्येय तो त्यांच्यासमोर ठेवतो आणि त्यांच्या प्राप्तीसाठी तो लोकांकडून आचरण करवून घेतो. एका वर्षात स्वराज्य मिळवून देण्याचे गांधींचे आश्वासन असेच अव्यवहारी होते. खरे म्हणजे, लोकनेता जे ध्येय म्हणून लोकांसमोर ठेवतो ते ध्येय नसतेच. तो एक संकेत असतो. त्यातून कार्याची प्रेरणा मिळते. भूदान आंदोलनात विनोबांनी पाच कोटी एकर जमीन दान म्हणून मिळविण्याचे लक्ष्य एकदा समोर ठेवले होते. पण ते लक्ष्य नसून साधे गणित होते—किती भूमिहीनांना देण्यासाठी किती जमीन लागेल ह्या हिशेबाने मांडलेले गणित ! जयप्रकाशांनी समोर ठेवलेल्या समग्र क्रांतीच्या उद्दिष्टांकडे ह्याच दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे. परवाच ते म्हणाले की समग्र क्रांती अजून फार दूर आहे; तरीपण जी छोटी क्रांती (मिनी रिव्होल्यूशन) झाली आहे तिच्यातही मला सध्या समाधान आहे. सारांश, जनतेकडून काही भरीव कृती करवून घ्यायची असेल तर एखादे व्यापक ध्येय तिच्यासमोर ठेवावेच लागते. तसे ध्येय जयप्रकाश नेहमीच ठेवत आले आहेत.

परंतु त्यांच्या स्वभावात आणखी एक वेगळेपणा आहे. देशात वेळोवळी ज्या समस्या उठतात, जे प्रवाह निर्माण होतात त्यामध्ये सामील झाल्याखेरीज त्यांच्याने राहवत नाही. अशा वेळी आपला पक्ष, त्याची ध्येयधोरणे, त्याचा नफातोटा ह्यांचा विचार ते करीत नाहीत. त्यांच्या सहकाऱ्यांपैकी मुख्यतः डॉ. लोहियांशीच त्यांचा विशेष मतभेद झाला. त्याच्या मुळाशी त्या दोघांच्या मनःप्रवृत्तीतील भेद हीच मुख्य बाब होती. लोहियांमध्ये विचारांची मौलिकता जयप्रकाशांपेक्षा जास्त होती. पण जयप्रकाशांचा कल गांधींकडे अधिक होता; आणि नेहरूंविषयीचे त्यांचे वैयक्तिक प्रेम कधीच मावळले नाही. आचार्य नरेंद्र देवांचा भर अहिंसक वर्गविग्रहावर होता; तर जयप्रकाशांना वर्गनिराकरण हवे होते. ह्या वर्गनिराकरणाची प्रक्रिया वर्गविग्रहाचीच असेल असे नाही; ती गांधी-विनोबांच्या मार्गाचीही असू शकेल, असे ते मानत होते. नरेंद्र देवांना जयप्रकाशांचे हे विश्लेषण मान्य नव्हते. शिवाय लोहिया वगैरे मंडळी जयप्रकाशांच्या बरोबरीची होती. त्यामुळे त्यांचे नेतृत्व त्या वेळी सर्वांना एकत्र ठेवू शकले नाही."

## लोहिया व जयप्रकाश

चर्चेच्या ओघात डॉ. राम मनोहर लोहिया ह्यांचा उल्लेख येताच लोहिया व जयप्रकाश ह्यांच्यातील परस्परसंबंधांविषयी थोडे अधिक जाणून घेण्याची इच्छा मला झाली. कारण लोहियांशी दादांची मैत्री किती घनिष्ठ होती, हे मी प्रत्यक्ष पाहिले होते. जयप्रकाश व दादा ह्यांच्या परस्परसंबंधात परस्पर आदराचाही फार मोठा भाग आहे. इतका आदरभाव दादा व लोहिया ह्यांच्या परस्परसंबंधात नसावा, तो निर्भेळ स्नेहभाव असावा, किंवा सख्यभाव असावा, असे मला वाटते. ते दोघे एकमेकांशी अगदी मोकळेपणाने वागत. थट्टामस्करीही करीत. एकमेकांच्या विचारांवर टीका करण्यातही त्यांना संकोच वाटत नसे. एक प्रकारे त्यांचे नाते बरोबरीचे, सलगीचे होते. म्हणून मी दादांना विचारले, ''जयप्रकाश आणि लोहिया ह्यांच्या व्यक्तित्वातील फरकाविषयी तुमचे काय मत आहे? लोहिया उग्र प्रकृतीचे होते, आणि जयप्रकाश सौम्य प्रकृतीचे आहेत, हे माझे मूल्यमापन तुम्हांला मान्य होण्यासारखे आहे काय?''

ह्यावर दादा म्हणाले, ''बाह्यतः किंवा स्थूलमानाने तुमचे म्हणणे बरोबर आहे. लोहियांशी माझा संबंध मुख्यतः त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभिक काळात आला. त्यांना प्रत्यक्ष काम करताना मी जवळून पाहिले नाही. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीविषयी मी तपशीलवार सांगू शकणार नाही. जयप्रकाशांना मी मित्र म्हणून आणि पुढारी म्हणूनही अगदी जवळून पाहिले आहे. लोहिया आपल्या विचारांची अभिव्यक्ती करताना जसे उग्र, कठोर शब्द वापरीत तसे जयप्रकाश वापरणार नाहीत. ते दुसऱ्याचे अनुयायित्व स्वीकारायला सहजासहजी तयार होतात. तसे लोहिया झाले नसते. जयप्रकाशांमध्ये एक प्रकारची अनन्यशरणता आहे. ते आपल्या नेत्याशी मतभेद व्यक्त करतील, त्याच्या विरुद्ध बंडही पुकारतील. पण ते मतभेदांमुळे; नेतृत्वाच्या स्पर्धेमुळे नव्हे. आपण नेता बनावे अशी आकांक्षा त्यांच्या ठिकाणी नसल्यामुळे त्यासाठी लागणारी उमेदवारी ते करणार नाहीत. आपल्याकडे नेतृत्व यावे, असा प्रयत्न त्यांनी कधी केला नाही. उलट इतरांकडे नेतृत्व सोपवण्यास ते आनंदाने तयार होतात.

''राहणीच्या बाबतीत लोहिया हे कार्यकर्त्यांना अधिक जवळचे वाटत. वागणुकीतही ते आपल्या अनुयायांशी अधिक बरोबरीच्या नात्याने वागत. लोहियांमध्ये कट्टरपणा, कडवेपणा होता. त्यामुळे त्यांचा गटही कम्युनिस्टांसारखा कडवा बनला. लोहियांना विनोबा कधी पटले नाहीत. विनोबांच्या कार्यक्रमाच्या बाबतीत त्यांना वाटे की, ही गांधींची प्रक्रिया नव्हे. उलट, जयप्रकाश विनोबांना गांधींचे वारसदार मानतात. जयप्रकाशांच्या प्रकृतीत पैस अधिक असल्यामुळे

त्यांच्या दृष्टिकोणात अधिक व्यापकता आहे. त्यांना कायम धरून राहिलेली अनुयायी मंडळी कमी. कारण उद्या त्यांना दुसरा मार्ग पटला तर ते त्या मार्गाने जातील आणि अनुयायांना वाटेल की हे आपल्याला सोडून गेले. हाच दोष गांधी-विनोबातही होता, असे म्हणता येईल. केरळमधील कालडी येथे भरलेल्या सर्वोदय संमेलनात विनोबांनी गांधींना कौतुकाने दगलबाज (सत्यापुढे सुसंगतीची चाड न बाळगणारा) पुढारी म्हटले होते. खुद्द विनोबांबद्दलही गांधी सेवा संघाचे मंत्री भाई धोत्रे यांनी 'अशाश्वत प्रभू' (बेभरवशाचा पुढारी) असे म्हटले होते, तेही ह्याच अर्थाने.

जयप्रकाशांनी पक्षसंघटनेच्या वर उठून देशव्यापी लोकनिष्ठेने कार्य केले. कधीकधी मला वाटते, जयप्रकाश, लोहिया, राजाजी, कृपलानी, रॉय, नेहरू ह्या सर्वांच्याच भूमिका अशा होत्या की, त्यांच्या अनुयायांनाही त्या नीट कळल्या नसाव्यात. ही मंडळी पक्षाच्या चौकटीत बसणारी नव्हती. त्यामुळे त्यांना मजबूत पक्षबांधणी करता आली नाही. इतके असूनही जयप्रकाशांना वाटते की आज लोहिया असते तर बरे झाले असते. आज लोहियांची माणसे जयप्रकाशांना मानतात. (परवाच जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी लोकसभेत जयप्रकाशांना उद्देशून 'महात्मा' हे संबोधन वापरले होते !) आज अटल बिहारी वाजपेयीही त्यांना आपला नेता मानतात. नानाजी देशमुख ह्यांनी आपली वैयक्तिक निष्ठा जयप्रकाशांना वाहिली आहे. हा सारा जयप्रकाशांच्या स्वभावातील व्यापकतेचा प्रभाव आहे. कृपलानींची भूमिका अशी की जो कोणी देशाचे भले करील त्याच्या पाठीशी उभे राहावयाचे. अशा प्रकारे प्रत्येकजण आपापल्या स्वभावाप्रमाणे वागत राहिला. त्यांचे आपसात पटले नाही, ह्यात दोष कोणाचा, या प्रश्नात मी कधी शिरलो नाही.''

## जयप्रकाश आणि प्रभावतीदेवी

जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या पत्नी श्रीमती प्रभावतीदेवी हे एक अद्भुत दांपत्य होते. त्यांच्या वैवाहिक जीवनासंबंधी माझ्या मनामध्ये अनेक वर्षांपासून एक प्रकारचे आदरयुक्त कुतूहल होते. प्रभावतीजींना मी सेवाग्रामला अनेकदा पाहिले होते. त्यांचा साधा-सरळ स्वभाव आणि नम्र वागणूक ह्यांनी मी प्रभावित झालो होतो. मात्र त्या बालब्रह्मचारिणी आहेत हे मला त्या वेळी माहीत नव्हते. गांधीजींच्या परिसरात वावरल्यामुळे विवाहोत्तर ब्रह्मचर्यासंबंधी मला कल्पना होती. गांधीजी, किशोरलाल मश्रूवाला, धोत्रेजी ह्यांच्यासारखी काही उदाहरणेही मला माहीत होती. परंतु ह्यांच्या उदाहरणांत पतिपत्नीपैकी पतीने ब्रह्मचर्याचे व्रत

स्वीकारले होते; आणि भारतीय परंपरेला अनुसरून पत्नीने त्याला संमती दिली होती. त्यांच्या बाबतीत पतिपत्नींमध्ये त्या प्रश्नासंबंधी मतभेदही नव्हता. त्यामुळे त्याबद्दल मला फारसे आश्चर्य वाटले नव्हते. जयप्रकाश-प्रभावतीजींच्या बाबतीत मात्र परिस्थिती अगदी उलट होती. प्रभावतीजींनी गांधीजींच्या प्रभावाने जेव्हा बालपणीच ब्रह्मचर्याचे व्रत घेतले,* त्या वेळी त्यांचे पती जयप्रकाश अमेरिकेत होते. अशा प्रकारच्या धार्मिक-आध्यात्मिक व्रताला त्यांची संमती असण्याचीही शक्यता नव्हती. कारण त्या वेळी ते पूर्णपणे भौतिकवादी विचाराच्या पगड्याखाली होते. अशा स्थितीत त्या दोघांचे वैवाहिक जीवन सुरळीतपणे कसे पार पडले असावे, हा प्रश्न वारंवार माझ्या मनात येत होता. म्हणून मी दादांना विचारले, ''जयप्रकाश आणि प्रभावतीजी ह्यांच्यातील परस्पर संबंधाचे निश्चित स्वरूप काय होते? प्रभावतीजींच्या व्रताला जयप्रकाशांनी कशी मान्यता दिली?''

ह्यावर दादा म्हणाले, ''प्रभावतीजी ब्रह्मचर्यव्रताला बांधलेल्या होत्या. लग्नानंतर त्या गांधीजींच्या आश्रमात राहत होत्या. तेथे त्यांनी ते व्रत घेतले होते. ते घेण्यापूर्वी त्यांनी जयप्रकाशांची संमती मिळवलेली नव्हती. कारण ते व्रत संमतिनिरपेक्ष असून त्याबाबतीत दुसऱ्या पक्षाला विचारण्याची गरज नाही, असे गांधीजींचे म्हणणे होते. 'यंग इंडिया'मध्ये त्यांनी 'इन कॉन्फिडन्स' (हितगुज) ह्या नावाचा एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, विवाहानंतर ब्रह्मचर्याचे व्रत घेण्यापूर्वी दुसऱ्या पक्षाची संमती मिळविणे अपरिहार्य नाही. सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य ह्यावर प्रभावतीजींची नितान्त श्रद्धा होती. म्हणून त्यांनी स्वतःच्या प्रेरणेने त्या व्रताचा स्वीकार केला. 'तुझा नवरा परदेशात आहे. तो परत येईपर्यंत तू निर्णय घेण्याची घाई करू नकोस.' असे गांधींनी प्रभावतीजींना सांगितले होते. पण त्यांनी त्यांचा तो सल्ला मानला नाही. पुढे जयप्रकाश परत आल्यावर प्रभावतीजींनी त्यांना सांगितले की, 'ब्रह्मचर्यावर तुमची श्रद्धा नाही, हे मला माहीत आहे; म्हणून मी तुम्हांला बांधून ठेवू इच्छित नाही. तुम्ही दुसरे लग्न करू शकता.' त्यावर जयप्रकाश म्हणाले, 'आजवर स्त्रिया पुरुषांची मते बिनतक्रार मान्य करीत आल्या आहेत. आता मी तुझे व्रत मान्य करतो.' आणि त्यांनी दुसरे लग्न करण्याचे नाकारले.

---

* ज्या वेळी वैवाहिक, वैषयिक जीवन म्हणजे काय याची देखील कल्पना नव्हती इतक्या लहान वयात प्रभावतीजींनी ब्रह्मचर्याचे व्रत घ्यावे, ही गोष्ट स्कार्फदंपतीना चमत्कारिक, किंबहुना आक्षेपार्ह, वाटते. परंतु भारतात अशी परंपरा फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे, हे त्यांना माहीत नसावे.

— श्रीपाद जोशी

**स्वभावातील तफावत**

"वस्तुतः जयप्रकाश आणि प्रभावतीजी ह्यांच्या जीवनदर्शनात ह्या वेळी फारच मोठी तफावत होती. जयप्रकाश मार्क्सचे अनुयायी होते तर प्रभावतीजी गांधींच्या मार्गावर श्रद्धा बाळगणाऱ्या होत्या. एक मार्ग पूर्णपणे भौतिकवादी होता, तर दुसरा पूर्णतः अध्यात्मवादी. प्रभावतीजींविषयी सामान्य लोकांना फारशी माहिती नाही, पण काही बाबतीत त्यांचे व्यक्तिमत्त्व जयप्रकाशांच्या व्यक्तिमत्त्वापेक्षाही अधिक सरस होते. पारदर्शक स्वच्छता, मनाचा निर्मळपणा, व्रतनिष्ठा, संयम, निग्रह वगैरे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे होते. त्या बऱ्याच बोलक्या, स्पष्टवक्त्या आणि तेजस्वी होत्या. पण त्या तेजस्वी असल्या तरी उग्र नव्हत्या, त्यांचे हे सारे गुण अगदी स्वभावगत होते. त्यात सहजता होती. त्यांचा कोठे ताण पडतो आहे, असे कधी दिसले नाही. जयप्रकाशांवर त्यांचे अनन्यसाधारण प्रेम होते. त्यात कदाचित परंपरागत भारतीय संस्कारांचाही भाग असेल; परंतु जयप्रकाशांचा मोठेपणाही त्यांना कळला होता. असे असूनही त्यांच्या सत्यनिष्ठेने त्यांच्या पतिप्रेमाला कधी वरचढ होऊ दिले नाही. जयप्रकाश देवळीच्या तुरुंगात असताना (ऑक्टोबर १९४१) प्रभावतीजी त्यांना भेटायला गेल्या होत्या. त्या वेळी जयप्रकाशांनी त्यांना बाहेर नेण्यासाठी काही राजकीय स्वरूपाची पत्रे हातचलाखीने देण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रभावतीजींनी ती पत्रे हातातही घेतली नाहीत. त्यांच्या सत्यप्रियतेने त्यांना त्या कृत्यापासून परावृत्त केले. जयप्रकाशांच्या त्या कटात सामील होण्याचे त्यांनी नाकारले. त्यांचा गांधीजींवर खूप प्रभाव पडला. प्रभावतीजींविषयीचा त्यांचा विश्वास दुणावला.

अर्थात जयप्रकाशांमध्येही प्रेमभावना खूपच प्रबळ आहे. त्यांनी प्रभावतीजींवर अगदी मनापासून, निरपेक्ष प्रेम केले. त्या प्रेमानेच प्रभावतीजींना आपलेसे केले, आणि त्यांनी आपले जीवन जयप्रकाशांच्या कार्याला वाहिले. प्रत्येक पत्नीमध्ये आपल्या पतीविषयी एक प्रकारची सूक्ष्म अशी मातृभावनाही वसत असतेच. प्रभावतीच्या बाबतीत ही मातृभावना अधिक स्पष्ट बनली. आणि त्यांनी जयप्रकाशांना आईच्या ममतेने सांभाळले. जयप्रकाशांची काळजी घेणे हे आपले एक धार्मिक कर्तव्य आहे, असेच त्यांनी मानले. त्यांच्या व्यक्तित्वात जे अनेक विलोभनीय गुण आहेत त्यांवर प्रभावतीजी लुब्ध होत्या. ते आणि गांधी ह्यांच्यात सख्य व्हावे, जयप्रकाशांनी गांधींचा मार्ग स्वीकारावा, अशी त्यांची इच्छा होती. गांधीजींचेही जयप्रकाशांवर अगदी सासऱ्याने जावयावर करावे तसे प्रेम होते. 'त्यांच्यासारख्या सज्जन माणसाला तुरुंगात खितपत पडावे लागत

असेल तर बाहेर राहायला कुणीच लायक नाही.' अशा अर्थाचे उद्गार गांधीजींनी काढले होते. ह्यावरून त्यांची जयप्रकाशांविषयीची भावना व्यक्त होते. ज्या ज्या वेळी सरकारने जयप्रकाशांवर वार केला, त्यांचा छळ केला, त्या त्या वेळी गांधीजी जयप्रकाशांच्या बाजूने उभे राहिले. त्या योगे आपल्या भूमिकेविषयी गैरसमज पसरेल याचीही त्यांनी पर्वा केली नाही. त्यांच्याशी गांधीजींचे मतभेद पुष्कळच होते आणि ते तीव्र व मूलभूत' स्वरूपाचे होते. तरीपण त्यांच्याविषयी गांधीजींना इतका विश्वास वाटत होता की स्वराज्यप्राप्तीच्या सुमारास जयप्रकाशांना काँग्रेसचे अध्यक्ष करावे, असे त्यांनी सुचविले होते.

**प्रभावतींचा प्रभाव**

पुढे जयप्रकाश भूदानात आले; आणि गांधीमार्गाशी असलेले त्यांचे मतभेद संपुष्टात आले. ते गांधीमार्गाकडे वळले त्यात फार मोठा भाग प्रभावतीजींच्या मूक सहकार्याचा होता. रावसाहेब अच्युतराव (पटवर्धन) वगैरे त्यांचे मित्र वैयक्तिक मोठेपणाच्या बाबतीत जयप्रकाशांपेक्षा प्रभावतीजींनाच अधिक मानत असत. ह्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येईल.

शेवटी-शेवटी जयप्रकाश आणि प्रभावतीजी ह्यांचे व्यक्तित्व अभिन्न बनले होते. त्यांचे रुसणे, रागावणे, लहरी, छंद हे सारे प्रभावतीजींनी लहान मुलासारखे सांभाळले. ते जसे आहेत तसेच फार चांगले आहेत, जे काही करतात ते प्रामाणिकपणाने करतात, ते फार थोर आहेत, अशी प्रभावतीजींची भावना होती. त्यांना एखादे महत्त्वाचे पद मिळावे, असा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. जयप्रकाश भूदानात आल्यानंतर प्रभावतीजींना जणू आपल्या जीविताचे सार्थक झाले, असे वाटले. आपल्या पतीचे हे परिवर्तन पाहायला बापूजी हवे होते, असे त्या नेहमी म्हणत; कारण ''तुझा नवरा फार थोर आहे,'' असे गांधीजी त्यांना म्हणत असत.

ह्याचा अर्थ त्या केवळ जयप्रकाशांची सावली म्हणूनच वावरल्या असा मात्र नव्हे. त्या गांधीजींच्या तालमीत तयार झाल्या होत्या. त्यांनी आपले वेगळे कार्यक्षेत्र निवडले होते. बिहारची महिला चरखा समिती त्यांनी स्थापन करून चालविली होती. पुढे जयप्रकाशही त्या संस्थेच्या इमारतीत जाऊन राहिले; आणि आजही पाटण्याला असताना त्यांचा मुक्काम तेथेच असतो. प्रभावतीजींच्या निधनानंतर (१५ एप्रिल १९७३) जयप्रकाशांच्या जीवनात कधीही भरून न येणारी अशी पोकळी निर्माण झाली. 'आता मी मेलोच आहे; माझे शरीर हे माझे

प्रेतच आहे, असे समजा' असे ते म्हणत.*

जयप्रकाशांना सांभाळणे व सतत त्यांच्याबरोबर राहणे हेच त्यांनी शेवटी-शेवटी आपले जीवनकार्य मानले होते. जयप्रकाशांप्रमाणेच त्यांच्या नातेवाईकांवरही प्रभावतीजींनी मनापासून प्रेम केले; आणि त्यांच्यासाठी खस्ता खाल्ल्या. एका अर्थाने जयप्रकाश प्रभावतीजी ह्यांचे दांपत्यजीवन मोठे मधुर, अद्‌भुत व अलौकिक होते, असेच म्हणावे लागेल, आणि त्याचे श्रेय उभय पतिपत्नींना समानपणे द्यावे लागेल. डॉ. सुशीला नैयरनी आपल्या आगाखान पॅलेसमधील निवासात लिहिलेल्या डायरीत प्रभावतीजींच्या ब्रह्मचर्यवृत्तीचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.''

## विनोबा आणि जयप्रकाश

विनोबा आणि जयप्रकाश ह्यांचे परस्परसंबंध जाणून घेण्यास मी अनेक दिवसांपासून उत्सुक होतो. आणीबाणीनंतर जयप्रकाशांच्या बाबतीत विनोबांकडून अन्याय झाला, असे मी अजूनही मानतो. जयप्रकाशांना एकान्तवासाची शिक्षा देऊन इंदिरा सरकारने त्यांच्या बदनामीची जी पद्धतशीर मोहीम चालविली होती तिचा निषेध विनोबांनी करावयास हवा होता. त्या बाबतीत त्यांच्याकडून कुचराई झाली असे मला वाटते. म्हणून विनोबा व जयप्रकाश या दोघांशीही सारखेच निकटचे संबंध असणाऱ्या दादांनी ह्या बाबतीत आपले म्हणणे सांगावे, अशी विनंती मी त्यांना केली.

दादा म्हणाले, ''जयप्रकाश विनोबांचे शिष्य व अनुयायी बनले तेव्हाही विनोबांशी काही बाबतीत त्यांचे मतभेद होतेच. मात्र त्यांचे स्वरूप अगदी सौम्य व सामान्य होते. ते मतभेद कार्यपद्धतीच्या बाबतीत होते त्यांचे स्वरूप मूलभूत नव्हते. म्हणून ह्या बाबतीत ते विनोबांचे निर्णय नम्रपणे मान्य करीत. तरीपण हे मतभेद हळूहळू वाढत गेले. जयप्रकाश सर्वोदयात आले तरी त्यांनी राजकारणाचा संन्यास घेतलेला नव्हता. कारण ज्या लोकसेवेसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते, ती सेवा राजकारणापासून पूर्णपणे दूर राहून करता येणार नाही, असे त्यांचे मत होते. म्हणून 'मतदारांचे शिक्षण केले पाहिजे,' 'पक्षातीत नागरिक

---

* 'स्वगत' या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आपल्या तुरुंगवासातील दैनंदिनीत इंदिरा गांधींना लिहिलेल्या पत्रात जयप्रकाश म्हणतात, ''तुम्हांला ठाऊक आहे की माझे वय झाले आहे. माझं जीवितकार्य संपलेलं आहे; आणि प्रभा गेल्यानंतर ज्याच्यासाठी जगावं असं काहीही उरलेलं नाही'' पृष्ठ १२८.

— श्रीपाद जोशी

व्यासपीठ निर्माण केले पाहिजे,' ह्यासारख्या आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी जयप्रकाशांनी वेगवेगळी संमेलने व चर्चासत्रे भरवली. ह्या सर्व कामांना शंकरराव देव यांचा पाठिंबा होता; आणि गोविंदराव देशपांडे हे जयप्रकाशांचे प्रमुख सहकारी होते.

### विरोधाचा मुद्दा

अशा प्रकारची भूदानाशी प्रत्यक्ष संबंधित नसलेली कामे जयप्रकाशांनी करू नयेत, त्यामुळे मुख्य कामाला निष्कारण फाटे फुटतात; म्हणून भूदानाचे एकच काम हाती घेऊन ते एकाग्रपणे केले पाहिजे, असे विनोबांचे मत होते. 'एक साधै सब साधै,' हा त्यांचा सिद्धान्त आहे. परंतु जयप्रकाशांना त्यांचे हे मत मान्य नव्हते. ह्या इतर गोष्टींकडेही लोकसेवकाने लक्ष दिले पाहिजे, त्यांचा प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणाशी काही संबंध नाही, असे ते म्हणत.

पुढे बिहारला दुष्काळ पडला. त्यावेळी दुष्काळग्रस्त जनतेच्या मदतीला जयप्रकाश धावून गेले. ती गोष्टही विनोबांना आवडली नाही. अशा प्रकारच्या मदतकार्यामुळे (रिलीफ वर्कमुळे) भूदानाच्या मुख्य कामात विक्षेप निर्माण होतो, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु जयप्रकाशांच्या मते दुष्काळाचे संकट एवढे प्रचंड होते की त्याच्यापुढे इतर सारी कामे गौण समजली गेली पाहिजेत. लोक संकटात सापडले असता इतर कामे सोडून त्यांच्या मदतीला धावून जाणे ही जयप्रकाशांची स्थायी अंतःप्रेरणा आहे. आणीबाणीच्या काळात ते तुरुंगात असताना बिहारमध्ये पूर आले होते. त्या वेळी पूरग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्यासाठी त्यांचा जीव कसा तिळतिळ तुटत होता, त्यासाठी राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहण्याची अटही स्वेच्छेने लादून घेण्यास ते कसे तयार होते ह्याची चांगली कल्पना 'स्वगत'मधील त्यांच्या टिपणांवरून येते. त्यांचा पिंडच मानवतावाद्याचा आहे. त्यानुसार ते काम करीत राहिले. प्रत्यक्ष भूदानाच्या कामात त्यांनी आपले मतभेद आड येऊ दिले नाहीत. विनोबांनी दिलेले निर्णयच ते अंमलात आणीत राहिले.

### योजनाबद्धता हवी

मात्र प्रत्येक कामाच्या बाबतीत त्यांच्या काही कल्पना असतात; आणि त्या अंमलात आणण्यासाठी ते धडपडत असतात. ग्रामदानाचे काम सुरू झाल्यावर ते कसेतरी अव्यवस्थितपणे न चालवता त्याचेही व्यवस्थित नियोजन व्हावे, देशातील अर्थशास्त्रज्ञांचे त्याकामी सहकार्य घ्यावे, असे जयप्रकाशांना वाटले. त्यांनी अनेक विचारवंतांच्या सहकार्याने 'सर्वोदयासाठी नियोजन' (प्लॅनिंग फॉर

सर्वोदय) ही पुस्तिकाही तयार करवली होती. आपल्या प्रत्येक कामात तंत्रज्ञ व विद्वान ह्यांचे सहकार्य मिळवण्याची त्यांची वृत्ती असल्यामुळे त्यांच्या कामात आपोआपच व्यापकता येते. विनोबांचा भर व्यापकतेपेक्षा एकाग्रतेवर अधिक असतो. त्यांच्यातील मतभेदांचे स्वरूप हे असे आहे. गांधीवादी कार्यक्रम किंवा गांधीदर्शन आणि अध्यात्म ह्या बाबतीत जयप्रकाशांनी विनोबांना नेहमीच प्रमाण मानले. परंतु सामाजिक व राजकीय बाबतीत मात्र त्यांचे निरपवाद प्रामाण्य मानले नाही. कोठे गोळीबार झाला, विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला झाला, तर जयप्रकाश स्वस्थ बसू शकत नसत. ते त्याचा जाहीरपणे निषेध करीत. तसे करणे हा सर्वोदयाचा भाग नव्हे असे त्यांनी कधी मानले नाही. काँग्रेसच्या तोडीचा प्रबळ विरोधी पक्ष देशात निर्माण झाला पाहिजे असे त्यांना वाटे. जयप्रकाश विरोधी पक्षवाले (ऑपोझिशनवाले) झाले आहेत असे विनोबांना वाटे. उलट, जयप्रकाश हे सरकारचे फार सहकार्य घेतात, असे आम्हाला (इतर सर्वोदयवाल्यांना) वाटे. मंत्र्यापासून साध्या कारकुनापर्यंत ते सर्वांची मदत घेत. राजकीय बाबतीत कार्य करण्याची त्यांची पद्धत गांधीवादीच होती.

बिहारमधील मुसहरी ह्या गावी त्यांच्या दोन कार्यकर्त्यांना मारून टाकण्याची धमकी काही नक्षलवाद्यांनी दिल्याचे समजताच ते आपला उत्तराखंडाचा दौरा अर्धवट सोडून मुसहरीला गेले; आणि तेथेच राहून काम करण्याचे त्यांनी ठरविले. तेथील एका नक्षलवाद्याचे घर क्रुद्ध लोकांनी जाळून टाकले. तेव्हा जयप्रकाश व प्रभावतीजी ह्यांनी ते घर बांधून दिले, आणि इतरही सर्व प्रकारची मदत त्या परिवाराला मिळवून दिली. नक्षलवाद्यांपैकी कोणालाही फाशीची शिक्षा होऊ नये, कारण त्यांचा मार्ग चुकीचा असला तरी तेही देशभक्तच आहेत, असे ते सांगतात. हिंदू-मुसलमानांच्या दंग्यातही ते निर्भयपणे मध्यस्थी करण्यासाठी धावून जात. त्यांच्याबरोबर इतर सर्वोदयी कार्यकर्तेही त्यात भाग घेत. त्या वेळी हिंदुत्ववादी व संघ-जनसंघवाले जयप्रकाशांच्या वाऱ्यालाही उभे राहत नसत ! तिबेट, काश्मीर, पाकिस्तान, बांगलादेश वगैरे प्रश्नांच्या बाबतीत आपल्या लोकप्रियतेची पर्वा न करता ते आपले विचार स्पष्टपणे बोलून दाखवीत. ते सारे विनोबांना पसंत नव्हते. हाती घेतलेले एकच काम त्यांनी करीत राहावे, असे विनोबांचे मत होते.''

**परस्परांविषयीच्या भावना**

''जयप्रकाश आणि विनोबा ह्यांनी एकमेकांना एकमेकांचे प्रतिस्पर्धी मानले असण्याची शक्यता आहे काय?'' मी विचारले.

त्यावर दादा म्हणाले, ''जयप्रकाशांनी विनोबांना आपले प्रतिस्पर्धी कधीही

मानले नाही, एवढे मी निश्चितपणे सांगू शकतो. विनोबांनीही जयप्रकाशांना कधी आपला प्रतिस्पर्धी मानले नाही. त्यांचा विरोध हा कार्यातील विक्षेपाला होता. अवांतर चळवळीमुळे भूदानाच्या कार्याला बाध येतो, असे त्यांचे मत होते. 'मी माझ्या अवांतर कामात विनोबांना किंवा सर्व सेवा संघाला संबद्ध (कमिट) करू इच्छित नाही,' असे जयप्रकाश म्हणत. तरी पण बांगलादेशाच्या कामापर्यंत सर्व सेवा संघाने त्यांचे नेतृत्व एकमताने मान्य केले होते. सर्वोदयी मंडळींनी विनोबांचे आचार्यकुलही स्वीकारले आणि जयप्रकाशांच्या गांधियन इन्स्टिट्यूटलाही मान्यता दिली. परंतु १९७४ साली बिहारचे संघर्ष आंदोलन सुरू झाल्यावर सर्व सेवा संघात दुफळी निर्माण झाली. संघाच्या दोन-तीन हजार लोकांपैकी त्रेपन्न-चोपन्न लोकांनी जयप्रकाशांच्या कार्यक्रमाला विरोध दर्शवण्यासाठी सर्व सेवा संघाचा राजीनामा दिला. त्यापूर्वी जयप्रकाशांचे कार्य व सर्व सेवा संघाचे कार्य ह्यांना गंगा व ब्रह्मपुत्रा ह्यांच्या प्रवाहांची उपमा देऊन विनोबांनी दोन्ही पक्षांना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला होता. आपण कोणतेही काम सर्व सेवा संघाच्या नावाने करीत नसून सर्व सेवा संघातील मित्रांची इच्छा असल्यास आपण संघ सोडायलाही तयार आहोत, असे जयप्रकाशांनी त्या वेळी जाहीर केले. परंतु बहुतेक लोकांना त्यांनी सर्व सेवा संघात राहावे, असे वाटल्यामुळे जयप्रकाशांनी संघाशी असलेला आपला संबंध तोडला नाही.

भूदान-ग्रामदानाचे कार्य हे मूलभूत क्रांतीचे कार्य आहे असे विनोबांप्रमाणे जयप्रकाशांचेही मत होते. पण विनोबांचे म्हणणे असे की इतर कामे करणारे अनेक लोक आहेत. भूदान-ग्रामदानाचे काम ठराविक व नैष्ठिक माणसेच करीत आहेत. तेव्हा त्याच कामावर त्यांची निष्ठा व शक्ती एकवटली तर इतरही कामे सुलभ होतील. जयप्रकाशांना वाटत होते की नेहमीच्या प्रश्नांच्या बाबतीत हे धोरण अगदी बरोबर असले तरी जेव्हा जिव्हाळ्याच्या समस्यांमुळे लोकजीवनच धोक्यात येत असेल किंवा लोकांच्या अस्तित्वावरच संकट येण्याची भीती असेल त्या वेळी त्या परिस्थितीचा मुकाबला केल्याने भूदान-ग्रामदान कार्याला मदतच होईल.

विनोबा आणि जयप्रकाश ह्यांच्यातील परस्परसंबंधाचे स्वरूप हे असे आहे.''

## विनोबांची उदासीनता

हे सारे विवेचन ऐकल्यानंतरही माझ्या मनात एक प्रश्न शिल्लक राहिला होता. म्हणून मी दादांना विचारले, ''आणीबाणीनंतर जयप्रकाशांना एकान्तवासाची शिक्षा देऊन आणि त्यांच्याविरुद्ध बदनामीची एकतर्फी प्रचार-मोहीम चालवून इंदिरा सरकारने त्यांच्यावर जो अन्याय केला होता त्याचा निषेध विनोबांनी का

केला नाही? जयप्रकाशांनी आपली सारी शक्ती एकवटून भूदानाचे काम जोरात पुढे चालवले होते, म्हणूनच नव्हे, तर आपला एक सहकारी आणि साधुचरित लोकनायक ह्या नात्यानेही विनोबांनी त्या वेळी जयप्रकाशांच्या पाठीशी उभे राहावयास हवे होते, असे तुम्हाला वाटत नाही का?''

दादा म्हणाले, ''जयप्रकाशांच्या मार्गाशी विनोबांचा काही संबंध नव्हता. किंबहुना त्यांच्या कार्यपद्धतीलाच त्यांची मान्यता नव्हती. जयप्रकाश आपली काळजी घ्यायला समर्थ आहेत. ते आपल्या प्रेरणेने वागताहेत, तर सरकार आपल्या स्वतःच्या प्रेरणेने वागते, अशी त्यांची भूमिका होती. मध्यवर्ती सरकार दुबळे होऊ नये, ही विनोबांची मुख्य इच्छा. जयप्रकाशांच्या चळवळीने ते दुबळे होईल अशी भीती त्यांना वाटत होती. अर्थात त्या वेळी जयप्रकाशांचा संघर्ष बिहार सरकारशी चालू होता, आणि ते सरकार दिल्लीच्या सरकारच्या हातात असल्याने त्यांना केंद्रीय सरकारशी लढा देणे भाग पडले होते. खरी गोष्ट अशी होती की, क्षेत्रसंन्यासानंतर प्रचलित परिस्थितीशी विनोबांचा संपर्क कमी झाला होता. जे कोणी येऊन जे काही सांगतील त्यावरच त्यांना विसंबून राहावे लागे. त्यामुळे त्यांची मते पुष्कळदा पक्षपाती वाटत.''

### जयप्रकाशांची प्रतिक्रिया

''त्यांच्या ह्या वागणुकीवर जयप्रकाशांची प्रतिक्रिया काय झाली?'' मी विचारले. दादा म्हणाले, ''त्यांना विनोबांच्या ह्या भूमिकेचे आकलनच होत नसे. ते म्हणत, 'विनोबांनी आपला तटस्थपणा सोडण्याचे कारण नाही.' तरीपण विनोबांच्या सार्वजनिक कामाचे समर्थन जयप्रकाश करीतच राहिले. आणीबाणीपूर्वी उत्तर प्रदेश सरकारतर्फे भूमिहीनांना जमीनवाटप करण्याचे काम रा. कृ. पाटील ह्यांच्या नेतृत्वाखाली सर्व सेवा संघाने स्वीकारले होते. त्या वेळी त्या कामात सहकार्य देण्याची तयारी जयप्रकाशांनी दाखवली होती. पण पाटीलसाहेब जयप्रकाशांचे सहकार्य घेऊ शकले नाहीत. कारण त्यांचे सहकार्य घेऊ नये असे काही सर्वोदयवाद्यांचे मत होते! पुढे गोवधबंदीच्या प्रश्नावरही जयप्रकाशांनी आपले सहकार्य विनोबांना देऊ केले होतेच. वस्तुतः, संघर्षवाद्यांनी विनोबांचे नेतृत्व पूर्वीपासून मान्य केलेच होते. एकंदरीत, विनोबांच्या बाबतीत आजही त्यांची भूमिका आदरयुक्त स्नेहाची व विनयाचीच आहे. ह्या साऱ्या प्रकरणात विनोबांच्या वागणुकीचे विश्लेषण करण्याचा माझा अधिकार नाही. मी त्यांना पूज्यच मानतो. जयप्रकाशांच्या बाबतीतील विनोबांची वागणूक मला पटली नाही, एवढेच मी म्हणू शकतो.''

**विनोबांचे मतपरिवर्तन**

त्यावर मी विचारले, ''विनोबांनी जयप्रकाशांना विरोध करताना टिंगल, निंदा केली. पण आपल्या 'मैत्री' मासिकावर बंदी येताच ते सरकारवर चिडले. त्यांच्या वर्तणुकीत संगती कशी लावावयाची?''

दादा म्हणाले, ''अशी संगती मला तरी लावता येत नाही. तरीपण एक गोष्ट स्पष्ट आहे. गोवधबंदीच्या प्रकरणानंतर विनोबांची मूळ भूमिका तशीच राहिली तरी त्यांचे मन पुष्कळच बदलले; आणि 'तुम्हांला योग्य वाटेल ते तुम्ही निर्भयपणे बोला,' असे ते आपल्या अनुयायांना सांगू लागले. 'मैत्री' सारख्या सात्त्विक मासिकाला व गोहत्येविषयीच्या शुद्ध सत्याग्रहाच्या संकल्पालाही सरकारच्या जुलूमशाहीचा प्रत्यक्ष फटका बसल्यानंतर त्यांचे मतपरिवर्तन झाले, असे कुणी म्हटल्यास त्याचे सहजासहजी खंडन करता येणार नाही.''

**जुन्या गांधीवाद्यांशी संबंध**

''विनोबा व जयप्रकाश ह्यांच्या परस्परसंबंधांविषयीचा जो प्रश्न मी आता विचारणार आहे त्याच्या काही पैलूंचे विवेचन ह्यापूर्वीच्या प्रश्नोत्तरांत येऊन गेले आहे. परंतु ते काहीसे अस्फुट किंवा अवगुंठित आहे. म्हणून माझा प्रश्न मी अधिक स्पष्ट शब्दात मांडतो.

''तो प्रश्न असा : जयप्रकाशांनी सर्वोदय आंदोलनात प्रवेश केल्यानंतर विनोबा व त्यांचे अंतेवासी ह्यांच्याकडून त्यांना जे महत्त्व प्राप्त झाले त्यायोगे गांधीजींच्या बरोबर काम केलेल्या जुन्या गांधीवाद्यांना वैषम्य वाटले, असे म्हणतात. त्यानंतर जयप्रकाशांनी जोपर्यंत विनोबांच्या कल्पनेप्रमाणे काम केले तोपर्यंतच ते विनोबांना प्रिय राहिले. परंतु त्यांनी जन-आंदोलनाचे काम हाती घेतल्यानंतर त्यांची लोकप्रियता सर्वोदयवाद्यांमध्येही विनोबांच्या लोकप्रियतेपेक्षा अधिक वाढली. ह्याचे विनोबांना वैषम्य वाटले; आणि म्हणून त्यांनी जयप्रकाशांचे परस्पर पारिपत्य करणाऱ्या आणीबाणीविरुद्ध ब्र काढला नाही, असे समजले जाते. ह्या समजुतीमध्ये तुमच्या मते कितपत तथ्य आहे?''

दादा म्हणाले, ''माझ्या मते ह्या दोन्ही समजुती चुकीच्या आहेत. शंकरराव देव, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, ध्वजाबाबू, वैद्यनाथ प्रसाद चौधरी, साहू, धीरेंद्रभाई, जगन्नाथन, अरुणाचलम्, रविशंकर महाराज, केदारनाथजी, मनुभाई पंचोली, वजूभाई शहा, गोकुळभाई भट्ट, सुशीला नैयर, रमादेवी, नवकृष्ण बाबू व मालतीदेवी चौधरी ही सारी अखिल भारतीय गांधीवादी मंडळी विनोबांवर निष्ठा

ठेवणारी होती. ह्या सर्वांनी जयप्रकाशांचे प्रेमाने स्वागत केले; आणि त्यांच्या कार्याचे आदरयुक्त कौतुक केले. पुढे जयप्रकाशांचे विनोबांशी मतभेद झाल्यावरही ह्या मंडळींचा जयप्रकाशांविषयीचा स्नेहादर कमी झाला नाही. ह्याचा अर्थ असा की गांधींच्या वेळची कार्यकर्ती मंडळी जयप्रकाशांच्या बरोबरच राहिली. त्यांच्यापैकी कोणालाही जयप्रकाशांच्या वाढत्या महत्त्वाचे वैषम्य वाटले नाही. उलट त्यांच्या आगमनाने भूदान चळवळीचे महत्त्व वाढले, तिला गौरव प्राप्त झाला, असेच त्यांनी मानले. अर्थात जयप्रकाशांच्या राजकीय पार्श्वभूमीमुळे त्यांच्या येण्याने आशंकित झालेली काही मंडळी त्या वेळी असतीलही. पण ती मूलतः आध्यात्मिक-धार्मिक वृत्तीची होती. जयप्रकाशांच्या भूदानातील सहभागामुळे सबंध देशात भूदानाचे आकर्षण वाढले असल्याचे सर्वांनाच जाणवले.

**विनोबांची भूमिका**

आता विनोबांच्या भूमिकेसंबंधी बोलावयाचे तर असे म्हणता येईल की जोपर्यंत विनोबांच्या अहिंसक आंदोलनाच्या कल्पनेप्रमाणे आंदोलन चालले तोपर्यंत त्यांनी त्याचे समर्थन जरी केले नाही तरी त्याला विरोधही केला नाही. परंतु जेव्हा त्यांना असे वाटू लागले की हे आंदोलन लोकनीतीचा मार्ग सोडून राजनीतीच्या मार्गाने चालू लागले आहे, तेव्हा त्यांनी त्याला उघडपणे विरोध केला. परंतु एकूण विचार करता जयप्रकाशांविषयी त्यांच्या मनात राग अथवा असूया निर्माण झाली नाही. जयप्रकाशांविषयीची त्यांची आत्मीयता यथापूर्व कायमच राहिली. अधूनमधून त्या दोघांमध्ये खटके उडाले असतील; परंतु एकूण प्रेमभावना कायम राहिली. ह्यासंबंधीचे आपले मत त्यांनी आणीबाणीच्या काळात व्यक्त केले होते; परंतु ते जाहीर झाले नाही. आणीबाणीविरुद्धही ते बोलले होते; परंतु त्याला प्रसिद्धी मिळाली नाही. त्यांच्या बोलण्यामध्ये इंदिरा सरकारला जेवढे अनुकूल आणि जयप्रकाशांच्या आंदोलनाला जेवढे प्रतिकूल होते, तेवढेच प्रसिद्ध झाले. परंतु जयप्रकाशांना अनुकूल असे ते जे काही बोलले ते अप्रसिद्धच राहिले. हे असे का घडले ह्याचे कारण मला सांगता येत नाही.

विनोबा जेव्हा स्वतःच्या ठिकाणी (आत्मावस्थित) असतात, त्यात कोणताही विक्षेप नसतो, तेव्हा त्यांचे व्यक्तित्व आगळेच असते. त्या स्थितीतील त्यांची अभिव्यक्ती निरूपाधिक असते. सामान्यतः ते कशातही फारसे लिप्त होत नाहीत. अशा वृत्तीला त्यांनीच 'स्व-स्थ' हे नाव दिले आहे. ही त्यांची 'स्वस्थ'वृत्ती ते स्वतःमध्ये लीन असतात तेव्हा असते. परंतु अधूनमधून त्यांना इतर मंडळी भेटायला जात त्या वेळी त्यांच्या ह्या वृत्तीत विक्षेप निर्माण होई; आणि काही

उद्‌गार प्रसंगपरत्वे त्यांच्या तोंडून बाहेर पडत.* परंतु हे असे सर्वच थोर विभूतींच्या बाबतीत घडते. ते तसे का घडते याचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण देणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे."

**विनोबांची भूमिका : दादांची प्रतिक्रिया**

"विनोबांच्या ह्या वर्तणुकीचा स्वतः तुमच्यावर काय परिणाम झाला?" मी विचारले,

दादा म्हणाले, "विनोबांची वागणूक मला पटली नाही. ती मला अनाकलनीय वाटली. त्यामुळे मला वाईटही वाटले. पण त्यांच्याविषयीच्या माझ्या मनातील आदरात व प्रेमात काही फरक पडला नाही. तसे का घडले हेही सांगता येत नाही. कदाचित तो माझ्या स्वभावाचा स्थायीभाव असावा. जयप्रकाशांशी माझा मतभेद झाला असता–आणि आजही त्यांच्याशी माझा मतभेद होतो–तरी त्यांच्याविषयी माझा प्रेमादर कायमच राहिला असता. तसे पाहिले तर जयप्रकाशांच्या चळवळीतील अडथळा करणारे घेराव, बंद, काही मोर्चे वगैरे गोष्टी मला पटल्या नाहीत; आणि मी त्यांना वेळोवेळी तसे स्पष्टपणे बोलूनही दाखवत असे. पण त्यांच्या मूलभूत भूमिकेशी मी सहमत होतो. त्यांच्या सभा-मिरवणुकीत मी भाग घेतला नाही. मात्र १९७४ च्या नोव्हेंबरमध्ये जयप्रकाशांच्या पाटण्यातील एका प्रचंड सभेला मी फक्त हजर होतो. सार्वजनिक निवडणुकीचे आव्हान त्यांनी त्याच सभेत स्वीकारले होते–मात्र त्यांच्या आंदोलनाची तर्कशुद्ध भूमिका मी स्वतंत्रपणे उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश वगैरे राज्यांतून लोकांसमोर मांडली. बुद्धिवादी वर्गावर माझ्या विवेचनाचा प्रभावही पडला. पण जयप्रकाशांच्या चळवळीत मात्र मी प्रत्यक्षपणे भाग घेतला नाही. तसे त्यांना मी सांगतही असे. मी त्यांना म्हणे, 'आता मी सर्व कामातून निवृत्त होत आहे. तरीपण तुमची चळवळ हे ईश्वरी वरदान आहे, असे मी मानतो. म्हणून तिचा मी यथाशक्ती पुरस्कार करीत राहीन.' गुजरातच्या आंदोलनाचे समर्थन मी केले नाही. त्यांच्या मागणीला माझा पाठिंबा होता. परंतु दंगली, जाळपोळ वगैरे गोष्टी मला मान्य नव्हत्या."

---

* आणीबाणीच्या आतंकपर्वाला त्यांनी अनुशासन पर्व म्हणून जे प्रशस्तिपत्र दिले, त्याला उद्देशून दादांनी हे विधान केले असावे. श्रीमाली व सुखाडिया त्यांना भेटण्यासाठी गेले असता त्यांनी सरकारविषयीही प्रतिकूल उद्गार काढले होते. पण ते प्रसिद्ध झाले नाहीत.

— श्रीपाद जोशी

## जयप्रकाशांचा भावी कार्यक्रम व इतर प्रश्न

"जनता सरकार सुरळीत चालू लागल्यावर जयप्रकाश पुन्हा त्यांच्या पूर्वीच्या कामात परत जातील असे तुम्हांला वाटते काय?" मी विचारले.

"ते ह्यापुढे भूदानासारखेच काम करतील असे मला वाटते." दादा सांगू लागले, "ग्रामस्वराज्य, दक्षता समित्या (व्हिजिलन्स कमिटीज) वगैरे कामात ते अधिक लक्ष घालतील, असा माझा अंदाज आहे. जनता सरकार लोकविरोधी मार्गाने जाऊ लागल्यास त्याच्या विरुद्ध संघर्ष करायलाही ते मागेपुढे पाहणार नाहीत. विनोबांचा कार्यक्रम हाच शाश्वत व मुख्य कार्यक्रम असू शकतो, त्यात शांतिमय प्रतिकाराचा (प्रसंगविशेषी) समावेश करावा लागेल. जयप्रकाशांचा नित्य कार्यक्रम विधायक लोकशक्ती जागृत करण्याचा आहे. त्यात सरकारकडून व्यत्यय आला तर मात्र शांतिमय प्रतिकाराची शक्तीही लोकांत जागृत असली पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे."

## भांडवलवाल्यांचे मित्र?

"स्वतःला साम्यवादी, समाजवादी किंवा पुरोगामी समजणारे लोक जयप्रकाशांना भांडवलवाल्यांचे मित्र म्हणून हिणवतात. त्याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे?" मी विचारले.

त्यावर दादा म्हणाले, "जयप्रकाश हे गांधींप्रमाणे माणूस व प्रणाली (सिस्टिम) ह्यामध्ये फरक करतात. भांडवलशाही ही समाजकल्याणाला प्रतिकूल असल्यामुळे तिचा नाश झाला पाहिजे, हे त्यांना मान्य आहे. परंतु भांडवलशाहीचा नाश करण्याच्या कामी भांडवलदारांचाही उपयोग करून घेता येईल असे त्यांना वाटते. म्हणून वर्गनिराकरणाला जे भांडवलदार अनुकूल असतील त्यांचे त्या कामी सहकार्य घेतले पाहिजे, असे ते सांगतात. माणूस म्हणून सर्वांविषयीच त्यांच्या मनात प्रेम वसत असते. ज्या सरकारच्या अन्यायाविरुद्ध ते संघर्ष करीत होते त्या सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पंतप्रधान इंदिरा गांधींवरही त्यांनी नेहमीच मुलीप्रमाणे प्रेम केले. त्यांचा प्राण वाचवण्यासाठी त्यांनी आपला जीव धोक्यात घालण्यास कधीच मागेपुढे पाहिले नसते. 'जानवे नको', 'भटजी नको', असे सांगत असताना त्यांनी कधी ब्राह्मणांचा द्वेष केला नाही. भांडवलदारालाही ते भांडवलशाहीप्रणालीचा बळी मानतात. ही त्यांची भूमिका भूदानातून निष्पन्न झाली आहे. अर्थात भांडवलवाल्यांवर प्रेम करीत असतानाच त्यांच्या अन्यायाला प्रतिकार करण्यासही ते सिद्ध असतात. कुळांना जमिनीवरून हुसकून लावणाऱ्या

जमीनदाराविरुद्ध सत्याग्रह केला पाहिजे, असे ते म्हणत; आणि विनोबांनीही त्याला संमती दिली होती.''

''परंतु ज्या श्रीमंतांशी जयप्रकाश मैत्रीचे संबंध ठेवतात त्यांच्या मनात काही परिवर्तन आतापर्यंत घडून आले आहे काय?'' मी विचारले.

दादा म्हणाले, ''जयप्रकाशांच्या श्रीमंत मित्रांपैकी अनेकजण विश्वस्ततेच्या (ट्रस्टीशिपच्या) सिद्धान्तावर श्रद्धा बाळगणारे आहेत. वस्तुतः जयप्रकाशांशी मैत्री ठेवण्यात त्यांचा काहीच फायदा नव्हता. उलट तोटाच होता. केवळ जयप्रकाशांशी स्नेह ठेवला ह्या एकाच गुन्ह्याबद्दल रामनाथ गोयंका ह्यांच्यासारख्या धनिकाचा इंदिरा सरकारने किती भयंकर छळ केला ! तरी पण ते हिमतीने जयप्रकाशांना मदत करण्यास पुढे आले. मात्र बिर्ला, टाटा, बजाज, दालमिया वगैरे अगदी वरच्या वर्गातील मोठे भांडवलवाले जयप्रकाशांना वर्गनिराकरणाच्या कामात प्रत्यक्ष मदत देण्यास तयार नाहीत. मुख्यतः मधल्या थरातील भांडवलदारच जयप्रकाशांचे मित्र आहेत. जयप्रकाशांमधील साधुत्वानेच ही मंडळी त्यांच्याकडे आकर्षित झाली आहेत, असे मला वाटते.''

## आंदोलनाला फाटे का फोडले?

जयप्रकाशांसंबंधी पायाभूत माहिती मिळविल्यानंतर त्यांच्या आंदोलनाविषयी दादांचे मत जाणून घेण्याची इच्छा मला झाली. ज्या मुद्यांची चर्चा जाहीरपणे अनेकदा झाली आहे, ज्या आक्षेपांना जयप्रकाशांनी स्वतः वेळोवेळी विस्ताराने समर्पक उत्तरे दिली आहेत, त्याची चर्चा करण्यात काही स्वारस्य नव्हते. म्हणून सामान्यतः लोकांपुढे न आलेल्या मुद्यांविषयीच दादांचे मत जाणून घ्यावे, असे ठरविले. म्हणून मी त्यांना विचारले, ''जयप्रकाशांनी आपल्या आंदोलनात मुख्यतः भ्रष्टाचारविरोध किंवा भ्रष्टाचार-निर्मूलन ह्यावर भर द्यावयास हवा होता. त्याऐवजी शिक्षणाची पुनर्घटना ह्यासारखे विवादास्पद मुद्दे त्यांनी आणल्यामुळे त्या आंदोलनाला फाटे फुटले व ते कमजोर पडले असे काही लोकांना वाटते. ह्याबाबतीत तुमचे मत काय आहे?''

दादा म्हणाले, ''एकाच वेळी अनेक मुद्दे घ्यायला नको होते, हे म्हणणे रास्त आहे. भूदानाच्या बाबतीत विनोबांचीही हीच नीती होती. पण तसे का घडले, हे समजावून घेतले पाहिजे. शिवाय मागण्या जरी अनेक असल्या तरी प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी मुख्य मागणीवरच जोर केंद्रित झाला, हेही लक्षात ठेवले पाहिजे. राजकीय (म्हणजे निवडणुकीतील) आणि प्रशासकीय (सरकारातील) भ्रष्टाचार नष्ट करणे हेच जयप्रकाशांच्या आंदोलनाचे मूलभूत सूत्र होते. त्यांचे

आंदोलन प्रारंभी बिहारपुरतेच मर्यादित होते. बिहारचे मुख्यमंत्री अब्दुल गफूर ह्यांना जयप्रकाशांनी सांगितले की, 'तुमच्या मंत्रिमंडळातील अमुक इतके मंत्री भ्रष्ट आहेत, असे समजते. त्यांची चौकशी करून ते दोषी आहेत असे आढळून आल्यास तुम्ही त्यांना काढून टाका.' परंतु गफूरसाहेबांनी तसे काही केले नाही. तेव्हा मग जयप्रकाशांनी बिहारच्या आमदारांना ह्या बाबतीत पुढाकार घेण्याचे आवाहन केले. पण त्यांनीही काही हालचाल केली नाही. म्हणून अखेर त्यांना विधानसभा बरखास्त करण्याची मागणी करावी लागली. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याची तरतूद आपल्या घटनेत नाही. म्हणून पंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत सभा घेऊन विधानसभा बरखास्त करण्याची मागणी त्यांनी केली. त्यासाठी जनतेतून लक्षावधी सह्या गोळा करण्यात आल्या. ह्याचा अर्थ असा की ती जनतेची मागणी होती; नुसती हुल्लडबाजी किंवा जमावबाजी नव्हती. प्रत्यक्ष घेरावाच्या कार्यक्रमाच्या वेळी मतदार नसलेले इतर लोकही त्यात सामील झाले; परंतु त्याला इलाज नव्हता. मुळात विद्यार्थ्यांच्या काही मागण्या होत्या. त्यांच्याविषयी बोलणी होऊ शकली असती; पण सरकारने बोलणी करायला नकार दिला. ह्या संबंधात इंदिरा गांधींशी जयप्रकाशांची मुलाखत झाली त्या वेळीच इंदिराजींनी सांगितले, 'बिहार असेंब्लीच्या बरखास्तीचा मुद्दा सोडून इतर कोणत्याही विषयासंबंधी तुम्ही बोला.' जयप्रकाश म्हणाले, 'इतर गोष्टींसंबंधीही मी बोलेन. पण मुख्य प्रश्न सुटायचा असेल तर बिहारची विधानसभा बरखास्त होणे आवश्यक आहे. तसे ताबडतोब करणे शक्य नसेल तर ती निवडणुकीपर्यंत तहकूब करा.' इंदिराजी म्हणाल्या, 'तसे करणे म्हणजे प्रत्यक्षात ती बरखास्तीच होईल.' अशा प्रकारे विधानसभा-विसर्जन हा प्रतिष्ठेचा मुद्दा बनला. त्यामुळे त्यांच्यात तडजोड होऊ शकली नाही. इंदिराजींनी जगजीवनरामबाबूंना मुलाखतीत बोलावून घेतले. बाबूजी जयप्रकाशांना म्हणाले, 'तुमची चळवळ शहरापुरतीच मर्यादित आहे. ती खेड्यापाड्यात जाऊन पोचलेली नाही.' जयप्रकाश म्हणाले, 'तुम्ही स्वतः खेड्यांत जा आणि पाहा म्हणजे तुम्हांला वस्तुस्थिती समजेल.' अशा प्रकारे बोलणी फिसकटली.''

''व्यक्तिशः मला असे वाटते की विधानसभा बरखास्तीच्या मागणीवर जयप्रकाशांनी जोर द्यायला नको होता. परंतु नंतर ती मागणीच प्रमुख बनली. लोकांमधील प्रक्षोभाला जयप्रकाशांच्या शांततापूर्ण आंदोलनाने आटोक्यात ठेवले, ही जयप्रकाशांची फार मोठी कर्तबगारी होती. त्या काळात केंद्रीय सरकारचे एक मंत्री पाटण्याला जयप्रकाशांना भेटून म्हणाले, 'आपने बिहारको बचाया; वरना न मालूम जान-मालका कितना नाश हो जाता!' मात्र ह्याच मंत्र्यांनी दिल्लीला

गेल्यावर संसदेत ह्याच्या अगदी उलट भाषण केले. बहुतेक सारेच कॉंग्रेस पुढारी इंदिराजींच्या दडपणाखाली होते. ते जयप्रकाशांजवळ एक बोलत तर दिल्लीला गेल्यावर दुसरेच बोलत.''

### जातीयवाद्यांशी सहकार्य

''जयप्रकाशांच्या आंदोलनावर आणि नंतर निर्माण झालेल्या जनता पक्षावर स्वतःला पुरोगामी व धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या व्यक्ती व पक्ष ह्यांचा महत्त्वाचा आक्षेप असा होता की त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघ ह्यांना सामील करून घेतल्यामुळे त्यात जातीयवाद्यांचे वर्चस्व झाले आहे. ह्यात कितपत तथ्य आहे? आणि जर काही तथ्य नसेल तर असा गैरसमज पसरविण्याची संधी जयप्रकाशांनी विरोधकांना का दिली?'' मी विचारले.

त्यावर दादा म्हणाले, ''संघ-जनसंघाच्या विचारसरणीवर, त्यांच्या हिंदुराष्ट्र कल्पनेवर जयप्रकाशांनी नेहमीच जोरदार हल्ले केले होते. परंतु कालांतराने ते आपली भूमिका बाजूस सारून जयप्रकाशांना सहकार्य देण्यास तयार झाले होते. त्यांनी काहीही हातचे न राखता जयप्रकाशांचा कार्यक्रम मान्य केला होता. जयप्रकाशांच्या सान्निध्यात आल्यावर त्यांच्या अद्भुत व्यक्तित्वाने ते अगदी भारावून गेले. त्यांची शिस्त, कार्यनिष्ठा वगैरे गोष्टींचे जयप्रकाशांना फार कौतुक वाटे. पुढे पाटण्याच्या मिरवणुकीत नानाजी देशमुखांनी जयप्रकाशांवरील लाठीचा आघात स्वतःवर झेलला, तेव्हा त्यांचे मनोमीलनच होऊन गेले. ही मंडळी आपल्या समग्र क्रांतीला उत्तम प्रकारे उपयोगी पडतील असा विश्वास जयप्रकाशांना वाटला; आणि त्यांनी मोकळ्या मनाने त्यांना आपल्या आघाडीत सामील करून घेतले. नक्षलवाद्यांविषयीही जयप्रकाशांना कौतुक वाटते. त्यांच्या शौर्याची, निर्भयतेची ते कदर करतात. परंतु त्यांनी त्यांना आपल्या कामात मात्र सामील करून घेतले नाही. कारण नक्षलवाद्यांचा शांततापूर्ण मार्गावर विश्वास नव्हता. ह्याच्या उलट संघ-जनसंघवाल्यांनी शांततापूर्ण मार्ग मनापासून स्वीकारला असल्याचे त्यांना पटले होते. म्हणून गैरसमज पसरवला जाण्याचा धोका पत्करूनही त्यांनी आपल्या आघाडीत त्यांना सामील करून घेतले. खरे म्हणजे जे लोकव्यापी आंदोलनात भाग घेतात त्यांच्या भूमिकेचे शुद्धीकरण होत असते, असा अनुभव आहे.''

### जयप्रकाशांचे जीवितकार्य

''जयप्रकाशांनी विरोधी पक्षांचे ऐक्य घडवून आणले, हा आधुनिक भारतातील एक चमत्कार समजला जातो. ह्या बाबतीत तुमचे मत काय आहे?'' मी विचारले.

"तुमचे म्हणणे खरे आहे." दादा म्हणाले. "ह्या देशात विरोधी पक्षांना काही स्थान नाही, येथील विरोधी पक्ष आपसातील मतभेदांमुळे एकत्र येऊ शकणार नाहीत, अशीच बहुतेक लोकांची समजूत होती. पण जयप्रकाशांनी विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणण्यासाठी आपली सारी शक्ती खर्च केली; आणि मुख्यतः त्यांच्याच प्रयत्नामुळे ते अद्भुत कार्य घडून आले. या देशात प्रभावशाली विरोधी पक्ष उभा राहू शकतो, हे लोकांना दिसून आले. एवढेच नव्हे तर सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाला त्यांनी एक पर्यायी पक्ष उभा करून दाखवला, हे त्यांचे कार्य भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. जगातील विकासशील देशांनाही त्या योगे प्रेरणा मिळेल."

"आता एक शेवटचा प्रश्न. जयप्रकाश नारायण ह्यांच्या एकूण जीवितकार्याचे समालोचन तुम्ही थोडक्यात कसे कराल?" मी विचारले.

दादा म्हणाले, "संघटनात्मक किंवा संख्यात्मक काम करणे जयप्रकाशांच्या स्वभावातच नाही. ह्यामुळे डोळ्यांत भरण्यासारखी मोठी संघटना ते उभारू शकले नाहीत, याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. परंतु जन-जागृतीची संधी जेव्हा जेव्हा त्यांना मिळाली तेव्हा तेव्हा त्यांनी प्रचंड प्रमाणावर लोकजागृती केली. तसे ते रेल्वेमेन्स फेडरेशन, पोस्ट अँड टेलिग्राफ्स एम्प्लॉईज असोसिएशन, समाजवादी पक्ष, इत्यादी संघटनांचे अध्यक्ष होते; आणि त्या त्या वेळी त्यांनी भरीव कामही केले. परंतु त्यांचे खरे कार्य लोकजागृतीचे व लोकसेवेचेच. जनता पक्षाची बांधणी आणि उभारणी हे त्यांचे अगदी अलीकडच्या काळातील एक महत्त्वाचे कार्य. जनता पक्षाने भ्रष्टाचार आणि सत्तेचा दुरुपयोग एवढ्या दोन गोष्टी कटाक्षाने टाळण्यात जरी यश मिळवले तरी भारतीय जनता सदैव त्या पक्षाच्या पाठीशी उभी राहील. ह्या पक्षाच्या स्थापनेच्या रूपाने आपल्या देशात शुद्ध लोकशाहीचा पाया घातला गेला आहे. त्याचे श्रेय सर्वस्वी जयप्रकाशजींनाच आहे. ह्यापेक्षा अधिक कशाची अपेक्षा आपण त्यांच्याकडून करावी?"

अर्थात स्वतः जयप्रकाशजी ह्या यशावर समाधान मानण्याइतके अल्पसंतुष्ट नाहीत. त्यांच्यासमोर समग्र क्रांतीचे ध्येय पूर्वीइतक्याच उत्कटपणे आजही ध्रुवताऱ्यासारखे स्थायी आहे. त्या दिशेने त्यांचे प्रयत्नही चालू आहेत. परमेश्वराने त्यांना आयुरारोग्य दिले तर ह्या ध्येयाच्या दिशेने ते खूपच मजल मारतील, अशी आशा आपण करावी.

❑❑

---

[३ ते ६ एप्रिल १९७७ : म्हैसूर, 'जयप्रकाश : एक संभाषण' ह्या किर्लोस्कर प्रेस प्रकाशनाच्या पुस्तकातून त्यांच्या सौजन्याने]

# दादा धर्माधिकारी यांचे साहित्य

## मराठी

सर्वोदय दर्शन
दादांच्या शब्दात दादा; भाग १-२
आपल्या गणराज्याची घडण
दादांच्या बोधकथा
स्नेहाचे झरे
अंतरीचे उमाळे
स्त्री-पुरुष सहजीवन
क्रांतीच्या संदर्भात
क्रांतिवादी तरुणांनो
संपूर्ण क्रांती
मैत्री
पहाटतारे
आशा उद्याची
तरुणाई
मानवनिष्ठ भारतीयता
प्रिय मुली
लोकनीती विचार
क्रांतीचे पुढचे पाऊल
मानवतेचा मापदंड म. गांधी
मनिषीची स्नेहगाथा
दादा धर्माधिकारी – जीवनदर्शन
लोकशाही विकास आणि भविष्य
नागरिक विश्वविद्यालय एक परिकल्पना
स्त्रिया आणि क्रांती

## इंग्रजी

Philosophy of Total Revolution
Philosophy of Sarvodaya
Talks on Total Revolution
Women and Revolution
Man-woman Mutual Fellowship – ?

●

## तेलगू

साम्ययोग तिस्ते बापीयील

●

## कानडी

मानवीय निस्ते - सर्वोदय क्रांती

●

## हिंदी

सर्वोदय दर्शन
अहिंसक क्रांतीकी प्रक्रिया
लोकक्रांतीके आयाम
स्त्रीपुरुष सहजीवन
मानवीय क्रांती
क्रांतिका अगला कदम
लोकनीती के मूलतत्त्व

दादा की नजरसे लोकनीती
लोकनीती विचार
गांधी की दृष्टी
अगला कदम –
साम्ययोग की राहपर
लोकतंत्र विकास और भविष्य
लोकतंत्र की चुनौती
मनुष्य की नयी मंजील : मैत्री
गांधीपुण्य स्मरण
दादा के शब्दों मे दादा, भाग १-२
नागरिक विश्वविद्यालय :
एक परिकल्पना
संपूर्ण क्रांती के आयाम
सारस की टांग
क्रांतिकारी तरुणोंसे
बहने और क्रांती
नये युग की नारी
गांधी का संदर्भ
मनिषी की स्नेहगाथा
मानवीयनिष्ठा – (सम्यक दर्शन)
मानवनिष्ठ भारतीयता
दादा की सूक्तियाँ

●

## गुजराथी

विचारक्रांती - ४ खंडो मे
क्रांतिनुं शुद्ध साधन
तरुणोने
सर्वोदयनी मीमांसा
बहनो अने क्रांती
स्त्रीपुरुष सहजीवन
देशनु पायातुं राजकारण
मनिषीनी स्नेहगाथा
विश्लेषण
बिहार आंदोलनु समर्थन–
शामाटे करू छुं
बुद्ध, शंकर, मार्क्स, गांधी शांतिविचार
दादाना चुटका

●

## मल्याळी

विप्लव पूरोगमनम्
बहुजन विप्लव तिन्डे मानङल
विप्लव कारियाय युवाक्कलाडू
सर्वोदय दर्शन
कथामृतम्
स्त्री-पुरुष बन्धङळ

# क्रांतिशोधक

दादा धर्माधिकारी

संकलन आणि संपादन
तारा धर्माधिकारी



...जयप्रकाशजी स्वत: ला 'क्रांतिशोधक' म्हणत. संपूर्ण क्रांती व लोकक्रांतीचे त्यांचे स्वत:चे असे अनोखे स्वप्न होते. त्यांना त्यागाचे, सेवेचे, निर्माणाचे, संघर्षाचे, संपूर्ण क्रांतीचे मार्गच मान्य होते. ती त्यांच्या शोधाची ध्येय-निधाने होती. त्यामुळे ते त्यांच्या विफलतेवरही संतुष्ट होते. पण ते म्हणत की त्यांचे विफल जीवन शतश: धन्य होईल, जर समानधर्मी प्रिय तरुणांचा काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग ते जरासा तरी सुगम करू शकलेत. जयप्रकाशजींना अपयश आले असे तरी कसे म्हणता येईल? परंतु तसे पाहिले तर जटायूचे अपयश किंवा अल्पयश रावणाच्या यशापेक्षा श्रेष्ठच होते ना? खरे तर जयप्रकाशजींचे संपूर्ण क्रांतीचे प्रयत्न विफल झालेत ही आमची विफलता आहे. त्यांची सफलता व विफलता यांची परिभाषाच भिन्न होती. क्रांती थांबत नसते तर प्रत्येक पिढी क्रांतीचा पुढचा अध्याय लिहून काढीत असते. आणि क्रांतीच्या प्रगतीपथाच्या प्रक्रियेत अंतिम अध्याय नसतोच कारण क्रांतीचा शोध सुरूच असतो. क्रांतीचे बेरीज-वजाबाकीचे अंकगणित नसते. त्यांत बीजगणितात असतात तसे संकेत असतात. क्रांतीची प्रतीके असतात. 'बुलेट' नव्हे तर 'बॅलेट'ने लोकजागृतीद्वारे सत्तापरिवर्तन होऊ शकते हे दाखवून देणारे जयप्रकाशजी दुसऱ्या क्रांतीचे 'लोकनायक' होते...

... भावी इतिहासाचा नवीन अध्याय लिहू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक 'पाथेय' ठरेल अशी खात्री आहे.

किंमत : रु. १२५.००
(म-९६२)
ISBN 81-7185-786-8

पॉप्युलर प्रकाशन

मुखपृष्ठ : उल्हास मोझेस